
ज़िंदाबाद
बाबा कदम



“ झिंदाबादबद्दल चार शब्द .... ”

घराण्याचा, खानदानीचा अनाठायी अभिमान बाळगणाऱ्या अनेक व्यक्ती मी जवळून बघितल्या आहेत. घराण्याची प्रतिष्ठा जपण्यासाठी ही मंडळी कोणत्या स्थराला जाऊ शकतात याचे प्रतिबिंब ‘ झिंदाबाद’ मध्ये रंगविण्याचा मी प्रयत्न केला आहे.

यातील प्रसंग आणि व्यक्तीरेखा मात्र काल्पनिक आहेत. वास्तवातील कोणा व्यक्तीशी अगर प्रसंगाशी साधर्म्य आढळल्यास तो एक योगायोग समजावा.

--- बाबा कदम
१० जुलै १९९२

१.

चिंचली, नावाची बरीच गावं महाराष्ट्रात आहेत, पण या चिंचलीला 'जहागिरदार चिंचली' म्हणून ओळखलं जातं. गणेशपूर जिल्ह्याच्या पश्चिमेला असलेलं हे गाव तसे फार मोठे नाही. गावची लोकसंख्या जेमतेम पाच सहा हजाराच्या आसपास आहे. गावाच्या पिकाऊ जमिनीपैकी एकतृतीयांश जमीन पूर्वी जहागिरदारांच्या मालकीची होती. अमृतराव घोरपडे जहागिरदारांच्या पत्नीने काळाची पावलं ओळखली.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर महाराष्ट्रातले कुळकायदे बदलण्याची लक्षणं दिसू लागताच, पद्मावाईनी आपल्या मालकीची दीडशे एकर जमीन हळूहळू कुळानाच विकून टाकली. गावाजवळची वडिलार्जित 'सरकार शेरी' नावाची चव्वेचाळीस एकर जमीन मात्र स्वत कडे ठेवली.

अमृतराव घोरपडे जहागिरदार याना पर्वापार

घराण्याची जुनी वंशावळ आणि ताम्रपट होता. या वंशावळीत सेनापती संताजीराव घोरपडे यांच्या नावाचा उल्लेख होता.

पावणेसहाफूट उंचीचे अमृतराव रंगानं गोरे, गरुड चोचीसारखं नाक आणि ओठावर टोकदार मिशा, यामुळं त्यांना बघताक्षणीच कोणाही नवख्या गृहस्थावर त्यांची छाप पडत असे. अमृतरावांच्या पत्नी पद्मावाई, या नगरदेवाळे इथल्या रघोजीराव देशमुखांच्या कन्या. अमृतरावाना दोनच मुलं. थोरला विक्रम आणि त्याच्या पाठची मीनल तीसुद्धा बापासारखीच गोरी; आणि रेखीव होती. अमृतरावानी विक्रमला एस्.एस्.सी. झाल्यानंतर शिक्षणासाठी पुण्याला ठेवलं. बंडगार्डन रोडला त्याच्यासाठी 'फ्लॅट' घेतला होता. विक्रमला बाहेरचं जेवण आवडत नाही म्हणून गावाकडून नरसिंग नावाचा आचारी तिथं नेऊन ठेवला होता.

मीनलला एस्.एस्.सी पास झाल्यानंतर पुण्याला नेऊन ठेवावं, ग्रॅज्युएट करावं, आणि मगच तिच्यासाठी स्थळ शोधावं असा पद्मावाईनी विचार केला होता. पण त्यावेळी चिंचलीला अचानक मुरारराव घोरपडे, अमृतरावांचे चुलत भाऊ आले आणि मीनलचं पुण्याला जाणं रहित झालं.

गावातला वडिलार्जित वाडा फारच जुना झाला होता. प्रत्येक पावसाळ्यात थोडी थोडी पडझड होत होती. वाड्याचं आवारही प्रचंड होतं. त्या वाड्याची डागडुजी करण्यात पैसे घालवण्यात अर्थ नाही असा विचार करून पद्मावाईनी 'सरकार शेरी' या आपल्या गावालगतच्या जमिनीतच दोन मजली बंगला बांधला होता. बंगल्याभोवती नारळीची पन्नास झाडं लावलेली होती. शिवाय बंगल्याच्या भोवताली आंबा, फणस चिक्कू आणि मोसंबीची झाडं होती. बंगल्याभोवतालचा परिसर नयनरम्य होता.

पावसाळ्यातले चार महिने सोडले तर अमृतरावांचा दिवसाकाठचा बराच वेळ बागेत जायचा. चिक्कूच्या झाडाखाली प्रशस्त असा संगमरवरी फरशी घातलेला चबुतरा त्यानी बांधून घेतलेला होता. तिथंच दुपारच्या

जेवणानंतर अमृतराव आणि पद्मावती बोलत बसत होते. दुपारी दोन अडीचच्या सुमारास बंगल्यासमोर पोलिसांची निळी जीप येऊन थांबली. जीपमधून पोलिस इन्स्पेक्टर मुरारराव घोरपडे आले होते. मुरारराव हे अमृतरावांचे सख्खे चुलत भाऊ. दोघांच्या वयात तसं फारसं अंतर नव्हतं, मुरारराव फक्त सहा महिन्याने अमृतरावांच्यापेक्षा मोठे होते.

मुराररावांना पाहून अमृतराव आणि पद्माबाई उठून उभे राहिले. मुरारराव जवळ येताच खानदानी रीतीरिवाजानुसार अमृतरावांनी त्याना मुजरा केला. मुराररावांनीही किंचित लवून अमृतरावांच्या मुजऱ्याचा स्वीकार केला. पद्माबाईनीही मुराररावांना नमस्कार केला.

"आज अचानक इकडं कुठं?"

अमृतरावांनी मुराररावाना चबुतऱ्यावर बसता बसता विचारलं.

"एका मर्डरच्या तपासासाठी आलो होतो!"

"मर्डर? कुठला हो?" पद्माबाईनी विचारलं.

"तो या भागात झालेला नाही. तो तिकडे जतेकडं उमराणी गावात झालाय्, पण त्यातला फरारी आरोपी तुमच्या या केटलोंडच्या जंगल भागात वावरतो अशी खबर मिळाली म्हणून आलो होतो."

"मग आरोपी मिळाला का?"

"असे फरारी आरोपी पोलिसांना कधी चट्कन मिळत असतात? पण तो मिळेल! सुभाना नावाचा एक धनगर आम्हाला मिळालेला आहे. त्याच्याकडून फरारी आरोपीचा ठावठिकाणा लवकरच मिळेल! बरं, मीनल काय म्हणते?"

"बरी आहे! नुकताच तिचा एस्.एस्.सीचा रिझल्ट लागला. पासष्ट टक्के मार्क्स मिळालेत. तिलाही विक्रमसोबत पुण्यालाच् ठेवावं म्हणतेय्. पुढं शिकायची हौस आहे. तिला!" पद्माबाई म्हणाल्या,

मुराररावानी खिशातून कॅप्स्टन् सिगारेटचं पाकीट काढून त्यातली एक सिगारेट ते ओठात धरण्याच्या तयारीत असताना अचानक थबकून म्हणाले,

"काय? मीनलला पुण्याला शिकायला ठेवताय? तिचा पुढचा काही विचार केलांत का?"

"कसला?"

"तिला ग्रॅज्युएट करून काय मास्तरीण करणार आहात?"

"छे ऽऽऽ नोकरीचा हेतू मुळीच नाही. आज काल एस्.एस्.सी. म्हणजे शिक्षण नव्हे. मुलीनी कमीत कमी ग्रॅज्युएट तरी व्हायला हवं!" पद्मावाई म्हणाल्या,

"पण आपल्यातल्या बऱ्याच ग्रॅज्युएट झालेल्या मुली घरीच बसून आहेत. इनामदार जाधवांच्यात दोन आहेत, सावळजच्या सावंताच्या मुली पैकी एक डबल ग्रॅज्युएट आहे. जाधव आणि सावंत गेली दोन तीन वर्षं मुलींच्यासाठी स्थळ शोधत आहेत, पण आपल्यात बसतील अशी स्थळ मिळतात कुठं?"

"पण जमाना बदलतोय् भावोजी, उद्या हेच दिवस राहतीलच असं नाही." पद्मावाई बोलल्या–

"एक सांगू वैनी तुम्हाला?"

"बोला!"

"मुली शिकल्या की त्यांचीही अपेक्षा वाढते! वडिलधाऱ्या मंडळींनी त्यांच्यासाठी स्थळं शोधली की त्यात त्या काही ना काही दोष शोधत रहातात. शिवाय काय आहे, या वयात मुलं काय आणि मुली काय थोडी स्वप्नाळूच असतात. व्यवहारी जगाची त्याना जाणीव नसते, या वयात कुणाच्यातरी प्रेमात पडल्या की कसलंही साहस करायला मागेपुढे पहात नाहीत! खात्यात आल्यापासून मी घरदार टाकून प्रियकरासोबत पळून गेलेल्या चांगल्या घराण्यातल्या अनेक मुलींची प्रकरणं हाताळलेली आहेत."

"पण तुम्हाला आपली मीनल असा काही प्रकार करेल असं वाटतं?"

सिगारेटचा एक प्रदीर्घ झुरका घेऊन ती विझवून खाली टाकत

मुरारराव म्हणाले, "त्याचं काय आहे वैनी, कोणाच्या आयुष्यात कसले प्रसंग येतील आणि त्यातून काय निर्माण होईल याचा भल्याभल्यांना अंदाज करता येत नाही. परवाची गोष्ट सांगतो. आमच्या कारंजी गावी एक मोठा सुताचा व्यापारी आहे. माणूस अतिशय चांगला! साहित्य, कला या क्षेत्रात रस घेणारा! त्याला एकच मुलगी. स्नेहल तिचं नाव. रोज दुर्गापूरला कॉलेजला एस्.टी.नं जायची. त्याच एस्.टी.नं एक लोहाराचा मुलगा आय.टी.आय.च्या कोर्ससाठी दुर्गापूरला जात असे. या दोघांची ओळख झाली. ओळखीचं रुपांतर प्रेमात झालं. दुर्गापूर शहर मोठं. ती दोघं मिळून हॉटेलात जायची, सिनेमा पहायची, असं होता होता त्या व्यापाऱ्याच्या कानावर ही गोष्ट गेली. त्यानं तिचं शिक्षण बंद केलं. पुढं त्या मुलीनं काय केलं असेल?"

"काय?"

"अहो पन्नास हजार रुपये घेऊन त्या कार्ट्याबरोबर पळून गेली. बेंगलोरला!"

"मग पुढं?"

"पुढं व्हायचं काय? मुलीला फूस लावून पळवून नेल्याची फिर्याद दिली बापानं कारंजी पोलिस स्टेशनला. अब्रूचं खोबरं व्हायचं ते झालंच! शेवटी त्या दोघांना पोलिसानी बेंगलोरवरून पकडून आणलं. कोर्टासमोर त्या मुलीनं काय जबाब द्यावा?"

"काय दिला?"

"ती म्हणाली या सुखदेवनं मला फूस लावली नव्हती! मीच त्याच्या प्रेमात पडले होते. तो यायला तयार नव्हता. मीच त्याला घेऊन गेले!"

"बापरे? पोरी इतक्या स्पष्टपणे कोर्टात बोलू शकतात?" अमृतरावांनी विचारलं,

"काय सांगायचं तुम्हाला अमृतराव, जमाना फार वेगाने बदलत चालला आहे!"

"पण त्या मुलीनं घरातले पैसे चोरले त्याचं काय?"

"चोरी हा मुद्दाच नव्हता अमृतराव!"

"मग काय झालं?"

"मुलीनं वडिलाकडे जायला चक्क नकार दिला. म्हणाली माझे वडील माझ्या जीविताचं काहीतरी भलंबुरं करतील! ती सज्ञान असल्यामुळं कोर्टालाही सक्तीनं तिला वडिलाकडं पाठवणं अशक्य होतं! त्या दोघांनी वाडीला जाऊन लग्न केलं! लग्न? आता त्या सुखदेव लोहाराबरोबर दुर्गापूरला झक् मारत एका चाळीतल्या खोलीत संसार करतेय्!"

"पुढे बापानं काय केलं?"

"काय करणार? वर्षभर अंथरुण धरलं!"

"भयानक आहे हा प्रकार!" अमृतराव म्हणाले,

"म्हणून मुलीना जास्त शिकविण्याच्या भरीस पडू नये असं माझं स्पष्ट मत झालंय! बोला यात काही चूक आहे का?"

"पण सगळ्याच मुली असं वागतील असं गृहीत धरून कसं चालेलं?" पद्माबाई

"ते बरोबर आहे वैनी, पण मी तुम्हाला हे एक उदाहरण सांगितलं, अशी अनेक प्रकरणं आहेत. नारंगपूरच्या जहागिरदारांनी आपल्या मुलीला गाणं शिकविण्यासाठी शिक्षक नेमला होता, तिच्यापेक्षा अकराबारा वर्षांनी तो मोठा. गेली पळून त्याच्याबरोबर! परवाचं एक प्रकरण याहूनही भयानक आहे. मी मध्यंतरी कोर्ससाठी जालन्याला गेलो होतो. तियल्या प्रख्यात डॉक्टरची बायको ड्रायव्हरसोबत मुंबईला निघून गेली होती, दोन मुलांची आई असलेली बाई असं धाडस करू शकते! मग अविवाहित मुलीचं काय विचारता?" अमृतराव म्हणाले,

"तुम्ही आता हे सर्व सांगितल्यामुळं मीनलला पुढं शिकवावं की नाही याबद्दल माझा मनात संभ्रम निर्माण झालाय!"

"हे पहा तुम्ही तिचे वडील आहात, तिला यापुढं किती स्वातंत्र्य द्यायचं हे तुमचं तुम्ही ठरवा! मुलींनी अगदीच काही अडाणी रहावं असं मला वाटत नाही. मीनलचं लग्न ठरेपर्यंत तिनं कॉलेजात एक दोन वर्षं

काढायलाही माझी काही हरकत नाही. पण तिला पुण्यासारख्या दूरच्या ठिकाणी डोळ्याआड ठेवणं मात्र मला काही पसंत नाही!"

नोकराने ट्रेमधून चहा आणला.

पद्मावाई म्हणाल्या, "रत्नाला नाही सोबत आणायचं?"

"अहो वहिनी मी कामासाठी इकडं आलो होतो. जाता जाता बंधू राजाना भेटावं म्हणून आलो. आता तुम्हीच दोघं या एकदा दुर्गापूरला! मीनल कुठाय्?"

"आहे. येतेय्!"

सोळा सतरा वर्षाची, मीनल किंचित् निळसर रंगाचा चुडीदार घालून पुढे आली. तिनेही मुराररावांना वाकून नमस्कार केला. तिच्या पाठीवर हात ठेवून मुरारराव म्हणाले," आभिनंदन, मीनलला फार तर दुर्गापूरच्या गृहिणी महाविद्यालयात एकदोन वर्ष राहू द्या! तियं पाकशास्त्र शिवणकला, लोणची, मुरंबे, पापड करायलाही शिकवतात. मुलींचं हॉस्टेलही आहे तियं!

अमृतरावांच्या पत्नी पद्मावती म्हणाल्या, "जेवण, लोणची, पापड, शिवण हे सर्व बायकांना न शिकवताही येतं भावोजी! त्यासाठी गृहिणी महाविद्यालयात जायची काय गरज आहे! त्यापेक्षा एक दोन वर्ष कॉलेजात गेलेली बरं!"

पद्मावतींचे भाऊ बॅरिस्टर होते. भाची पुण्यात बी.जे. मेडिकलला होती. त्या घराण्यात शिक्षणाविषयी आस्था होती. पद्मावतीना मीनलच्या लग्नाची घाई नव्हती. तिनं कमीत कमी ग्रॅज्युएट व्हावं अशीच त्यांची इच्छा होती.

मुरारराव मात्र थोड्या जुन्या विचारांचे असल्याची पद्मावतीना जाणीव होती.

"तुला पुण्यात ठेवू नये असं म्हणतात मुरारराव!"

अमृतराव केसावरून हात फिरवत मीनलला म्हणाले.

म्हणाले,

"कन्या तुमची आहे. तिला किती शिकवायचं, कुठं ठेवायचं हे तुमचं तुम्हीच ठरवा!"

त्यावर पद्माबाई म्हणाल्या,

"मीनलची मला खात्री आहे. तिला तिच्या वयापेक्षा अधिक जाण आहे. ती इथून रोज बसनं कॉलेजला जाईल! शिवाय भावोजी तुम्ही तिथंच आहात की? तिच्यावर लक्षही ठेवता येईल!"

पद्माबाई थोड्याशा पुरोगामी विचाराच्या आहेत हे मुराररावांना ठाऊक होते. ते खांदे उडवून म्हणाले, "वहिनी, माझं खातं असं विचित्र की, रोज कुठं ना कुठं गुन्ह्याच्या तपासासाठी मला बाहेरगावी जावं लागतं! मला कसं काय मीनलवर लक्ष ठेवता येईल? "बरंय्, निघतो मी!"

"जेवण करून नाही जात?" अमृतरावानी विचारलं,

"नाही. पुन्हा एकदा या भागात यावंच लागणार आहे, तेव्हा जरूर येईन!"

मुरारराव निघून गेल्यानंतर पद्माबाई अमृतरावांना म्हणाल्या,

"एवढ्यात काय तुम्ही मीनलचं लग्न ठरवणार आहात?"

"असं कोण म्हणतो तुम्हाला?"

"मग हिला पुढं दोन चार वर्षं शिकवायला तुम्हा लोकांना काय अडचण वाटते?"

"मला काहीच अडचण नाही. मुरारराव मात्र म्हणतात. आता मीनलचं शिक्षण पुरे!"

"काय ग मीनल, तुला कॉलेजला जायचं नाही?" पद्माबाईनी जवळ उभ्या असलेल्या मीनलला विचारलं.

मीनल आईवडिलांच्याकडे पहात अडखळत म्हणाली, "माझ्या सगळ्या मैत्रिणी कॉलेजला जाणार आहेत!"

त्यावर पद्माबाई म्हणाला, "पोलीस खात्यातल्या माणसाना जगात काही चांगलं दिसतच नाही! त्या रत्नाचं असंच केलं त्यांनी! पोरीनासुद्धा घराबाहेर पडायची सुद्धा बंदी! गोशात ठेवा म्हणावं बायकोला आणि मुलींना! अशी बंधनं घालून मुली बायका चारित्र्यसंपन्न होतात ही त्यांची समजूत वेडेपणाची आहे! गोशाची पद्धत असलेल्या बड्याबड्या घरात बायकांची काय प्रकरणं चालतात हे मला चांगलं ठाऊक आहे!"

अमृतराव डोळे मिटून ऐकत होते. ते शांतपणे म्हणाले,

"आता यातून एक मार्ग आहे!"

"कोणता?"

"विश्वास या भागातच कॉलेज काढायचं म्हणतोय! ते झालं तर मीनलला इथं घरी राहूनच वर्ष दोन वर्ष पुढं शिकता येईल!"

पद्माबाई म्हणाल्या, इथंच कॉलेज निघालं तर बरंच! नाहीतर मी स्वत: दुर्गापूरात मीनलला घेऊन राहीन! किमान् तिनं ग्रॅज्युएट होणं अत्यावश्यक आहे!"

अमृतराव कठड्यावर लोडाला ठेकून पडले होते. त्या घरात पद्मावाईंचा शब्द अखेरचा होता.

२.

विश्वास हा चिंचोलीच्या परिसरातला कार्यकर्ता. त्याने चिंचोलीच्या ग्रामीण भागात भागात गेली आठ दहा वर्षे अनेक सुधारणा घडवून आणल्या होत्या. त्या भागात रस्ते नव्हते ते तयार करून घेतले. पावसाळ्यात डोंगरातून वहात येणाऱ्या ओढ्यानी दोन दोन तास वाहतूक अडून रहात असे. अशा ओढ्यावर त्याच्या प्रयत्नाने बांधले गेले. ग्रामीण भागात प्राथमिक शाळा नव्हत्या. त्या विश्वासच्याच

ज्युनिअर कॉलेज सुरू करायचे. त्या भागातून रोज शंभर दीडशे मुलं कॉलेजला शिराळ्याला जायची. बरीच मुलं दुर्गापूर आणि गणेशपूर या गावी वसतिगृहात राहून शिक्षण घेत होती. विश्वासने ती सर्व आकडेवारी जमवली आणि 'दि तोरणा एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची स्थापना केली. डायरेक्टर ऑफ एज्युकेशन यांचेकडे त्या भागातल्या प्रतिष्ठित लोकांचे एक शिष्टमंडळ घेऊन गेला. डायरेक्टरनी त्या लोकांचे निवेदन ऐकून घेतले आणि कॉलेजला योग्य अशी इमारत उपलब्ध असेल तर परवानगीचा विचार करू असें आश्वासन दिले.

चिंचोली गावात अशी इमारत मिळणं अशक्य होतं. पण विश्वास मोठा जिद्दीचा. तो सरळ अमृतरावांच्याकडे आला.

"या पुढारी, काय खबरबात? तुझ्या कॉलेजचं काय झालं पुढं?"

"त्यासाठीच आज आपल्याकडं आलोय्!"

"मी काय करू शकतो?"

"शिक्षण खात्यानं आम्हाला आश्वासन दिलंय की कॉलेज सुरू करायला योग्य जागा असेल तर परवानगी देऊ!"

"बरं मग?"

"आता आपल्या गावात कॉलेज सुरू करणं न करणं केवळ आपल्याच हातात आहे."

"माझ्या? ते कसं काय?"

"आपला गावातला वाडा आपण आमच्या कॉलेजसाठी द्यावा अशी विनंती आहे."

"गावातला वाडा? आरे तो जुना झालाय्, दर पावसाळ्यात थोडा थोडा ढासळतोय. म्हणून तर आम्ही इथं 'शेरीत' बंगला बांधला."

"हे बघा सरकार, वाडा जुना आहे हे मान्य, पण त्यांची व्यवस्थित दुरूस्ती केली तर ती वास्तू पुन्हा उपयोगात आणता येईल. वाड्याच्या मुख्य भिंती दगडी आहेत; त्यांना आतून बाहेरून गिलावा केला तर आणखीन शंभरवर्षे त्या वास्तूचा उपयोग होईल."

अमृतराव क्षणभर विचार करून म्हणाले, "पद्मावाईना विचारून बघ!" अमृतराव पद्मावाईंच्या सल्ल्याशिवाय कोणताच निर्णय घेऊ शकत नव्हते.

"अहो ऽऽऽ ऐकलंत का? जरा इकडं या, विश्वास काय म्हणतोय ते ऐका जरा." स्वयंपाक घराच्या दिशेनं पहात अमृतराव बोलले.

नॅपकिनला हात पुसत पद्मावाई बाहेर आल्या. विश्वासने त्यांना पाह्यलं आणि उठून वाकून नमस्कार केला.

"काय म्हणतो विश्वास? पद्मावाईनी विचारलं,

कॉलेजसाठी गावातला आपला वाडा मागतोय!"

"होऽऽय! पण परवानगी मिळतेय्?"

"जवळ जवळ मिळाल्यासारखीच आहे, फक्त जागेचीच अडचण आहे."

क्षणाचाही विलंब न लावता पद्मावाई म्हणाल्या, "पण वाड्याचं नवजुनं करण्यासाठी बराच खर्च करावा लागेल. विश्वास!"

"ती आमची सगळी तयारी आहे वहिनीसाहेब. आपण फक्त 'हो' म्हणा, उद्यापासूनच दुरूस्तीला सुरुवात करतो."

"पैशाचं काय?"

"पैसे? सुदैवानं आजपर्यंत पैशाअभावी माझं एकही काम अडून राहिलेलं नाही. हे सुद्धा अडणार नाही."

"वाडा तुझ्या शिक्षणसंस्थेला दिला." पद्मावाई अमृतरावांच्याकडं पहात पुढं म्हणाल्या, "पण एक अट!"

"बोला वहिनी सरकार!"

"कॉलेजला मी सांगेन तेच नाव द्यायला हवं!"

"जरूर, आपण नांव सांगा?"

"सेनापती संताजीराव घोरपडे महाविद्यालय."

विश्वास चटकन् उठला आणि त्याने पद्मावाईंचे चरणं स्पर्श करून म्हटलं,

अनेक निर्णय घेतले होते. पण आजचा हा त्यांचा निर्णय मात्र अमृतरावांना अगदीच अनपेक्षित होता.

विश्वास, हा त्या भागातले एक जबरदस्त व्यक्तिमत्व होतें. खादीचा नेहरू शर्ट, खादीचीच विजार, खांद्याला अडकवलेली शबनम बॅग, डोक्यावर न विंचरलेले कुरळे केस. असा काही बावळट पोशाख करणाऱ्या विश्वासमध्ये एक अत्यंत कळकळीचा असा समाजकार्यकर्ता दडलेला होता. बी.ए. झाल्यानंतर कायद्याचा दोनवर्षे अभ्यास केल्यानंतर नोकरीसाठी न धडपडता विश्वासने स्वत:ला समाजकार्यात झोकून दिलं होतं. गरजेपेक्षा अधिक संपत्ती कमावणे हे महापाप आहे असं विश्वास मानत होता. एखाद्या समाजोपयोगी कार्याला पैशाची गरज भासली की, विश्वास एखाद्या सधन माणसाकडे जाई. पैसे मागण्याची त्यांची पध्दत फारच निराळी होती. तो अशा लोकांना कधी विनंती करती नसे. धनगर मोळयांत शाळा बांधण्यासाठी पंचवीस हजारांची गरज निर्माण झाली. धनगर मेळयाजवळ विरुपाक्ष सावकारांनी पन्नास एकर उसाची जमीन घेतली होती. चार पाच महिने त्यांचं गुन्हाळ चाले. या चार महिन्याच्या कालावधीत सावकारांचा मुक्काम अधूनमधून गुन्हाळावर असे.

त्या संध्याकाळी कानातली भिकबाळी कुरवाळत विरुपाक्ष सावकार गुळाच्या तयार ढेपी ट्रकमध्ये चढवत होते. विश्वास तेथे आला.

"काय आण्णा काय चाललंय?"

"काय चालायचं? पोटापाण्याचा उद्योग!"

"हा पोटापाण्याचा उद्योग? अण्णा सतत दहावर्षे इथं काही पिकलं नाही तरी तुम्ही उपाशी मरणार नाही."

विश्वासची ख्याती उभ्या जिल्ह्याला ठाऊक होती. हा माणूस काही कामासाठी पैसे मागायला आला की मोकळ्या हातानं परत जात नसतो हे सर्वांनाच ठाऊक होतं. एकही सधन माणूस सरळपणानं पैसा देत नाही याचा विश्वासला पूर्ण अनुभव होता.

"अण्णा मला पंचवीस हजारांची गरज आहे! केव्हा देता बोला?" विश्वासने विचारले.

"पंचवीस हजार? विश्वास, अरे चार दोन हजार मागशील का एकदम पंचवीस? अगोदरच गेल्यासाली व्यापारात दोन अडीच लाखाचा फटका बसलाय्, आणि त्यात तू पंचवीस हजार माग?"

"अण्णा, मला कसली सबब नकोय! धनगर मेळ्यातल्या शाळेचं बांधकाम अर्ध्यात अडून राह्यलंय. तुमच्या या गुन्हाळावर कांम करायला कोण येतं?"

"कोण येणार? ही धनगर मोळ्यातली बाया माणसंच येतात की?"

'हाऽऽऽ मग यांच्या पोराबाळासाठीच मी इथं शाळा बांधतोय! त्यासाठी तुम्ही पैसे द्यायला पाह्यजेत. नाहीतर....!"

विश्वासच्या 'नाहीतर' या शब्दाला फार खोल अर्थ होता. विश्वासची मागणी मान्य झाली नाही तर विरुपाक्ष अण्णाना तिथं शेती करणं मुश्कील होणार होतं. एकही मजूर कामासाठी मिळाला नसता. बाहेरगावचे कोणी मजूरही येऊ शकले नसते. विरुपाक्ष आण्णानी हात जोडले आणि ते म्हणाले, 'एक दहा हज़ार कमी कर! पंधरा हजार देतो.'

विश्वास मोठ्याने हसला आणि म्हणाला.' अण्णा तुम्हा लोकांची खरोखरच मला कीव वाटते! अहो इतके पैसे कशासाठी मिळवता? तुम्ही या जगात येताना जसे आलात तसेच काहीही सोबत न घेता परत

जाणार आहात! ही तुमच्या कानातली भिकबाळीदेखील अंत्ययात्रेच्या-वेळी तुमचे वारस काढून ठेवतील."

"ते काय तरी होऊ दे म्हण, आज माझ्याजवळ एवढा पैसा नाही बघ!"

"बरं, केले दहा हजार कमी! पंधरा कधी देता बोला?"

विरुपाक्ष अण्णानी पुढे चार दिवसांनी विश्वासरावाना पंधरा हजार दिले. आणखी दहा हजार जमवणे. भाग होते. विश्वास कळंबी इथल्या एका डॉक्टरांच्या घरी आला. डॉक्टरनी आठ दहा लाख रुपये खर्चून नुकताच एक बंगला बांधला होता. बंगल्याला नाव दिलं होतं 'पर्णकुटी.'

त्या संध्याकाळी विश्वास डॉक्टरांच्या घरी आला.

"वा ऽऽऽ काय सुरेख बंगला बांधलात हो, बाकी डॉक्टर म्हणून फारच अल्पावधीत तुम्ही जो लौकिक मिळवला तो खरोखरच कौतुकास्पद आहे, पण बंगल्याला 'पर्णकुटी' असं का नाव दिलं?"

"बरं वाटलं म्हणून दिलं!"

"पण बंगला मात्र झक्कास झालाय हं."

त्या भागातल्या प्रत्येक सधन माणसाला ठाऊक होतं की हा विश्वास कारण नसताना कोणाच्या घरी जात नाही. जातो तेव्हा काहीतरी रक्कम वसूल करण्यासाठीच जातो! तो आला की भल्याभल्यांना काही बोलताच येत नसे.

"बरं, डॉक्टर धनगर मोळ्यातल्या शाळेचं बांधकाम अर्ध्यात पडलंय्, विरुपाक्ष अण्णानी पधरा हजार दिलेत आता दहा हजाराची गरज आहे. पैसे कधी देता बोला?"

"एवढे पैसे कुठून देणार मी? नुकताच हां बंगला बांधलाय्, होते नव्हते तेवढे सगळे पैसे यात घातले!"

त्यावर विश्वास टाळी वाजवून हसत म्हणाला, "डॉक्टर, जगातला कोणीही शहाणा आणि सूज्ञ माणूस असतील नसतील तेवढे पैसे घराला वापरत नसतो! ते जाऊ द्या, पैसे कधी देता बोला?"

डॉक्टरना ठाऊक होतं, विश्वास काहीना काही रक्कम घेतल्याशिवाय हलणार नाही. ते म्हणाले, "खरंच विश्वास माझ्याजवळ आज इतकी रोख रक्कम नाही. बायकोला परवा चार तोळ्याच्या बांगड्या केल्या आहेत. त्या घेऊन जा हव्यातर!"

"तुम्हाला असं वाटतं की मी वहिनींच्या बांगड्या नको म्हणेन? द्या! आज त्या शाळेत जाणाऱ्या पोरांना छपराची नितांत गरज आहे. वहिनींनी चार महिने बांगड्या वापरल्या नाहीत तरी चालण्यासारखं आहे. सोनं काही दुर्मिळ नाही. देशातले बहुसंख्य सराफही अजून जिवंत आहेत. बांगड्या केव्हाही पुन्हा बनवता येतील!"

असा हा विश्वासचा स्वभाव! पण गंमत अशी की त्याच्याविरुद्ध पोलिसाकडं आजपर्यंत कोणीही तक्रार केलेली नव्हती. वसूल झालेल्या रकमेपैकी एक पै देखील तो स्वतःसाठी वापरत नव्हता. तो जो काही पैसा असा खंडणीच्या स्वरुपात वसूल करत होता तो सर्वच्या सर्व समाजोपयोगी कामासाठी वापरत होता. एवढं करूनही तो स्वतःच्या नावाचा कुठेही गाजावाजा करत नव्हता.

चिंचलीला, कॉलेज सुरू करण्याची त्याची इच्छा पद्मावाईनी आपला वडिलार्जित वाडा देण्याचं आश्वासन देताच फलद्रूप होण्याची चिन्हं दिसू लागली. यावेळी विश्वासनं वाड्याच्या दुरुस्तीसाठी थोडे थोडके नव्हेतर दोन लाख रुपये रक्कम जमवली. यावेळी त्याने साखर कारखानदारांना गाठलं. गणेशपूर जिल्ह्यात चार मोठे साखर कारखाने होते. प्रत्येकाकडून पन्नास पन्नास हजार वसूल केले. इंजिनिअर आणि आर्किटेक्ट म्हणून प्रसिद्ध असलेल्या पी. मानसिंगराव यांच्यावर त्यानं वाड्याच्या दुरूस्तीचं काम सोपवलं. मानसिंगरावानी ते दुरूस्तीचं काम विनामूल्य केलं. वाड्याच्या ज्या भिंती मजबूत होत्या त्यावर स्लॅब टाकले. घोरपड्यांच्या जुन्या वाड्याचं एका प्रचंड देखण्या वास्तूत रुपांतर झालं.

'सेनापती संताजीराव घोरपडे' महाविद्यालयाची स्थापना झाली. महाविद्यालयाची 'वास्तुशांती' केली. अमृतराव आणि पद्मावाई या

दोघांच्या हस्ते सत्यनारायणाची महापूजा झाली. पहाटेपासूनच सनई चौघडा वाजत होता.

चिंचलीच्या परिसरातील जी मुलंमुली रोज शिराळयाला, दुर्गापूरला उच्चशिक्षणासाठी जात होती त्यांनी 'सेनापती' महाविद्यालयात आपली नावं दाखल केली.

मीनलला शिक्षणासाठी कुठंही बाहेर जाण्याची गरज उरली नाही. ती अकरावीत ज्युनियर कॉलेजला जाऊ लागली. पद्मावाईना कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं. घोरपड्यानी आपला वडिलार्जित संपूर्ण वाडा कॉलेजसाठी दिल्यानं त्यांचंही त्या भागात खूप कौतुक झालं.

बघताबघता एक वर्ष सरलं, चिंचलीची माहीची जत्रा आणि वागजाई देवीची यात्रा एकाच वेळी येत असे. चिंचलीला यात्रेच्यावेळी जनावरांचा बाजार भरत असे. महाराष्ट्रातल्या कान्याकोपऱ्यातून खिलारी बैलं आणि 'खोंडं' तियं विक्रीसाठी आणली जातात. याचबरोबर घोड्यांचीही फार मोठ्या प्रमाणावर तियं खरेदी विक्री होत असे. 'माहीला' वागजाई देवीला 'खारा' नैवेद्य देण्याची प्रथा होती. जे सधन असत ते बोकड किंवा बकरा देवीच्या नावावर वहात असत. अशा देवीला वाहिलेल्या बोकडाच्या किंवा बकऱ्याच्या मटणाचा नैवेद्य वागजाई देवीला दाखवला जायचा. जे गरीब असत ते देवीला कोंबड्याचा किंवा मटणाचा नैवेद्य दाखवत.

गावातल्या मुली जियं दिल्या जात, त्यांच्या सासरच्या माणसांना 'माही'चं आमंत्रण दिलं जायचं. गावात जिकडं बघेल तिकडं गर्दीच गर्दी दिसायची.

चिंचलीच्या पूर्वेला टेकडीवर वागजाई देवीचं प्राचीन मंदिर होतं. या 'वागजाई'पासून शंभर फुटावर तिच्या बहिणीचं, 'रानजाई'चं मंदिर होतं. टेकडीच्या भोवताली वडाची, पिंपळाची आणि पांढऱ्या चाफ्याची बरीच झाडं होती. टेकडीच्या भोवताली दहा बारा एकरांचा माळ होता. जत्रेच्या दिवशी या माळावर मेवामिठाईची दुकानं, हॉटेलं, सौंदर्य

प्रसाधनं विकायची 'पालं' उभारली जात. एका बाजूला विजेवर चालणारे पाळणे आणि लाकडी घोडे फिरवणाऱ्या भल्या मोठ्या छत्र्या उभ्या केल्या जात.

यात्रेच्या दिवशी गावात बैलगाड्यांच्या शर्यती, रेड्यांच्या आणि बकऱ्यांच्या टकरा, कोंबड्यांची झुंज आणि कुस्त्या असे बरेच मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जायचे. त्या दिवशी वागजाई देवीची पूजा करण्याचा मान होता सरदार घोरपड्यांचा. सूर्योदयाला अमृतराव आणि पद्मावाईनी देवीची पूजा केली. पूजा आटोपल्यानंतर पद्मावाईनी देवीच्या मूर्तीसमोर क्षणभर डोळे मिटले आणि प्रार्थना केली.

"आई, वागजाई, आजपर्यंत तुझ्या आठही हातांनी मला भरभरून सुख दिलंस, आता एकच मागणं, माझ्या मीनलला एखादं चांगलं स्थळ मिळू दे! मग माझं तुझ्याकडं काही मागणं नाही!"

त्या पूजेच्या वेळी गावकऱ्यांना आत जाता येत नसे. तालुक्यावरून आलेले पोलिस बंदोबस्ताला सभोवार उभे असत. घोरपडे सरदारांची पूजा आटोपली की मगच रांगेत उभे असलेल्या लोकांना मंदिरात सोडलं जायचं.

'वागजाई' ही खरंतर अष्टभूजा जगदंबाच होती. ती वाघावर आरुढ असल्यामुळं वाघावरून जाणारी, ती 'वागजाई' असं तिला नामाभिधान प्राप्त झालेलं होतं, अखंड पाषाणात व्याघ्रावर आरुढ अशी कोरलेली ती वागजाईची मूर्ती अत्यंत रेखीव आणि देखणी होती.

'वागजाईच्या नावानं चांगभला' या गर्जनेनं चिंचलीचा आसमंत भरून गेला होता. सूर्योदयानंतर लोकांची गर्दी वाढू लागली. माहीसाठी आलेली पाहुणे मंडळी भल्यापहाटे उठून आंघोळी उरकून देवीच्या दर्शनासाठी रांगेत जाऊन उभी होती. 'सरकारांची पूजा आटोपल्यावर रांग हळूहळू पुढे सरकू लागली.

'जिलेब्या आणि गुलाबजामन' विकणाऱ्यांनी कानठळ्या बसवणारे लाऊडस्पीकर लावले होते. पावलापावलावर उभ्या असलेल्या

'पाल'तून 'ट्रान्झिस्टर्स' लावले होते. 'पाल'भोवती लोकांचा गलका वाढत चालला होता.

३.

मीनल वाड्यात माडीवर कादंबरी वाचत बसली होती. आईवडील पूजा आटोपून परत आल्याचे दिसताच ती माडीवरून खाली आली.

"मीनल, प्रसाद घे!"

पद्माबाईंनी मीनलला चांदीच्या वाटीतला पेढा दिला.

मीनलने पेढा तसाच हातात ठेवल्याचे पाहून त्या म्हणाल्या,

"अगं खा ना?"

"मा, परवा मी धनवडेंच्या कमलकडे गेले होते. तिथं पेढे बनवत होते. ते मी बघितल्यापासून पेढा खावासाच वाटत नाही."

"का? काय बघितलंस तिथं?"

"ते लोक पेढे बनवत होते ना त्यावर असंख्य माशा बसलेल्या होत्या."

"काहीतरीच तुझं! खा. वाजाईचा प्रसाद आहे हा!"

"मी हा खाऊ शकणार नाही."

अमृतराव तो मायलेकीचा संवाद ऐकून म्हणाले, "हा" हाच शिक्षणाचा परिणाम!"

"आबा यात शिक्षणाचा काही संबंध नाही बरं! आपल्या डोळ्यामागे काय काय घडतं आपल्याला समजत नाही. मेवामिठाई बनवताना प्रत्यक्षात तिथं काय घडतं हे मी परवाच डोळ्यानी बघितलंय्! यापुढं मी या जन्मात कुठल्याही देवाचा प्रसाद म्हणून खाणार नाही!"

त्यावर अमृतराव म्हणाले "परवा तुझ्या कॉलेजात विश्वासच्या बायकोचं भाषण झालं ना?"

"होय, फारच छान बोलल्या त्या! 'अंधश्रद्धा निर्मूलन' हा त्यांच्या भाषणाचा विषय होता. इतकं सुरेख बोलत होत्या की, त्यांचा शब्द नि शब्द लिहून ठेवावा असं वाटलं. जातिभेदावर तर त्या कडाडून टीका करतात. स्वत: आंतरजातीय विवाह केल्यामुळं त्यांना त्या विषयावर बोलायचा अधिकारच आहे."

अमृतरावांनी कोट काढून खुंटीला अडकवला. फरची टोपी बाजूच्या टेबलावर ठेवली आणि म्हणाले, "हा विश्वास आणि त्याची बायको, हे एक डोकेदुखीचं प्रकरण होऊन बसणार आहे उभ्या तालुक्याला!"

"का? काय केलं त्यानी?" पद्मावाईनी विचारलं,

"काय करायचं बाकी ठेवलंय विचारा ना? आता माहीच्या यात्रेत देवीला बकऱ्याचा बळी दिला जातो ती पद्धत बंद करावी म्हणून मोहीम उघडणार आहे ही जोडी! पूर्वापार चालत आलेली ही पद्धत बंद करायची.?"

त्यावर मीनल म्हणाली, "आबा लोकांनी हवं तर खारं जेवणं करून नातेवाईकाना जरूर बोलवावं, देवीला त्यात कशासाठी मध्ये धरायचं? माझ्यासुद्धा बुद्धीला हे पटत नाही."

"अहो ऽऽऽ ऐकलंत का? "अमृतरावांनी आतल्या खोलीकडे पहात पद्मावाईना बोलावलं.

पद्मावाई साडी बदलून बाहेर आल्या आणि म्हणाल्या,

"मीनल म्हणते त्यात काही चूक नाही. देवीसमोर उघड्यावर बकरी, कोंबडे कापायची ही प्रथा मलासुद्धा पूर्वीपासून खटकते."

आईने आपली बाजू घेतल्याचं पाहून मीनल म्हणाली, "माँ, परवा जाधवांच्या घरी ती ताईबाईची जत्रा झाली. किती क्रूर प्रकार आहे तो? गाभण मेंढी कापून नैवेद्यासोबत तो कोवळा गर्भ जमिनीत पुरायचा, आणि त्याच मेंढीचं मटण शिजवून खायचं? शी ऽऽऽ जगात कुठं असली निर्दय प्रथा नसेल!"

अमृतराव डोक्यावरून हात फिरवत पद्मावाईना म्हणाले,

"ऐकलंत का लेकीचं वक्तव्य? यासाठीच आपल्यात मुलीना जास्त शिक्षण दिलं जात नसे. तुमचा अट्टाहास म्हणून इथं कॉलेज काढायला आम्ही परवानगी दिली, आणि आता शिक्षणामुळं काय घडतं त्याचा घ्या हा अनुभव!"

पद्माबाईनी शांतपणानं ऐकून घेतलं आणि त्या म्हणाल्या." मीनल म्हणते ते सारंच काही चुकीचं नाही! मला सुद्धा मंदिरासमोर होणारी प्राण्यांची कत्तल कधीच पसंत नव्हती!"

"मग गाव सोडून कुठंतरी जंगलातच जाऊन रहावं लागेल! हो! सगळेच घराण्याचे रीतिरिवाज बंद कारयचे असले तर?"

"जंगलात रहाण्याची काही गरज नाही! आपल्या बुद्धीला जे पटत नाही ते केवळ घराण्याची पद्धत म्हणून करीत रहायचं याला काय अर्थ आहे."

"मग आज एवढ्या पहाटे उठून देवीच्या पूजेला तरी का आलात?"

"देवीची पूजा करण्यात काहीच वावगं नाही. विश्वासची बायको म्हणते, देवीसमोर होणारी प्राण्यांची कत्तल थांबवावी ही खरंच विचार करण्यासारखी गोष्ट आहे."

मघाशी मीनलला दिलेला पेढा तिनं कठड्याच्या एका बाजूला ठेवला. चिक्कूच्या झाडावर इतकावेळ पंख साफ करीत बसलेल्या कावळ्याने खाली झेप घेतली आणि तो चोचीत पेढा घेऊन उडून गेला.

पोस्टमन सायकलवरून आला. त्याने दूर नारळाच्या झाडाला सायकल लावली. अमृतरावांना वाकून नमस्कार करून त्यानं त्यांच्या हातात दोन तीन पत्रं दिली. पहिली दोन तालुका विकास सोसायटीची होती. तिसरं पत्र होतं पाकीट. वर लिहिलेलं होतं 'पर्सनल!'

"चिरंजीवांचं पत्र आहे, यावर पर्सनल असं खास कशासाठी लिहिलंय्" असं म्हणत त्यानी ते पाकीट उघडलं.

ती. आबासाहेबांच्या चरणी दंडवत,

आबासाहेब, बऱ्याच दिवसांपासून मला आपल्याला एक महत्वाची गोष्ट सांगायची होती, पण धाडसच होत नव्हतं. आता मला ती सांगावीच लागणार आहे. माझ्या कॉलेजात अमिता नावाची पंजाबी मुलगी आहे. तिचे वडील सैन्यात कर्नल आहेत. तिची माझी दोन वर्षापूर्वी ओळख झाली. कर्नलसाहेब स्वभावानं अतिशय मनमिळावू आहेत. मी आणि अमिता एकत्र फिरतो, ही गोष्ट त्याना समजली. त्यानी मला आपल्या बंगल्यावर बोलावून घेतलं आणि माझी माहिती विचारली. मी सर्व सांगितलं. तेव्हा ते म्हणाले, 'हे बघ विक्रम, अमिता तुझ्यावर प्रेम करते हे मला ठाऊक आहे. पण हे शेवटपर्यंत टिकणार आहे का? नाहीतर इथं पुण्यात आहेस तोपर्यंत तिच्याबरोबर फिरशील, तिकडे तुझ्या वडिलानी तुझं दुसऱ्या मुलीशी लग्न ठरवलं तर तू काय करणार आहेस?' ते असेही म्हणाले, 'तुम्ही, सरदार जहागिरदार लोक, अन्य जातीतल्या मुली पत्नी म्हणून कधीच स्वीकारीत नसता हे मला ठाऊक आहे. अमिता भावनाप्रधान आहे. तू दुसऱ्या मुलीशी लग्न करायचं ठरवलंस तर माझी पोर आत्मघात करून घेईल! तेव्हा मला आताच सांग, तू अमिताचा पत्नी म्हणून स्वीकार करणार आहेस का? ते शक्य नसेल तर आताच सांग! हो नंतर उगाच गुंतागुंत नको!'

आबा, मी त्याना अमिताशी लग्न करण्याचं वचन दिलं आहे. खरं तर मी माझे हे प्रकरण या अगोदरच तुमच्या कानावर घालायला हवं होतं, पण माझी चूक झाली. माँना आणि तुम्हाला माझा हा आंतजातीय विवाहाचा निर्णय कदाचित् रुचणार नाही. आपल्या खानदानीत आजपर्यंत कोणीही पंजाबी मुलीशी लग्न केलेलं नाही हेही मला ठाऊक आहे. पण जग फार झपाट्यानं बदलत चाललंय्! घराणं, जात-गोत, नातेवाईक यांना काय वाटेल या सर्व गोष्टी आता कालबाह्य होत चाललेल्या आहेत.

माझी परीक्षा दोन महिन्यावर आलेली आहे. मी नक्कीच पास होईन. बी.ए. झाल्यानंतर मी 'लॉ' करणार आहे. पुण्यात 'सिंबॉयसेस'

आणि आय.एल्.एस्. लॉ कॉलेज अशी दोन प्रख्यात लॉ कॉलेजेस आहेत. परिक्षा झाल्यानंतर अमिताशी माझे लग्न होईल. माझ्या या निर्णयात कोणीही बदल करू शकणार नाही.

तुम्ही आणि माँ माझ्या निर्णयास 'ग्रीन सिग्नल' द्याल अशी आशा आहे.

ती. सौ. माना दंडवत.

चि. मीनलला आशीर्वाद

आपला आज्ञाधारक

विक्रम

अमृतरावांनी डोळ्याचा चष्मा काढला आणि एक दीर्घ निश्वास सोडून-जवळ बसलेल्या पद्माबाईना म्हणाले,

"घ्या ऽऽऽ वाचा हे पत्र! चिरंजीव सुट्टी पडली तरी इकडं का येत नव्हते. त्याचं कारण काय होतं ते वाचा. स्वतःच स्वतःचं लग्न ठरवतोय आणि आज्ञाधारक म्हणवून घेतोय."

पद्माबाईनी ते पत्र घेऊन वाचलं आणि त्या म्हणाल्या, "पंजाबी हिंदूच असतात ना?"

"हो हो. हिंदूच असतात, पण त्यांच्या चालीरीती आणि रीतीरिवाज भिन्न असतात. शेवटी चिरंजीवानी खानदानीला बट्टा लावला. घरात आपली लग्नाची बहीण आहे. याचीतरी जाणीव ठेवायची होती! आणि वर म्हणतो की माझ्या निर्णयात कोणताही बदल होणे शक्य नाही! मग पत्र तरी पाठवण्याची तरी काय गरज होती? लग्न झाल्यावरच कळवायचं?"

"अहो पण असा त्रागा कशाला करून घेता? ती मुलगी चांगली असल्याशिवाय तो असा निर्णय घेणार नाही!"

"म्हणजे त्या पोरीशी लग्न करून घेऊ दे?"

"आता त्यानं ठरवलंय् म्हटल्यावर आपण काय करणार?"

"काय करणार? अहो तुम्ही शुद्धीवर आहात का? या मिनलला जन्मभर घरी विना लग्नाची ठेवणार आहात का? म्हणे त्यानं ठरवलं म्हटल्यावर आपण काय करणार? या घराशी असलेले सगळे संबंध तोडून त्याला काय करायचं असले ते बेशक करू दे! मुराररावांना हे कळलं तर काय वाटेल? तरी मला ते म्हणतच होते. पोरांना शिकवण्यासाठी डोळ्याआड ठेवणं बरं नव्हे! दुर्गापूरातच त्याला ठेवायला हवं होतं! तुम्ही गेल्यासाली मीनलला पुण्याला शिकायला ठेवायचं म्हणत होता. म्हणजे चिरंजीवांनी पंजाबी मुलगी पसंत केली तसा हिनेही एखादा शीख पसंत केला असता!"

"काय जीभेला हाड नसल्यासारखं बोलता?"

"मग काय करू? चिरंजीवांच्या गळयात हार घालून त्यांचं अभिनंदन करू? याला जबाबदार तुम्ही आहात तुम्ही?"

"मी काय केलं?"

"म्हणे तुम्हाला शिक्षणाचं महत्व कळत नाही. माझे भाऊ बॅरिस्टर, मांझी भाची एम्.बी.बी.एस्. करते, पुणं शिक्षणाचं माहेरघर! जेवणाचे हाल होतात म्हणून नरसिंगला नेऊन ठेवला. महिन्याकाठी सातशे आठशे रुपये पॉकेटमनी म्हणून तुम्ही पाठवत होता. आणि हे विद्वान् तियं त्या पोरीशी प्रेमाचे चाळे करीत फिरत होते!"

"अहो, पण तो पुढं बी.ए. झाल्यावर लॉ कॉलेजला नाव दाखल करणार म्हणतो आहे ना?"

"हो ऽऽ लॉ कॉलेजला जातो म्हणे! लग्न झाल्यावर याच्या हातून 'लॉ'चं शिक्षण होईल हा भ्रम आहे तुमचा, भ्रम! लग्नालाच उतावीळ झाला होता तर तसं स्पष्ट सांगायचं आम्हाला! एकापेक्षा एक अशा सुंदर मुलींची पलटण आणून त्याच्यासमोर उभी केली असती, आणि ती सुद्धा आमच्या खानदानीत पदर जुळणारी!'

अमृतराव आवाज चढवून बोलत होते. जवळ उभी असलेली मीनल उगीचच डोळे पुसत होती. आपल्या घरावर काहीतरी प्रचंड

आपत्ती आलीय असं तिच्या कोवळ्या मनाला वाटत होतं. ती काही न बोलता उगीचच हुंदके देत उभी होती. ते पाहून पद्मावाईनी तिला आपल्याजवळ ओढून घेतलं 'आणि तिच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाल्या–

"अग तुला काय झालयं रडायला?"

"रडेना तर काय करील? भावानं आईबापाना न विचारता परजातीच्या पोरीशी लग्न ठरवल्याचं ऐकून आनंदानं बागडावं काय तिनं?"

"बस्स्. पुरे झालं तुमचं? मी आज पुण्याला जाते. ती मुलगी कसली आहे ते पहाते. जर ती विक्रमला शोभण्यासारखी असेल, आपल्या आाणि तिच्या चालीरीती एकच असतील तर...!"

"तर काय? परीक्षा झाल्यानंतर तो लग्न करावं म्हणतोय, ते तुम्ही गेल्यागेल्याच लावून मोकळ्या होणार आहात का?"

अमृतराव भडकल्यानंतर लवकर शांत होत नाहीत हे पद्मावाईना ठाऊक होतं.

त्या मीनलला हाताला धरून पलीकडच्या खोलीकडं नेत म्हणाल्या, "मीनल तूही चल माझ्यासोबत, आपण जाऊ ती मुलगी कसली आहे बघू. बरी असेल तर,..!"

सह्याद्री एक्सप्रेस बरोबर सात वाजता पुण्याला पोहोचली. पद्मावाई आणि मीनल रिक्षाने विक्रमच्या फ्लॅटवर पोहोचल्या. बेल दाबताच नरसिंगने पुढे येऊन दार उघडले.

पद्मावाईना आणि मीनलला पहाताच त्याला आश्चर्य वाटले. नरसिंगाने पद्मावाईना मुजरा केला.

"विक्रम कुठे आहे?"

"झोपल्यात!"

"इतका वेळ?"

"रातच्याला आभ्यास करत बसले हुते!"

"म्हणून काय झालं?" असं म्हणत पद्मावाई विक्रमच्या बेडरुममध्ये आल्या. विकी, ए विकीऽऽ!"

विक्रमने पद्मावाईचा आवाज ऐकला आणि तो चटकन् अंथरुणातून उठला. त्याने पद्मावाईचे चरण स्पर्शून म्हटलं.

"इतक्या लवकर कशा काय आलात मां?"

"तुमचे पत्र मिळाले. त्यानी तिकडे आकाशपाताळ एक केले! मग म्हटलं आपणच जावं आणि मुलगी पाहून यावं! पण काय हो हे प्रकरण इतकं पुढं जाईपर्यंत मला थोडीतरी कल्पना द्यायची?"

"मां. खरं सांगू. माझी इतक्यात लग्न करण्याची इच्छा नव्हती. कर्नलसाहेब मिलिट्रीत असूनही थोडे जुन्या वळणाचे आहेत. ते म्हणाले 'लग्न करा आणि मग पुढं हवं तितकं शिकत रहा!'

"पण मी म्हणते तुम्ही आईवडील जिवंत असताना असे निर्णय घेण्यापूर्वी आम्हाला विश्वासात घ्यायला काय हरकत होती?"

विक्रम मीनलजवळ जात म्हणाला,

"पण मी पत्रातून सगळी कल्पना दिलीच ना?"

"हो ऽऽ! पण स्वत: निर्णय घेतल्यानंतर, अगोदर नव्हे!"

"जाऊ द्या, तुम्ही आलात बरं झालं. मीनल तुझं कॉलेज काय म्हणतं? परवा विश्वास डेक्कनवर भेटले होते."

"बरं, आता तुम्ही आवरा, एकदा ती मुलगी कशी आहे ते बघण्याची मला उत्कंठा लागून राहिलीय्. मी लगेच उद्या परत चिंचलीला जाणार आहे! शेतीची बरीच कामं पडून राह्यलीत."

"म्हणजे? आल्यासारख्या चार दिवस रहात नाही?"

"विकी, तुम्हाला ठाऊक का नाही? तुमचे पिताजी शेतीत कधी लक्ष घालतात का? तुमच्या जन्मापूर्वीपासून ती जबाबदारी माझ्यावर येऊन पडलीय्. घरचं सगळं मीच पहायचं, शेतीचंही मीच पहायचं; मला कुठं निवांतपणे चार दिवस रहावं म्हटलं तर शक्य नाही! त्यात तुम्ही हे प्रकरण निर्माण करून ठेवलंत! कशी आहे ती मुलगी

स्वभावानं ?"

"ते मी काही एक सांगणार नाही ! तुम्ही , अमिताला समक्षच पहा आणि मग तुमचं मत सांगा !"

"खाली गाडी कोणाची आहे ?"

"अमिताचीच गाडी आहे. काल जेवायला कर्नलसाहेबांनी आग्रह केला , उशीरा त्या भागात रिक्षा मिळत नाही. म्हणून गाडी घेऊन जा म्हणाले."

"हं ऽऽऽ !"

विक्रमने बाजूच्या फ्लॅटमधून अमिताकडे फोन केला.

"हॅलो अमिता , आज सकाळी मा आणि मीनल आल्या आहेत. त्या दोघीही तुला पहायला उत्सुक आहेत. तू इकडं येतेस का मी त्याना तिकडं घेऊन येऊ ?"

"मी कशाला तिकडं येऊ ? तूच त्याना इकडे लंचला घेऊन ये ! डॅडी अकरा वाजता येणार आहेत. आज दुपारच्या प्लेननं ते कदाचित दिल्लीला जाणार आहेत. आनायासे त्यांचीही ओळख होईल !"

"ओ. के. ऽऽऽ !"

साडे दहाच्या सुमारास गणेशखिंड रोडवरून गाडी यशवंतनगर कॉलनीकडे आली. या कॉलनीला 'मिलिट्री ऑफिसर्स कॉलनी म्हणून ओळखलं जातं. बरीच वर्षं 'सदर्न कमांडला' सर्व्हिस झाल्यामुळं कर्नल वेदपाल ओबेरॉय यानी निवृत्तीनंतर पुण्यातच स्थायीक व्हायचं ठरवलं होतं. त्यांचे अत्यंत जवळचे असे मित्र ब्रिगेडियर भोसले यानी त्याना आपला तयार बंगला अल्प किंमतीत दिला होता.

४.

भोवताली कॉक्सकोंब, डेलिया, झेलियाची विविध रंगांची फुलं फुललेली होती.

विक्रमने पोर्चमधे गाडी आणून उभी करताच आतून अमिता बाहेर आली.

गोरी, किंचित सडपातळ बांध्याची, सरळ नाक, धनुष्याकृती भिवया, अतिशय तेजस्वी डोळे असलेल्या अमिताने पद्माबाईना वाकून नमस्कार केला. डोक्यावरून पदर घेतलेल्या अमिताकडे पहाताच पद्माबाई क्षणभर भांबावून गेल्या. त्यानी तिच्या खांद्यावर हात ठेवला. तिच्याशी चटकन् काय बोलावं हेच त्याना समजेना. विक्रमकडे त्यानी पाहिलं. त्यांचे डोळेच बोलून गेले. 'वाऽऽऽ काय छान निवड केलीस!' मीनललाही अमिता बघताक्षणीच आवडली होती.

'अमिता, ही माझी बहीण, मीनल. "विक्रमनं मीनलची ओळख करून दिली. अमितानं मीनलचा हात आपल्या हातात घेतला. इतक्यात आतून किंचित् स्थूल अशा मोहिनी आल्या.

"मां. या अमिताच्या आई,"

विक्रमने ओळख करून दिली. टिपिकल असा मिलिट्री ऑफीसरचा तो दिवाणखाना होता. जमिनीवर काश्मिरी गालीचा, निळसर वेल्व्हेटचे कव्हर असलेला सोफासेट, समोर अखंड काचेचं स्टूल. कोपऱ्यात चिनी पॅगोडाच्या आकाराची लँपशेड, दुसऱ्या कोपऱ्यात युरोपिअन, युवतीचा प्लॅस्टर ऑफ पॅरीसचा अर्धनग्न पुतळा, भिंतीवर दोन लँडस्केप्स, एक बर्फाच्छादित शिखराचं आणि दुसरं केरळ मधलं. मध्यभागी लाकडी कपाट, त्यावर कर्नलसाहेबांचा ड्रेसमधला रंगीत फोटो. टेबलाच्या बाजूला पितळेच्या चकचकीत तोफेच्या मोकळ्या सेल्स ओळीनं ठेवलेल्या होत्या. भिंतीवर पेंढा भरलेलं सांबराचं मुंडकं होतं.

पद्माबाई म्हणाल्या, "परवा विक्रमचं पत्र आलं, पत्र वाचल्यावर प्रथम आम्हाला धक्काच बसला. त्यानं पत्रात चक्क लिहिलं होतं की मी अमिताशी लग्न करण्याचा निर्णय घेतला आहे म्हणून! मग म्हटलं एकदा जाऊन प्रत्यक्षच भेटून यावं!"

मोहिनी हसत हसत म्हणाल्या, "पण विकीची निवड काही चुकीची नाही ना?"

"छेऽऽऽ! असली सून मिळणं हे भाग्यच म्हणायला हवं!"

"पण कर्नलसाहेब आजूनही थोडे साशंक आहेत. ते म्हणतात तुम्ही जहागिरदार लोक परजातीतली मुलगी पसंत करता की नाही कोंण जाणे! तसं म्हणाल तर् तुमच्या अन् आमच्या संस्कृतीत फारसा फरक नाहीच! ब्रिगेडिअर भोसले आणि कर्नलसाहेब बरेच जुने स्नेही आहेत. आंमचं त्यांच्याघरी जाणं येणं असतं. फक्त भाषेचाच फरक आहे. आम्ही लोक हिंदी बोलतो तुम्ही मराठीत बात करता इतकंच! अमित, चहा करायला सांग."

"आता चहाची गरज नाही. आम्ही नुकताच घेऊन आलो.'

"घ्या ना, कर्नलसाहेबाना यायला अजून थोडा अवधी आहे!" जा अर्धा अर्धा कप करायला सांग!

मीनलजवळ बसलेली अमिता तिला म्हणाली, "माझी रूम बघणार?"

मीनल मानेनेच हो म्हणाली, मीनलचा हात हातांत घेऊन् अमिता तिला आपल्या खोलीत घेऊन गेली.

कपाटात ओळीनं हिंदी कथा कादंबऱ्यांची पुस्तकं होती. भिंतीवर पाच सहा वॉटरकलरची पेंटिंग्न होती. त्यात हॉलमधे लावलेल्या केरळच्या पेंटिंगची लहान जलरंगातली प्रतिकृती होत्या.

मीनल म्हणाली, "हॉलमधलं चित्र आणि हे सारखंच दिसतंय."

"होऽऽ मीच केलीत दोन्ही पेंटिंग्ज. हे वॉटर कलरचं ओरिजनल आहे. यावरूनच ते हॉलमधलं आईलपेंट् केलेलं आहे, डॅडी दोन वर्ष त्रिवेंद्रमला होते ना?"

"एवढ्या दूर बदल्या होतात?"

"मग? मिलिट्रीतल्या लोकांना कुठंही भारतात पोस्टींग देतात! आता डॅडींची सर्व्हिस संपत आली नां म्हणून डॅडींनी इथं [illegible]

करून घेतली. या अगोदर सहा वर्षे आम्ही पुण्यातच होतो. माझ्या शिक्षणासाठी मी आणि अम्मा इथंच राह्यलो. डॅडी एकटेच नोकरीच्या ठिकाणी जायचे! आम्ही सुट्टीत त्यांच्याकडे थोड्या दिवसांसाठी जायचो."

"पण तुम्ही इतकं चांगलं मराठी कसं काय बोलू शकता?"

"त्याला कारण आमचं पुण्यातलं वास्तव्य! तसे आम्ही मुळचे पाकिस्तानातले. फाळणीनंतर आजोबा भारतात आले. सक्करजवळ सिंधू नदीच्या तीरावर खैरपूर नावाचं गांव आहे. आमचं ओबेरॉय घराणं हे मूळचं तिथलंच. आम्ही खैरपूरचे जहागिरदार होतो. फाळणीनंतर भारतात आलो आणि दिल्लीत राहयलो. डॅडी सैन्यात दाखल झाले. आणि मग आम्ही त्यांच्यासोबत फिरत राहयलो. आसाम, सिलीगुडी, त्रिवेंद्रम, अगदी या कडेपासून ते त्याकडेपर्यंत भारत बघितला. आता गेली दहावर्षे मात्र पुण्यातच असतो आम्ही."

"पुणंच स्थाईक व्हायला कसं काय पसंत केलंत?"

"काही दिवस डॅडी एन.डी.ए. मधे होते. नंतर सदर्न कमांडला होते. तेव्हा त्याना निवृत्तीनंतर पुण्यातच स्थायिक व्हावंसं वाटलं. ब्रिगेडियर भोसलेंची आणि डॅडींची खूप मैत्री होती. त्यानीच बांधलेला हा बंगला डॅडीना आगदी स्वस्तात दिला."

"विक्रमची आणि तुमची ओळख कुठं झाली?"

त्यावर अमिता हसली आणि म्हणाली तो एक योगायोगच होता. दोन अडीच वर्षापूर्वीची गोष्ट मी कॉलेजला निघाले होते. सिमला हौससमोर माझ्या गाडीचं पुढचं चाक झालं पंक्चर. गाडी रस्त्याच्या बाजूला लावून मी रिक्षानं मोटार मेकॅनिककडं जावं असा विचार करीत होते. पण वरून धोधो पाऊस कोसळत होता. एक रिक्षा थांबायला तयार नव्हती. गाडीतून जायचं म्हणून मी रेनकोट किंवा छत्रीही सोबत घेतलेली नव्हती. समोरून रेनकोट घातलेला विक्रम येत होता. माझ्या गाडीचा नंबर बघून तो थांबला. काचेतून माझ्याकडे डोकावून पाहयलं.

मी त्याला अधूनमधून कॉलेजमध्ये पहात होतेच. पण त्याची खास अशी ओळख नव्हती. त्याला पाहून मी गाडीची काच थोडी खाली केली. त्यानं मला का थांबलात म्हणून विचारलं. त्याला चाक पंक्चर झाल्याचं सांगितलं. त्यानं मला बाहेरूनच स्टेफनी आहे का विचारलं. स्टेफनी गाडीत होतीच! त्यानं भरपावसात जॅक चढवला आणि चाक बदललं. तो अर्धा अधिक भिजून गेला होता. नंतर मी त्याला कॉफी प्यायला घेऊन गेले. आणि त्यादिवसानंतर अधूनमधून आम्ही भेटू लागलो. मला त्याचा स्वभाव आवडला. कळत नकळत आम्ही एकमेकांचे झालो. डॅडींना हे समजलं. ते म्हणाले 'तू तुझा जोडीदार शोधलंस खरा, पण तो शेवटपर्यंत तुला साथ देईल याची खात्री आहे का?' मी म्हणाले, 'हो नक्की देईल!'

मग डॅडीनी त्याला घरी बोलावलं त्याच्याशी खूप वेळ बोलत राहयले. त्यानाही त्याचा स्वभाव आवडला होता."

"बरोबर आहे. त्यानंतरच विकीनं आबांना ते पत्र पाठवलं असेल!"

"विकीला डॅडी म्हणाले तुम्ही दोघे एकमेकावर प्रेम करता यात मला काही वावगं वाटत नाही. पण मला तुम्हा लोकांचे रितिरिवाज चांगलेच ठाऊक आहेत. लग्न जमवताना तीन पिढ्यांचा इतिहास तुम्ही लोक पहाता. नंतर काही गुंतागुंत होऊ नये म्हणून तुम्ही तुमच्या आईवडिलांची संमती घेतलेली बरी! पण आज तुमचे वडील का नाही आले सोबत?" अमितानं विचारलं.

मीनल क्षणभर विचार करून म्हणाली, "तुमच्या वडिलांचा अंदाज बरोबर होता. आमच्या आबांचा स्वभाव थोडा चमत्कारिक् आहे. त्यांना विकीनं परक्याजातीच्या मुलीशी लग्न करणं हे एकदम मान्य होण्यासारखं नाही. पण माझ्या मा मात्र पुरोगामी विचाराच्या आहेत. माझे मामा अरविंद देशमुख बॅरिस्टर आहेत. ते हायकोर्टात मुंबईला प्रॅक्टिस करतात. माझी मामी रोहिणी सी.के.पी. आहे."

"ओहऽऽऽ वंडरफूल !"

"त्यानाही लग्नात बराच विरोध झाला होता. पण चारपाच वर्षे लंडनमध्ये राहिलेल्या मामांनी बाहेरचं खूप जग बघितलेलं होतं. त्यांनी नातेवाईकांच्या विरोधाला भीक घातली नाही, लग्न करून मोकळे झाले. आता त्याना दोन मुलं आहेत. दोघेही अत्यंत बुद्धिमान आहेत." अमिता हसत हसत म्हणाली, "त्याचं कारण आहे. जे लोक आपल्या नातेवाईकात लग्नं ठरवतात, त्याना एक गोष्ट ठाऊक नसते, पती-पत्नीच्या रक्तात भिन्नता असली की 'प्रोजिनी' बुद्धिमान जन्मते. आपल्या देशात हे समजायला आणखीन काही शतकं जावी लागतील ! ते असू द्या, मग तुमच्या आबांचा आमच्या लग्नाला विरोध होणार तर? "अमितानं काहीसं सचिंत होत विचारलं.

"विरोध असा नाही. पण......!"

"माझ्या डॅडीनी हा थोडा अंदाज केलेलाच होता, तुमच्या जातीच्या बऱ्याच मिलिट्री ऑफिसरांची डॅडींची मैत्री आहे, त्याना तुम्हा लोकांचे रीतीरिवाज ठाऊक आहेत, म्हणूनच त्यानी विकीला ती स्पष्ट कल्पना दिली."

"तसे आमचे आबा मांच्या सांगण्याबाहेर जाणार नाहीत, पण आमचे एक काका आहेत पोलीस खात्यात! ते अतिशय जुनाट विचारांचे आहेत. दोन लग्न न झालेल्या मुली त्यांच्या घरी आहेत."

"का ? दिसायला बऱ्या नाहीत ?"

"छेऽऽ! तसं काहीच नाही. चांगल्या देखण्या आहेत. पण मुरारकाकांना जो 'पदर' अपेक्षित आहे तो लागत नाही म्हणून मुलींची लग्न होत नाहीत."

"पदर म्हणजे ?"

"पदर म्हणजे सोयरीक ठरवताना जे नात्या-गोत्यांचे संबंध विचारात घेतले जातात त्याला पदर म्हणतात. आई-बाप जुनाट विचारांचे असले की असंच होतं. आणखीन् एक आमच्या नात्यात

आत्या आहे. तिला सहा मुली आहेत. त्यांचीही लग्नाची वयं होऊन गेली!"

"का बरं?"

"हेच ना. डोक्यात प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पना ठेवणाऱ्यांच्या घरात दुसरं काय होणार?"

"बट् इट इज क्रिमिनल! असे आई-बाप असणं हे पापच म्हणायचं मुलींचं!"

इतक्यात मोहिनीची हाक आली, 'अमिताऽऽऽ इकडं या ना तुम्ही!"

"अमिता आणि मीनल हॉलमध्ये पद्मावाई बसल्या होत्या तिथं आल्या. टेबलावर चहाचा ट्रे होता. मोहिनी किटलीतला चहा कपात ओतून म्हणाल्या, "साखर घेता ना?"

"हो, चालते!"

"मला मात्र थोडी डायबेटिक टेंडन्सी आहे म्हणून मी टाळते!" कपात दूध ओतून कप पद्मावाईच्याकडं कप देत त्या म्हणाल्या, "तुम्ही तशी तब्बेत छान ठेवलीत!" पद्मावाई हसल्या आणि म्हणाल्या, "मी घरातलं तर सारं पहातेच, पण चाळीस एकर जमीनसुद्धा मीच पहाते."

"आणि मिस्टर?"

"काय सांगायचं तुम्हाला? जाऊ द्या! अजूनही आमच्यात पुरुषाना घरची कामं करणं हे कमीपणाचं वाटतं! अद्याप त्यानी बाजार कसला असतो ते बघितलेलं नाही! सगळं मलाच पहावं लागतं! घरचं आणि शेतीचंही!"

"माझंही तेच आहे! आमच्या साहेबांना बाहेरचं काही काही समजत नाही! त्याना सवड असतेच कुठं म्हणा! सकाळी सहाला घरातून बाहेर पडले की लंचला दुपारी अर्धा-पाऊणतास परत येतात. लंच घेतल्यावर एक पंधरा मिनिटं पडतात की लगेच बाहेर! ते रात्री आठ साडेआठलाच घरी! तरी आता रिटायरमेंट जवळ येतेय, म्हणून हे घर तरी झालं! ब्रिगेडियर भोसलेना तुम्ही ओळखत असाल ना?"

"नाही, फक्त नाव कानावर आहे. त्याना शिकारीचा छंद आहे का?"

"होऽऽऽ! बरोबर सांगितलंत, चार दोन दिवसांची सुट्टी मिळाली की रानडुक्कर मारायला तिकडं थेट खेड-चिपळूणपर्यंत जातात! विकीचे वडील शिकार करतात की नाही?"

"पूर्वी करायचे. आता सर्व बंद आहे. पण माझे सासरे फार उत्तम शिकारी होते. नरभक्षक असे दहा-बारा मोठे ढाणेवाघ त्यानी धाडसानं मारले होते."

"मला एक पुजेसाठी पँथरचं कातडं हवं होतं!" मोहिनी म्हणाल्या, त्यावर पद्माबाई म्हणाल्या" आता विकी चिंचलीला आला की त्याच्याकडून पाठवून देईन! बरीच आहेत घरी!"

पद्माबाई आणि मोहिनी यांची पहिल्या भेटीतच रास जमून गेली.

मोहिनी म्हणाल्या, "आमचे सगळे नातलग तिकडं दिल्ली, हरियाणात असतात. माझाही भाऊ सैन्यात होता. रिटायरमेंटनंतर शेती करतोय. तो आमच्या मिस्टरना म्हणायचा 'तिकडं पुण्यात कशाला स्थायिक होता, आपले सगळे जातभाई इकडं पंजाबात असताना इतक्या दूर कशाला जाता? पण कर्नलसाहेबांना पुणं फारच आवडतं. रिटायरमेंटनंतर इथल्या मुलांना मिलिट्रीचं आकर्षण वाटावं म्हणून कोचिंग क्लासेस घेणार म्हणतात. काय काय बऱ्याच कल्पना त्यांच्या डोक्यात आहेत. शिवाय पुणंही तसं रिटायर्ड लोकाना रहायला बरंच आहे ना? पुण्यासारखी भाजी, फळं आणि शुद्ध पाणी महाराष्ट्रांत इतर कुठं आहे? आणि शेवटी काय असतं सांगू तुम्हाला, आपण उर्वरित आयुष्यात कुठं रहायचं हे सारं दैवानं ठरवूनच टाकलेलं असतं! खरं की नाही?"

"अगदी बरोबर! माझ्या वडिलाना मला खूप शिकवून डॉक्टर करायचं होतं. पण मी कॉलेजला जायला लागले आणि हे चिंचलीकरांचं स्थळ सांगून आलं. माझे वडील त्यांच्या व्यक्तिमत्वावर भाळले. म्हणाले,

'शिक्षण राहू दे, आता तुझं लग्न करून टाकू! चिंचलीकरांची ऐतिहासिक परंपरा मोठी, दुर्गापूरच्या राजघराण्याशी त्यांचे नातेसंबंध होते."

"पण तुम्हाला डॉक्टर करायचं होतं ना त्यांना?"

"कसली डॉक्टर होतेय आणि काय? वीस वर्षाचं माझं वय होतं. भाऊ माझ्यापेक्षा दोन वर्षांनी मोठे होते. ते जळगावला शिक्षणासाठी राहत होते. माझं शिक्षण अपुरं ठेवून इतक्यात लग्न करू नका असं सांगणारं कोणी नव्हतं. दुसऱ्या महिन्यात लग्न झालं अन् काय? तेव्हापासून आपली चिंचलीत आहे. कुठं बाहेर जाता येत नाही. तरी बरं, आता आमच्यात घोषा नाही! नाहीतर तुरुंगातले कैदी आणि जहागिरदारांच्या बायका यात कसलाच फरक नव्हता. मी पाह्यलं, की पुरुषमाणसं फारशी कर्तृत्ववान नसतात, बापजाद्यांच्या शौर्यकथा आणि घराण्याची वंशावळ सांगण्याशिवाय त्यांच्याजवळ दुसरं काहीच नसतं, तेव्हा मी मुलांना मात्र जिद्दीनं शिकवायचं ठरवलं. विक्रमला इकडं पुण्याला ठेवण्याचा निर्णयही मीच घेतलेला! आता या मीनलला ग्रॅज्युएट करायलासुद्धा मुरारदाजींचा विरोध!"

"कोण हे मुरारदाजी?"

"आमच्या सरकारांचे चुलत भाऊ! पोलीस खात्यात आहेत! आजूनही डोक्यात जुनाट विचार! आमचं घराणं, आमचं खानदान, आमचे नातेवाईक राजेरजवाडे, याशिवाय चर्चेला दुसरा विषयच नाही! कोण विचारतो तुम्हाला बाहेरच्या जगात?"

"मोहिनी म्हणाल्या, "त्या मानानं आमचे कर्नलसाहेब फार चांगले! जातीगोतीचा विषय कोणी काढला की त्यांचं मस्तकच फिरतं! इतकी वर्षं ते सैन्यात आहेत. पण त्यानी आपल्या हाताखालच्या माणसाला कधी त्याची जात नाही विचारली! दुसरे कोणी जातीगोतीची चर्चा करू लागले की ते तडक तेथून उठून जातात!

चौकशी केली. तो जहागिरदार घोरपडेयांचा मुलगा आहे हे समजल्यावर मात्र अमिताला म्हणाले, 'मी स्वत: जातगोत मानत नाही, पण तू जो विकी पसंत केला आहेस, त्याच्या आईवडिलाना आपली सोयरीक कदाचित पसंत पडणार नाही!' शिवाय आमिता आमची एकटी एक कन्या! तिला लग्नानंतर कसलाही त्रास होऊ नये एवढ्या एकच हेतुने त्यानी तुमची मात्र चौकशी केली होती!"

"अगदी बरोबर आहे त्यांचं! मला अमिता पसंत आहे! माझ्या घरी ती विजातीय म्हणून तिला कसलाही त्रास होणार नाही."

"पण विकीच्या वडिलांची समजूत तुम्ही कशी काय काढणार?" पद्मावाई हसल्या आणि म्हणाल्या, 'त्याची तुम्ही चिंता करू नका!' कोणत्याही महत्वाच्या गोष्टीचा अंतिम निर्णय मी स्वत:च घेत असते!'

"पण ते फौजदारसाहेब विरोध करतील ना?"

"छेऽऽ! माझ्यासमोर स्पष्टपणे बोलण्याची त्यांची हिम्मतच होत नाही! ज्या गृहस्याला आपल्या उपवर होऊन पाच-सात वर्षे झालेल्या मुलींची लग्नं ठरवता येत नाही, त्यानी दुसऱ्यांच्या मुला-मुलींच्या लग्नात कशाला लुडबूड करावी? आणि केली तरी मी जुमानते थोडीच?"

बाराच्या सुमारास कर्नलसाहेब आले. विक्रम अमिता आणि मीनल व्हरांड्यातच होते. विक्रम त्याना पाहून उठून उभा राहिला. मीनलकडं पहात कर्नलसाहेब म्हणाले,

"आरे ऽऽ! बहीण भावात किती साम्य आहे."

"आत मा आल्या आहेत!' अमिता म्हणाली.

"हो, आलोच!"

कर्नलसाहेबांनी व्हरांड्यातच बूट काढून ठेवले. ते हॉलमधे येताच त्यानी पद्मावाईना किंचित् वाकून नमस्कार केला.

चहाचे मोकळे कप पाहून कर्नलसाहेब म्हणाले, "तुम्हा लोकांच्या बऱ्याच गप्पा झालेल्या दिसतात! विकीचे वडील नाही आले?"

पद्माबाई म्हणाल्या, "ते थोडे कामात होते म्हणून आम्ही दोघीच आलो!"

"ओ. के. ऽऽऽ! कशी काय वाटली आमची कन्या?" हसत हसत कर्नलसाहेबांनी विचारलं.

पद्माबाई अतिशय मुत्सद्दी! त्या स्मित करून म्हणाल्या, "आमचं भाग्य, म्हणून अमितानं विकीला पसंत केलं!"त्यावर कर्नलसाहेब हातातली काठी दुसऱ्या हातावर हळूवार आपटत म्हणाले, "पण आम्ही उलट म्हणतो! आमचं भाग्य म्हणून विकीनं अमिताला पसंत केलं!' विक्रम आणि अमिता एकमेकाकडं पाहून गालातल्या गालात हसत राहयले.

५.

काचेच्या मोठ्या डायनिंग टेबलाभोवती मंडळी जेवायला बसली. कर्नलसाहेबांची खुर्ची ठरलेली, ते टेबलाच्या डाव्या बाजूला बसले. त्यांच्यासमोर विक्रम बसला. विक्रमच्या डाव्या बाजूला अमिता, अमिताच्या शेजारी-मीनल. मीनलच्या समोर पद्माबाई बसल्या. त्या मोहिनींची वाट पहात होत्या. इतक्यात आतून येणाऱ्या मोहिनी म्हणाल्या.

"पद्माबाई मी इतक्यात बसणार नाही!"

"का?"

"मी तुम्हाला वाढणार, नंतर बसते."

"अहो असं काय करता, आपण हातानं हवं ते घेऊ ना? या!"

म्हणजे...!" "तसं काही समजू नका! मोहिनी, खरंच तुम्ही या. मला संकोचल्यासारखं वाटतं!"

पद्मावाईनी विनंती केली. त्यावर अमिता म्हणाली, "मम्मी अशावेळी ऐकणार नाही. आपण सुरू करा!"

चिकन ग्रील, सॅलड, फुलके आणि खाऱ्या बुंदीचं रायतं असा जेवणाचा मेनू होता.

कर्नलसाहेबांना लंच उरकून थोड्याच वेळात परत जायचं असल्यामुळं त्यानी जेवायला सुरुवात केली. ते जेवता जेवता पद्मावाईना म्हणाले, "आमचं जेवण तुम्हाला फिक्क वाटणार!"

"तसं काही नाही! छानच झालेत सारे पदार्थ!"

"अहो फिक्कं एवढ्यासाठी म्हणतो की मी एकदोन वेळा ब्रिगेडियर भोसलेंच्या सोबत दुर्गापूरला आलो होतो. तिथं त्यांच्या नातेवाईकाकडे आम्हाला जेवण होतं, अरे बापरे! काय तो लाल तिखटाचा रस्सा केला होता म्हणून सांगू? पहिल्याच घासाला असं तोंड भाजलं की काही विचारू नका! डोळ्यातून घळघळ पाणी आलं. सगळी गात्रं गरम झाली. अहो आम्ही जातिवंत सैनिक, दोन दोन पेग रम पाणी न घालता पिणारे, पण आम्ही त्यादिवशी हरलो. ब्रिगेडियरना म्हणालो, आजपर्यंत आम्ही रणांगणावरच्या अनेक भयानक प्रसंगाला तोंड दिलं, पण तेच आमचं तोंड आज असं पोळलंय की ताटावरून उठून पळत सुटावं असं वाटतंय!"

विक्रम हसत हसत म्हणाला, "पण आमच्याघरी तितकं तिखट नाहीत बनवत!" त्यावर कर्नलसाहेब म्हणाले, "मराठा लाईट इन्फंट्रीच्या अनेक शौर्यकथा मी ऐकलेल्या आहेत. ही जात इतकी कडवी का असते हे त्यादिवशीचा रस्सा चाखल्यावर समजले! माय गॉड, रियली इट वॉज ॲन एक्स्ट्रिमली हॉरिबल एक्सपिरिअन्स."

त्यावर पद्मावाई म्हणाल्या, "मी लग्न होऊन चिंचलीला आले तेव्हा जेवणात तोच प्रकार होता. पण मी हळूहळू त्यांच्या त्या सर्व

सवयी बदलून टाकल्या. गरजेइतकं माफक तिखट खाणं ठीक आहे. असं प्रमाणाच्या बाहेर तिखट खाण्यानं काहीतरी व्याधी उद्‌भवायच्या !"

मोहिनी आतून गरम गरम फुलके घेऊन येत होत्या. दोन फुलके झाल्यावर त्या मोहिनीना म्हणाल्या,

"आता तुम्ही या !"

"ठीक आहे !" त्या पद्मावाईच्या शेजारी बसल्या "जनार्दन ते फ्राईड राईसचं भांडं आणून ठेव !"

कर्नलसाहेबांचा कूक पूर्वी सैन्यातच होता. क्रॉसकंट्रीच्या वेळी तो खड्यात पडला आणि त्याचा उजवा पाय फ्रॅक्चर झाला. त्याला 'डिसॅबिलिटी' पेन्शन बसली. तो अविवाहित होता, आईवडील लहानपणीच गेलेले.

तो कर्नलसाहेब जातील त्या ठिकाणी त्यांना जेवण करून वाढत असे. कर्नल साहेबांच्यावर त्याचे जिवापाड प्रेम होते. तो निवृत्तीनंतर त्यांच्याच घरी राहयला. चालताना तो उजव्या पायानं लंगडत चालत असे. मोहिनी जेवायला बसल्यावर जनार्दनने पाहुणे मंडळीना काय हवं नको ते पहायची जबाबदारी आपल्यावर घेतली.

जनार्दनला कर्नलसाहेब 'जॉनी' म्हणत.

"जॉन, मीनलला रायतं आवडलेलं दिसतं, थोडं वाढ !"

त्यावर पद्मावाईही म्हणाल्या, "खरंच हे खाऱ्या बुंदीचं रायतं छानच लागतं !"

"आमची पंजाब्यांची ती आवडती 'डिश' आहे !"

त्यावर पद्मावाई म्हणाल्या, "मलाही निरनिराळे पदार्थ बनवण्याची खूप हौस आहे. तुमच्यात सरसोंका साग आणि मक्क्याची रोटी बनवतात ना, ती मी मुंबईला शेरेपंजाबमधे खाल्ली होती. चिंचलीत परत आल्यावर मोहरीची भाजी पैदा करून आणली, पण मला काही तश्शी बनवता आली नाही. ती मोहरीची भाजी कितीही शिजवली तरी शिजलीच नाही !"

त्यावर मोहिनी म्हणाल्या, "ती पानं प्रथम उकडून मग मिक्सरमध्ये घालावी लागतात. गिरगिट्टा झाल्याशिवाय तो 'साग' चविलाच लागत नाही!'

मग जेवणाचे विविध प्रकार कसे बनवायचे याची त्या दोघीत चर्चा झाली. कर्नलसाहेब बेसीनकडं जाऊन हात धुता धुता मागे वळून पहात म्हणाले, "अमिताला मोहिनीनं शिकवून तयार केलेलं आहे, सून म्हणून तुमच्या घरी आल्यावर छोले भटोऱ्यापासून ते सरसोंका सागपर्यंत सगळे पदार्थ तुम्हाला अधूनमधून खायला घालेल.!"

पद्माबाईना ती माणसं आवडली होती. पहिल्याच भेटीत मनमोकळेपणानं बोलणारे कर्नलसाहेब, अगत्य आणि आदरातिथ्य करणाऱ्या मोहिनीभाभी आणि काहीशी अबोल पण मार्दवशील अशी अमिता, ही सारीच माणसं लोभस होती. मीनलला तर मनापासून वाटत होतं की विकीदादाचं अगदी लवकरात लवकर लग्न व्हावं!

पद्माबाईना आपल्या लग्नाच्यावेळचा प्रसंग आठवला: नगरदेवाळ्याला मुरारराव आणि आमृतराव आले होते. मुलगी दाखवण्याचा तो जुनाटपध्दतीचा कार्यक्रम झाला. देशमुखांच्या वाड्यातल्या अंधाऱ्या खोलीतून नऊवारी साडी नेसवलेल्या पद्माबाई बाहेर येऊन मंडळीना वाकून नमस्कार करून पाटावर बसल्या.

मुराररावांनी प्रश्न विचारायला सुरुवात केली.

"तुमचं नाव काय?"

"पद्मा."

"संपूर्ण नाव सांगा?"

"पद्मा रघोजीराव देशमुख!"

"हाऽऽ! ठीक् आहे! तुमचं शिक्षण किती झालंय?"

"मी एस.वाय.ला आहे!"

"जेवण बनवता येतं?"

"होऽऽऽ!"

"काय काय बनवू शकता?"

यावेळी पद्मावाईचे वडील रघोजीराव मधेच म्हणाले, "याना पाकशास्त्राची फार आवड आहे. खारं, गोडं सगळे पदार्थ बनवता येतात."

"मटणाचं लोणचं बनवता येतं का?" मुराररावांच्या या प्रश्नावर मात्र पद्मावाईना काही उत्तर देता येईना. त्याना आजपर्यंत आंब्याचं, लिंबाचं लोणचं बनवतात एवढंच ठाऊक होतं. मटणाचं लोणचं हा प्रकार खानदेशात कोणाला फारसा ठाऊक नसे. मटणाचे लोणचे ही दुर्गापूरच्या परिसरातील खास अशी 'खासीयत' होती.

पद्मावाईना आपण निरुत्तर केलं अशा अविर्भावात मुरारराव अमृतरावांच्याकडे पहात असताना पद्मावाई म्हणाल्या, "एकदा मला ते कसं बनवतात हे शिकवलं तर मी दुसऱ्यांदा कोणाच्याही मदतीशिवाय करू शकेन!' पहायला आलेल्या मुलीकडून इतक्या धीटपणानं उत्तरं येण्याची अपेक्षा नसलेले मुरारराव उगीचच ओशट हसले.

त्यावर रघोजीराव म्हणाले, "आमच्या भागात तो प्रकार खरोखरच ठाऊक नाही!"

अमृतरावांना पद्मावाई पसंत पडल्या होत्या. आता चाळीशी उलटूनसुद्धा तीस-बत्तीस वर्षाच्या असल्यासारख्या भासत होत्या. लग्नाच्यावेळी तर त्या अतिशय देखण्या होत्या.

त्यांना खूप शिकवून डॉक्टर करायची रघोजीरावांची इच्छा होती. पण अमृतराव घोरपड्यांचे घराणे इतिहासप्रसिद्ध. त्यात चिंचलीच्या परिसरात दीड-दोनशे एकर जमिनीचे ते एकटेच मालक! रघोजीरावाना दारात चालून आलेल्या स्थळाने मोहात टाकले. शिवाय अमृतराव अतिशय हँडसम् होते. रघोजीरावाना शिक्षणाची थोडी आस्था होती, नाही असं नाही, तरी पण सेनापती घोरपड्यांच्या घरात आपली लेक

पुढं शिकायची इच्छा आहे हे वडिलांसमोर बोलण्याचं धाडसही आठरावर्षाच्या पद्माबाईत नव्हतं.

आज इतक्या वर्षांनी पद्माबाईना आपल्या लग्नाचा तो सारा इतिहास आठवला. जेवण झाल्यानंतर कर्नलसाहेब बरोबर वीस मिनिटं आपल्या खोलीत जाऊन पडले. वेळ होताच पुन्हा ड्रेस चढवून ते हॉलमध्ये आले. पद्माबाईना आदबीनं म्हणाले,

"माफ करा, मला परत ड्युटीवर जायचं आहे. आपल्याला अमिता पसंत आहे हे मी ओळखलंय्, तरी पण विकीच्या वडिलाना एकदा पाठवून द्या! त्यानाही आमची राहणी कशी आहे ते समजू द्या!"

त्यावर पद्माबाई म्हणाल्या, "मी त्यांना काही पाठवणार नाही. मी आणि मीनलनं पहायचं ते सर्व पाहयलंय. आता तुम्हीच भाभीना आणि अमिताला घेऊन चिंचलीला या! आमचं घर शेती, राहणीमान पहा! होय; नाहीतर उद्या अमिताच म्हणायची मला या खेड्यात करमत नाही! काही झालं, तरी माझ्या पश्चात् तिलांच घोरपड्यांची खानदान सांभाळावी लागणार आहे!"

कर्नलसाहेब पद्माबाईच्या वक्तव्यावर किंचित हसून म्हणाले, "अगदी बरोबर आहे. आपण म्हणता ते! आता हा एप्रिल नाही का, मेच्या दुसऱ्या आठवड्यात मी चार दिवसांची रजा घेईन! ठरलं! आम्ही चिंचलीला येणार, पण एका अटीवर!"

"कोणती?" पद्माबाईनी विचारलं.

"आम्हाला तो तोंड भाजणारा तांबडा रस्सा तेवढा खायला घालायचा नाही! येतोऽऽऽ!"

हसत हसत पोर्चमधे उभ्या असलेल्या मिलिट्रीच्या हिरव्या रंगाच्या जीपमध्ये कर्नलसाहेब चढले.

दुपारी मीनल, अमिता आणि विक्रम अमिताच्या स्टडीरूममधे गप्पा मारत बसले. पलीकडे मोहिनी आणि पद्माबाई यांच्या चर्चा चालल्या होत्या. साड्या, मोलकरणींची समस्या, यावरून दिवसेंदिवस भडकत

चाललेल्या महागाईवर येऊन ठेपलेली होती. कित्येक वर्षांचा परिचय, असल्याप्रमाणे त्या दोघी एकमेकींशी मनमोकळेपणानं बोलत होत्या.

दिदीचं लग्न ठरतंय, या विचारानं लंगडा जनार्दन खुषीत येऊन स्वयंपाक घरातली आवराआवर गाणं गुणगुणत करीत होता.

अमिताला मीनलचा स्वभाव आवडला होता. चिंचलीसारख्या लहानशा खेड्यात लहानाची मोठी झालेली मीनल विचारानं अतिशय पोक्त वाटत होती.

"अग तुझं कॉलेज काय म्हणतंय?" विक्रमनं विचारलं.

"ठीक चाललंय! विश्वासरावांना सुरुवातीला वाटायचं आपण मोठ्या उत्साहानं कॉलेज सुरू करतो आहोत, पण त्याला प्रतिसाद कसा मिळतो कुणास ठाऊक? आता आमच्या कॉलेजात गावातल्या दहावी पास झालेल्या मुलीही यायला सुरुवात झालीय!"

"कमाल आहे हं विश्वासरावांची!"

"कोण हे विश्वासराव?" अमितानं विचारलं.

"आमच्या भागातले सामाजिक कार्यकर्ते आहेत. सत्तेची कसलीही अभिलाषा न बाळगता गेली दहा-बारा वर्षे आमच्या भागात सामाजिक कार्य करतात. आमच्या भागातले रस्ते इतके वाईट होते की, तिकडं एस.टी. सुरु होणंच शक्य नव्हतं. त्यानी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाला सांगितलं, 'चार महिन्यात रस्त्यांची दुरुस्ती झाली नाही तर दहा गावचे लोक जमवून तुमच्या घराभोवती शिमगा साजरा करू!"

"म्हणजे?"

"म्हणजे काय घराभोवती जमलेल्या शेकडो लोकांनी शंखध्वनी करायचा. सामुदायिक रित्या बोंब मारायची!"

"माय गॉड? पण हे बेकायदेशीर नाही?"

"ते पुढचं पुढं बघता येईल! जिल्हा परिषदेचा अध्यक्ष विश्वासरावाची ताकत ओळखून होता. आपल्या घराभोवती जमलेले शेकडो लोक सामुदायिकरित्या बोंब मारत उभे राहतील या कल्पनेनेच तो हबकला. आणि सहा महिन्यांत सगळे रस्ते दुरुस्त झाले!'

विक्रम म्हणाला, "आता दुर्गापूर हे आमच्या जिल्ह्याचं ठिकाण, गावाजवळून सप्तगंगा नदी वाहते, पण वाटेत तिच्या पाण्यात चारपाच साखर कारखान्यांची मळी मिसळते, शिवाय दुर्गापूरातल्या दोन नाल्यांचं दुर्गंधीयुक्त पाणी नदीत मिसळतं, तेच पाणी शहराला प्यायला दिलं जातं. आता विश्वासराव जिल्हापातळीवर हे शुद्ध पाण्यासाठी आंदोलन उभं करण्याच्या विचारात आहेत. ते म्हणतात वर्षानुवर्ष खासदार आणि आमदार म्हणून निवडून जाणारे निष्क्रीय आहेत. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाला ज्या मार्गानं ताळ्यावर आणला त्याच मार्गानं खासदार आमदारांच्या घराभोंवती रोज शंभर शंभर लोकांच्या तुकडीनं जायचं आणि पांचजन्य करायचा."

"पांचजन्य म्हणजे?" अमितानं विचारलं.

"शंखध्वनी! सामुदायिकरित्या बोंब मारायची! रोज हा कार्यक्रम करायचा!"

"पण हा सनदशीर मार्ग नव्हे विकी!" अमिता म्हणाली.

"पण अमिता वर्षानुवर्ष मेंबर ऑफ पार्लमेंट म्हणून निवडून जायचं, आणि जनकल्याणासाठी काहीही करायचं नाही याला काही अर्थ आहे का?"

"मग हे विश्वासराव स्वत ःच का नाही राजकारणात उतरत?"

"ते म्हणतात, मी राजकीय कार्यकर्ता नाही! राजकीय कार्यकर्त्यांचं मानगूट पकडून मी सामाजिक सुधारणा कशी होत नाही ते पाहतो! फार निःस्वार्थी आहे तो माणूस!"

मीनल म्हणाली, "विकी, त्यानी धनगरमोळ्यात शाळा उभी केली ना, त्यासाठी विरुपाक्ष सावकाराकडून पंधरा हजार रुपये घेतले, अगदी खंडणी घेतल्यासारखे!"

"परवा मला बालगंधर्वसमोर भेटले होते. अलकाताईही सोबत होत्या. मला म्हणाले, "गावात कॉलेज सुरू करायला मानीच मदत केली म्हणून!"

"मा नी कशी मदत केली?"

"तुला ठाऊक नाही अमिता, आमच्या गावातला जुना वाडा मांनी कॉलेजला देऊन टाकला. आबा जरा कुरकुरत होते. पण मांच्या पुढं त्यांचं काही चालू शकलं नाही! मुरारकाकांचा आणि विश्वासरावांचा छत्तीसाचा आकडा आहे!"

"का बरं?"

"मुरारकाकांना विश्वासरावांचं हे दहशतीचं तंत्र पसंत नाही. त्यामुळं केव्हा ना केव्हा विश्वासराव गोत्यांत येतील, गजाआड जातील असा मुरारकाकांचा 'होरा' आहे. मांनी कॉलेजसाठी वाडा दिल्याचं मुरारकाकांना आवडलेलं नाही."

"या तुमच्या मुरारकाकांना एकदा पहायला हवंय! दिसतात कसे ते?"

"भारतीय वेशात स्टॅलिन कसा दिसला असता, याची कल्पना कर! भव्य कपाळ, गौरवर्ण, सरळ नाक, ओठावर भरघोस मिशा, आणि जाड भिवयाखालचे भेदक डोळे! जातिवंत पोलिस अधिकारी कसा असावा याचा ते आदर्श आहेत. एखाद्या माणसाबद्दल ते फार चांगलं बोलू लागले किंवा तो भेटल्यानंतर त्याच्याशी अदबीनं वागू लागले की निश्चित ओळखावं की तो गृहस्थ गोत्यात येणार आहे."

"माय गॉड, विकी, ही मोठी टिपिकल कॅरॅक्टर आहे मग?" अमिता म्हणाली.

"होऽऽऽ! आपल्या लग्नाला आबा एकवेळ संमत्ती देतील पण मुरारकाका मात्र तीव्र विरोध करतील! आता आमच्या मा त्याना जुमानणार नाहीत ही गोष्ट अलाहिदा! मला पुण्याला शिकायला ठेवायचा वेळचा प्रसंग ऐक! मी एस.एस.सी. झालो. तेव्हा मा म्हणाल्या, विक्रमनं कमीत कमी ग्रॅज्युएट तरी व्हायला हवंय! मुरारकाका घरी आले होते, ते म्हणाले! विकीला आर्ट ग्रॅज्युएट करून काय करणार आहात? त्यापेक्षा शेतकी कॉलेजात घाला. शेतकीतला पदवीधर झाला तर निदान

घरची शेती तरी सांभाळेल! आमच्या आबासाहेबांनाही ते पटलं. म्हणाले 'मुरारदादा म्हणतात ते खरं आहे.' पण मा म्हणाल्या ते काही चालणार नाही. विकीनं प्रथम आर्ट ग्रॅज्युएट व्हावं आणि नंतर 'लॉ' करावा! आमचे मामा मुंबईला प्रॅक्टिस करतात ना? ते बॅरिस्टर आहेत! मी निदान लॉ ग्रॅज्युएट व्हावं एवढीच मा ची इच्छा आहे! त्या म्हणतात वकिली करता करता शेती सांभाळता येईल! आमचे मुरारकाका अजून पन्नास वर्षे काळाच्या मागे आहेत. माझ्या दोन चुलत बहिणींची लग्नच जमू दिली नाहीत यांनी! त्यांना अपेक्षित अशी खानदान मिळेपर्यंत त्या बिचाऱ्या म्हाताऱ्या होऊन जातील! छबूताईचं वय काय असेल गं मीनल?"

"सत्ताविसावं चालू आहे, चंपाताइपेक्षा त्या दोन वर्षांनं मोठ्या ना? चंपाताईना परवा सप्टेंबरमधे पंचविसावं लागलं."

"बघ अमिता. एक पंचवीस वर्षाची आणि दुसरी सत्तावीस वर्षाची झालीय. मुरारकाकांना केवळ शहाण्णव कुळीतला मुलगा चालत नाही तर तो राजघराण्याशीच संबंधित असला पाहिजे असा त्यांचा अट्टाहास आहे."

"विकी हे ऐकून मला आत्तापासूनच भीती वाटायला लागलीय. आपल्याही लग्नाला त्यांचा विरोध होणार?"

"विरोध होणार! मा तो विरोध जुमानणार नाहीत, आणि आमचे आबासाहेब त्यामुळं थोडे अस्वस्थ होणार हे सगळं ठरलेलं आहे, चला, मला जिमखान्यावर प्रॅक्टीसला जायला हवं!"

"कसलं प्रॅक्टिस?" मीनलनं विचारलं.

"अग आमच्या कॉलेजची हॉकीची टीम यंदा पतियाळाला जाणार आहे!"

"विकी फार छान हॉकी खेळतो हं मीनल!" अमिता कौतुकानं विक्रमकडे पहात म्हणाली.

६.

पद्माबाई आणि मीनल चिंचलीला परतल्या तेव्हा बंगल्यासमोर पोलिसांची जीप उभी होती. पोलिसांची जीप येणं म्हणजे मुरारकाकांचं आगमन हे मीनलला ठाऊक होतं.

टॅक्सीतून उतरताना ती पद्माबाईना म्हणाली, "मा, काका आलेले दिसतात."

"हो, त्या उमराणीच्या मर्डर केसच्या तपासासाठी पुन्हा येणार होते, त्यासाठीच आलेले असतील."

बंगल्याच्या दिवाणखान्यात अमृतरावांच्या समोर मुरारराव बसले होते. त्यानी मीनलला आणि पद्माबाईना आल्याचं बसल्या जागेवरूनच पाहयलं: त्या दोघांची एखाद्या गंभीर विषयावर चर्चा झाली असावी असं त्यांच्या मुद्रेवरून वाटत होतं.

पद्माबाईनी रिवाजाप्रमाणे मुराररावांना वाकून नमस्कार केला.

"मग काय सून पसंत करून आलात तर?" मुराररावांनी प्रश्न केला.

"होऽऽ! मुलगी फारच छान आहे. शिवाय घराणंही खानदान आहे!"

"खानदान? वहिनी खानदानीची तुमची कल्पना काय आहे?"

"जी माणसं खरोखरच मोठी आहेत पण मोठेपणाचा बडेजाव करीत नाहीत, तीच माझ्या दृष्टीनं खानदान! कर्नल ओबेरॉय, त्यांच्या पत्नी मोहिनी आणि कन्या अमिता, या तिघांना तुम्ही एकदा पाहून या म्हणजे खरी खानदान कशी असते याची तुम्हाला कल्पना येईल!'

"अहो पण आपल्यात दुसऱ्या जातीच्या मुली करण्याची प्रथा नाही! उगाच सुधारणेच्या नावाखाली जातकुळीला बट्टा लावण्यात काय अर्थ आहे?"

"भावोजी, विक्रमनं पूर्ण विचारांती त्या मुलीशी लग्न करण्याचा निर्णय घेतलेला आहे. अशी सुस्वरूप आणि सद्गुणी मुलगी आजपर्यंत मलाही आढळ्त नव्हती! ओबेरॉय यांचंही खानदान मोठं आहे. शिवाय ते हिंदू आहेत!"

"हिंदू ही जात फार मोठी आहे वैनी. पण आपला पदर जमल्याशिवाय सोयरीक होऊ शकत नाही!"

"होऽऽ! आणि तो जमत नाही म्हणून तुमच्या दोन्ही कन्या म्हाताऱ्या होणार आंहेत."

पद्मावाईनी एकदम मुराररावांच्या मर्मावर बोट ठेवताच ते म्हणाले, "घराणं बाटवण्यापेक्षा त्या म्हाताऱ्या झाल्या तरी चालतील वैनी!"

"मुली तुमच्या आहेत, तुम्ही काहीही निर्णय घेऊ शकता. पण विक्रमनं निवडलेली मुलगी मला आणि मीनलला पसंत आहे."

"मीनल अजून बच्चा आहे१ तिला व्यवहारातलं काय समजतं? पण तुम्ही असा घाईघाईत निर्णय घेणं चुकीचं आहे!"

इतकावेळ गप्प असलेले अमृतराव म्हणाले, "मलाही हे बिलकूल पसंत नाही! घरी वडिलधारी माणसं जिवंत असताना हा लिहितोय 'की माझा निर्णय पक्का आहे यात कोणीही बदल करू शकणार नाही. याचा अर्थ काय?"

मुरारराव एक दीर्घ सुस्कारा सोडून म्हणाले "याचा अर्थ एकच मुलांना नको तितके स्वातंत्र्य दिले की ती वरचढ होऊन बसतात! म्हणून मी सुरुवातीपासून म्हणत होतो त्याला पुण्याला आर्टस् कॉलेजात न घालता राहुरीला नाही तर दापोलीला शेतकी कॉलेजात घाला."

"भावोजी, उगाच त्रागा करून घेण्यात काही अर्थ नाही. विक्रमनं जो निर्णय घेतलेला आहे तो काही घाईघाईनं घेतलेला नाही. जवळ जवळ दोन वर्षे ती दोघं एकमेकाना ओळखतात, एकमेकांच्या सगळ्या आवडीनिवडी एकमेकांना ठाऊक झालेल्या आहेत, पूर्ण डोळसपणे त्या दोघांनी हा निर्णय घेतलेला आहे. त्या दोघांचं आयुष्य सुखाचं व्हायचं

असेल तर त्यांनी आपण कसलीही आडकाठी न आणता संमती द्यायला हवीय!'

"वैनी तुम्ही आम्हाला काही सांगितलं तरी ही सोयरीक आम्हाला पसंत नाही! त्या पंजाबी पोरीपेक्षा लाखपटीनं देखण्या पोरी मी विक्रमसाठी तुमच्यासमोर आणून उभ्या करीन!"

"पोरी नुसत्या देखण्या असून भागत नाही भावोजी! त्यांच्यावर बालपणापासून चांगले संस्कार झालेले असावे लागतात! पति- पत्नीची बौद्धिक पातळी एक असावी लागते! शिवाय कुणाही अपरिचित अशा मुलीला सून म्हणून पसंत करण्यात अनेक धोके असतात! अशा अनोख्या मुलीच्या आवडीनिवडी आणि विचारसरणी भिन्न असेल तर नंतर मतभेदाला सुरुवात होते!"

त्या दोघांचं संभाषण ऐकणारे अमृतराव बोलून गेले, "तुमच्याशी आमचं लग्न झालं, त्या अगोदर तुमची आम्हाला काय माहिती होती? पण आपला संसार सुखाचा झालाच ना?"

इतका वेळ संयमाना बोलणाऱ्या पद्मावाई अमृतरावांच्याकडं तुच्छतेने पहात म्हणाल्या, "सरकार, लग्नापूर्वी मला थोडीजरी तुमची माहिती मिळाली असती तर मी तयार झाले नसते! बापजाद्यांनी कमाई केलेल्या उत्पन्नावर तुम्ही आजपर्यंत जगलात! उभ्या आयुष्यात तुम्ही एका पैशाची तरी कमाई केलीत का? येईल जाईल त्याला घराण्याची ती वंशावळ काढून दाखवायची! सरसेनापती संताजीराव घोरपड्यांचे वंशज म्हणून शेखी मिरवायची, आज काल जगात कोण तुमचा 'अमीर-उल-मुल्क' या पदवीला पुसतो? लग्न झाल्यापासून पाहते आहे, दरवर्षी दहा-पाच एकर जमीन विकून चरितार्थ चालवता आहात. का तर म्हणे उद्या कुळकायदा आला तर सगळ्याच जमिनी जातील! शेरीबागसुध्दा तुम्ही विकायला उठला होता. मी विरोध केला म्हणून गप्प बसलात! तो वडिलार्जित वाडा दरवर्षी थोडा थोडा पडत चालला होता म्हणून मी हा बंगला बांधायचा निर्णय घेतला, तुमच्यासारख्या

कर्तृत्वशून्य माणसाशी मी नाईलाजानं संसार केला. विक्रमवर चांगले संस्कार घडावेत म्हणून मीच त्याला शिक्षणाला प्रवृत्त केलं!"

"होऽऽऽ! पण तो कुठं तुम्हाला जुमानतो? स्वत:च लग्नाचा निर्णय घेऊन मोकळा झालाय!"

"घेऊ द्या! पण त्यानं तो निर्णय पूर्ण विचारांती घेतला आहे! उद्या कर्नल ओबेरॉय अमिताला घेऊन येतील तेव्हा ती मुलगी बघा! घोरपड्यांची खानदान, घोरपड्यांची खानदान करीत उगाच तुम्ही दोघे भाऊ भाऊ टाहो फोडता, लग्न होत नाहीत म्हणून झुरत बसलेल्या त्या पोरींचं अगोदर काहीतरी बघा!"

मुराररावांनी टेबलावर ठेवलेली आपली पीक्ड कॅप उचलून डोक्यावर ठेवली आणि अमृतरावांना उद्देशून ते म्हणाले, "मुलगा तुमचा आहे वैनी! तुम्ही काही करू शकता, पण यापुढे आपले कोणीही नातेवाईक तुमच्या घराशी संबंध ठेवणार नाहीत याची जाणीव असू द्या!"

"हे पहा भावोजी, मला नातेवाईकांची भीती घालू नका! तुमच्या या नातेवाईकापैकी एकानं तरी काय दिवे लावलेत हो? कुठं शिक्षण घेऊन नाव कमावलंय? उलट मोठमोठ्या राजेरजवाड्यांची चमचेगिरी करण्यातच तुम्हा लोकांचं आयुष्य खर्ची पडत आलंय! असा एकतर स्वत:च्या कर्तृत्वावर पुढं आलेला जहागिरदार मला दाखवा ना?"

'चला अमृतराव निघतो आम्ही! तुम्ही या घराचे कर्तेपुरुष असूनही हतबल आहात याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. पण आम्हीही काही करू शकत नाही! निघतो!"

अमृतराव मुराररावाना ज़ीपपर्यंत पोहोचवायला गेले. जीपच्या बॉनेटवर हात ठेऊन बराचवेळ त्या भावाभावांची चर्चा चालली होती. जीप निघून गेल्यानंतर अमृतराव बंगल्यात परत आले. 'पिवळा हत्ती' शिलगावून शांतपणाने छताकडं पहात झुरके घेत बसले.

चार दिवसांची शेतीची कामं पडून होती. पद्मावाईनी स्नान उरकले,

आणि त्या शेताकडं निघाल्या तेव्हा व्हरांड्यातल्या वेताच्या खुर्चीवर बसलेले अमृतराव म्हणाले, "मुरारदादांचा कारण नसताना तुम्ही आज अपमान केलात, हे बरं नाही झालं."

"म्हणजे? माझ्या मुलाच्या लग्नात त्याना ढवळाढवळ करायचा काय अधिकार आहे?"

"अहो ते घराण्यातले जेष्ठ प्रतिष्ठित आहेत, त्याना डावलून कसं चालणार?"

"ते प्रतिष्ठित असतील तुमच्या दृष्टीनं. माझ्या दृष्टीनं त्यांची किमत शून्य आहे. ती बिचारी बायको रत्ना स्वभावानं भाबडी म्हणून गप्प राहते. तुम्हाला त्यांच्या घरात काय परिस्थिती आहे ठाऊक नाही! चांगली चालून आलेली स्थळं या तुमच्या बंधुराजानी नाकारलीत, का तर म्हणे ते आपल्यात बसत नाहीत! हंऽऽऽ! ती बिचारी रत्ना. मी तिला भेटते तेव्हा पोरींच्या चिंतेनं धायधाय रडते! माणसाला घराण्याचा अभिमान असावा नाही असं नाही, पण बदलत्या काळात आपलं नेमकं स्थान काय आहे याची थोडीतरी जाणीव असावी! तरी बरं त्या पोरी समजूतदार आहेत. कोणाचातरी हात धरून पळून गेल्या असत्या म्हणजे मग समजलं असतं!"

"तसं होणं अशक्य आहे!"

"असू द्या, मला आता त्याविषयावर तुमच्याशी बोलायला सवड नाही. गव्हाची कापणी सुरू करायची आहे, कोवी काढायला आलाय, माझ्यामागे काय एक काम नाही!"

डोळ्याला गॉगल, खांद्याला पर्स, हातात छत्री, पायात हंटरबूट घातलेल्या पद्मावाई बंगल्यामागच्या शेरी जमिनीकडं निघाल्या.

अमृतरावांनी टेबलावरचं पिवळा हत्तीचं पाकीट उचललं आणि त्यातली आणखी एक सिगारेट शिलगावली. पद्मावाई त्यांच्यावर वर्चस्व गाजवतात हे अमृतरावांना समजत होतं, पण ते वर्चस्व निमूटपणे सहन करण्याशिवाय त्यांनाही गत्यंतर नव्हतं.

सहा एकरात खपली गहू केलेला होता. गव्हाची कापणी सुरू होती. गावातले चार मजूर आणि तीन बायका मजुरीनं गहू कापायला बोलावलेले होते.

पद्माबाई छत्री घेऊन तिथं आल्या. गव्हाची कापणी करायला आलेल्या बाईला म्हणाल्या "मंजुळा, तुझ्या सासूला बरं आहे का आता? तिचे गुढगे काय म्हणतात?"

"वैनीसाब, तुमी तो मोलामा दिलातासा का न्हाई, त्यो लावल्यापास्नं ठनका थांबलाय मामीचा!"

"गौरा लेक आली का माहेराला?"

"न्हाई वैनीसाब, सासू म्हंतीया एवडी पुनव झाल्यावर बगू!"

"अग आता तिला सातवा महिना असेल ना? जास्त कष्टाची कामं तिनं करू नयेत अशा अवस्थेत! निवृत्तीला सांग, तिच्या नवऱ्याला मी बोलावलंय म्हणावं!"

तिसऱ्या बाईजवळ जाऊन पद्माबाई म्हणाल्या "काय गं सुंद्रा? संभानं प्यायची बंद केली की नाही?"

"आट दिस झालं, तसलं काय न्हाई, तुमी त्यास्नी सांगितल्यापस्नं थंड हैत!"

पद्माबाई हसल्या आणि म्हणाल्या, "पुन्हा त्यानं दारू पिऊन तुझ्या अंगावर हात टाकला तर मला सांग! त्याची गाढवावरून धिंडच काढते.

पुरुष मंडळी गहू कापत होती तिथं पद्माबाई आल्या.

"दत्तू, अरे सकाळी तुम्ही आणि बायकांनी एकदमच कापणी सुरू केलीत ना? मग त्या बघा बरं तुमच्या पुढं कासराभर गेल्या. खरं तर बायकांना जास्त मजुरी देऊन तुम्हा पुरुषांची कमी करायला पाहिजे!"

पद्माबाईना चिंचलीत 'सरकारबाई' म्हणत. उभा गाव त्याना घाबरत होता. गावात कोणाबाईला घरी त्रास झाला तर ती गाऱ्हाणं घेऊन सरळ बंगल्यावर यायची. पद्माबाईना आपली तक्रार सांगायची. पद्माबाई ती ऐकून घ्यायच्या आणि गावकामगाराला निरोप पाठवायच्या.

गावकामगार विठ्ठल पाटील तात्काळ बंगल्यावर यायचा. अदबीनं मुजरा करून बाजूला उभा रहायचा.

"पाटील तुम्हाला सरकारनं गावकामगार कशासाठी नेमलंय?"

विठ्ठल पाटील अतिशय सज्जन आणि सालस माणूस. महिन्याच्या एकादशीला पंढरपूरला जायचा. खाकी कोट, डोक्याला भगवा पटका, धोतर, अशा पेहेरावातला विठ्ठल पाटील कपाळावर गंध- बुक्क्याचा टिळा लावायचा.

"हंऽऽ बोला पाटील, तुमची सरकारनं गावकामगार म्हणून नेमणूक कशासाठी केलीय?"

"हेच की, गावात काय कमीजास्ती झालं तर पोलीस ठाण्याला वर्दी द्याची! लेवी वसुलीला मामलेदार साहेब आले की, त्याना मदत करायची."

"ते लेव्ही वसुलीचं जाऊ द्या. गावात काही कमीजास्ती झालं म्हणजे काय?"

"हेच की, खून, मारामारी, आकस्मात् मयत!"

"पण तुम्हाला ठाऊक आहे का? पोलीस पाटलानं असे खून, मारामाऱ्या, अपघाती निधन असं काही घडू नये याचीही दक्षता घ्यायची असते!"

"बरोबर आहे!"

"काय बरोबर आहे. महिन्या महिन्याला तुम्ही चार सहा दिवस पंढरपूरला जाऊन राहता, इकडं गावात सूना म्हणून आलेल्या कोणा मुलीला सासू, सासरे, नवरा, दीर, ही मंडळी छळतात का याची कधी चौकशी करता का?"

"तसं काही घडलेलं नाही वैनीसरकार!"

"घडलेलं नाही. ही भीमा चौगुल्याची सून, दोन वेळा हिला माहेरून रेडिओ आण म्हणून नवऱ्यानं मारहाण केलेली होती. तुम्ही त्याबाबत काय केलंत?"

"मी काय करणार? घरगुती प्रश्न आहे तो चौगुल्यांचा!"

"कायदा बदललाय, ठाऊक आहे ना? एखाद्या विवाहित स्त्रीला, सासरची माणसं जर मानसिक किंवा शारीरिक छळ करत असतील, आणि तशी वर्दी आली तर पोलिसानी तो दखलपात्र गुन्हा म्हणून नोदं करून घ्यावा आणि त्या मुलीचा मानसिक किंवा शारीरिक छळ करणाऱ्याना अटक करावे असा कायदा झालेला आहे! यापुढं महिन्या महिन्याला पंढरपूरला जाणं बंद करा. गावात घरोघरी काय चालतं. हे पाहणं तुमचं कर्तव्य आहे. घातपात झाल्यानंतर वर्दी देण्यापेक्षा गावात घातपात होणार नाही याची दक्षता घेण्याची तुमची जबाबदारी आहे."

"जी, वैनीसरकार!"

"जा, त्या भीमा चौगुल्याला मी बोलावलंय म्हणून निरोप द्या!"

कसलेही सत्तेचे स्थान नसलेल्या पद्मावाईचा गावावर दरारा होता त्यामुळं चिंचली गावात लग्न होऊन येणाऱ्या मुलीना त्यांचा आधार वाटत असे. गावात नवराबायकोंची किरकोळ कारणावरून काही कुरबूर झाली तरी त्याची वार्ता बंगल्यापर्यंत जाऊ नये असे पुरुषाना वाटायचं.

पद्मबाईची ही ख्याती त्यांच्या नातेवाईकातही ठाऊक होती. तरीही पद्मावाई आपण होऊन कोणाच्या घरगुतीबाबतीत कधी हस्तक्षेप करीत नसत.

त्यादिवशी शेतावरच्या बांधावर आंब्याच्या झाडाखाली सतरंजी अंथरून त्या बसल्या होत्या. तोच समोरून त्याना विश्वास येताना दिसला. विश्वास झाडाजवळ येऊन पद्मावाईना नमस्कार करून अदबीनं उभा राहिला.

"काय विश्वास, आज तुला सकाळी सकाळीच कशी काय सवड झाली?"

"तुम्हालाच भेटायला आलो होतो. बंगल्यावर गेलो होतो. मीनलताई म्हणाल्या तुम्ही 'शेरीत' आहात म्हणून इकडंच आलो."

"बोल काय काम काढलंस?"

"आपल्या कॉलेजचं पहिलं गॅदरिंग करायचं ठरलंय !"

"गॅदरींग, अरे उगाच पोरं जो शहरात निवडणुकींचा धिंगाणा घालतात तो आपल्या खेड्यापर्यंत कशाला आणता? माऱ्यामाऱ्या काय करतात, गुलाल काय उधळतात, रस्त्यानं हिजड्यांच्यासारखं नाचकाम काय करतात! आपल्याला असलं काही घडलेलं पसंत पडणार नाही इथं चिंचलीत!"

"तसे प्रकार इथं काही घडणार नाहीत. वर्गातच मुलांनी प्रतिनिधी निवडून दिले. त्या निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी आपला एक जनरल सेक्रेटरी निवडला हे सगळं अत्यंत शांतपणे पार पडलेलं आहे!"

"निवडणूक आणि शांतपणे? काय बोलतोस काय विश्वास? अरे या देशात कुठली निवडणूक आजपर्यंत शांतपणे पार पडलीय का? एकमेकांच्या कुचाळक्या, मारामाऱ्या, आरोप – प्रत्यारोप हे होतातच! हे बघ विश्वास लोकशाहीत निवडणुका होणं अपरिहार्य असतं, पण अडाण्यांच्या देशात कसली लोकशाही येणार? लोकशाहीला शंभर टक्के जनता सुशिक्षित असावी लागते! मला तू माझं प्रामाणिक मत विचारशील तर मी तुला सांगेन, आपण लोकशाहीचं विडंबन करतो आहोत! ज्यांची पात्रता नाही असे खासदार-आमदार निवडून जातात. सत्तेवर येतात, ती सत्ता स्वार्थासाठी राबवण्यासाठी! समाजहिताचं काम त्यांच्याहातून घडत नाही. तू परवा दुर्गापुरला व्याख्यान दिलेलं माझ्या कानावर आलं! दुर्गापूर शहराला गेले कित्येक वर्षे दूषित पाणी पुरवठा होतो, पण तिथून निवडून जाणाऱ्या एकातरी आमदारानं किंवा खासदारानं आजपर्यंत आपलं थोबाड उघडलंय का?"

"म्हणूनच मी तो 'शंखध्वनी मोर्चा' काढायची कल्पना लोकाना सांगितली. रोज शंभर लोकांच्या तुकडीने खासदार आणि आमदार यांच्या घराभोवती जाऊन जोरजोराने शंखध्वनी करायचा! दूषित पाणी पुरवठा बंद होईपर्यंत ते चालूच ठेवायचं!"

पद्माबाई हसल्या आणि

होणार नाही विश्वास, हे राजकारणी लोक आणि गेंडे यांच्यात काही फरक नाही! हे लोक आपलं घर सोडून पुण्यामुंबईला जाऊन राहतील आणि मोर्चेवाल्याना म्हणतील खुशशाल हात तुटेपर्यंत बोंब मारीत रहा! अशा लोकांना निवडणुकीत पाडून घरातच बसवायला हवयं!''

''वैनीसाहेब गेल्या वीस वर्षाचा माझा असा अनुभव आहे की, लोकांना हे खासदार आमदार निष्क्रीय आहेत हे ठाऊक असलं तरीही ते त्यानाच निवडून देतात!''

''याचं कारण तुला ठाऊक आहे का विश्वास?''

''कोणतं?''

''चांगली माणसं राजकारणात भाग घेत नसतात! तुला जॉन्सनचं ते वाक्य ठाऊक नाही का?''

''कोणतं हो वैनी साहेब?''

''जॉन्सन हा फार मोठा राजकीय द्रष्टा होता. तो शंभरवर्षापूर्वी सांगून गेलाय की 'राजकारण बदमाषांचे शेवटचे आश्रयस्थान असते! Politics is the last resort of scondrals".

विश्वास बद्दल पद्मावाईंच्या मनात जिव्हाळा होता. तो तालुकापातळीवर सामाजिक कार्य किती निष्ठेनं करतो याची पद्मावाईना जाणिव होती. 'सेनापती संताजीराव घोरपडे' महाविद्यालयाची स्थापना केवळ पद्मावाईंच्या औदार्यामुळे होऊ शकली हे विश्वास विसरू शकत नव्हता.

''वैनीसाहेब मी परवा येऊन गेलो आपण पुण्याला मीनलबरोबर गेलात म्हणून समजलं, मीनलताईच्या लग्नाच्या गडबडीत तर नाहीत ना?''

''छेऽऽऽरे! तिचं इतक्यात कशाला लग्न करायचं? विक्रमच्या लग्नाच्या वाटाघाटी चालू आहेत!''

''कोणत्या जहागिरदारांची कन्या पाहून आलात?''

पद्मावाई डोळ्यारवचा गॉगल काढून हसल्या आणि म्हणाल्या,

"जहागिरदाराची मुलगी नाही! मुलगी आहे एका कर्नलची! आणि तो कर्नल आहे पंजाबी!"

"काय सांगता काय? म्हणजे विकीबाबांना आंतरजातीय मुलगी करणार?

"अरे आम्ही करणार कोण? त्याचं त्यानंच हे लग्न ठरवलंय! फक्त मुलगी कशी आहे याची उत्सुकता होती म्हणून पहायला गेले होते!"

"कशी आहे मुलगी?"

"मला हवी तशी आहे!"

"वाऽऽऽ छान झालं! पण सरकार काय म्हणतात?"

"सरकारांचं काही नाही. पण मुरारभावोजीना मात्र हे पसंत नाही. ते आजूनही त्रेतायुगात वावरतात! आपली शहाण्णव कुळी! जहगिरदाराचं खानदान! राजेरजवाड्यांशी असलेली नसलेली नाती, यातच रममाण असतात! पण खरं सांगू विश्वास, मला हे या जहागिरदार लोकांचं काही काही पटत नाही! मुराररावभावोजींनी या जातीगोतीच्या कारणावरून आपल्या दोन मुलींना आलेली अर्धा डझन स्थळं नाकारलीत. त्या पोरी झुरणीला लागल्या आहेत! रत्ना तर इतकी रडते विचारू नकोस! बरी आठवण झाली मला रत्नाला एक चार दिवस इकडं रहायला बोलायचं आहे."

"मग ते गॅदरिंगचं काय करायचं?"

"करून टाका!"

"आपल्या हस्ते बक्षीस समारंभ व्हा अशी प्राचार्यांची आणि मुलांची इच्छा आहे!"

"माझ्या हस्ते? अरे तू वेडा की काय? मी अशी कोण मोठी लागून

बरी आठवण झाली कर्नल वेदपाल ओबेरॉय आमच्याकडे येत आहेत. आपण त्यानाच गॅदरिंगचे पाहुणे करू! त्यांच्या हस्तेच बक्षीससमारंभ उरकून घ्या!"

"पण ते येणार आहेत केव्हा?"

"पुढच्या आठवड्यात. अजून तारीख निश्चित नाही, पण येणार हे निश्चित!"

"मग फारच छान! त्यांची परवानगी घ्यायला नको?"

"तसं पाहिलं तर घ्यायला हवी, पण ते माझ्यावर सोपव तू!"

विश्वास म्हणाला, "सेनापतींच्या नावानं सुरू केलेल्या आपल्या कॉलेजच्या पहिल्या गॅदरिंगला सैन्यातले वरिष्ठ अधिकारी यावेत हा फारच चांगला योगायोग आहे."

७.

सायंकाळी सहाच्या सुमारास बंगल्यासमोर कर्नल ओबेरॉय यांची फियाट गाडी येऊन थांबली. कर्नलसाहेबांच्या सोबत मोहिनी, अमिता आणि कर्नल साहेबांच्या विश्वासू सेवक जनार्दनही आलेले होते.

गाडी बंगल्याच्या पोर्चमध्ये येऊन थांबताच पद्माबाई त्यांच्या स्वागताला पुढे झाल्या. पुण्यापासून गाडीत बसून मोहिनीचे पाय आखडले होते. अमिता गडद् निळ्या चुडीदारमध्ये फारस सुरेख दिसत होती. विक्रमनं तिला आपल्या घराण्याचे रीतिरिवाज सांगितल्यामुळे अमितानं पुढं येऊन पद्माबाईंचे चरण स्पर्शून नमस्कार केला.

कर्नलसाहेब करड्या रंगाच्या सफारीत होते. डोळ्याचा गॉगल काढून तो केसमध्ये ठेवीत ते म्हणाले. "तमचा हा परिसर अतिशय ...

"फारच छान! वाटेत साताऱ्यात थोडावेळ थांबून लंच घेतलं! हायवे बऱ्यापैकी मेंटेन केलेला दिसतो!"

"हो. पण या एन.एच. फोरला तशी फारच वहानांची वर्दळ असते!"

"वाटेत चार ट्रक उलटी चाकं करून पडलेले दिसले. एक मेटॅडोर आणि मारुतीची समोरासमोर टक्कर होऊन दोन्ही गाड्यांचा संपूर्ण चुराडा झालाय! कधी आपल्या राज्यकर्त्यांचे डोळे उघडतात आणि एकेरी वहातूक सुरू होते कोणास ठाऊक?"

कर्नलसाहेब पद्मावाईच्या मागोमाग येत म्हणाले, "आम्ही विकीलाही सोबत घेऊन येणार होतो. पण उद्याच त्याची हॉकीची मॅच आहे. विकीचे वडील कुठं दिसत नाहीत?"

"ते जरा दुर्गापूरला गेलेत. रात्रीपर्यंत येतील! काय मोहिनीताई? आमचं आपलं खेडं आहे बरं का?"

मोहिनी व्हरांड्यातल्या वेताच्या खुर्चीवर बसता बसता म्हणाल्या–

"तुमचं खेडं असले, पण हा बंगला मात्र अत्याधुनिक आहे!" इतक्यात बागेची पहाणी करून पोर्चकडे येणारी अमिता म्हणाली,

"मां ऽऽ मीनल कुठं आहेत?"

"अग तिच्या कॉलेजचं गॅदरिंग सुरू आहे. आणि हो, बरी आठवण झाली, कर्नलसाहेब उद्या तुमच्या हस्ते मुलांना बक्षिसं द्यायची आहेत, समारंभाचे तुम्ही 'चीफ गेस्ट' आहात!"

कर्नलसाहेब डोळे विस्फारून म्हणाले,

"हे आणि काय तुम्ही योजलंत? मी शिपाई गडी! मला कशाला पाहुणा केलंत? मला सभेत बोलता कुठं येतं?"

"सभा कसली आलीय्? मुलांना उपदेशपर चार शब्द सांगायचे! शिवाय काय आहे, आमच्या कॉलेजचं नाव आहे "सेनापती संताजीराव घोरपडे कॉलेज" सेनापतींच्या नावानं सुरू केलेल्या या कॉलेजचं पहिलं गॅदरिंग सैन्याधिकाऱ्यांच्या उपस्थित पार पडावं हा एक दुर्मिळ योग

आहे. नाहीतर आमच्या भागात पांढऱ्या टोप्या धारण करणारे अनेक पुढारी स्वतःहून यायला तयार असतात. पण प्राचार्य आणि मुलं म्हणाली, आम्हाला रटाळ भाषणं करणारा, खोटा ध्येयवाद बरळणारा पाहुणा नको. आमच्या विश्वासलाही तुम्ही येत आहात म्हणून सांगितलं, तो तर एकदम खूषच झाला."

"तुम्ही माझ्यावर भलतंच संकट आणलंत पद्मावाई! अहो मला रणांगणावर शंभर शत्रूंच्या तळावर एकट्याने हल्ला करायला भीती वाटणार नाही इतकी भीती समोर भाषण ऐकायला पंचवीस माणसं असली तरी वाटते! मागे एन. डी. एच्या एका समारंभात माझ्यावर तीन मिनिटं बोलण्याची वेळ आली होती, त्यावेळी तेरावेळा मी अडखळलो होतो!"

त्यावर शेजारी येऊन बसलेली अमिता म्हणाली, "डॅडीचं काही खरं मानू नका हं मां! डॅडी उत्तम बोलतात!"

"अमिता, अग घरी व्यवस्थित बोलणं निराळं आणि सभेत बोलणं निराळं! सभेत बोलताना "मॉब कॉन्शसनेस' येतो, विचार नीट व्यक्त करता येत नसतात."

"आता त्या सबबी काही चालणार नाहीत, आम्ही पत्रिकाही छापून टाकल्या आहेत!" पद्मावाई म्हणाल्या,

पद्मावाईनी उठून आतून एक निमंत्रण पत्रिका आणून कर्नलसाहेबांना दाखवली.

त्यानंतर चहा आला. चहा झाल्यावर पद्मावाई म्हणाल्या, "आपण आता वॉश घ्या, नंतर थोडावेळ शेताकडं फिरून येऊ!"

मोहिनी म्हणाल्या "आता फार चालायचं काही काढू नका!"

त्यावर पद्मावाई म्हणाल्या, "अहो शेत कुठं दूर नाही. बंगल्याच्या मागेच!"

"मग हरकत नाही."

कर्नलसाहेब माडीवरच्या गच्चीत आले. त्यानी बंगल्याच्या मागे

असलेली घोरपड्यांची जमीन बघितली. एकतळावर असलेली ती 'सरकार शेरी' नावाची जमीन अत्यंत सुपीक होती. शेता भोवताली ओळीनं नारळांची तीन चारशे झाडं होती. शेतात कोबी, फ्लॉवर, नवलकोल अशा भाज्या निरनिराळ्या वाफ्यात केलेल्या होत्या. नुकतीच कापणी केलेला गव्हाचा वाफा मोकळा होता. वाफ्यात पारव्याचा थवा चरत होता. खळ्यावर गव्हाची रास पडलेली होती.

आपली कन्या या जमिनीची मालक होणार या कल्पनेनं कर्नलसाहेब मनातून सुखावले होते. 'पद्माबाईच्यासारखी पुरोगामी विचाराची सासू, विक्रमसारखा उमदा, खेळाडूवृत्तीचा जामात आणि मीनलसारखी प्रेमळ नणंद, अमिताला मिळते आहे, हा आपल्या आयुष्यात आलेला एक दुर्मिळ योगायोग आहे, असंच कर्नलसाहेबांना वाटत होतं.

त्यानी बाथरुमध्ये जाऊन थंड पाण्यानं आंघोळ केली. मलमलीचा झब्बा आणि पायझमा घातला. जनार्दननं त्याना सोबत आणलेले जोधपूरी चढाव आणून दिले. आपल्या करड्या झालेल्या मिशांना पीळ देत कर्नलसाहेब जिन्यावरून खाली उतरले.

बायकांचं अधाप आवरायचं होतं. समोरच्या बगीचात कर्नलसाहेब हात मागे धरून फिरत असतांनाच दुर्गापूरला गेलेले अमृतराव परत आले.

निळा सर्जचा स्टँड कॉलरचा कोट, डोक्यावर काळी केसाळ टोपी, हातात छत्री, घेऊन येणारे अमृतराव हेच विकीचे वडील आहेत हे कर्नलसाहेबांनी ओळखलं.

बागेतून व्हरांड्याकडं येत कर्नलसाहेब अमृतरावांना हात जोडून म्हणाले,

"मी कर्नल ओबेरॉय?" पुढं येऊन कर्नलसाहेबानी अमृतरावांच्या हातात हात दिला. अमृतरावानाही नाईलाजाने आपला उजवा हात पुढं करावा लागला.

"केव्हा आलात आपण ?" अमृतरावानी औपचारिकपणे विचारलं.

"अर्धा पाऊण तास झाला! तुमचं हे सारं वैभव पाहून फार समाधान वाटलं!"

"कसलं आलंय् वैभव! आमच्या चांगल्या जमिनी कुळाना देऊन टाकाव्या लागल्या! दीड दोनशे एकर जमीन होती आमची." अमृतरावांची घराण्याच्या मोठेपणाची बढाई मारण्याची हौस कमी झालेली नव्हती. ते दोघे व्हरांड्यात येऊन बसल्यावर अमृतराव म्हणाले," तसा हा सारा गावच आम्हाला इनाम होता."

"आय सी ऽऽऽ! विकी म्हणत होता तुम्हाला परंपरेनं चालत आलेली एक पदवीही आहे म्हणे!"

"हो ऽऽ 'अमीर-उल-मुल्क'!"

कर्नलसाहेब म्हणाले, "मी सेनापती घोरपड्यांच्यावर लिहिलेलं एक इंग्रजी पुस्तक बऱ्याच वर्षापूर्वी वाचलेलं होतं!"

"आमच्या घराण्याचा समग्र इतिहासच आहे!"

"असणार! असणार! आपणाला शिकारीचा षोक दिसतो!"

व्हरांड्यातल्या भिंतीवर टांगलेलं भलंमोठं गवारेड्याचं शिंग न्याहाळत कर्नलसाहेबांनी विचारलं.

"पूर्वी होता. आता जमाना बदलला! आमच्यापेक्षा आमच्या आबासाहेबांनी खूपच शिकारी केल्या होत्या. जवळजवळ बारा मॅन इटर टायगर, आणि नऊ बिबळे मारले होते. रानडुक्कर. भेकर आणि सांबर याची गणतीच करता येणार नाही इतके मारले होते!" .

त्यावर कर्नलसाहेबानी खिशातून पाईप काढला. 'पाऊच'मधली 'पालमाल' कंपनीची तंबाखू त्यात भरत म्हणाले, "पण मला सांबर, भेकर हे प्राणी मारणं काही पटत नाही. रानडुक्कर एक ठीक आहे, ती जात पिकांना उपद्रव देणारी आहे!"

त्या दोघांच्या गप्पा चालू असतानाच आतून पांढरी साडी, पांढरा ब्लाऊज घातलेली डोक्यावरून पदर घेतलेली अमिता बाहेर आली. तिनं

अमृतरावांना ओळखलं. पुढं येऊन तिने त्यांचे चरण स्पर्शून नमस्कार केला. विक्रमनं परक्याजातीच्या मुलीशी विवाह करण्याचा निर्णय घेतल्याचे ऐकून काहीसे संतप्त झालेले अमृतराव अमिताच्या सौंदर्याने स्तिमितच झाले. त्यांच्या तोंडून शब्दच उमटेना. नकळत त्यानी खाली वाकून नमस्कार करणाऱ्या अमिताला आशिर्वादादाखल हात वर केला.

"विकीला सोबत आणायचं होतं पण उद्या त्याची हॉकीची मॅच आहे."

कर्नलसाहेब पाईप पेटवता पेटवता पुढं म्हणाले. "त्याला पुढच्या महिन्यात हरियाणा आणि पतियाळात जायचं आहे ना ?"

"परवा इथंही कॉलेजच्या मुलांच्या स्पर्धा झाल्या– अलिकडची मुलं खेळात लक्ष घालतात म्हणायचं !"

"होऽऽ पण आम्ही येण्याच्या अगोदर पद्मावाईनी मला इथल्या तुमच्या कॉलेजच्या गॅदरिंगचं पाहुणेपद देऊन टाकलंय्, उद्या संध्याकाळी मला बक्षीस वाटप करून नंतर भाषणाच दिव्य करावं लागणार आहे !"

पद्माताई आणि विश्वासराव या दोघांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या त्या कॉलेजबद्दल अमृतरावांना फारशी आस्था अशी नव्हतीच. पण उगाच वरकरणी ते हसत हसत म्हणाले, "हो, त्या कॉलेजमुळं इथल्या आजूबाजूच्या मुलांची थोडी सोय झाली खरी !"

"पण तुम्ही कॉलेजसाठी आपला वडिलार्जित वाडा देऊन एक फार मोठा आदर्श निर्माण केलात !"

"हंऽहंऽऽहंऽऽ !"

अमृतराव प्रत्युतरादाखल खोटं खोटं हसले. खरंतर विश्वासबद्दल अमृतरावांच्या मनात एक अढी होती. ती विश्वासच्या अलोट लोकप्रियतेमुळे निर्माण झालेली होती. चिंचलीकर घोरपड्यांना कोणी फारसं जुमानत नव्हतं. उलट विश्वास ज्या गावात जाईल तिथं पाच पन्नास माणसांचा घोळका त्याच्या भोवताली जमत असे. अमृतरावांना लहानपणाचे दिवस आठवत होते. वडिलांच्यासोबत ते बाजारपेठेतून

निघाले की रस्त्यावरचे लोक आपोआप बाजूला होऊन त्या बापलेकाना वाकून मुजरा करायचे. पण तेच अमृतराव मोठेपणी कर्तृत्वहीन निघाल्यामुळे त्याना गावात आणि गावाबाहेर कोणी किमत देईनासे झाले होते. आणि यातूनच मी कोणीतरी मोठा आहे हे समोरच्या माणसाला भासवत रहायची विकृती त्यांच्यात निर्माण झालेली होती.

पद्माबाईनी अमृतरावांच्या मर्यादा केव्हाच ओळखल्या होत्या. म्हणूनच त्यानी जमिनीचे आणि आर्थिक व्यवहार आपल्या हातात घेतले होते.

मोहिनी आणि अमिता तयार होऊन बाहेर आल्यानंतर पद्माबाई त्या सर्वांना बंगल्यामागे शेती दाखवण्यासाठी घेऊन गेल्या. चालता चालता त्या बोलत होत्या. 'पूर्वी आमची अडीचशे एकर जमीन होती. पण ती सर्व कुळांच्याकडे होती. कुळं देतील तो खंड घ्यायचा आणि गप्प बसायचं! त्यात कायदेही झपाट्यानं बदलू लागले. कुळाना कायद्याचं संरक्षण मिळत होतं, कसेल त्याच्या मालकीची जमीन हे विधेयक विधानसभेत येण्याआधीच मी कुळांना बोलावून घेतलं आणि त्यानाच त्या जमिनी विकून टाकल्या. आणि ही शेरीबाग, हिला सरकार शेरीही म्हणतात, एवढीच आमच्याकडे ठेवली. पण ही करता करता नाकी नऊ येतात. उगाच माझे आणि गावकऱ्यांचे संबंध चांगले आहेत म्हणून चाललं आहे."

"काय प्रचंड आहे हो ही विहीर?" विहिरीच्या कठड्यावर हात टेकवून कर्नलसाहेब खाली वाकून पहात म्हणाले.

"आता दोन वर्षापूर्वी मी बांधून घेतली. वीस वर्षात जमिनीचा गाळ उपसलेला नव्हता. जवळ जवळ बारा ट्रक भरतील एवढा गाळ निघाला. गाळ काढल्यापासून पुन्हा विहिरीला पाझर फुटला. शिवाय आमच्या गावाजवळून तोरणा नदी वहाते ना, तिचं पाणी पाझरून ही विहीर आता बारमाही अशी तुडूंब भरलेली दिसेल! बारा पंधरा एकर बागाईत करते, उरलेली ज्वारी, बाजरी, भुईमूग यासाठी ठेवलीय्!"

"पद्माताई मलासुद्धा अशी एखादी चार सहा एकर जमीन या भागात मिळते का पहा. रिटायर झालो की एखादं लहानसं घर बांधून रहावं म्हणतो!"

त्यावर मोहिनी म्हणाल्या, "तुमच्या डोक्यात रिटायरमेंट मिळाल्यावर सैनिकी स्कूलसाठी मुलांना शिकवण्याची योजना आहे, त्याचं काय करणार? यांचं काही ऐकू नका पद्माताई. आजपर्यंत मी यांच्या अनेक योजना ऐकत आले आहे.

त्यावर पद्माताई म्हणाल्या, "अहो उद्या अमिता या जमिनीची मालक होणार, तिला मदत करायला तुम्ही बेशक इथं येऊन रहा, दुसऱ्या जमिनीची गरजच काय आहे?"

"डॅडी, टूमॉरो आय एम गोईंग टू स्वीम इन धिस वेल! मां, मीनलला पोहता येतं का?" अमिता म्हणाली,

"मीनललाच काय, पण ही मीनलची आईसुद्धा छान पोहते! नगरदेवाळयाला आमच्या वडिलानी आम्हा बहिण भावंडाना पाचव्या वर्षीच पोहायला शिकवलंय्।"

त्यावर कर्नलसाहेब म्हणाले, "पद्माबाई, आमची ही अमिता पूर्वजन्मी मासा होती की काय समजत नाही. आम्ही रामटेकडीला राहत होतो. तेव्हा ही साडेचार वर्षाची होती. तीन दिवस 'फ्लोट' बांधून पोहली आणि चौथ्यादिवशी 'फ्लोट' काढून अगदी सराईतासारखी पोहली. तो दिवस मला अजून आठवतो. ब्रिगेडियर रायबहादूर खंबा पत्नीला घेऊन स्वीमिंग पूलवर आले होते. त्यानी अमिताचं इतकं कौतुक केलं की काही विचारू नका! तेव्हापासून ही जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा पोहते!"

"चला म्हणजे, तिची अन् माझी रास याबाबतीत जमली म्हणून समजा! विकीसुद्धा छान पोहतो! फक्त पोहायला येत नाही म्हणजे आमच्या सरकाराना!"

"काय सांगता?"

"हो ऽऽऽ! त्यांचे वडील, आई त्याना फारच जपायचे, कधी नदीकडं फिरकूदेखील दिलं नाही!"

"फँटॅस्टिक! पद्माबाई पुरुषांना पोहोयला येऊ नये यासारखी केविलवाणी गोष्ट नाही!"

विहिरापासून पश्चिमेला पाण्याचा नळ गेलेला होता. ते दाखवून पद्माबाई म्हणाल्या–

"आमच्या भागात पाण्याचा फार अपव्यय होतो. जमिनीला जरूरीपेक्षा जास्त पाणी दिल्यानं पीक तर चांगल येत नाहीच नाही; पण जमिनीना क्षार फुटण्याची भीती असते. आमच्या या भागातल्या बऱ्याच लोकांच्या जमिनी त्यामुळं नापीक झाल्या आहेत."

"सारखा उस करू नये म्हणतात ते खरं का?" कर्नलसाहेबांनी विचारलं,

"अगदी खरं. एकसारखा उस करण्यानं जमिनीचा कस कमी होतो. पीकं आलटून पालटून करावीत असं शेतीशास्त्र सांगतं! केवळ 'मनीक्रॉप' म्हणून सतत ऊस पिकवणाऱ्यांची एक दिवस दुर्दशा होणार आहे! मी चार वर्षापूर्वी इथं या वाफ्यात उस केला होता, नंतर इथं शाळू केला. त्यानंतर एक वर्ष यात भुईमूग लावली, यंदा कोबी करते आहे!"

"एवढ्या भाजीपाल्याची तुम्हाला गरज लागते?"

कर्नलसाहेबांनी पाईप शिलगावून विचारलं,

"आम्हाला एवढी भाजी कशाला लागते? दुर्गापूरचे लोक इथं येऊन घेऊन जातात!"

पलीकडच्या वाफ्यात क्रिकेटच्या चेंडूसारखे लालभडक टॉमेटो लागले होते. प्रत्येक वेल अधांतरी रहावा म्हणून वेळूचे छोटे छोटे मांडव उभे केले होते.

गव्हाच्या खळ्यावर आल्यानंतर मोहिनी त्या ढिगातले गहू हातात घेऊन म्हणाल्या,

"अगदी खैरपूरसारखा गहू आज मी पहिल्यांदा इथं पहाते आहे! पण ही रास अशी उघड्यावर का? पोत्यामध्ये का नाही भरून ठेवले?"

त्यावर पद्मावाई म्हणाल्या, "अजून 'डोहारा' व्हायचा आहे, 'डोहारा' म्हणजे इथं खळयावर ज्या लोकानी हे पीक तयार करायला मदत केली त्यांना मटणाचं जेवण द्यायची इथं प्रथा आहे. त्याला इथले लोक 'डोहारा' म्हणतात. तो उद्या करायचा आहे."

"किती लोक असतात जेवायला?" कर्नलसाहेबांनी विचारलं,

"सत्तर पाऊणशे लोक असतात की!"

"सगळे पुरुषच बोलावता का?"

"पूर्वी प्रथा होती, पुरुषानाच बोलवायची! पण मी ती मोडली. गव्हाच्या वाफ्यात भांगलणी करायला येणाऱ्या बायकांनाही मी आता बोलावते. प्रत्येक बाईला चोळीसाठी खण आणि नारळ देते!"

"वंडर फूल!"

"त्याचं काय आहे सांगू का, या लोकांना तुम्ही जर एक टक्का प्रेम दिलंत तर ते लोक नव्व्याण्णव टक्के विश्वासानं काम करतात. त्यांच्यावर गैरविश्वास दाखवलात तर मग संपलंच! आता दुपारी कामाला येताना हे लोक घरून, डाळ, भाकरी घेऊन येतात. जेवताना या वाफ्यातले दहा पाच टॉमेटो तोडून घेतात, कधी तोंडी लावायला गाजरं घेतात, मी त्याना बिलकूल मना करत नाही! खाऊन खाऊन किती खाणार? एखादुदुसरा टॉमेटो नाहीतर गाजर! बरं ते त्यानीच पिकवलेलं असतं! जमिनीची मालकी असेल आमच्याकडं पण ही पिकं तयार होताना त्या लोकांचा घाम इथं पडतो ना? म्हणून मी अशा किरकोळ गोष्टीकडं दुर्लक्ष करते. त्यामुळं नुकसान होण्याऐवजी फायदाच होतो! लोकांना चोरून खावं असं मुळीच वाटत नाही!"

त्यावर कर्नलसाहेब म्हणाले, "अमिता, तुलाही हीच प्रथा पुढं चालवायची आहे बरं!"

अमिता हसली आणि म्हणाली, "खरं मां चा आदर्श मीही पुढं चालू ठेवेन!"

कर्नलसाहेब सहकुटूंब विक्रमचं घर पहायला आले होते, पण त्या लोकांची चर्चा चालली होती ती जणू हे लग्न झालेलंच आहे अशा अविर्भावात!

खळ्यावरून थोडं पुढं गेल्यानंतर थोडं माळरान लागलं.

"हे कुरण, इथं श्रावण संपला की भरपूर गवत येतं. आमच्या गाई बैलांना वर्षभर पुरेल इतकं गवत इथं मिळतं! शिवाय शाळूचा कडबा असतो, मक्याचा कडबा असतो! आमचे बैल तुम्ही नाही पाहिले? उद्या सकाळी पहा! सहा बैल आहेत! दोन गाई आणि चार म्हशी! बाहेरचं दूध असं घ्यावंच लागत नाही!"

"पद्मावाई मग तुम्हाला बाजारात जायचं कारणच पडत नसेल? घराला लागणारं सारंच तुम्ही पिकवता असं दिसतंय?"

"असं काही नाही. साबण, तेल, लवंग, दालचिंनी, वेलदोडे, असे मसाल्याचे पदार्थ घ्यावेच लागतात. पण मागे मी मिरी आणि वेलदोडे लावले होते. पण या भागातलं हवामान त्याला 'सूट' होत नाही, मग ते सोडून दिलं!'

कुरणाच्या पश्चिमेला निळ्या डोंगरांच्या कुशीत लाल केशरी सूर्यबिंब हळूहळू शिरू लागलं. तेव्हा पद्मावाई म्हणाल्या, "आपल्या बंगल्याच्या गच्चीवरून सूर्यास्त फार छान दिसतो!"

"अमिता, तुला पेंटिंग करायला भरपूर ठिकाणं आहेत बघ, अमिताला चित्रकला चांगली येते." मोहिनी म्हणाल्या.

"मलाही पूर्वी विणकाम करायला खूप आवडायचं, पण आता इतका व्याप वाढलाय की इच्छा असूनही काही करता येत नाही! हॉलमध्ये ते घोड्याचं चित्र आहे ते पाह्यलंत ना?"

"कर्नलसाहेब तोंडातला पाईप काढून म्हणाले, "म्हणजे, ते तुम्ही केलंय?"

"हो, कापडावर विणलेलं आहे ते!"

"आय थॉट इट वॉज एन ऑईल पेंट! आता पुन्हा एकदा ते जवळून पहायला हवंय!"

संधिप्रकाशात मंडळी बंगल्याकडं परताना कर्नलसाहेबांनी विचारलं,

"पद्माबाई माफ करा एक गोष्ट स्पष्ट विचारतो, सरकार कधी मद्य घेतात का?"

त्यावर पद्माबाई चालता चालता थांबून त्या म्हणाल्या, "कर्नलसाहेब असं विचारणं म्हणजे त्यांचा अपमान आहे!"

"म्हणजे? मी विचारलं ती चूक झाली तर, आय एम् सॉरी!"

"आता काय सांगायचं तुम्हाला? मी या घरी आले नसते तर मद्यानं या घराची धूळधाण केली असती! स्वतःची प्रौढी मारते असं नका समजू! माझ्या घरी वडील आणि माझे बॅरिस्टर भाऊ दोघंही घेतात, पण त्याला काही प्रमाण आहे! इथं साऱ्याच गोष्टी बेहिशोबी होत्या!

अगोदर यांच्या मैफली मी बंद करून टाकल्या!

"म्हणजे आता बंगल्यात कडक 'दारुबंदी' आहे तर?"

त्यावर मोहिनी म्हणाल्या, "हे सर्व ते का विचारतात ठाऊक आहे का?"

"ते समजण्याइतकी मी नक्कीच सूज्ञ आहे! कर्नलसाहेब सैन्याधिकारी आहेत. ते अधूनमधून घेत असणार!"

"हे तुम्हाला कोणी सांगितलं?" कर्नल साहेबानी विचारलं.

"पुण्यात आले होते तेव्हा गॅरेजजवळ मोकळ्या स्कॉच व्हिस्कीच्या बाटल्या बघितल्या."

कपाळाला हात लावून कर्नल साहेब म्हणाले, "तुम्ही कमालच केलीत्!"

"मोहिनी, पाह्यलंस का? अशी चौफेर नजर असावी! पण पद्माताई आज मात्र तुमच्या परवानगीने मी सरकाराना एक दोन पेग व्हिस्की देणार!

"द्या, द्या, माझी काय हरकत नाही! आम्हा बायका बायकांची रास जमलीय, तेव्हा तुमची व्याह्या व्याह्याची त्यामुळं जमणार असेल तर त्यात मी कशाला आडकाठी आणू?"

बंगल्यातले दिवे लागले होते. स्वयंपाक घरातून पुलावा शिजल्याचा वास येत होता.

कर्नलसाहेब, मोहिनी आणि अमिता एकदम खूष होते. कर्नलसाहेब व्हरांड्यात बसलेल्या अमृतरावाना म्हणाले,

"सरकार आपण तुमच्या शेतीवर बेहद्द खूष झालो बुवा! काय जमीन ठेवलीय तुम्ही!"

"त्याचं श्रेय मला नाही, बाईसाहेबांना!"

"ते तर आहेच, पण त्यासाठी तुमचेही सहाय्य हवेच ना? आमच्या पुण्यात एखाद्या कर्तबगार माणसाचं कौतुक करताना, त्याच्या कर्तबगारीमागे त्याच्या पत्नीचा सिंहाचा वाटा आहे असे म्हणण्याची प्रथा आहे. मी तेच थोडं सुधारून इथं असं म्हणेन की 'पद्माबाईच्या अजोड कर्तृत्वामागे तुमची प्रेरणा आणि प्रोत्साहन आहे!'

पद्माबाई ते वाक्य ऐकून हसत हसत म्हणाल्या, "तसं काही बोलू नका, ते खरं वाटेल त्याना."

रात्री बंगल्यासमोरच्या हिरवळीवर कर्नलसाहेबानी 'ब्लॅक डॉग' व्हिस्कीची बाटली उघडली. एरव्ही 'खोडेज रम्' पिणाऱ्या अमृतरावाना दोन अडीच पेग व्हिस्कीने काहीच परिणाम होणार नव्हता.

दोन पेगनंतर त्यानी कर्नलसाहेबाना आपल्या घराण्याची वंशावळ ऐकवली, नातेवाईकांची नावं सांगितली. 'आपल्या घराण्याला असलेली 'अमीर-उल-मुल्क ही ऐतिहासिक पदवी किती मोलाची आहे हे मोठ्या अभिमानानं सांगितलं.

शांतपणाने व्हिस्कीचा घोट घेऊन पाईपचा धूर आकाशाकडं सोडणारे कर्नलसाहेब मनातल्या मनात म्हणत होते' हे सर्व निरर्थक मला ऐकवण्यापेक्षा 'मी पद्मावाईचा नवरा आहे.' एवढं सांगितलं असतं तरी पुरेसं होतं!'

८.

सेनापती संताजीराव घोरपडे महाविद्यालयाचे पहिले वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहाने साजरे होत होते.

पहाटेपासून कॉलेजसमोर उभ्या केलेल्या मंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ सनई चौघडा वाजत होता. दोन दिवसापासून विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत भाग घेतलेला होता. मुला मुलींनी काढलेल्या चित्रांची आणि रांगोळीची स्पर्धाही आयोजित करण्यात आलेली होती. त्या चित्रकला आणि रांगोळीच्या दालनाचं उद्‌घाटन मोहिनी ओबेरॉय यांच्या हस्ते व्हायचं होतं. पारितोषिक वितरण समारंभ कर्नल ओबेरॉय करणार होते. आणि त्याचवेळी विद्यार्थ्यांना उपदेशपर असे चार शब्द ते बोलणार होते.

कॉलेजचे प्रिन्सिपॉल जांभळे हे कर्मवीर आण्णांच्या संस्थेत शिकलेले होते. विश्वास आणि पद्मावाईच्या प्रेरणेने सुरू करण्यात आलेल्या या कॉलेजच्या प्राचार्यपदाची धुरा त्यानी समर्थपणे सांभाळलेली होती. खादीचे कपडे परिधान करणारे प्राचार्य जांभळे अत्यंत ध्येयनिष्ठ होते.

दुपारी चारच्या सुमारास कार्यक्रमा[illegible]

रहात नाही हा या भागातील लोकांचा आजवरचा अनुभव आहे. कसल्याही सत्तास्थानाची अपेक्षा न बाळगता, समाजसेवेला आजन्म वाहून घेतलेल्या विश्वासरावांनी या भागातील ग्रामीण जनतेवर अनंत उपकार करून ठेवलेले आहेत. बरं एवढं काम करूनही ते त्याचं श्रेय आपल्याकडं घेत नाहीत. आज त्यांच्या प्रेरणेनं सुरू झालेल्या या महाविद्यालयाच्या संमेलनालासुद्धा ते उपस्थित नाहीत. मी त्याना कळकळीची विनंती केली, 'निदान महाविद्यालयाच्या पहिल्या स्नेहसंमेलनाला तरी हजर रहा.' तर ते म्हणाले 'नको, माणसानं स्वत:ची स्तुती कधी ऐकू नये, तुम्ही या गॅदरिंगच्यावेळी माझ्या नावाचा उल्लेख करणार. माझ्या प्रयत्नाने हे महविद्यालय निर्माण झाले म्हणून पाहुण्यांच्या हस्ते माझा सत्कार करणार. सार्वजनिकरित्या सत्कार करून घ्यायला मला संकोच वाटतो. मी या भागातील जनतेचा सेवक आहे.' प्राचार्य पुढं म्हणाले–

"इयली मुलं महाविद्यालयीन शिक्षणासाठी गणेशपूर किंवा दुर्गापूर या गावी जात असत. त्यांचे अतोनात हाल व्हायचे. पावसाळ्यात वेळेवर गाड्यासुद्धा मिळायच्या नाहीत, जे काही आर्थिक दृष्ट्या थोडे बऱ्यापैकी होते. त्यांची मुलं दुर्गापूरलाच शिक्षणासाठी राह्यची, त्यानाही कंधी कधी तो खर्च झेपायचा नाही. म्हणून विश्वासरावानी कॉलेज सुरू करण्याचा प्रयत्न केला. तुम्हा सर्वांच्या आशीर्वादाने तो पूर्ण झाला, इतकंच !"

परवापर्यंत विश्वासराव या भागात होते. आज मात्र नेमके ते नाहीत पण आज आपल्याला लाभलेले पाहुणे कर्नल ओवेरॉयसाहेब हे विश्वासरावांच्या प्रयत्नामुळेच लाभलेत.

या प्रसंगी मला आणखी एक व्यक्तीचे ऋण मानायला हवे आहेत. त्या आहेत, वैनीसरकार! त्यामात्र आज आमच्या विनंतीला मान देऊन इथं उपस्थित राहिल्या हे आमचे परमभाग्य आहे. उपस्थित लोकांच्या नजरा पद्माबाईंच्यावर केंद्रित झाल्या आणि लोकांनी उस्फूर्तपणे

टाळ्यांचा कडकडाट केला. व्यासपीठावर बसायला नकार दिलेल्या पद्माबाई, मोहिनी अमितासह पुढच्या रांगेत खुर्च्यांवर बसलेल्या होत्या. प्राचार्य जांभळे पुढं म्हणाले, "विश्वासरावानी कॉलेजची परवानगी मिळवली खरी. पण जागेशिवाय कॉलेज सुरू करणं अशक्य होतं. ती आमची अडचण वहिनीसरकारनी दूर केली. त्यांनी कॉलेजसाठी आपला ऐतिहासिक वाडाच देऊन टाकला. त्यानी ही इमारत देताना आमच्यावर फक्त एकच अट घातली होती. कॉलेजला नाव दिलं पाहिजे ते सेनापती संताजीराव घोरपडे यांचं! खरं म्हणजे विश्वासराव आणि मी आमच्या महाविद्यालयाला कोणाचं नाव द्यायचं या संभ्रमातच होतो. वहिनीसरकारानी एका क्षणात आमची ती समस्या दूर केली.

या वर्षभरात आमच्या कॉलेजने अनेक समाजोपयोगी योजना राबवलेल्या आहेत. इतकीवर्ष चिंचली गावात माहिची आणि वागजाई देवीची यात्रा व्हायची. या यात्रेत शेकडो बकऱ्यांचे बळी दिले जायचे. ती प्रथा बंद व्हावी म्हणून आमच्या विद्यार्थ्यांनी घरोघरी जाऊन लोकांना भेटून या परंपरागत चालत आलेल्या अनावश्यक प्रथेला पायबंद घातला. लोक माहिला जेवण करतात, नातेवाईकांना बोलावतात, पण देवीसमोर होणारी ती कत्तल मात्र पूर्णत: थांबलेली आहे.

मुलानी खेडोपाडी जाऊन, सामाजिक वनिकरणात मोठ्या हौसेनं भाग घेतलेला आहे. गेल्या काही वर्षात चिंचली आणि वागजाईच्या परिसरात जंगलाची बेसुमार तोड झाली आहे, त्यामुळं गेली दहाबारा वर्ष या भागात पावसाचे प्रमाणही कमी झाले आहे. जंगलतुटीमुळे पर्यावरणाचा तोल बिघडलेला आहे. पावसांचा आणि जंगलाचा काय संबंध असतो, हे आमच्या विद्यार्थ्यांनी या भागातल्या जनतेला चित्रफितींच्या माध्यमातून पटवून दिले.

प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षण घेऊन स्वत:चा उत्कर्ष करण्याचा प्रयत्न करीत असतानाच समाजाच्या उत्कर्षाचेही भान ठेवायला हवे हेच आमच्या संस्थेचे ब्रीदवाक्य आहे.

कर्नलसाहेब, आज आपण आमच्या स्नेहसंमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून आलात, हा एक फार मोठा असा दुर्मिळ योगायोग आहे. सेनापती संताजीराव घोरपडे महाविद्यालयाच्या प्रथम स्नेहसंमेलनाला भारतीय सैन्यातले वरिष्ठ अधिकारी यावेत हा आम्हा सर्वांच्या दृष्टीनं चिरस्मरणीय असा प्रसंग आहे. मी आपले आणि आपल्या कुटुंबियांचे मनापासून स्वागत करतो आणि माझे हे प्रास्तविक संपवतो.''

त्यानंतर ज्या विविध क्रीडास्पर्धा झाल्या होत्या, त्यातील प्रथम क्रमांकांच्या विद्यार्थ्यांना कर्नलसाहेबांचे हस्ते बक्षिसं देण्यात आली. बक्षिसं देताना, श्रीरंग नावाच्या विद्यार्थ्याने धावण्याच्या स्पर्धेतले प्रथम क्रमांकाचे बक्षिस घेतले. तो आपल्या जागेवर परत जातो न जातो तोच पोहण्याच्या स्पर्धेतही त्यालाच पहिले बक्षिस मिळाले असल्याने तो परत स्टेजकडे आला. कर्नलसाहेब त्याला गमतीनं म्हणाले, ''दुसऱ्या कोणाला संधीच देत नाहीस की काय?''

तेव्हा शेजारी बसलेले प्राचार्य जांभळे म्हणाले, ''कर्नलसाहेब हे दोन आयटेम तर सोडाच, अजून तीनचार आयटेममध्ये हाच प्रथम आला आहे. उत्तम कुस्तीसुद्धा करतो.''

''अरे व्वा, याला डेव्हलप करायला हवा.''

''पण घरची गरीबी आहे. याला उत्तम आहार मिळाला तर तो कुस्तीच्या क्षेत्रात खरोखरच नाव कमवेल!''

''कार्यक्रम संपल्यावर मला त्या मुलाला भेटवा!''

विद्यार्थ्यांना बक्षिसं प्रदान करण्यात आल्यानंतर कर्नलसाहेब बोलण्यासाठी माईकजवळ आले.

''माननीय प्राचार्य, या गावचे दानशूर सरकार अमृतराव आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. पद्माबाईसाहेब आणि माझ्या बालमित्रानो,

तुमच्या प्राचार्यांनी सुरुवातीला या कॉलेजच्या निर्मितीसाठी अव्याहत परिश्रम घेणाऱ्या विश्वासरावांची हकिगत ऐकून मी अक्षरश: भारावून गेलो आहे. आज आपल्या देशात खरी गरज असेल तर

असल्या नि:स्वार्थी कार्यकर्त्याची! हा भला मनुष्य आपल्या गौरवाचे शब्द ऐकावे लागतील म्हणून आज इथं हजर नाही, यातच त्यांचा मोठेपणा मला दिसून आला! मी रोज सकाळी ब्रेकफास्ट घेण्यापूर्वी वर्तमानपत्रं वाचतो. असा एकही पेपर अलीकडं मला आढळत नाही की ज्यात राजकीय पुढाऱ्यांचे फोटो नाहीत! 'खंबीर नेतृत्व, आदर्श मार्गदर्शन, योग्य निवड असे मथळे देऊन राजककीय पुढाऱ्यांचे फोटो पेपरवाल्याना पैसे देऊन छापले जातात. ते 'पुढारी' काय पात्रतेचे असतात हे मी वेगळं सांगण्याची गरज नाही. दुर्गापूरला एक वृद्ध पुढारी आहे म्हणे! रोज वृत्तपत्रात आपलं नाव आणि फोटो आलाच पाहिजे असा त्याचा अट्टाहास असतो! तसा तो पेपरमध्ये फोटो किंवा त्याचं नाव नसलं की तो अस्वस्थ होतो! त्याचं ब्लडप्रेशर वाढतं!

अशी जी एक प्रसिद्धीची घाणेरडी हाव असणारी पुढाऱ्यांची जात आज आपल्यात निर्माण झालेली आहे, त्या पार्श्वभूमीवर विश्वाससारखा चारित्र्य संपन्न, प्रसिद्धी पराङ्मुख असा कार्यकर्ता आपल्यात असू शकतो हे तुमचं भाग्य आहे! आता मला सर्वात मोठी उत्कंठा लागून राहिली आहे ती या महाविद्यालयाच्या त्या 'पायोनिअरला' डोळेभरून पहायची!'

कर्नलसाहेबांच्या उद्‌गारावर विद्यार्थ्यांनी आणि उपस्थितानी टाळ्यांचा गजर केला, विश्वासच्या मोठेपणाचा तो गौरव होता.

"मित्र हो, आपल्या देशाने लोकशाही पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. पण ज्या देशात शंभरटक्के लोक सुशिक्षित असतात, त्याच देशात लोकशाहीचा हा प्रयोग यशस्वी होऊ शकतो. आपल्या देशात अजून साठ ते सत्तर टक्के लोक निरक्षर आहेत. मतदान करताना स्वार्थी 'पुढारी' या निरक्षर लोकानाच आपल्या हाताशी धरतात, त्याना पैशाची अमिषं दाखवली जातात. त्यांची मतं ते अक्षरश: विकत घेतात! मतं विकत घेऊन सत्तेवर येणाऱ्या लोकाकडून देशाचं भलं होईल ही आशा व्यर्थ असते. म्हणून आपल्या देशात लोकशाही यशस्वी व्हायची असेल

तर प्रथम या देशातला प्रत्येक नागरिक साक्षर बनायला हवा, केवळ साक्षरच नव्हे तर, सुविद्य आणि सूज्ञसुद्धा! आपण ज्याला मत देतो, त्याचं पूर्व चारित्र्य काय आहे? तो सत्तेवर आल्यावर ही सत्ता समाजाच्या उन्नतीसाठी राबवेल की स्वत:च्या स्वार्थासाठी? असा विचार करणारा नागरिक या देशात अजून निर्माण झालेला नाही. तो जर निर्माण व्हायचा असेल तर शिक्षणाचा प्रसार व्हायला हवा. या चिंचलीसारख्या लहानशा गावात महाविद्यालय निघतं आहे, ही खरोखरच कौतुकाची गोष्ट आहे.

आपल्या देशाची परंपरा फार मोठी आहे. या देशात सम्राट चंद्रगुप्त मौर्यापासून ते छत्रपती शिवाजी महाराजापर्यंत अनेक वीरपुरुष निर्माण झाले. पण अलीकडं काही वर्षात या वीरपुरुषांचे विस्मरण घडत आहे. या देशात अलीकडे विचित्र अशी शिकवण दिली जाते आहे. म्हणे एखाद्याने तुमच्या गालावर मारले तर दुसरा गाल पुढे करा, सहिष्णुता हा सर्वात मोठा गुण! पण अति सहिष्णुता हा भेकडांचा गुणधर्म आहे. तुमच्या गालावर निष्कारण मारणाऱ्याचा हात कलम करण्याची हिंमत तुमच्यात हवी! ही हिंमत केवळ एका व्यक्तीत असून चालणार नाही. ती उभ्या राष्ट्रात निर्माण व्हायला हवी! त्यासाठी देशाचं सैन्यदल मजबूत हवं! 'आपला देश महान परंपरेचा आहे.' हा मंत्र जपून भागणार नाही. या देशावर आक्रमण करणाऱ्याला, या देशाची निष्कारण कुरापत काढणाऱ्याना जन्माची अद्दल घडवण्याचे सामर्थ्य आपल्यात हवे! आज आपण बाहेरच्या जगाकडं पहा. अमेरिका आणि रशिया ही दोन प्रबल राष्ट्रं कोणत्याही क्षणी एकमेकांचा सर्वनाश करू शकतील इतकी शस्त्रसमृद्ध आहेत. पण ही दोन राष्ट्रं एकमेकाविरुद्ध कधीच लढणार नाहीत. त्याना ठाऊक आहे की आणखीन एखादं युद्ध झालं तर ते इतकं संहारक असेल की त्यांच्या देशाची समृद्धी काही क्षणातच बेचिराख होईल, म्हणून मला म्हणायचं आहे, की आपल्या देशाचा नागरिक सुखानं आणि शांततेनं जगायला असेल तर आपणही बलशाली होणं

अत्यावश्यक आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण दोन लढाया खेळलो. त्यावेळी आपल्या सैनिकानी, वैमानिकानी आणि नौदलाने अतुलनीय अशा शौर्याचे प्रदर्शन घडवले. आपणा सर्वांना अभिमान वाटावा असा तो इतिहास आहे! म्हणून तुमच्यापैकी ज्याना खऱ्या अर्थाने या देशाची सेवा करायची इच्छा असेल त्यानी सैन्यात, विमान दलात किंवा नौदलात सामील व्हावे असे मी सुचवतो.

आज या प्रसंगी मला इथे प्रमुख पाहुणा म्हणून संयोजकानी बोलावलं म्हणून मी त्यांचे आभार मानतो. आपण सर्वांनी माझ्यासारख्या सैनिकाचे चार मोडकेतोडके शब्द ऐकून घेतलेत म्हणून मी तुम्हा सर्वांचेच आभार मानतो.

जय महाराष्ट्र! जय हिंद.

कर्नलसाहेब थोडकंच बोलले पण ते इतकं मनापासून बोलले की चिंचलीच्या परिसरातील उपस्थित नागरिकांनी उस्फूर्तपणे टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला.

त्यानंतर विद्यार्थी प्रतिनिधीने आभार प्रदर्शन केले. राष्ट्रगीतानंतर समारंभ संपन्न झाला.

पद्मावाई व्यासपीठावरून खाली येणाऱ्या कर्नल साहेबाना उद्देशून म्हणाल्या "फारच छान बोललात आपण"

"अहो कसचं छान! पण एक गोष्ट खरी, समोर विद्यार्थी असले की मला खूप आनंद होतो. कधीकधी मला माझं बालपणही आठवतं!"

इतक्यात तिथं प्राचार्य जांभळे आले आणि म्हणाले, "मघाशी आपण भेटवा म्हणून सांगितलं तो हा श्रीरंग!"

हातात पारितोषक आणि प्रमाणपत्रांची भेंडोळी घेतलेला श्रीरंग जांभळे सरांच्या बाजूला उभा होता.

तेव्हा पद्मावाई म्हणाल्या, "सर. त्याला बंगल्यावर ने—

उशीर झाला आहे. कर्नल साहेब...

बोलायचं होतं, हा चांगला 'ॲथलेट' होईल भविष्यात!"

"हो ते ठीक आहे, आपण त्याच्याशी बंगल्यावर बोला! तू ये श्रीरंग बंगल्यावर!"

श्रीरंगने होकारार्थी मान हलवली.

समारंभाला अमृतराव हजर होते, पण त्यानी कर्नलसाहेबांच्या भाषणावर कसलीही प्रतिक्रिया व्यक्त केली नव्हती. प्रतिक्रिया व्यक्त करण्याची त्यांच्यात पात्रताच नव्हती.

बंगल्यावर परतल्यानंतर पद्मावाई मोहिनीला म्हणाल्या, 'कर्नलसाहेब इतकं चांगलं बोलत असतील याची कल्पना नव्हती.'

"त्याना मुलं समोर असली की असे मनापासून बोलतात. मुलाना ते 'अनस्पॉईल्ड सिटीझन्स' म्हणतात. कर्नलसाहेबांच्या मते माणूस प्रौढ झाला की तो काही ऐकण्याच्या पलीकडचा असतो."

'खरं आहे त्यांचं एकअर्थी! आपल्या देशात आजपर्यंत इतके संतमहात्मे होऊन गेले. त्यानी समाज प्रबोधनात आपल आयुष्य खर्च केलं तरी अजून लोक लांड्यालबाड्या करतातच ना? विश्वासघात, स्वार्थ, लोभ हे कमी होण्याऐवजी दिवसेदिवस वाढतच चाललेत! आता या तरुण पिढीनंच काही आदर्श डोळयापुढे ठेवले तर त्यातच त्यांच आणि देशाचही हीत आहे."

कर्नलसाहेब वॉश घेऊन कपडे बदलून खाली हॉलमधे आले.

गॅदरिंगच्या कार्यक्रमात सहभागी झालेल्या मीनलला पाहुण्यांच्या सहवासात आत्तापर्यंत राहताच आले नव्हते. बक्षिससमारंभ आणि भाषणाचा कार्यक्रम संपल्यानंतर मात्र ती सरळ घरी आली. तिला पाहून कर्नलसाहेबानी विचारलं

"काय मीनल, काय म्हणतात मुलं? पाहुण्यानी बोअर केलं म्हणाले नाहीत ना?"

"छेऽऽ! मुलं फारच खूश आहेत, असं मनापासून मुलाशी हितगूज करणारे वक्ते आजकाल आहेतच कुठं?

शब्दांची पोकळ आतषबाजी करणारा व्यावसायिक वक्ता बोलावला नाही म्हणून आम्हा सर्वानाच आज बरं वाटलं !"

"पद्माताई, तुमची मीनल बोलण्यात मोठी पटाईत आहे बरं! अरेऽऽ सरकार कुठं दिसत नाहीत ?"

"आहेत पोर्चमधे तुमचीच वाट पहात आहेत !"

"ओऽऽह, बरोबर आहे, त्यांची वेळ झालेली दिसते! बेटा अमिता, माझ्या बॅगेतली ती व्हिस्कीची बाटली तेवढी आणतेस ?"

"जीऽऽऽ डॅडी !"

व्हरांड्यात कर्नलसाहेबांची वाट पहात अमृतराव पिवळा हत्ती सिगारेटचे झुरके घेत बसले होते. कर्नल वेदपाल ओबेरॉय हे किती जबरदस्त व्यक्तिमत्व आहे हे त्यानी गेले दोन दिवस जवळून बघितले होते. काहीतरी कुरापत काढून विक्रमची ही सोयीरीक मोडता आली तर पहावी असा संकल्प केलेल्या अमृतरावाना आपण या गृहस्थासमोर किती नगण्य आहोत याची जाणीव झालेली असावी.

कर्नलसाहेब व्हरांड्यात येताच मागून आमिताने व्हिस्कीची बाटली आणि ग्लास टेबलावर आणून ठेवले. मीनलने पाण्यानं भरलेला जग आणला.

"काय सरकार ? आपली माझ्या भाषणावर काही प्रतिक्रिया ?"

कर्नल साहेबानी विचारलं.

"छान झालं भाषण ? पण आपण त्या विश्वासाबद्दल जे गौरवोग्दार काढलेत, ते थोडसं खटकलं !"

"खटकलं ? ते का ?"

"तुम्हाला वाटतं तेवढा तो माणूस मोठा नाही !"

"म्हणजे ?"

"लोकाना दहशत घालून पैसा उकळून समाजकार्य होतं ?"

"म्हणजे ? तो दहशत घालतो ?"

"मग काय तर? धनगरवाड्यात शाळा बांधण्यासाठी विरूपाक्ष सावकाराकडून पंधरा हजार रुपये त्यांन जबरदस्तीनं घेतले! परवा गणेशपूरला मला विरूपाक्ष सावकार भेटला होता, तोच सांगत होता."

"पण मला वाटतं चांगल्या कामासाठी लोक जर खुषीनं पैसा देत नसतील तर तो जबरदस्तीनं त्यांच्याकडून वसूल करण्यात काही वावगं नाही!"

"म्हणजे आपण त्याच्या गुन्हेगार प्रवृत्तीचं समर्थन करता असा त्याचा अर्थ होईल!"

"यात गुन्हेगारीचा काय संबंध?"

"एखाद्या माणसाकडून जबरदस्तीनं पैसे घेणं हा गुन्हा नाही का? मुरारदादा म्हणतात हा 'एक्स्टॉर्शनचा गुन्हा होतो!"

"मुरारदादा म्हणजे तुमचे ते फौजदार बंधू तेच ना?"

"होऽऽ होऽऽ तेच! ते म्हणतात एकना एक दिवस हा विश्वास गजाआड जाणार!"

कर्नलसाहेबाना एव्हाना अमृतराव, मुरारराव. या दोन्ही लोकांच्या विचारसरणीची थोडीफार कल्पना आलेली होती. मुराररावाना त्यानी अद्याप पाहिलेलं नव्हतं. पण पद्माबाईनी त्याना मुराररावांच्या प्रतिगामी विचारसरणीची थोडीफार कल्पना दिलेली होती. अमृतरावांच्यावर मुराररावांच्या विचारसरणीचा पगडा आहे हेही त्याना समजले होते. कर्नलसाहेब म्हणाले,

"त्याचं काय आहे सरकार आजकाल बहुसंख्य लोक स्वतःच्या सुखसोयीशिवाय दुसऱ्या कशाचाच विचार करेनासे झाले आहेत. मी, माझी मुलं, माझी प्रॉपर्टी यातच लोक मश्गूल आहेत. या देशातल्या गोरगरीब आणि अज्ञानी जनतेचं भलं करण्याच्या प्रेरणेने कार्यरत झालेला विश्वाससारखा एखादा निस्पृह कार्यकर्ता सधन लोकाकडून चांगल्या कामासाठी जबरदस्तीनं पैसा जमा करत असेल तर त्यात बिघडलं कुठं? हांऽऽ आता तुमच्या फौजदारबंधूच्या दृष्टीनं ते गुन्ह्याचं

कृत्य होत असलं तरी त्या कृतीमागचा हेतू नि:संशय स्तुत्य आहे असं नाही आपल्याला वाटत?"

व्हिस्कीच्या ग्लास ओठाजवळ नेत अमृतराव म्हणाले, "मला तसं वाटत नाही, तुमचा हेतू लाख चांगला असेल. पण तो हेतू पूर्ण करताना ज्या मार्गाचा अवलंब करता तो मार्गसुद्धा स्वच्छ असायला नको?"

कर्नलसाहेबानीही एक घोट घेतला आणि ते म्हणाले "पण सरकार विश्वासने हे सेनापती कॉलेज इथं सुरु केले. त्यात त्याचा हेतू इथल्याभागातील मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी हाच होता ना? यापूर्वी इथं तसा प्रयत्न कोणी केला होता का? मला वाटतं.....!"

"काय?"

"आपल्या मनात विश्वास बद्दल थोडा गैरसमज आहे! अहो कल्पना करा या भागातली आज चारपाचशे मुलं तुमच्या या कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहेत, त्यांची केवढी मोठी सोय झाली? असा प्रयत्न खरं म्हणजे तुम्ही स्वत:च करायला हवा होता!"

क्षणाचाही विलंब न लावता अमृतराव म्हणाले"

आम्ही होतो म्हणूनच हे कॉलेज निघालं! विश्वासनं परवानगी आणली हे जरी खरं असलं, तरी तो हे कॉलेज काय झाडाखाली भरवणार होता? अहो एवढा मोठा आमचा वाडा आम्ही दिला म्हणूनच नाही का हे कॉलेज सुरु झालं?"

"हो, तेही खरंच!"

कर्नलसाहेबानी खूप दुनिया अनुभवलेली होती. मनुष्य स्वभावांचे असंख्य नमुने जवळून बघितलेले होते. अमृतराव घोरपडे [illegible] केले

"या प्राचार्य, बसा, तुम्हाला हे चालतं का?" ग्लासाकडं बोट दाखवीत कर्नलसाहेबांनी विचारलं. प्राचार्य जांभळयानी नकार दर्शवीत कर्नलसाहेबाना हात जोडले.

"हांऽऽ तर मी या मुलाला एवढयासाठी बोलावलं की हा भविष्यात चांगला ॲथलेट होईल. सैन्यात यायला आवडेल का तुला?"

कर्नलसाहेबानी अदबीनं बाजूला असलेल्या श्रीरंगला विचारलं.

त्यावर प्राचार्य म्हणाले, "त्याचं काय आहे साहेब, हा एकुलता एक मुलगा आहे. याची आई विधवा आहे. हा जन्माला येण्यापूर्वी याचे वडील अपघातात गेले. आईनं याला मोलमजुरी करून लहानाचा मोठा केलेला आहे. खरंतर महाविद्यालयीन शिक्षण घ्यायची सुध्दा त्याला ताकद नाही. केवळ वैनीसरकारांची कृपा म्हणून हे पोर शिकतं आहे!"

"याला कॉलेजची एकदोन वर्षे पूर्ण करु दे. मी याला सैन्यात भरती करुन घेतो, ॲथलेटस्‌ना सैन्यात फारच सवलती मिळतात!"

त्यावर हातचोळत प्राचार्य म्हणाले -

"ते थोडंसं कठीण वाटतं मला साहेब, याच्या आईला याच्याशिवाय दुसऱ्या कोणाचा आधार नाही. शिवाय अजूनही इथल्या लोकाना वाटतं, सैन्यात जाणं धोक्याचं असतं!"

कर्नलसाहेब हसत हसत म्हणाले

"प्राचार्य, अहो प्रत्येकानं जर सैन्यात जाणं धोक्याचं आहे असं मानलं, तर या देशाचं रक्षण कोण करणार? माझ्या दृष्टीनं म्हणाल तर सैनिकासारखी प्रतिष्ठा जगात कोणालाच नाही! काय हो सरकार?"

इतका वेळ ती चर्चा ऐकत बसलेले अमृतराव म्हणाले", आपण स्वत: सैन्यात आहात तेव्हा तुम्हाला तसंच वाटणार!"

"मला काय वाटतं ते द्या सोडून, देशाचं संरक्षण ही मला सर्वात आदर्श अशी सेवा वाटते. काय रे श्रीरंग, तुला नाही वाटत सैनिक होऊन देशसेवा करावी?"

श्रीरंग किंचित् हसून म्हणाला

"साहेब, मला घरी जायला थोडा उशीर झाला तर माझी आई सगळं गाव पालथा घालते. एकदिवस सुध्दा ती मला कुठे बाहेर जाऊ देत नाही!"

त्यावर कर्नलसाहेब म्हणाले, "अरे श्रीरंग तू एका आईचा विचार करतोस? भारतात अशा असंख्य माता आहेत, त्यांचं संरक्षण हे एका मातेच्या संरक्षणापेक्षा मोठं काम आहे असं नाही वाटत तुला?"

श्रीरंगला त्यावर काही उत्तर देता आलं नाही. तो तसाच दिङ्मुढ होऊन उभा असताना पद्मावाई बाहेर आल्या.

त्या कर्नल साहेबाना म्हणाल्या

"साहेब, यानं आज पाचसहा बक्षीसं मिळवली म्हणून आपणाला त्यानं सैन्यात यावं असं वाटतं ते बरोबरच आहे. पण हा सैन्यात भरती झाला की याची आई एक महिन्यात मरुन जाईल. फार हळवी बाई आहे ती! तिनं आयुष्यात खूप मोठा आघात सहन केलेला आहे!"

"नवऱ्याच्या आपघाती मृत्यूचाच ना?"

पद्मावाई अमृतरावांच्याकडं एक कटाक्ष टाकून म्हणाल्या, "बलभीमच्या अपघाती मृत्यूला हे अमीर-उल-मुल्क घोरपडेच करणीभूत आहेत!"

"म्हणजे?" कर्नलसाहेबानी उत्कंठेनं अमृतरावांच्याकडे पाहत विचारलं.

"कशाला आता त्या जुन्या गोष्टी उगाळता आहात?

अमृतराव काहीसे नाराजीनं म्हणाले

"पण घडलं तरी काय?" कर्नलसाहेबांनी उत्कंठेनं विचारलं.

त्यावर पद्मावाई म्हणाल्या 'ते सांगेन नंतर! श्रीरंगला आपण बोलावलं होतं ते काम झालं का?

"हो, यांन सैन्यात भरती व्हावं असं मला अगदी मनापासून वाटतं, पण त्याच्या आईची मन:स्थिती ऐकल्यापासून तसा आग्रह धरु

नये असं वाटायला लागलंय !"

इतकावेळ गप्प बसलेले प्राचार्य म्हणाले", तूर्तास यानं कुस्तीवर लक्ष केंद्रित केलेलं आहे, आजूबाजूच्या खेड्यात होणाऱ्या यात्रेत त्यानं कुस्त्या करून बरीच बक्षिसं मिळविलेली.आहेत. याला चांगला आहार जर मिळाला तो केवळ आपल्या तालुक्यातलाच नव्हे तर जिल्ह्यातला नामवंत पहिलवान होईल !"

"चांगला आहार ? म्हणजे ?"

कर्नलसाहेबानी विचारलं.

"रोज कमीत कमी एकशेर दूध हवं, आठवड्यातून दोनतीन वेळा आकनीचा सूप हवा, अधूनमधून बदाम, पिस्त्याचा 'घोटा' हवा, पण एवढी याची आज परिस्थिती नाही !"

त्यावर पद्माबाई म्हणाल्या," बाकीचं काही जमलं नाही तरी याला रोज एकशेर दूध मी देऊ शकेन ! हे बघ श्रीरंग, रोज संध्याकाळी सात वाजता बंगल्यामागे थट्टीत धारा काढल्या जातात, मी संतरामला सांगून ठेवते. उद्यापासून त्याच्याकडून रोज शेरभर दूध घेऊन जात जा !"

अमृतरावानी त्यावर काहीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. प्राचार्य जांभळे कर्नलसाहेबांचा निरोप घेऊन श्रीरंग सोबत जाण्यासाठी निघाले तेव्हा कर्नलसाहेब म्हणाले

"प्राचार्य, याच्या आईची समजूत घालता आली तर पहा, आजकाल सैन्यात अशी खेळाडू मुलं दाखल झाली तर त्याना भराभर प्रमोशन्स मिळतात !"

"बघतो प्रयत्न करुन !" असं म्हणून प्राचार्य श्रीरंगला घेऊन परत गेले.

मघा पद्माबाई म्हणाल्या होत्या, श्रीरंगचा बाप बलभीम याच्या मृत्यूला सरकार घोरपडेच कारणीभूत आहेत. तो नेमका प्रकार काय घडला हे जाणून घ्यायला कर्नल ओबेरॉय उत्सुक होते. प्राचार्य गेल्यानंतर कर्नलसाहेबानी पद्माबाईना विचारलं

"सरकार काय प्रकार घडला होता तो?"

"यानाच विचारा!"

पद्माबाईच्याकडे पाहत अमृतराव म्हणाले, पद्माबाई सांगू लागल्या.

"माझं नुकतंच लग्न होऊन मी चिंचलीला आले होते. त्यावेळी यांचे वडील सूर्याजीराव यानी दुर्गापूरच्या कलेक्टरला चिरंजिवांच्या लग्नानिमित्त जेवण द्यायचं ठरवलं होतं. त्यावेळी आम्ही सर्व जुन्या वाड्यात राहत होतो.

मी नगरदेवाळ्यावरून सगळा गोतावळा सोडून आल्यामुळे फारच चमत्कारिक अवस्थेत होते. एक तर मला वडिलानी शिक्षणापासून वंचित करुन घाईघाईनं माझं लग्न करुन दिलेलं होतं, आणि दुसरं म्हणजे एकदम नवीन अशा वातावरणात आल्यामुळं मला बिलकूल करमत नव्हतं.

कलेक्टर साहेबासाठी तोरणा नदीतले मासे पकडून ते ताजेताजे त्याना बनवून द्यायचे असा आमच्या सासरेबुवानी बेत केला. पण त्यावेळी तोरणानदीत दोन भल्या मोठ्या मगरी आलेल्या होत्या डोहाकडं कोण फिरकत नसे. एकदा दोनदा पाण्यावर गेलेल्या शेळ्या मेंढ्या मगरीनं ओढून नेल्या होत्या. धुणं धुण्यासाठी गेलेली एक बाई खरं म्हणजे मगरीनंच ओढून नेली होती, पण लोक म्हणत होते, पाय घसरुन पडली आणि मेली.

सासरे शिकारीचे शौकीन होते. गावाला उपद्रव देणाऱ्या त्या मगरीना मारुन टाकायचा त्यानी निर्णय घेतला.

रोज सकाळ संध्याकाळ ते खांद्यावर रायफल घेऊन डोहाजवळून फिरू लागले. तोरणेच्या डोहाजवळ एका बाजूला खडक आहे. त्या

मगरी खडकाच्या दिशेनं येत होत्या. हळूहळू त्या काठाला लागल्या आणि खडकावर येऊन विसावल्या. सासऱ्यानी त्याना थोडं स्थिर होऊ दिलं. स्वच्छ सूर्यकिरणांत त्याना दोन्ही मगरी स्पष्ट दिसू लागल्या. पाचबारी थर्टी स्प्रिंग फिल्ड बंदूक त्यानी सरसावली. एका पाठोपाठ एक असे दोन बार उडाले. दोन्ही मगरीच्या मस्तकांच्या काही क्षणातच ठिकऱ्या उडाल्या होत्या.

काय घडलंय हे समजण्याच्या आतच त्या मगरी गडागडा लोळून गतप्राण झाल्या. गावकऱ्यानी जल्लोष केला. दोन्ही मगरींची मिरवणूक काढली. गावचे संकट नाहीसे झाल्यामुळे गावकऱ्याना अतोनात आनंद झाला होता. हळूहळू लोक नदीकडे जाऊ लागले. हा प्रकार घडल्यानंतर पुढे आठ पंधरा दिवसानीच कलेक्टर ये"ार होते.

गावात कोळ्यांची चार घरं होती, पण मगरी आल्यापासून कोळी नदीकडं फिरकले नव्हते. ते गाव सोडून दुसऱ्या गांवी जाऊन राहिले होते. कलेक्टर येणार म्हणून सांसऱ्यानी ते काम बलभीमला सांगितले. बलभीम हा या सरकारांच्याच वयाचा, कुणबी, आमच्याकडे शेतावर कामाला होता. त्याचं लग्न होऊन सहासात महिने झाले होते. तो भयंकर धाडसी होता.

कोळी लोक गाव सोडून गेल्याने सासऱ्यानी बलभीमलाच डोहावर जाळी पसरायला सांगितले. तसा बलभीम अतिशय धाडशी होता. तो रॉकेलचे मोकळे डबे घेऊन तरंगत डोहाकडे गेला. त्यानं जाळी पसरलीसुध्दा, पण तो किनाऱ्याकडे परत येताने आचानक बुडाला. तो वर येईना म्हणून लोकानी सासऱ्याना बोलावून आणले.

त्या डोहात आणखीन एक मगर होती. हे कोणालाच माहिती नव्हतं. तिसऱ्या दिवशी अर्धवट खाल्लेलं बलभीमचं प्रेत डोहावर तरंगतना दिसलं. बायजा तेव्हा पाच महिन्याची गरोदर होती. सारा गाव हळहळला. मग आता सांगा. त्या बलभीमच्या मृत्यूला हे घोरपडे लोकच कारणीभूत आहेत की नाही?"

"मग पुढं काय झालं?"

"बलभीमला गावात एकगुंठा देखील जमीन नव्हती. तो आमच्याच शेतीत राबायचा. लोक सासऱ्याना म्हणाले, "बलभीमची बायको निराधार झालेली आहे तिला एक दोन एकर जमीन घोरपड्यानी द्यावी. पण सासरे काही तयार झाले नाहीत. ते म्हणाले बायजाच्या पोटाला लागेल तेवढं धान्य आम्ही देऊ! पुढं सासरेही गेले! मी मात्र वेळोवेळी बायजाला मदत करते.

अमृतरावाच्याकडं पाहत कर्नलसाहेब म्हणाले, "वडिलांच्या पश्चात सरकार आपण ती जबाबदारी घेणं जरूरीचं होतं!"

अमृतराव त्यावर काहीच बोलले नाहीत. ते फक्त सिगारेटचे झुरके घेत बसले.

थोड्यावेळानं ते म्हणाले

"आमच्या हातात काय होतं? या बाईसाहेबानीच सर्व सूत्रं आपल्या हाती घेतली ना?"

त्यावर पद्माबाई म्हणाल्या", हो, ती घेणंच भाग होतं! ती सूत्रं मी माझ्या हाती घेतली. म्हणून हा बंगला उभा राहिला. ही चाळीस एकर शेरीबाग कबजात राहिली. इतर सरकार लोकांनी आपल्या वडिलार्जित जमिनींची जशी वाट लावली तशी तुम्हीसुद्धा लावून टाकली असती! कर्नलसाहेब माफ करा थोडं स्पष्ट बोलते, या सरकार लोकाना काळाची पावलं कधीच ओळखता आली नाहीत. आता या कॉलेजला दिलेल्या वाड्याचं तुम्हाला सांगते. हा यांच्या पणजोबांनी बांधलेला. त्याला डागडूजी म्हणून दोनपिढ्यात कोणी केली नव्हती. हळूहळू तो

कर्नलसाहेब , आपल्या ग्लासात पुन्हा व्हिस्की ओतून घेत म्हणाले, "पद्माबाई , आपण आजपर्यंत जे निर्णय घेतलेत त्यात काही वावगं होतं असं मला तरी बिलकूल वाटत नाही. पण पुढे त्या बलभीमाच्या विधवा बायकोचं काय झालं ?"

"तिचा भाऊ दौलू पोलिस हवालदार होता. तो तिला आपल्या गावी माहूलीला घेऊन गेला. तिकडेच ती बाळंत झाली. आणि हा श्रीरंग जन्मला. मामानंच त्याला लहानचा मोठा करायचं ठरवलं होतं. पणं भावजयेचा बायजाला त्रास होऊ लागला. ती श्रीरंगला घेऊन परत चिंचलीला आली. माझ्याकडे शेतावर कामाला यायची पण मी तिला कामावर येऊ नको असं सांगितलं. काही अपरिहार्य कारणामुळं !"

"तुम्ही तिला एक चार एकर जमीन का नाही नावावर करुन दिलीत ?"

"जमीन दिली असती तर तिला ती कसता येणं अशक्य होतं ! त्यापेक्षा तिच्या पोटाला लागतं तेवढं आजपर्यंत मी देतच आलेय् ! माझ्या जुन्या साड्या मी तिला द्यायची. तसं माझं तिला संरक्षण होतं म्हणूनच ती तरली ! तुम्हाला कल्पना नाही , त्यावेळी बायजा दिसायला फारच देखणी होती ! देखाण्या विधवाबायकाना आमच्या समाजात वावरणं फार कठीण जातं ! 'अमृतरावांच्याकडं पहात पद्माबाई बोलल्या. कर्नल साहेब समजून चुकले की पद्माबाईनी बायजाला कामावर येऊ नको असं का सांगितलं असावं !

पहिल्यांदा घर पहायला आलेल्या कर्नलसाहेबाना केवळ अमीर-उल-मुल्क घोरपड्यांचं घरच पहायला मिळालं नाही , तर त्या घराण्याचा दोन तीन पिढ्यांचा इतिहासही ऐकायला मिळाला होता , अमृतराव घोरपड्यांचा स्वभावही समजला होता.

पद्माबाईची कर्तबगारी पाहून ते मनातल्या मनात म्हणत होते 'माझ्या आमिताचं भाग्य मोठं म्हणून या बाईची ती सून होतेय् !'

९.

बरीच वर्ष महाराष्ट्रात वास्तव्य झाल्यामुळे कर्नल साहेबाना महाराष्ट्रातले रीतिरिवाज चांगले माहीत झालेले होते. काही महाराष्ट्रीन सैन्याधिकारी त्यांचे मित्रही होते. त्यामुळेच त्यानी निवृत्तीनंतर पुण्यात स्थायीक व्हायचा निर्णय घेतलेला होता. ब्रिगेडियर भोसलेनी बांधलेला 'शिवनेरी' हा बंगला कर्नलसाहेबाना विकून टाकला होता. ब्रिगेडियर भोसल्यांची मोठी शेती दुर्गापूरच्या परिसरात होती. ती पहायला दुसरं कोणी नसल्यानं त्यानी पुणं सोडलं होतं. पण अधूनमधून ते कामानिमित्त पुण्याला आले की कर्नलसाहेबांच्याकडेच उतरत असत.

कर्नलसाहेब चिंचलीला जाऊन परत आल्यानंतर आठ दिवसानी ब्रिगेडियर भोसले पुण्याला आले.

उंच, गोरे, गरुडाच्या चोचीसारखं नाक, ओठावर किंचित् भुऱ्या रंगाच्या मिशा असलेल्या ब्रिगेडियर भोसल्यांचं व्यक्तिमत्व अत्यंत प्रभावी होतं।

आल्या आल्या ते कर्नलसाहेबाना म्हणाले, "हे काय? चिंचलीला येऊन गेलंत, तेथून दुर्गापूर फार दूर होतं का?"

"त्याचं काय झालं ब्रिगेडियर साहेब, सोबत मोहिनी आणि अमिता होत्या, त्या दोघी चिंचलीत इतक्या रमल्या की तेथून कुठेही बाहेर जायला नको म्हणाल्या. माझ्या मनात तुम्हाला भेटून यायची खूप इच्छा होती, पण हे असं झालं!"

"मला ते समजलं, मग कसे काय वाटले सरकार घोरपडे?'

"ठीक आहेत! पण माझ्यावर पद्माबाईनी —

असती! तुम्हाला कल्पना नसेल पद्मावाई मला दुरुन मावसबहीण लागतात!"

"काय सांगता काय? हे त्यानी कसं मला नाही सांगितलं?"

"त्या सांगणार नाहीत! कर्तबगार माणसं उगाच मोठ्या घराण्यातल्या नातेवाईकांचा उल्लेख करीत नसतांत! पण अमृतरावानी तुम्हाला आपली वंशावळ सांगितली असेलच की?"

"होऽ होऽऽ ती गेल्या गेल्याच त्यानी सांगितली!"

"मग विक्रम तुमचा जामात होणार हे नक्की होतंय तर?"

"अहो ते नक्की झाल्यासारखंच आहे. उगाच आपलं त्या लोकांना भेटून यायचं म्हणून जाऊन आलो!"

"पण तुमची मुरारराव घोरपड्यांची भेट झालेली दिसत नाही?"

"नाही झाली! पद्मावाईना त्यांच्या नावाचा उल्लेख फारसा रुचला नव्हता."

"तो रुचणारच नाही! त्या बाईची कर्तबगारी अमीर-उल-मुल्काना पेलवणारी नाहीच! साधी गोष्ट आहे, पद्मावाईनी तुमच्या कन्येला सून म्हणून पसंत केली ही गोष्ट कोणत्याही घोरपड्याना पसंत पडणारी नाही. पण पद्मावाई कोणाची फिकीर करणार नाहीत हेही तितकंच खरं!"

"पण मी तिकडे येऊन गेल्याचं तुम्हांला कसं काय समजलं?"

कर्नलसाहेबानी हसत हसत विचारलं.

"वाऽऽऽ हे काय विचारणं झालं? अहो तुमच्या भाषणाचा सर्व वृत्तांत 'नेता' या दुर्गापूरच्या प्रमुख वृत्तपत्रात छापून आलेला होता. फारच छान भाषण केलंत! मला थोडी पूर्वसूचना असती तर मी सुध्दा त्या समारंभासाठी चिंचलीला आलो असतो! मग तुम्हाला विश्वास भेटलाच नाही तर?"

"नाही हो, पण त्या भल्या गृहस्थाला भेटायला फारच उत्सुक आहे! एवढा प्रसिध्दी पराङ्मुख पुढारी अद्याप माझ्या पाहण्यात नाही! काय कॉलेज काढलंय त्यानं?"

"दोन तीन लाख रुपये लागले तो वाडा दुरुस्त करायला!"

"इतकी रक्कम कुठून उभी केली हो?"

'त्यावर ब्रिगेडियर भोसले हसत हसत म्हणाले' आम्ही त्याला 'रॉबिनहूड'म्हणतो. त्याला समोर बघितला की तिजोऱ्या आपोआप उघडतात अशी लोकात वंदता आहे! पाच दहा हजार रुपये तर तो सहज जाता जाता जमा करतो, पण एक वैशिष्ट्य, सामाजिक कार्यासाठी जमा केलेल्या रकमेतला एक पैसादेखील स्वत:साठी खर्च करणार नाही! प्रवास एस्.टीनं, रेल्वेनं करणार, दुर्गापुरात फिरायचं असलं तर रिक्षा करणार नाही. भाड्याची सायकल घेऊन फिरेल."

"मला या लोकांचं खरंच कौतुक वाटतं."

"त्याला बायकोसुद्धा तशीच भेटलीय."

चिंचलीजवळच्या धुमाळवस्तीवर ती दोघे झोपडीवजा घरात रहातात."

"आएम व्हेरी इगर टू मीट हिम्!

बाकी ब्रिगेडियर साहेब आपल्यासारख्या मिलिट्रीतल्या लोकाना बाहेरच्या जगात काय चालतं याचा पत्ता सुध्दा नसतो!

पद्माबाईनी घोरपड्यांच्या पिढ्यांचा इतिहास आम्हाला सांगितला, अमृतरावांच्या तोंडासमोर त्यांच्या कर्तृत्वशून्यतेचा पाढाही वाचला, मला खरोखरच त्या बाईच्या निर्भीडपणाचं आश्चर्य वाटलं!"

ब्रिगेडियर हसत हसत म्हणाले, "पद्माबाई घोरपड्यांची सून म्हणून त्या घरात आल्या नसत्या तर हेच अमृतराव फाटका स्टॅंडकॉलरचा कोट घालून केस झडलेली सशाच्या कातड्याची टोपी घालून ओळखीच्या लोकाकडं दहापाच रुपये उसने मागत फिरताना दिसले असते! पद्माबाईनी आल्या आल्या पाहृयलं आणि सारा कारभार आपल्या

'काही करा आणि यावेळी झेड.पी.च्या इलेक्शनला उभ्या रहा' पण पद्माबाईनी नकार दिला. त्या म्हणाल्या 'विक्रमचं शिक्षण आणि मीनलचं लग्न होईपर्यंत मला काही करायचं नाही! मग ते लोक विश्वासकडं गेले त्यानंही नकार दिला!'

"फँटॅस्टिक! लोक ज्या लोकाना निवडणुकीला उभे रहा म्हणून आग्रह करायला येतात. ते निवडणूक लढवत नाहीत, आणि जे अपात्र आहेत ते निवडणूक लढवतात, हात जोडून दारोदारी मतांची भीक मागत हिंडतात, गंमत आहे की नाही ही?'

त्यांचं बोलणं चाललं असतानाच बाहेरुन गाडी आली. आमिता ड्रायव्हिंग करत होती. तिच्या शेजारी विक्रम बसलेला होता. गाडीत त्या दोघांची काय चर्चा चालली होती कोणास ठाऊक, पण गाडीतून उतरल्या उतरल्या ती दोघं मोठमोठ्यानं हसत हसत पोर्चकडं आली.

हॉलमध्ये येताच विक्रमनं ब्रिगेडियर साहेबाना बघितले. त्यानं त्याना वाकून नमस्कार केला आणि विचारलं

"आपण केव्हा आलात अंकल?"

"झाला अर्धातास!"

अमितानंही आपल्याकडं घरी आलेल्या वडिलधाऱ्या माणसाना वाकून नमस्कार करण्याची संवय लावून घेतली होती. ब्रिगेडियरना तिने नमस्कार करताना ते तिच्या डोक्यावर हात ठेवून म्हणाले, "द्विपुत्र सौभाग्यवती भव".

"हा कुठला नवीन आशीर्वाद काढलात?" हॉलमध्ये येता येता मोहिनीनी विचारलं.

"भाभी आता जमाना बदललाय. पूर्वीचे लोक अष्टपुत्र सौभाग्यवती म्हणून आशीर्वाद द्यायचे. पण आजच्या जमान्यात असा आशीर्वाद देणं हास्यास्पद ठरेल! बरं तुम्ही चिंचलीला जाऊन आलात, कशा वाटल्या विहीणबाई?"

"कर्नलसाहेबानी सांगितलं असेलच की तुम्हाला!" कोचावर बसता बसता मोहिनी म्हणाल्या.

"त्यानी तर सांगितलंच, पण, तुमची प्रतिक्रिया काय? काय अनिता? कशा वाटल्या पद्मावाई?"

"छानच आहेत!"

"अग त्या दिसायला कशा आहेत हे नाही मी विचारलं?"

"दिसायला तर सुंदर आहेतच, पण त्याचबरोबर त्यांची कर्तबगारी फारच मोठी आहे!" मोहिनीने उत्तर दिले.

"मग मुहूर्त कोणता ठरला? लग्न इथं पुण्यात की चिंचलीला?"

"या दोघाना रजिस्टर पध्दतीनं लग्न करायचं आहे! रिसेप्शन हा सुध्दा प्रकार त्याना मान्य नाही!'

म्हणजे? कमाल आहे? हे खर्चात बचत म्हणून की काय?"

ब्रिगेडियर साहेबांनी पाईप भरता भरता विचारलं.

विक्रम म्हणाला, "छेऽऽऽ खर्चाचा सवाल नाही अंकल! आम्हा दोघांनाही लग्नाचा गाजावाजा पसंत नाही. लग्न ही आमच्या आयुष्यातली वैयक्तिक घटना आहे. सगळ्या जगासमोर बँडबाजा वाजवून ती साजरी करणं हे आमच्या बुध्दिलाच पटत नाही!"

"अरे होऽऽ पण त्याशिवाय तुम्ही दोघे विवाहबध्द झालात हे जगाला समजायचं कसं?"

"आमिता गळयात मंगळसूत्र बांधू लागली की ते समजेलच की!"

त्यावर कर्नलसाहेब ब्रिगेडियर भोसलेयांचा हात हातात घेऊन म्हणाले, "चला, गच्चीवर जाऊ, या तरुणपोरांच्या नादी लागण्यात अर्थ नाही! जनार्दन ग्लास आणि बाटली घेऊन ये गच्चीवर! मोहिनी आज जेवायला काय करतेस?"

"ब्रिगेडियर साहेब आले म्हटल्याबरोबर फ्रीजमधले पापलेट बाहेर काढून ठेवलेत. त्यांच्या आवडीची सोलकढी आणि पापलेट फ्राय बनवते!

"वाऽऽऽ भाभी, मान लिया! कर्नलसाहेब तुमच्यातरी हे लक्षात आहे कां, आपल्या मित्राला फ्राय पापलेट आवडतो ते?"

"ते नसेल, पण या मित्राला उत्तम स्कॉच आवडते आणि ती सुध्दा 'ऑन द रॉक्स' हे मात्र मला पक्कं ठाऊक आहे! तो बंदोबस्त तयार आहे! जनार्दन अरे चल. आटप!"

ब्रिगेडियर साहेब आणि कर्नलसाहेब दोघे गच्चीवर आले पौर्णिमा दोन दिवसावर आलेली होती. सगळीकडं टिप्पूर चांदणं पसरलेलं होतं. ग्लासला ग्लास भिडवल्यावर ब्रिगेडियर भोसले म्हणाले, "चिअर्स फॉर अमिताज मॅरेज बिट्रोयल!"

दोघांनी एक एक घोट घेतला आणि ब्रिगेडियरनी आपला पाईप प्रज्वलित केला. एक प्रदीर्घ झुरका घेऊन ते म्हणाले

"कर्नलसाहेब आपण आजपर्यंत एकमेकांचे एक मित्र होतो, पण यापुढे आपल्या दोघांत नात्याचा संबंध निर्माण होणार!"

"तो कसा काय?"

"कसा ते सांगतो, पद्मावाई नात्यानं माझ्या मावसबहीण लागतांत त्या उद्या तुमच्या विहीण झाल्यावर तुमचे माझेही नातं निर्माण नाही का होणार?

"म्हणजे तुमच्यांशी आमचा पदर लागणार तर?"

'पदर' या शब्दावर ते दोघे बराचवेळ मनसोक्त हसत राहिले.

त्या रात्री ब्रिगेडियर भोसले मुक्कामाला कर्नलसाहेबांच्याकडेच राहिले.

दुसरा दिवस रविवारचा होता. कर्नलसाहेब आणि ब्रिगेडियर दोघे एन.डी.एच्या रस्त्याला फिरुन आले. मोहिनी ब्रेकफास्टची तयारी करीत होत्या. ब्रिगेडियर आंघोळीला बाथरुममधे गेले.

इततक्यात दारावरची बेल वाजली. कर्नलसाहेबानी हातातला पेपर बाजूला ठेवून उठून दार उघडलं.

दारात तीस पस्तीस वर्षाचा, रंगानं उजळ, भव्य कपाळ, दाट

कुरळे केस डोळयात विलक्षण आत्मविश्वास असलेला, गुरूशर्ट, पायजमा घातलेला, खांद्याला निळसर शबनम पिशवी अडकवलेला एक तरुण उभा होता.

कर्नलसाहेबानी दार उघडताच तो त्याना नमस्कार करुन म्हणाला

"मी विश्वास घुमाळ."

अरे याऽयाऽयाऽऽ! आज इकडे असे अचानक?"

विश्वासरावाना हातास धरुन हॉलमधे घेऊन येत कर्नलसाहेब म्हणाले, "खरं तर तुम्हाला भेटायला मी केव्हापासून उत्सुक आहे! गॅदरिंगलाही तुम्ही नव्हता."

विश्वास खांद्याची विशवी बाजूच्या स्टुलावर ठेवत म्हणाला,

"त्या दिवशी मला दुर्गापूरला एका मिटींगसाठी आचानक जावं लागलं! पण नंतर पेपरमध्ये मी आपलं भाषण वाचलं. फारच छान बोललात आपण! मला नंतर प्राचार्यही भेटले होते. तेही म्हणत होते की मुलाना आपले भाषण अतिशय आवडले!"

"थँक्स्! पण आपण आज इकडे कसे?"

"मी ब्रिगेडियर साहेबाना भेटायला आलोय. ते आपल्याकडं मुक्कामला आहेत असं समजलं म्हणून आलो, ते आहेत ना?

"होऽ होऽऽ आहेत. आंघोळीला गेलेत. आत्ताच आम्ही दोघं फिरून आलो आपण आमच्या सोबत ब्रेकफास्ट घ्याल ना?"

"मला फक्त एक कप चहा दिला तरी चालेल!"

"तुम्ही प्रथमच माझ्याकडे येत आहात, आणि फक्त चहाच कसा देऊ? हॅव सम ब्रेकफास्ट वुईथ अस!"

"बरं, जशी आपली आज्ञा!"

विश्वास अत्यंत विनम्र होता. तो बसल्या ठिकाणावरुन हॉलचं निरीक्षण करीत होता. कर्नलसाहेब विश्वासला बारकाईनं न्यहाळत होते. विश्वासची विजार गुडघ्याजवळ थोडी फाटलेली होती. तिला ठिगळ लावलेलं होतं. गुरु शर्ट गळ्याजवळ किंचित् उसवलेला होता. हॉलच्या

दाराजवळ काढून ठेवलेल्या त्यांच्या सँडलला बऱ्याच दिवसांत पॉलिश लागलेले नव्हतं.

लाखो रुपये जमवून समाजोपयोगी काम करणारा हा सच्चा कार्यकर्ता होता.

"आपणाला आमचा चिंचली गाव आवडला?" विश्वासनं विचारलं.

"हे काय विचारणं झालं? गाव तर आवडलाच पण गावची माणसंसुध्दा आवडली. चिंचलीसारख्या लहानशा गावात तुम्ही 'सेनापती' कॉलेज सुरू करून फार मोठी समाजसेवा केलीत. पूर्वी तो वाडा असला तरी आता तुम्ही त्याचं अध्ययावत् अशा वस्तूत रुपांतर केलंय! खरंच आज तुम्हाला भेटून मला खूप आनंद वाटला!"

विश्वासने प्रत्युत्तरादाखल फक्त मंद स्मित केलं इतक्यात माडीवरुन ब्रिगेडियरसाहेब मलमलीचा कुडता, पायझमा, आणि जोधपुरी चढाव घालून खाली आले. हॉलमधे बसलेल्या विश्वासला पाहून भिवया उंचावून, हात उंचावून म्हणाले.

"अरेच्या, विश्वास तू इकडं कूठं असा अचाकन?"

"तुम्हालाच भेटायला आलोय! काल म्हाळुंग्याला गेलो होतो. तियं समजलं आपण इकडं आलात म्हणून! मग रात्री 'सह्याद्रीला बसलो."

"बोल, काय काम काढलंस?"

"आपल्या भागात साखर कारखाना निघतोय, परवाच प्रशासनाची

"तू तर कमालच करतोस? आज महाराष्ट्रात जे साखर कारखाने आहेत ते काय राजकीय गुंडाचे अड्डे असं समजतोस?"

"त्यात काही अतिशयोक्ति नाही. आज महाराष्ट्रात इतके साखर कारखाने आहेत. तिथं कुठल्याही राजकीय पक्षात नसलेला असा एकतरी चेअरमन मला दाखवा! आपल्या तालुक्यात निघणाऱ्या या सहकारी साखर कारखान्याचे चेअरमनपद तुमच्या सारख्या नि:स्वार्थी, आणि निस्पृह अशा, कुठल्याही राजकीय पक्षाशी सलगी नसलेल्या व्यक्तीकडे जावे अशी माझी प्रमाणिक इच्छा आहे!"

"तुझ्या सदिच्छेबद्दल मी आभारी आहे पण मी आहे एक निवृत्त सैनिक! मला ती चेअरमनपदाची जबाबदारी पेलता येणं अशक्य आहे! पण हे मुळात तुझ्या डोक्यात आलंच कसं?"

"परवा मी चिंचलीला गेलो होतो. पद्माबाईशी मी या विषयावर सविस्तर चर्चा केली. मी त्यानाच ही विनंती करणार होतो, पण त्यानी मला तुमचे नाव सुचवले!"

"असं आहे काय? बघा कर्नलसाहेब, तुमच्या विहीणबाई तिथं चिंचलीत बसून कशा किल्ल्या फिरवतात ते?"

"पण हे विश्वासराव म्हणतात त्यात काही चूक नाही. सहकारी साखर कारखाने राजकीय पुढाऱ्यांच्या हाती असता कामा नयेत असं मलासुध्दा अगदी प्रांजळपणे वाटतं!"

"वाटतं ते खरे, पण मला कोण चेअरमन होऊ देईल?"

"मी! "विश्वास आत्मविश्वासाने छातीवर हात ठेवून म्हणाला", तालुक्यातले एकजात सारे सभासद माझ्या शब्दाबाहेर जाणार नाहीत."

जनार्दनने ब्रेकफास्ट तयार असल्याची वर्दी आणतांच कर्नलसाहेब उठता उठता म्हणाले,

"चल विश्वास आत ब्रेकफास्ट घेता घेता चर्चा चालू दे! मोठा मनोरंजक विषय आहे हा!"

मंडळी आंत डायनिंग टेबलाकडे आली. मोहिनी किचनमधून बाहेर आल्या तेव्हा कर्नलसाहेबानी त्यांची विश्वासशी ओळख करुन दिली विश्वासने मोहिनीबाईना आदबीनं हात जोडले.

मोहिनी म्हणाल्या 'एकटेच आहात? मिसेसना सोबत नाही का आणलं?"

"ती तिकडे तालुक्यात फिरते. शिवाय मी एकटा असलो की अनिर्बधपणे मला भटकता येतं. इयंही तशी माझी एकमैत्रीण सोबत असते!"

"मैत्रीण" हा शब्द ऐकताच कर्नल साहेब डोळे मोठे करुन ब्रिगेडियर साहेबाकडे पाहू लागले. तेव्हा विश्वास हसत हसत म्हणाला, " ती फारशी बोलत नाही, पण मला हव्या त्या ठिकाणी बस. रिक्षा आणि टॅक्सीशिवाय घेऊन जाते".

"म्हणजे गाडीवाली मैत्रीण दिसते?"

त्यावर विश्वास हसत म्हणाला, "अहो माझ्या सायकलला मी मैत्रीण म्हणतो!"

त्यावर कर्नल साहेब डोक्याला हात लावून मोठ्याने हसले आणि म्हणाले, "मानलं बुवा, काही क्षण आम्ही तुमच्याबद्दल अनेक तर्ककुतर्क करीत राह्यलो! बरं ते जाऊ द्या. हा टोस्ट घ्या."

काचेच्या पात्रातलं पिवळंधमक लोणी टोस्टला लावून तो टोस्ट विश्वासकडं देत कर्नलसाहेबानी विचारलं

"पण विश्वासराव, सध्याच्या या साखर कारखान्यांच्या चेअरमन लोकांबद्दल तुम्हाला आकस असायचं कारण काय?"

"खरं सांगू साहेब? हे लोक फालतू आहेत! आता साखर कारखाना म्हटल्यावर दरवर्षी बॉयलर प्रदीपन हे करावंच लागतं. पण तो प्रसंग समारंभपूर्वक साजरा करतात. एखाद्या मंत्र्याला, सपत्नीक बोलवायचं. त्याला पटका बांधायचा, आपणही बांधून घ्यायचा, त्या प्रसंगाचे पेपर मधून फोटो छापून द्यायचे, हे झालं की शंभराव्या पोत्याची पूजा,

हजाराव्या पोत्याची पूजा एक लाख पोती झाली की समारंभासह सत्यनारायणाची पूजा. काय फालतूगरी चालते म्हणून सांगू? तिकडे तो बिचारा शेतकरी मातीत राबतो आणि हे भडवे नित्याच्या या प्रसंगाला समारंभाचे स्वरुप देऊन स्वत:ची थोबाडं मिरवतात. हे सर्व प्रकार अत्यंत कीळसवाणे आहेत. पण हे चूक आहे, हे थांबायला हवं आहे असं याना सांगणार कोण? खालपासून वरपर्यंत यांचा राजकीय 'पदर' लागलेला असतो."

विश्वासने 'पदर' हा शब्द उंच्चारताच ब्रिगेडियरसाहेब कर्नल साहेबाकडे पहात म्हणाले

"ऐकलत का? काल आपला लागला तो नात्यागोत्याचा 'पदर', आज हे म्हणताहेत तो आहे राजकीय 'पदर', आहे की नाही गंमत!"

मोहिनी आतून 'स्क्रॅंबल्ड एग्ज' बनवलेलं भांडं बाहेर घेऊन येत म्हणाल्या

"हे फक्त बोलतच राहिलेत, खाल्लतर काहीच नाही?"

त्यावरं ब्रिगेडियरसाहेब म्हणाले

"विश्वासचं पोट बोलूनच भरत असतं! अरे घे नाऽऽ!"

"घेतो घेतो, पण ब्रिगेडियरसाहेब आपल्या तालुक्यातल्या साखरकारखान्याचे चेअरमन म्हणून तुमची नियुक्ती मी करणारच!"

"म्हणजे तू लोकांकडून जबरदस्तीने जसे पैसे जमा करतोस, तसाच हा प्रकार झाला?"

"त्याला काही म्हणा! पण तुम्हाला ही जबाबदारी स्वीकारावीच लागेल. त्याला पर्याय नाही!"

बाजूच्या खुर्चीवर बसलेल्या मोहिनीनी विश्वासरावांच्या कपात चहा ओतत म्हटलं

"पद्मावाई सांगत होत्या तुमच्या मिसेस मासा फार छान बनवतात म्हणून!"

त्यावर विश्वास म्हणाला, "हो, हो, ती सी.के.पी. आहे नां, सारस्वत आणि सीकेपी ही मंडळी त्यात तरबेज असतात, पण तिला सहा सहा महिने मासा खायलाच मिळत नाही!"

"त्याना एकदा इकडं घेऊन या, मला त्यांच्याकडून माशाच्या रेसीपीज शिकायची इच्छा आहे! पद्माबाई तर त्यांची खूपच तारीफ करीत होत्या!"

"बरं, मी आता निघतो, पण आमच्या खातेदारीणबाई कुठं दिसत नाहीत?"

कर्नलसाहेबाना 'खातेदारीण' या शब्दाचा अर्थ समजला नाही. ते ब्रिगेडियरसाहेबांच्याकडं प्रश्नार्थक मुद्रेनं पहात राह्यले. तेव्हा ब्रिगेडियर हसत हसत म्हणाले", आमच्या भागात जमीनदारांच्या मुलाला खातेदार म्हणतात, त्याची पत्नीला खातेदारीण म्हणतात! याला अमिता पहायची आहे!

"आय सी ऽऽऽ! रात्री बारापर्यंत ती अभ्यास करत होती, शिवाय आज 'संडे ना?'

दहा मिनिटानी प्रसन्न चेहऱ्याची अमिता तिथं आली. तिनं विश्वासला नमस्कार केला. विश्वास हसत हसत म्हणाला, "वा ऽऽऽ विकीबाबानी आगदी योग्य अशी निवड केलीय! छान ताई, वहिनीसरकारांच्यापेक्षा तुमचा दरारा गावावर अधिक बसायला हवाय! शिवाय आमचे हे 'सरकारलोक'शिकले सवरले तरी काहीवेळा बऱ्याच 'गडबडी'.करतात!"

"विश्वास तुम्ही ती चिंता करु नका, मातोश्रींचे सगळे गुण अमितामधे आहेत. समरांगणावर शत्रूंचा अचानक हल्ला झाला तेव्हा मी कधी घाबरलो नव्हतो, पण अमिताच्या मातोश्री समोर दिसल्या की माझे सगळे धैर्य, शौर्य गळून पडते. अशा माताजींची ही कन्या आहे, लक्षात असू द्या!" विकी लग्नानंतर कसलीच गडबड करू शकणार नाही."

कर्नलसाहेबांचा स्वभाव आतिशय विनोदी आणि खेळकर होता. ब्रिगेडियरसाहेब आणि विश्वास त्यांच्या वक्तव्यावर मनापासून हसले.

अमिताही त्या वक्तव्याने मनापासून हसली.

१०.

त्यादिवसापासून श्रीरंग रोज दुधाची किटली घेऊन सरकार बंगल्यामागच्या थट्टीतून दूध घेऊन जाऊ लागला. गावात वागजाईच्या मंदिरामागे तालीम होती. महिपतराव, वस्ताद नवीन हौशी पोराना तियंच कुस्त्यांचे डाव शिकवायचे. श्रीरंग पहाटे साडेचारला उठून तालमीत व्यायामाला यायचा. पाचशे जोर आणि एक हजार बैठका तो नित्यनियमाने मारायचा. त्यामुळं त्याचं शरीर पोलादासारखं मजबूत बनत चाललं होतं. त्याचा बाप बलभीम हाही नावाजलेला पहिलवान होता. बऱ्याच उशीरा त्याचं लग्न झालं होतं. पहिलवान पेशाच्या माणसानं लवकर लग्न करु नये असा प्रघात होता. बलभीमच्या बापानं त्याचं लग्न केलं आणि दुसऱ्यांच महिन्यात निंबोतला-सातारा जिल्ह्यात झालेल्या कुस्तीत तो हरला. बायको गरोदर असतानाच तोरणा नदीत त्याचं आपघातानं निधन झालं होतं.

साठी उलटलेल्या महिपत वस्तादानं श्रीरंगाला आपला 'चेला' बनवायचं ठरवलं होतं. फावल्या वेळात वस्ताद श्रीरंगला भूतकाळात गाजलेल्या काही कुस्त्याची वर्णने सांगत असे. त्याची निवेदन पध्दत इतकी सुरेख होती की हकीगत ऐकताना आपण प्रत्यक्षच ती कुस्ती पहात आहोत असा भास व्हायचा.

"तू अजून जन्माला याचा हुतास! तुजा बा आनि मी दुर्गापूरला गेलतो. दुर्गापूरचं कुस्त्याचं मैदान कदी बगिटलास काय? ह्यॅऽऽऽ! तसंल मैदान, मैदानाभवताली गोल घसारतीवर एका वक्ताला लाकभर मानूस बसल एवडं जक्शान हाय! शावम्हाराजानं बांदल्यालं मैदान हाय ते!

आमी पाडव्याला कुस्त्या बगायला गेल्यालो. तुजा बा तवा ऐन जवानीत हुता.

पाच मोठ्या कुस्त्या हुनार हुत्या.

चार झाल्या. पाचवीतला दुसरा पैलवान आला नाही. तवा त्याचा जोड सय्यद पैलवान लाल लांग घालून मैदानात उतरला आणि शड्डूमारून म्हनाला ह्या मैदानात हजर असलेल्या कुनाबरोबरबी मी कुस्ती करायला तयार हाय! काळारोम आंगाला डांबार फासल्यागत सय्यद दिसायला. सुपागत छाताड, शिशवीच्या खोडागत मांड्या, दांडगा तयारीचा हुता त्यो! म्या तुज्या बाला म्हटलं बळ्या धरतोस का कुस्ती? बळ्या काय बोलला नाही, पर लगोलग त्यानं कापडं काडली. लांग चडिवली."

"आणि मग? श्रीरंगनं विचारलं

"आणि काय? गडी मैदानात उतारला की! चौकडनं टाळ्या वाजल्या. तुज्या गतच गोरापानहूता. झाली जुपली की कुस्ती! काय सांगायचं मर्दा, कावळ्याची आन बगळ्याची झुंज लागल्यागतीनं दिसायला लागलं. सय्यद पैलवान हूम दांडका दिसत होता. त्यो बगता बगता बळ्याला लोळीवनार म्हनायला लागली मानसं. पर बळ्या म्हैपती वस्तादाच्या तालमीत तयार झाल्याला. दिसायला दांडगा नव्हता खरं त्याला म्हैपती वस्तादानं डावपेचात तयार केल्याला." महीपती स्वत:चा उल्लेख तो कुणीतरी तिसऱ्यांनी करावा अशा ढंगात करी.

"मग काय झालं;" श्रीरंग उत्कंठेनं विचारी.

"मग काय हुनार लेका! एक दोन मिल्टं खडाखडी झाली. तिसऱ्या मिल्टाला बळ्यानं छडीटांग मारली आणि फफईचं झाड कोसळावं तसा सय्यद पैलवान खाली पडलं. बळ्या वाग जसा रेड्याच्या पाटीवर चडतो, तसा मागनं उडी मारून चडला. घिश्शाचा आणि घुटन्याचा डाव मारुन सय्यदाला माती चारली माती! आरे एवडा दांडगा गडी तो सय्यद खरं गुदमारुन गुदमारुन आयाला आलं आणि बळ्यानं जवा

तेचा डावा हात धरुन वडला तवा सय्यदाला आस्मानच दावलं बळ्यानं! हॅ हॅ हॅ, काय सांगू मर्दा, त्या कुस्तीला पाच हजाराचं बक्षिस हुतं ते तर बळयाला मिळालंच, पर मैदानात लोकानी त्याच्यावर पैशाचा पाऊस पाडला रे पाऊस! अकरा हजार रुपये म्याच गोळा करुन पटक्यात बांदलं होतं, ह्या ह्याच हातानं! तवा मी काय म्हंतो, पुरुस जातीत जल्माला आलाइस तवा कदीबी लगीन करावंच लागनार हाय! पर चांगलं नाव कमवून मगच लगीन करायचं बग! एकदा का लगीन केलं का तुज्यातला पैलवान सपला म्हणून समज!"

"नाही, नाही, वस्ताद मी लग्नाची घाई करणार नाही!"

"हेंगास्स शिरीरंगा तुज्या बाची एक इरस हूती!"

"कोणती इर्षा होती?"

"त्येला निंवोतला दिवाळी पाडव्याला जी पैल्यालंबरची कुस्ती हुती ती हानायची हुती! पर गेला रे! पान्यातल्या त्या वैरीनीनं डाव सादला!"

"वस्ताद मला आईनंही ती हकीगत सांगितलीय, पण नेमकं काय घडलं त्यादिवशी?"

"घडायचं काय लेका? घोरपडे सरकाराकडं कलीक्टर का कोन म्हंत्यात त्यो वाड्यावर जेवायला आला हुता. त्याला म्हनं तोरना नदीतली मरळ खायला घालायची हुती. पर गावातल्या ढवांत नुकत्याच दोन मगरी आमृतराव सरकाराच्या बानं मारल्याल्या.

गांवचं कोळी गाव सोडून गेल्यालं मग आमृतराव सरकारनं बळयाला गळ घातली! म्हनालं मरळ खायाला घाटली न्हाई तर कलीक्टर नाराज हुईल! काय सांगायचं तुला शिरीरंगा, रोह्यलासारका बळया पान्यात उतारला. मोकळं डबं हाताला धरुन जाळी बी त्यानं पसारली. मागं याला निगाला आणि त्या रांडच्या मगरीनं त्येचा पाय वडला रं! तिसऱ्या दिवशी कुरतडल्यालं त्याचं मडं लागलं ढवावर तरंगायला!"

ही हकीगत सांगताना वस्तादनं आपले ओले झालेले डोळे पटक्याच्या शेमल्याने टिपले.

संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास, अंगात मलमलीच बनियन, कमरेला लालहिरव्या चौकड्याची लुंगी लावलेला श्रीरंग दुधाची किटली घऊन सरकार वाड्यामागच्या थट्टीकडं आला.

"संतराममा, हो संतराममा? त्यानं हाक मारली. त्या पाठोपाठ थट्टीच्या पुढच्या खोलीतून मीनलचा आवाज आला.

"कोण?-श्रीरंग काय? आज संतराम पुणदीला गेलाय, तुला दूध हवं आहे ना? इकडं ये?"

पांढरी शुभ्र साडी, तसलांच ब्लाऊज घातलेली मीनल कादंबरी वाचत बसलेली होती. ती त्याचा आवाज ऐकून आतूनच बोलली.

श्रीरंग हातात दूधाची किटली घेऊन खोलीच्यादाराशी आला. "त्या मोठ्या किटलीतलं तुला हवं तेवढं दूध घे, मला एवढी कादंबरी संपवायची आहे!"

पुस्तकावरची नजर स्थिर ठेवून मीनल म्हणाली.

श्रीरंगला रोज सरकारचा गडी संतराम दूध द्यायचा. संतराम अतिशय खत्रूड होता. त्याला आपल्या बापाचं नुकसान होतं असं रोज वाटायचं दुधासाठी श्रीरंग आला की तो काहीतरी कुजकट बोलत रहायचा!

"दूद पिऊन आता तू मोट्टा पैलवान हूनार म्हन! आरे पैलवान हुयाला खुराख खायाला लागतो, काजू, बदाम, पिस्तं, खोबरं, खारका!

आट्टवड्यातनं दोनदा 'घोटा' घ्यावा लागतो, आकनीचा सोप प्यावा लागतो. तू घरात खानार डाळ भाकरी, आणि हे सरकारातलं शेरभर दूद! एवड्यानं काय कात हुत्योय का काय रे? उगच गप शाळा शिकून कुटंतरी कारकून हुयाचं सोडून न्हाईत्या नादाला कशाला लागलाईस?"

कधी कधी संतरामचं ते बोलणं ऐकून श्रीरंगला दूध आणायला सरकारवाड्याकडे जाऊ नये असं वाटायचं! पद्माबाई धारा काढल्या की

घरी लागणारं दूध ठेवून घेऊन बाकी 'डेअरीला पाठवून द्यायच्या. त्यादिवशी संतराम बाहेर गावी गेल्यामुळं मीनलला थट्टीकडं पाठवलं होतं.

मीनलनं श्रीरंगला हातानं दूध घ्यायला सांगितलं तरी तो तसाच स्तब्ध.

"अरे, मी सांगितलं ना, तुला हवं तेवढं दूध घे म्हणून?"

तरीही श्रीरंग पुतळ्यासारखा तसाच उभा.

"अरे घे ना तुझ्या हातानं? तुला ऐकू येत नाही का?" पुस्तकात खुणेसाठी बोट घालून मीनल म्हणाली?

श्रीरंगनं मोठ्या गेळ्यातलं बरोबर शेरभर दूध मापून घेतलं. कादंबरी बाजूच्या टेबलावर ठेवून मीनल म्हणाली

"आगदी शेर म्हणजे शेरच घ्यायचं का?

अरे थोडं जास्त घेतलंस तरी चालेल!"

श्रीरंगच्या ओठावर आलेलं होतं बोलायचं, 'तुम्ही उदार मनानं देता पण तुमची नोकर माणसं माझ्यावर जळतात.'

पण उगाच वाडेचार लागू नये म्हणून तो गप्प बसला.

"श्रीरंग, तुला काय होतंय का? बोलत का नाहीस? मला वाटतं तुला काहीतरी बोलायचंच, पण तू ते टाळतोयस? खरं ना? अरे काल पुण्यावरुन कर्नलसाहेबांच पत्र आलंय! त्यात त्यांनी तुझा उल्लेख केलाय्! अजूनही ते म्हणतात तू सैन्यात भरतीत झालास तर 'स्पोर्टसमन' म्हणून तुला ताबडतोब घेतील, थोड्या अवधीत प्रमोशनही मिळेल!"

"मी एका पायावर जायला, तयार आहे! पण आई म्हणते तू लढाईवर गेलास की मी मरुन जाईन!"

"तूझी आई खरंच अगदीच अडाणीरे! अशी कुठं रोज युद्ध होतात का?"

त्या दोघांचं बोलणं चालू असतात आत गोठ्यात खाडखाड असा काठ्या बडवल्यासारखा मोठ्यान आवाज येऊ लागला

उठून गोठ्याजवळ आली आणि छातीवर हात ठेवून म्हणाली,

"अरे बापरे बांडा खोंड सुटलाय. त्या पांढऱ्याला मारणार तो आता."

दोन समवयस्क असे खोंड त्या थट्टीत होते. त्यातला बांडा खोंड अतिशय नाठाळ होता. तो दुसऱ्या खोंडावर नेहमी धावून जायचा म्हणून त्याला नेहमी लोखंडी साखळीनं बांधून ठेवावा लागे. पण त्यानं हिसडे मारल्यामुळं कडीचा एक फासका निघाला होता. मोकळा झाल्यावर त्यानं दुसऱ्या खोंडावर चाल केली होती. दुसरा पांढरा खोंड बांधून ठेवल्यामुळे त्याला स्वत:चा बचाव करता येत नव्हतं.

श्रीरंग क्षणाचाही विचार न करता पुढे झाला आणि त्यानं सुटलेल्या त्या खोंडाच्या गळयाची लोखंडी साखळी हातात धरुन जोराचा हिसका मारला. अचानक गळयाला ओढ बसल्यामुळे खोंड बाजूला फिरला. त्याला जोर जोराने ओढत श्रीरंगने बाजूला नेले आणि रस्सीने त्याला खुंटाला जाम बांधले.

धडधडत्या छातीवर हात ठेवून मीनल तो प्रकार पहात होती. सुटलेल्या त्या बांडा खोंडाला श्रीरंगनं बांधून टाकल्यावर एक दीर्घ निश्वास सोडून ती म्हणाली, "बापरे बाप! श्रीरंग आज जर तू इथं नसतास तर पांढऱ्या मरुन पडला असता. हे दोन्ही खोंड एकत्र ठेवणंच धोक्याचं आहे! तूझे फार उपकार झाले बघ!"

"माझे? आणि उपकार? काय बोलता?"

"घोरपड्यांच्या दूधाचं सार्थक केलंस! इथं तुझ्या ठिकाणी दुसरा कोण आसता तरी त्याची सुटलेल्या त्या खोंडाला काबूत आणायची हिम्मतच झाली नसती."

ज्याच्यावर आचानक हल्ला झाला त्या खोंडाचे कपाळ रक्त बंबाळ

"श्रीरंग, मला मीनलनं सगळं सांगितलंय तुझ्या बापासारखा तूही धाडसी निघालास!

हे शभंर रुपये तुला बक्षीस!"

"बक्षीस? कशाबद्दल?"

"पाच हजार रुपयांचा पांढऱ्या खोंड परवा मरुन गेला असता! केवळ तुझ्यामुळं तो वाचला. हं हे घे!"

"मी नाही घेणार!"

पद्माबाईना त्याचं कौतुक वाटलं. पुणदीला गेलेला संतराम परत आला. त्याला घडलेला प्रसंग समजला. त्यादिवसापासून दूधाला आलेल्या श्रीरंगला तो निमूटपणानं दूध देऊ लागला.

या प्रसंगानं आणखीन एक गोष्ट घडली. श्रीरंग दिसला नाही की मिनलला चुकल्या सारखं वाटू लागलं.

कॉलेजात श्रीरंग तिला दिसायचा. पण तिथं त्याच्याशी चार शब्द बोलता येत नव्हते. मग मीनलनं एक युक्ती केली.

पद्माबाई नुकत्याच शेतावरुन परत आल्या होत्या. पावसाळा तोंडावर आल्यामुळं शेतं पेरणीसाठी तयार करण्याचं काम सुरु होतं. आकाशात मोठमोठाले ढग जमत होते, पण बळीव काही पडत नव्हता. हवेतला उप्मा काही कमी होण्याची लक्षणं नव्हती.

दिवसभर उन्हात थकून शेतावरून परत आलेल्या पद्माबाई विश्रांतीसाठी कॉटवर आडव्या झाल्या होत्या मीनल त्यांच्याजवळ येऊन म्हणाली,

"मां, मी तुमच्या कामात थोडी मदत करावी म्हणते,"

"कसली मदत करतेस बेटा!"

"तुम्ही, घरचं सगळं पहाता, शेतीही बघता, संध्याकाळी डेअरीत जाता, तियले हिशोब पहाता मी आपलं डेअरीचं तेवढ काम पहावं म्हणते!"

"डेअरीचं काम पहाणार? सगळे हिशेब ठिशेब ठेवावं लागतात, डोक्याला कटकट असते ती मीनल! त्यापेक्षा अभ्यातात लक्ष घाल".

"अभ्यास तर करतेच ना, पण त्याचबरोबर तुम्हाला थोडी मदत म्हणून डेअरीचं तेवढं संध्याकाळचं काम पहावं म्हणते!"

"ठीक आहे. उद्यापासून जात जा"

डेअरीचं काम बघण्यामागे मीनलचा हेतू होता श्रीरंगला भेटायचा रोज नित्यनियमानं तो संध्याकाळी साडेसातच्या सुमारास दूध नेण्यासाठी तिथं यायचा. धारा काढून दुधाचे गेळे भरुन गडी माणसं निघून जायची. डेअरीची गाडी आठच्या सुमारास आली की संतराम दूध मोजून घालायचा. संतरामला इकडंच तिकडचं काहीतरी काम सांगून श्रीरंगशी निवांतपणे गप्प मारायला ती एकमेव संधी तिला लाभणार होती.

त्यादिवशी पुन्हा डेअरीच्या ऑफीसात मीनलला पाहून श्रीरंग काहीसा गोंधळून म्हणाला.

"तुम्ही कशा आज पुन्हा इकडं?"

गालातल्या गालात हसत मीनल म्हणाली,

"मां नी डेअरीची जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे. यापुढं रोज सात ते आठ मी इयंच असणार!"

श्रीरंग हातातली दुधाची किटली धरुन काहीच न बोलता उभा होता.

"का? तू असा अचानक गप्प का?"

बांडा खोंडाचा तो प्रसंग घडल्यापासून ज्या ज्यावेळी त्याला मीनल दिसली होती त्या त्यावेळी त्याला तिच्या डोळयात त्याच्याबद्दल स्नेह भाव दिसले होते. श्रीरंग विचारी होता. त्यालाही तिच्यानजरेतून व्यक्त होणाऱ्या भावना समजत होत्या.

तिच्यापासून चार हात दूर राहण्याचा तो सतत प्रयत्न करीत होता. ... ढोगपड्यांची ऐतिहासिक परंपरा त्याला ठाऊक होती.

इतकी मोठी जमीन नव्हती. पद्मावाई पुरोगामी विचाराच्या होत्या तरीही मीनलने श्रीरंगबद्दल इतकी आपुलकी दाखवणं त्याना रूचण्यासारखं नव्हतं. आपण निराधार आहोत, आईनं काबाडकष्ट करुन आपल्याला लहानाचं मोठं केलेलं आहे. याची त्याला जाणीव होती. कॉलेजात एक दोनवर्ष काढल्यानंतर कुठंतरी नोकरी करून त्याला आपल्या चारितार्थ चालवावा लागणार होता. तशातच त्याला ही कुस्तीची आवड निर्माण झालेली. खरं तर ज्यांची घरची परिस्थिती चांगली असेल अशांच्याच मुलांनी कुस्ती सारख्या महागड्या छंदाच्या मागं लागावं. पण श्रीरंगचा बाप बलभीम हा जातिवंत पैलवान होता. या बलभीमचं रक्त श्रीरंगच्या धमण्यातून वहात होतं. कळत न कळत त्याला कुस्तीविषयी आकर्षण वाटू लागल होतं. दहावीपर्यंत शिक्षण झालं की कुठंतरी नोकरी धरावी असं वाटत असतानाच अचानक चिंचलीला कॉलेज निघाल्यानं कॉलेजात एक दोन वर्ष शिकावं असं त्याला वाटलं.

पहिल्यवर्षीच्या गॅदरिंगच्या निमित्ताने क्रीडा स्पर्धा झाल्या. श्रीरंगनं गोळा फोक, भाला फेक, कुस्ती, या स्पर्धात भाग घेऊन प्रथम क्रमांक मिळवले. सर्वसाधारणपणे कुस्ती करणारा मुलगा धावण्याच्या स्पर्धेत किंवा उंच उडी, लांब उडी अशा स्पर्धेत भाग घेत नसे. श्रीरंगनं बऱ्याच स्पर्धात भाग घेतला आणि कर्नलसाहेबांच्या हस्ते पाच सहा बक्षीसं घेतली. वारंवार बक्षीसं घेणारा हा तगडा, देखणा पोऱ्या कोण? असं कर्नलसाहेबानी स्टेजवर शेजारी बसलेल्या प्राचार्य जांभळ्याना विचारलं. प्रचार्यानी त्याची माहिती सांगितली. तेव्हा अशा उमद्या तरुणाला सैन्यात भरती करुन घ्यावे या हेतूने त्यानी श्रीरंगला त्या संध्याकाळी बंगल्यावर बोलावून घेतले होते.

श्रीरंगची आई, त्याला सैन्यात भरती व्हायला कधीही संमती देणार नाही हे ऐकून कर्नल साहेब काहीसे नाराज झाले. पण शिकता शिकता त्यानं निदान कुस्तीत तरी प्रावीण्य संपादन करावं अशी इच्छा व्यक्त केली. पद्मावाईनी त्याला डेअरीतले रोज शेरभर दूध द्यायचे ठरवले.

श्रीरंग आपल्या पायरीने वागत होता. त्याचा स्वभाव काहीसा अबोल होता. त्याला आपल्या गरिबीची जाणीव होती. म्हणून फावल्या वेळेत तो कोणाच्याही शेतात मजुरीने कामाला जायचा. मोठी माणसं ज्या कामाला अर्धादिवस लावायचे ती कामं तो तासा दोन तासातच पूर्ण करायचा.

मीनलची आपल्याशी वागण्याची बोलण्याची तऱ्हा काहीशी बदललेली आहे, हा बदल खोंडांच्या त्या प्रसंगापासून घडलेला आहे याची श्रीरंगला जाणीव होत होती. पण आपण फार मोठं काहीतरी केलं असं त्याला बिलकूल वाटत नव्हतं. म्हणूनच त्यानं पद्मावाईनी त्याला देऊ केलेलं शंभर रुपयांचं बक्षीस नाकारलेलं होतं.

डेअरीत रोज संध्याकाळी येणारी मीनल श्रीरंगची वाट पाहू लागली. श्रीरंग यायच्या वेळी ती डेअरीतला नोकर संतराम याला काहीतरी .ाम सांगून बाजूला पिटाळत असे. श्रीरंगला हे सारं दिसत होतं, समजत होतं.

त्यादिवशी श्रीरंगनं दूध आणायला बायजाला पाठवलं. म्हणाला 'जरा डोकं दुखायला लागलंय, कणकणी आल्यासारखी झालीय तूच जाऊन दूध घेऊन ये!'

बायजा जेव्हा थट्टीकडं आली तेव्हा मीनलनं चट्कन विचारलं

"श्रीरंग का नाही आला?"

"त्येला कनकनी आलीया ताईसाब!"

"मग औषध आणलं का?"

"न्हाई, आवशिद कवा खात न्हाई त्यो!"

"अग असं करू नको बायजा, गणेशपूरला टायफॉईडची साथ

डायनिंग टेबलवर, तिच्या समोर पद्माबाई बसल्या होत्या. रमचे दोन पेग घेतलेले अमृतराव बाजूला बसले होते. टेबलावर जेवणाची ताटं आल्यानंतर मीनलनं त्यातली अर्धी चपाती मोकळया प्लेटीत काढून ठेवली म्हणून पद्माबाई तिला म्हणाल्या

"हे काय? आज अर्धीच चपाती?"

"होऽऽ! भूक नाही!"

"तू ते डेअरीचं काम बघायला लागल्यापासून मला चिंताग्रस्त दिसतेस मीनल! तुला ते हिशोब ठेवणं त्रासाचं वाटत असेल तर बंद कर! मी बघत जाईन!"

"नाही मा, तसं काही नाही. उलट माझा संध्याकाळचा वेळ चांगला जातो तिथं. सोसायटीचे लोक येऊन फॅटचं प्रमाण बघतात, दूध मोजून घेतात आणि लागलीच पैसे देऊनही मोकळे होतात! तसा मला तिथं काही त्रास नाही!"

इतका वेळ गप्प असलेले अमृतराव म्हणाले,

"मला वाटतं मीनलनं आपला अभ्यास करावा, मी डेअरीचं काम बघत जाईन!"

जेवताजेवता डावा हात कपाळला लावून पद्माबाई म्हणाल्या, "मला डेअरी आतबट्ट्यात चालवायची नाहीए! रोज तुमच्या हातांत शंभर दीडशे रुपये येऊ लागले की त्यातले किती घरापर्यंत येतील सांगता येणार नाही! तुम्ही आपले यापुढं आराम करा! मीनल डेअरीत तुला त्रास होत असेल तर मला सांग!"

"नाही मां? सांगितलं ना, मला बिलकूल त्रास नाही!"

जेवता जेवता काहीतरी आठवल्यासारखं करीत पद्माबाईनी विचारलं.

"श्रीरंग रोज दूध घेऊन जातो का?"

"जातो. पण आज नाही आला. त्यानं बायजाला पाठवलं होतं!"

"बायजाला? ते का?"

"त्याला बरं नाही म्हणे! डोकं दुखतंय तापही आहे म्हणे!"

"खरं की काय? औषध आणालं की नाही?"

"तो कधी औषधच घेत नाही म्हणे!"

"नाही घेऊ दे! तुला का त्याची एवढी चिंता?" अमृतराव जेवण संपवून बेसिनकडे दात धूवायला जाता जाता म्हणाले.

"चिंता अशी नाही आबा, गणेशपूरला टायफॉईडची साथ सुरु आहे!"

"म्हणून तो काय लगेच मरतो काय?"

या अमृतरावांच्या वक्तव्यावर पद्माबाई काहीशा नाराज होऊन म्हणाल्या

"देवानं तोंड दिलंय म्हणून वेड्यासारखं काहीतरी बरळू नये!

बायजानं त्या श्रीरंगकडं पाहून उभं वैधव्य काढलं, तो मोठा होईल, लग्न होईल, एकादं दुसरं मूल होईल ही त्या बिचारीची स्वप्नं! आणि तुम्ही त्याच्या मरणाची भाषा करता? काही तरी वाटायला पाहिजे तुम्हाला!"

मीनलला अर्धवट जेवण सोडून उठून जावंसं वाटलं. पण अमृतराव पुन्हा त्यातून काहीतरी विपर्यस्त अंदाज करत राहतील म्हणून ती नाइलाजानं भात चिवडत राहिली. तिचे डोळे ओलावले होते. त्या अवस्थेत प्रत्येक घास तिला मोठ्या प्रयासाने गिळावा लागत होता.

११.

कर्नल ओबेरॉय सहकुटूंब चिंचलीला येऊन गेल्याचं जेव्हा मुरारराव

होतं, पण अमृतरावानी त्या कर्नलसाहेबा सोबत दारु प्यावी हे मात्र मला अपेक्षित नव्हतं! ठीक आहे. तिकडं आणखीन काय घडामोडी घडतात त्या वेळोवेळी मला येऊन सांगत जा!"

"जी साहेब!"

'विक्रमची तरी वाट लागली, निदान मीनलचं तरी लग्न चांगल्या ठिकाणी व्हावं, असं तिच्या आईबापाना वाटायला हवं!"

संतराम कांहीसा गंभीर होऊन म्हणाला,

"सायेब, ताईसायबांच सुद्दा लक्ष्यान कांय बरुबर दिसत न्हाई!"

"म्हणजे!"

"बलभीम पैलवान तुमाला म्हाईत हुता न्हवं?"

"होऽऽ तो तोरणेत बुडून मेला तोच ना?"

"व्हय त्योच! त्यो मेला तवा त्याची बायकू बायजा पोटूशी हूती! नवरा मेल्यावर बाळत झाली!"

"ते मला सगळं ठाऊक आहे रे, ती बायजा दिसायला सुंदर होती, पद्मावैनी तिला कामासाठी घरी बोलावत होत्या, तेव्हा त्याना अमृतराव काहीतरी गडबड करतात अशी शंका आली, म्हणून तिला वैनींनी कामासाठी बोलवायचं बंद केलं. तिला पोटापोण्यासाठी धान्य देत होत्या."

"हांऽऽ बरुबर! तर त्या गोष्टीला आता इस वर्स झाली. त्या वक्ताला तीन वर्साचा आसल्याला शिरीरंग आता तेवीस वर्साचा हाय! इस्वासच्या कालिजात शिकतोय. त्योबी बा सारका तगडा आणि गोरापान हाय!"

"बरं मग?"

"तवापस्नं शिरीरंगाला रोज एक शेर दूद द्याची आरडर झाली वैनीसायबांची".

"त्यात काय वाईट झालं? त्या पोराचा बाप घोरपड्यांची सेवा चाकरी करतानाच मेला ना?"

"मेला खरं हाय वो, पर फुडचं तरी ऐका!"

"हं, बोल!"

"शिरीरंग दूद न्याला आला तवा गोट्यातल्या बांड्या खोंड सुटलाता, त्यो पांड्या खोंडासंग टक्कर खेळू लागला. तवा ह्या शिरीरंगानं बांड्याला खेचून बाजूला केला आन बांधून टाकला."

"बरं झालं की मग?"

"कसलं बरं झालं म्हंतासा सायेब, तवापस्नं आमच्या ताईसाब रातध्याड बैचेन हैत!

ह्यो शिरीरंग डेरीत दूद न्यायला येतो म्हणून आता त्याच रोज डेरीत याला लागल्यात. मला कुटंतरी भाईर फिटलल्यात आणि दोगंजनं गुळूगुळू बोलत बसत्यात!"

"अरे काय सांगतोस काय तू हे संतराम? बलभीम चांगला पैलवान होता. पण तो जातीनं कुणाबी होता. त्याच्या पोराबर मीनल गुळूगुळू करते?"

कपाळावर हात मारुन घेत मुरारराव ताडकन उठून म्हणाले

"छेऽऽऽ छेऽऽऽ! आमच्या सत्तावीस पिढ्यांची बेअब्रू करायचं ठरवंल या पद्मावैनीनी! कुठल्या मुहूर्तावर त्या घोरपड्यांची सून म्हणून आमच्यात आल्या समजत नाही! संतराम, अरे तू मला ही गोष्ट सांगितली नसतीस फार अनर्थ घडला असता. मला आता स्वस्थ बसून चालणार नाही. तरी मी मीनलला जास्त शिकवू नका म्हणून बजाऊन ठेवलेलं होतं!"

मुराररावाना संतरामनं चिंचलीतल्या घडामोडींची वार्ता सांगितल्यानंतर त्यानी तात्काळ चिंचलीला जाऊन अमृतरावांची भेट घेण्याचा निर्णय घेतला.

दुपारची वेळ होती. अमृतराव चिक्कूच्या झाडाखाली कट्ट्यावर पडले होते. इतक्यात पोलिसांची निळी जीप बंगल्याच्या फाटकातून सरळ त्या कट्ट्याजवळ आली. लोडाला टेकून पडलेले अमृतराव उठून बसले. त्यानी खाली उतरुन मुरारराबाना मुजरा केला.

"इकडं तिकडं पहात जवळपास कोण नाही याची खात्री करुन घेत मुरारराव म्हणाले", वैनी कुठं आहेत ?"

"शेरीत, त्या यावेळी कुठं असणार ?"

"अरे इंगळे तू जीप तिकडं पोर्चमधे थांबव, मी बोलावल्यावर इकडं ये". मुरारराबानी इंगळे ड्रायव्हरला हुकूम केला.

कठड्यावर बसताबसता मुरारराव म्हणाले", अमृतराव तिकडं पंचवीस मैलावर मला ज्या गोष्टी समजतात त्या तुम्हाला इथं असूनही समजत नाहीत ?"

"कशाबद्दल म्हणता ?"

"मीनल डेअरीकडं रोज का जाते ?"

"का म्हणजे ? पद्माला मदत म्हणून !"

"हूंऽऽऽ ! वेडे आहात ! त्या बलभीमच्या पोराच्या प्रेमात पडलीय ती ! तरी मी तुम्हाला बजावत होतो, आपल्यात पोरीना शिक्षण नको ! पण तुम्ही लोक ऐकाल तर खरं ! आजपासून तिचं डेअरीत जाणं बंद करा ! आणि त्या हरामखोराला दूध देणं सुध्दा ! तो पुण्याचा कर्नल येतो काय आणि तुम्हा लोकांना सांगतो काय ? सगळंच काही चमत्कारिक ! मला वाटलं होतं तुम्ही त्या कर्नलला तुझ्या मुलीशी आमची सोयरीक जमणं शक्य नाही असं स्पष्ट सांगून टाकाल ! पण तुम्ही तर चक्क त्याच्या ग्लासाला ग्लास भिडवून दारु पीत बसला होता म्हणे"

"पण या घरात माझं काय चालतं का मुरारराव ?"

"न चालायला काय झालंय, तुम्ही स्वतःच्या हातानी आपली किमत कमी करुन घेता !"

"पण हे मीनलचं तुम्हाला कसं समजलं ?"

"कसं समजलं? अमृतराव आम्ही कोर्टात पाठवलेल्या खटल्यात साक्षीला जातो, तिथं एखाद्या प्रसंगाबाबत साक्ष देताना आरोपीचा वकील आम्हाला हाच प्रश्न विचारतो. हे तुम्हाला कसं समजलं? कोणी सांगितलं? तर त्या प्रश्नाची उत्तर देण्याचे आमच्यावर बंधन नसते! बातमीदाराचं नाव सांगण्याची कोर्टदिखील आमच्यावर सक्ती करु शकत नाही. ते काही असो. आम्हाला समजलेली बातमी खात्रीशीर आहे! मीनलवर तुम्ही 'वॉच' ठेवायला हवा! तिचं शिक्षणसुध्दा यापुढे थांबायला हवंय्!"

"आहे पण........!"

"पण बिण काही माझ्यासमोर चालणार नाही. विक्रम मुलगा आहे. त्यानं परजातीच्या मुलीशी जमवलं याकडं एकवेळ मी कानाडोळा करीन, पण मीनलच्या बाबतीत ते मला बिलकूल खपणार नाही! कल्पना करा, मीनलनं कुणब्याच्या पोराला आंपला नवरा म्हणून पसंत केला. तर उद्या आमच्या पोरींची लग्नं होतील का?"

दूर बांधावर उभ्या असलेल्या पद्माबाईनी जीप आल्याचं बाघितलं होतं. हातातली छत्री सांभाळीत त्या बंगल्याकडं आल्या. ज्या ज्या वेळी मुरारराव आपल्याकडे येतात तेव्हा आपल्या पतिराजाना काहीतरी शहाणपणा सांगण्यासाठीच येतात हा पद्माबाईचा आजवरचा अनुभव होता. मागे कॉलेज सुरु होण्यापूर्वीसुध्दा ते आले होते आणि आपल्यात मुलीना शिकवणं किती धोक्याचं आहे याचा सल्ला देऊन गेले होते.

पद्माबाई कट्ट्याजवळ येताच त्यानी मुराररावाना वाकून नमस्कार केला.

"अचानक येणं केलंत भावोजी?"

"वैनी तुम्ही आमच्या घोरपडे घराण्याची वाट लावायचं ठरवेलं दिसतंय्?"

दूर क्षितिजाककडं पहात सिगारेटचा धूर सोडत मुरारराव म्हणाले.

"मला ठाऊक आहे, विक्रमची पसंती तुम्हाला आवडलेली नाही. पण तुम्ही एकदा अमितला डोळ्यानं बघा! अगदी शहाण्णव कुळीतल्या मुलीसारखी दिसते, वागते की नाही!"

"विक्रमचं एक सोडा, आज त्यानं परक्या जातीच्या मुलीशी लग्न केलं तरी उद्या अपल्यात पदर लागणाऱ्या दुसऱ्या मुलीशी आम्हाला त्याचं दुसरं लग्न लावून देता येईल. किती झालंतरी तो पुरुष आहे! पण मीनलनं हे काय आरंभलंय?"

"मीनलनं काय केलं?"

"घ्या, म्हणजे तुम्हालाही ही अर्ध्या गावची खबर नाही! अहो ती त्या श्रीरंगच्या प्रेमात पडलीय!"

"काय बोलतां काय भावोजी तुम्ही हे?"

"कुठंय ती बोलवा! आता तुमच्या समोरच सोक्षमोक्ष करु!"

पद्मावाई काहीशा सचिंत होऊन म्हणाल्या·

"तुम्हाला इथं काय घडतं, हे एकाचं दोन करुन कोणीतरी· सांगत असलं पाह्यजे! मीनल, ए मीनूऽऽ"

काहीशा सचिंत झालेल्या पद्मावाईनी बंगल्याकडे पहात हाक मारली. माडीवरुन आवाज आला.

"जी मांऽऽऽ आले हं!"

फिक्कट गुलाबी रंगाचा चुडीदार घातलेली मीनल, त्याच रंगाची जॉर्जेटची ओढणी सावरीत खाली आली. मुराररावांना वाकून नमस्कार करुन ती आदबीनं उभी राहिली.

पद्मावाईनी तिला विचारलं

"भावोजी म्हणतात तू श्रीरंगाच्या प्रेमात पडलेली आहेस, खरंय हे?"

मीनलला तो प्रश्न अगदीच अनपेक्षित होता. तरीही ती त्या प्रश्नाचं उत्तर न देता पद्मावाई आणि अमृतराव यांच्याकडं पाहत राहिली.

त्यावर मुरारराव म्हणाले, "वेडे पोरी असं काही करशील तर आपली अमीर-उल-मुल्क ही खानदान बरबाद होईल. माझ्या मुलींची सुध्दा लग्न होणार नाहीत."

अमृतरावाना आणि पद्माबाईना वाटले यावर मीनल काही बोलणार नाही. पण डोक्यावरची ओढणी सावरत ती धीटाईनं म्हणाली,

"काका, छबूताई आणि चंपाताई माझ्यापेक्षा पाच सात वर्षानं मोठ्या. आजपर्यंत तुम्ही त्या दोघींची लग्न करु शकला नाहीत, आणि आता माझ्यामुळं त्यांची लग्न खोळंबतील या म्हणण्यांला काय अर्थ आहे?"

मीनलच्या त्या उत्तरानं मुरारराव कपाळावर हात मारुन घेत म्हणाले

"घ्याऽऽऽ अमृतराव हा शिक्षणाचा परिणाम बरं?"

"ते राहू द्या, मीनल तू श्रीरंगच्या प्रेमात पडली आहेस ही गोष्ट खरी का?"

पद्माबाईनी किंचित् आवाज चढवून मीनलला विचारलं.

एक दोन क्षण विचार करुन मीनल म्हणाली

"मला तो आवडतो!"

"आता बोला अमृतराव, मला जे समजलं होतं, ते खरं ठरलं ना?"

"हे मला कशाला सांगता, या तुमच्या वहिनीना सांगा! त्याना स्त्री शिक्षणाबद्दल खूप आस्था आहे, वडिलार्जित वाडा फुकट कॉलेजला देऊन टाकला! आज एवढी इमारत नव्यानं बांधायची म्हटल्यावर चार पाच लाख रुपये तरी खर्च आला असता की नाही!"

मीनलच्या उत्तरानं काहीशा सचिंत झालेल्या पद्माबाई म्हणाल्या," वाडा कॉलेजला दिला यात मी काहीही वावगं केलेलं नाही. गोरगरीब विद्यार्थ्यांची फार मोठी सोय तर झालीच पण आपल्या घराण्याच्या मूळ पुरुषांचं नावही आजरामर झालं!"

"होऽऽऽ नाव अजरामर झालं, आता तुमची कन्या कुणब्याच्या पोरावर प्रेम करून ते आणखीन उज्वल करणार आहे! वैनी, वाडा दिलात, कॉलेज सुरु झालं, गोरगरिबांची तुम्हाला कणव आहे हे सगळं मला मान्य, पण यापुढे मीनलला त्या कॉलेजात पाठवू नका! एकवर्ष ती तियं गेली तर ही एवढी प्रगती, वडिलधाऱ्यासमोर तो कुणब्याचा पोर मला आवडतो असं निर्लज्जपणे सांगण्याचं धाडस करते! उद्या ग्रॅज्युएट झाल्यावर काय करेल?"

"काका, माफ करा थोडं स्पष्ट बोलतें,

कुणबी, कुणबी म्हणून श्रीरंगला हिणवू नका, त्याची पात्रता काय आहे हे तुम्हाला कधी समजणार नाही!"

"मीनल, अजून तू लहान आहेस, तुला व्यवहारी जगाची अद्याप ओळख झालेली नाही. वैनी तरी बरं हे प्रकरण हाताबाहेर जायच्या आधी आपल्या निदर्शनाला आलं! यापुढं मीनलच्या बाबतीत काय करायचं ते तुमचं तुम्ही ठरवा! तू आत जा."

आता मीनल दु:खी चेहरा करुन बंगल्यात गेली.

पद्माबाईनाही मीनलचे हे प्रकरण रुचण्या होण्यासारखे नव्हते. श्रीरंग दिसायला सुंदर होता, वागायलाही नम्र होता, म्हणून काही तो घोरपड्यांचा जावई होऊ शकणार नव्हता. त्या काहीशा गंभीर होऊन म्हणाल्या,"

बरं केलंत भावोजी आपण हे प्रकरण माझ्या निदर्शनाला आणलंत, आता यापुढं मी मीनलच्या बाबतीत जागरुक राहीन!"

मुरारराववांच्या पेटीतली सिगारेट घेऊन ती शिलगावून अमृतराव म्हणाले "दुसरं काही करु नका, उद्या पासून हिचं कॉलेज बंद करुन टाका!"

"पण मी यात एक मार्ग सुचवू का?" मुरारराव म्हणाले.

"कोणता?" पद्माबाईनी विचारलं.

"श्रीरंगलाच इथून हलवायचा!"

"म्हणजे ?"

डोळे बारीक करुन नारळाच्या झाडाच्या शेंड्याकडे पहात मुरारराव म्हणाले

"यंदा दुर्गापूरला पोलीस भरती आहे. त्याला पोलिसातच भरती करुन टाकतो. तिथंही त्याला स्पोर्टसमन म्हणून बऱ्याच सवलती मिळतील, त्याचं तरी नुकसान आपण कशाला करायचं ?"

ही कल्पना पद्माबाईनाही एकदम पसंत पडली. त्या म्हणाल्या, "नाहीतरी हा ग्रॅज्युएट झाल्यावर नोकरीच करणार ना ?"

अमृतराव म्हणाले, "बायजा श्रीरंगला मिलिट्रीत भरती करायला विरोध करीत होती, पोलिसात भरती व्हायला विरोध करायचं काही कारण नाही."

मुराररावांची ही कल्पना पद्माबाईनाही पसंत पडली. कसलीही कटुता निर्माण न होता श्रीरंग चिंचलीच्या बाहेर जाणार आणि यापुढे मीनलला त्याचा सहवास घडणार नाही, या जाणिवेनं त्या म्हणाल्या

"बायजा या सूचनेला विरोध करील असं मला वाटत नाही. तिचा भाऊ देखील पोलिसात हवालदार होताच की !"

मुरारराव ज्या कारणासाठी आले होते ते साध्य झालं होतं.

ते जायला निघाले, तेव्हा पद्माबाई म्हणाल्या, "पण भावोजी त्याला नोकरी नक्की लागेल ना ?"

"ती चिंता तुम्हाला नको ! मुरारराव घोरपड्यांच्या शब्दाला अजून पोलीस खात्यात किंमत नक्कीच आहे !"

"मग हरकत नाही. बायजाला मी पटवून देते. पण त्याचं पुढचं शिक्षण थांबेल ना ?"

"छेऽऽऽ ! आहो वैनी आता गावोगावी नाईट कॉलेजेस निघालेली आहेत. त्याला नोकरी करीत करीत ग्रॅज्युएट होता येईल. आणि तो ग्रॅज्युएट झाला की त्याला फौजदार व्हायला काही अडचण येणार नाही. आता कॉन्स्टेबलना डिपार्टमेंटल परीक्षेला बसण्याची सवलत शासनाने

सुरू केलीय, आमच्या खात्यातले किती तरी कॉन्स्टेबल्स पी.एस.आय. झालेत!"

त्यावर अमृतराव म्हणाले, "त्याला फौजदार करायचं नंतर पहाता येईल, नोकरी लागल्यावर त्याचं लग्न होईल, नोकरी लागल्यावर त्याचं लग्न तेवढं जमवून टाका. हो, नाहीतर.......!"

"नाहीतर काय?" पद्माबाईनी विचारलं

"नाही तर तो इथून गेला तरी काही तरी कारण सांगून इकडं येत राहील!"

"त्यांची तुम्ही चिंता करु नका आमृतराव, जयसिंग जमदाडे माझ्या अगदी खास विश्वासातला हेडकॉन्स्टेबल आहे. त्यालाच श्रीरंगवर वॉच ठेवायला सांगतो म्हणजे झालं."

"पण समजा श्रीरंग पोलिसात भरती झाला तर तो तुमच्याच पोलीस ठाण्यालाच नेमला जाईल कशावरून?" पद्माबाईनी विचारलं.

मुरारराव उठून उभे राहिले आणि हसत हसत म्हणाले, "वैनी पंचवीस वर्ष मी पोलीस खात्यात काढलीत, भल्या भल्या डी.एस.पी. लोकांशी माझे संबंध आहेत, आता त्यातले काही डी.आय.जी तर काही स्पेशल आय.जी. या पदावर आहेत. मला उपद्रव देणाऱ्या काही इन्स्पेक्टर लोकांना मी चंद्रपूर आणि वर्धा दाखवलाय, मला हवा असलेला जमादार जयसिंग जमदाडे गेली बारा वर्षे मी जाईन त्या पोलीस ठाण्याला बदलून घेत असतो. या श्रीरंगला माझ्या हाताखाली घेणं हा माझ्या हातचा मळ आहे, निघतो मी!"

अमृतराव आणि पद्माबाईनी उठून मुराररावाना नमस्कार केला. बाजूला आंब्याच्या झाडाखाली जीपच्या स्टेअरिंगवर डोकं ठेवून डुलकी घेत असलेल्या इंगळे ड्रायव्हरने मुराररावांची हाक ऐककताच. बाजूला काढून ठेवलेली टोपी डोक्यावर चढवली आणि त्यानं स्टार्टर दाबला.

१२.

श्रीरंगला मिलिट्रीत भरती व्हायला विरोध करणाऱ्या बायजाने त्याला पोलिसात भरती व्हायला मात्र बिलकूल विरोध केला नाही. तिचा भाऊ दौलत हा पोलीस जमादार होता. त्याचा रूबाब तिनं बघितलेला होता. तो गुन्ह्याच्या तपासासाठी खेडोपाही जायचा आणि येताना ढीगभर भाजी, पोतं अर्धे पोतं गहू तांदूळ घेऊन यायचा. त्याला 'वरकड' जे मिळत होतं त्यावरच त्याचा घरचा खर्च भागत असे. सगळा पगार शिलकीत पडायचा. त्याची बायको चंद्रा नातेवाईकांच्या लग्नाला किंवा बारशाला गेली, की गळ्यांत मोहनमाळ, हातात पाटल्या, बिल्वर घालून मिरवत असे. पोलीस खात्यातली नोकरी म्हणजे भरपूर पैसा आणि प्रतिष्ठा, अशी बायजाची भोळीभाबडी समजूत होती. जेव्हा पद्मावाईनी श्रीरंगाला पोलिसात नोकरी मिळणार असल्याची वार्ता बायजाला सांगितली तेव्हा ती हरकून गेली. पद्मावाईचे चरण स्पर्शून ती म्हणाली,

"वैनीसाब, लई लई उपकार व्हतील बगा गरिबावर! तेला तेवडी नोकरी लागली का वर्साभरात त्येचं लगीन करुन टाका बगा! दौलतीची धाकली लेक उग्गळ निग्गळ आपल्या ताईसायबागत दिसतीया, एकीला दडवावं आन दुसरीला भाईर काडावं!"

पद्मावाई हसून म्हणाल्या, "हो ऽऽऽ पण ते कुस्तीचं वेड त्याच्या डोक्यात आहे ना? ते गेल्याशिवाय तो लग्नाला तयार नाही होणार बायजा!"

"कसली कुस्ती घिऊन बसलायसा वैनीसाब? गोरगरीबाचा खेळ हाय काय त्यो? ह्येचा बा कुस्ती करायचा न्हवं? तवा उगं थोरलं

उगं तुमच्या पायाच्या पुन्याईनं मला पोटालां मिळत हुतं म्हनून आजपतोर आमी जगलाव !"

बायजाला पद्माबाईनी श्रीरंगला नोकरी दिल्यानं आपल्यावर अनंत उपकार होणार आहेत असं वाटत होतं. त्याला नोकरी देण्याचा आपला हेतू कोणता आहे याची जाणीव पद्माबाईना होती. त्या म्हणाल्या, "मुरारभावोजी पोलीस खात्यात आहेत, म्हणूनच हे शक्य होत आहे बायजा! नाहीतर आजकाल कितीतरी शिकलेली पोरं नोकरीसाठी वणवण करताना मी पहाते आहे! श्रीरंग आता कुठं गेलाय् ?"

"तेच ठावं न्हाई वं! एदूळपतोर याला होवाता! तालमीतबी गेल्याला न्हई! लांगं हितंच खुट्टीला हाय न्हवं ?"

शेरी बागेच्या पश्चिमेला वेळूचं दाट बेट होतं. त्यापलिकडं ओढा होता. ओढ्यांत केवड्याचं बन होतं. सापांच्या भीतीनं तिन्ही सांजा झाल्यावर केवड्याच्या बनाकडं फारसं कोणी फिरकत नसे.

त्यासंध्याकाळी याच केवड्याच्या बनात श्रीरंगच्या छातीवर डोकं ठेवून मीनल एकसारखी अश्रु ढाळत होती. तो तिच्या पाठीवरुन हात फिरवत तिची समजूत घालत होता.

"तुला इयून घालवून देण्यासाठीच हे मुरारकाकानी कारस्थान रचलंय्! मला वाटलं नव्हतं मां सुध्दा त्याला तयार होतील. पण आता त्यानीच पुढाकार घेतलाय रे! मला सांग, तू इयून गेल्यावर मला विसरुन जाशील कां ?"

"वेड्या अहात काय? मी या जन्मीतरी तुम्हाला विसरु शकेन का ?"

"तू इयून गेल्यावर मी काय करू सांग ?"

"मला वाटतं, मला इयून घालवल्यावर हे लोक तुम्हाला पुढं फारसं शिकूही देणार नाहीत. तुमच्या लग्नाच्या हालचाली सुरु करतील !"

"पण मी तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाशीही लग्न करुन घेणार नाही! ते लोक तुला नोकरी लागली की तुझ्यासुध्दा लग्नाचं कारस्थान रचतील! मला त्यांच्या सगळ्या हालचालींचा अंदाज येऊ लागलाय्!"

"निंबोतला पाडव्याला होणारी पहिल्या नंबरची कुस्ती मारल्याशिवाय लग्न करायचं नाही अशी माझी प्रतिज्ञा आहे!"

"पण मुरारकाका महाकारस्थानी आहेत. ते येनकेन प्रकारेण तुझ्या गळ्यात तुझ्या मामाची मुलगी बांधल्याशिवाय रहाणार नाहीत लक्षात ठेव!"

"पण तसं होणार नाही! महिपती वस्तादाना मी वचन दिलंय! माझ्या जन्मापूर्वी माझे वडील गेले पण त्यांचीसुध्दा तीच प्रतिज्ञा होती. निंबोतची पहिल्या नंबरची कुस्ती जिंकायची! पण त्यांचं स्वप्न अपुरं राहयलं. तोरणेतल्या त्या मगरीनं त्यांचा घात केला! त्यांची ती अपुरी इच्छा पूर्ण झाल्याशिवाय मी बोहल्यावर उभा रहाणार नाही".

"श्री ऽऽऽ, मला मांचा फार आधार वाटत होता. विकीदादाच्या लग्नाला त्यानी अजिबात विरोध केला नाही. मलाही त्या माझ्या इच्छेप्रमाणं माझा जीवनसाथी निवडण्याचं स्वातंत्र्य देतील असं वाटत होतं. पण त्यानी माझा अपेक्षाभंग केला! त्यानासुध्दा शेवटी घराण्याची प्रतिष्ठा मोठी वाटली!"

"असू दे! तुम्ही आता उगाच दु:ख करु नका! अधून मधून मी चिंचलीला येत जाईन! इथंच या केवड्याच्या बनात, या जागी आपण सूर्यास्त झाल्यावर भेटत जाऊ!"

श्रीरंगनं मीनलच्या गालावरुन ओघळणारे अश्रु आपल्या हातानं पुसले आणि तिला मिठीत घेऊन तिच्या ओठावर आपले ओठ टेकवले. त्याच्या त्या पोलादी मनगटीची पकड इतकी घट्ट व्हावी की त्याच्या विळख्यात आपण गुदमरुन मरुन जावं असं क्षणभर तिला वाटलं.

खंडाळ्याच्या आर.पी.टी.एस्.चे सहामहिन्याचे प्रशिक्षण संपल्यावर श्रीरंगची नेमणूक दुर्गापूरच्या पोलीस हेडक्वार्टरला झाली. पहाटे

साडेपाचला ब्यूगल वाजला की नव्याने भरती झालेले 'रिक्रूट' उठायचे. सकाळी साडेसहाला परेड ग्राऊंडवर हजर व्हावं लागे. दुर्गापूरचा पोलीस बँड उभ्या महाराष्ट्रात प्रसिध्द होता. बँडच्या तालावर परेडला सुरुवात व्हायची. 'रिझर्व्हड' पोलीस इन्स्पेक्टर आणि आर.एस्.आय.स्वत: ग्राऊंडवर हजर राहून नवीन कॅडेट्सनना मार्गदर्शन करायचे. एक तास परेड झाली की कॅडेटसना नाश्ता दिला जाई. त्यानंतर नऊच्या सुमारास जिह्याचे वरिष्ठ पोलीस प्रॉसिक्युटर कॅडेटना फौजदारी कायदा शिकविण्यासाठी येत. श्रीरंगला हा कायद्याचा तास फारच आवडत होता. पोलिसांची कर्तव्यं, त्यांचे आधिकार, सामाजिक शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी कायद्याने त्यांच्यावर घातलेली बंधने तो अत्यंत एकाग्रतेनं अभ्यासत असे.

दुपारी चारच्या सुमारास स्पोर्टससाठी सर्व कॅडेटस् परेड ग्राऊंडवर यायचे. श्रीरंगला कुस्तीची आवड आहे हे एव्हाना आर. एस्. आय्.या आधिकाऱ्याला ठाऊक झालेले होते. श्रीरंगप्रमाणेच दुर्गापुरच्या ग्रामीण भागातून-आलेल्या चार पाच कॅडेटसना कुस्तीची आवड होती. कुस्तीचा सराव आसावा या हेतूनं हेडक्वार्टला एक छोटीशी तालीमही बांधण्यात आलेली होती. रमजान नावाचा हेडकॉन्स्टेबल मुलाना त्या तालमीत डावपेच शिकवायचा. कुस्तीबरोबरच श्रीरंग हॉकी, हॉलीबॉलही खेळायचा.

नियमित सकस आहार, रोजची परेड आणि संध्याकाळी स्पोर्टस्, यामुळं बघता बघता श्रीरंगमधे बदल घडत होता. त्याच्या चालण्यात एकप्रकारची ऐट दिसू लागली. नजरेत आत्मविश्वास दिसत होता. अधून मधून डी.एस्. पी. परेडला हजर रहायचे.

'टर्नआऊट'च्या ऑर्डर्स रुबाबदारपणे करणारा श्रीरंग त्या बॅचमधला बेस्ट कॅडेट ठरला होता.

बघता बघता तीन महिन्यांचे ट्रेनिंग संपले.श्रीरंगची कोणत्यातरी पोलीस स्टेशनला नेमणूक व्हायची होती. कॅडेटस् आपसात चर्चा करु

लागले. कोणाला आपल्या तालुक्यात नेमणूक हवी होती. तर कोणाला 'आर्म मधून आनार्म' होऊन एखाद्या चांगल्या पोलीस स्टेशनला नेमणूक व्हावी .असं वाटत होतं. आपण नवीन असल्यामुळे आपल्याला हवं ते ठिकाण मिळेलच याची कोणालाच शाश्वती नव्हती.

दुपारी तीनच्या सुमारास आर.एस.आय्. हातात यादी घेऊन आले. कॅडेटस्च्या नेमणुकींचा हुकूम डी.एस्.पी.च्या ऑफीसकडून आलेला होता.

दुर्गापूर जिल्ह्यात शिरगांव पोलीस स्टेशन महत्वाचं मानलं जात होतं.:या शिरगांव पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन साखर कारखाने होते. साखरकारखान्यांत राजकारण होते. ज्याच्या हातात अध्यक्षपद येई तो त्या भागातला पुढारी होई. पोलिसानाही त्याची मर्जी सांभाळावी लागे.

इतके दिवस दुर्गापूर तालुका पोलीस स्टेशनला फौजदार म्हणून नेमणुकीस असलेल्या मुरारराव घोरपड्यांची नेमणूक शिरगांव पोलीस स्टेशनला झाली होती. त्यांचा उजवा हात म्हणून गणल्या जाणाऱ्या जमादार जयसिंग जमदाडेचीही शिरगांव पोलीस ठाण्यालाच नेमणूक झालेली होती.

पूर्वी दुर्गापूर संस्थान होतं. ते स्वातंत्र्य प्राप्तीनंतर काही वर्षांनी भारतीय संघराज्यात विलीन झालेलं होतं. या पूर्वीच्या दुर्गापूर संस्थानात अनेक जहागिरी होत्या, त्यांत चिंचली, शिरगाव, अमरापूर अशा प्रमुख जहागिरीची गावं होती. दुर्गापूर तालुका पोलीस स्टेशनच्या फौजदारांचं निवासस्थान जुन्या तळ्याजवळ होतं. उन्हाळ्यात नळाला पाणी कमी येऊ लागलं की आसपासचे लोक या जुन्या तळ्याचं पाणी वापरण्यासाठी आणत.

शिरगांव हे गाव दुर्गापूरच्या दक्षिणेला बारा मैलावर अंतरावर होतं. संस्थानाबरोबर जहागिरीही विलीन झाल्या होत्या.

पोलिसांच्यासांठी माळावर 'पोलीस लाईन' बांधण्यात आलेली होती. ओळीनं बारा ब्लॉक्स् बांधलेले होते. दोन दोन खोल्यांच्या या पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाला फक्त प्रवेशद्वारच होतं. मागच्या बाजूने दारं नव्हती फक्त दोन खिडक्या होत्या.

या पोलीस लाईनपासून एक फर्लांगावर शिरगांवचं पोलीस स्टेशन होतं. त्याच इमारतीच्या आवारात मामलेदार ऑफीसही होतं. तालुक्याचे हे दोन वरिष्ठ आधिकारी असल्यामुळं मामलेदार आणि फौजदार यांच्यासाठी जवळच वेगवेगळे बंगले होते.

मुराररावांची दुर्गापूर तालुका पोलीस स्टेशनवरून शिरगांवला बदली झाली. त्यांच्या घरी असलेले ऑर्डली सामानाची बांधाबांध करण्यासाठी आले होते. दुपारी दीडच्या सुमारास दुर्गापूर तालुका पोलीस स्टेशनचा चार्ज नव्या फौजदाराकडे सोपवून मुरारराव आपल्या बंगल्याकडे आले.

दारातच त्याना उभी असलेली त्यांची मोठी मुलगी छबू दिसली. ती चिंताग्रस्त दिसली,

"काय गं? काय झालं?"

मुराररावानी दारातून आत येता येताच विचारलं.

"एक तास झाला चंपा कुठं दिसत नाही! लायनीत कुणाकडं गेलीय का पहावं म्हणून जाऊन आले. पण ती कुठंच नाही!"

"कुठंच नाही? रत्ना कुठाय्?"

"आई आत आहे!"

खाडखाड वाजणारे बूट. बाहेर न काढताच मुरारराव आत आले. डोकं हातात धरुन बसलेल्या पत्नीला त्यानी दरडावून विचारलं

"कुठाय चंपा?"

"कुठं दिसेना! मुळीक आणि दगडूला तिला शोधायला पाठवलंय्!"

मुरारराव संतप्त झाले. ते बायकोवर ओरडले.

"कुठं दिसेना याचा अर्थ काय?"

"मी तरी काय सांगू?"

मुरारराव शिरगांव पोलीस ठाण्याला जायचं म्हणून मोठ्या खुषीत होते. पण त्यांची कन्या चंपा अचानक नाहीशी झाल्याचं पाहून त्याना नेमकं काय करावं हेच सुचेना. इतक्यात चंपाचा शोध घ्यायला गेलेले दोन कॉन्स्टेबल्स मुळीक आणि दगडू परत आले.

"काय रे? काय झालं?"

कॉन्स्टेबल मुळीक मुराररावांच्या जवळ जाऊन काहीसा गंभीर होऊन म्हणाला

"साहेब जरा बाहेर या!"

मुरारराव बंगल्याच्या बाहेर आले.

"साहेब कसं सांगू आपल्याला? धाकट्या ताईसाहेब पळून गेल्या!"

"पळून गेली? कुठं? कुणाबरोबर?"

"आपल्या बंगल्याशेजारी मामलेदार साहेब राहतात, त्यांच्या घरी सहा महिन्यापूर्वी एक तरुण आला होता.

मामलेदारांच्या घरी किरकोळ काम करायचा आणि नाईट कॉलेजला जायचा. त्याच्याशी धाकट्या ताईसाहेब बोलत असायच्या! मला शंका आली म्हणून आता सरळ मामलेदार साहेबांच्या बंगल्यावर जाऊन त्याची चौकशी करुन आलो. तोही रात्री पासूनच बेपत्ता आहे! काल कॉलेजला जातो म्हणून गेला तो अजूनही नाही आला."

"हरामखोर हे तू मला आता सांगतोस?"

मुराररावानी मुळीक कॉन्स्टेबलच्या थोबाडात मारली.

"माझी काय चूक आहे साहेब?"

"काय चूक आहे? चंपा त्या हरामखोराशी बोलताना तू पाहिलंस, मग मला का नाही सांगितलंस?"

"धाकट्या ताईसाहेब आमच्याशीही बोलायच्या, तशाच त्या शिवरामशी सहज बोलत असतील असं वाटायचं मला".

"बदमाश! चल मामलेदारना विचारु कुठला होता तो हरामखोर!"

मुरारराव मुळीक कॉन्स्टेबलला सोबत घेऊन मामलेदारांच्या बंगल्याकडे आले.

"काय हो साहेब? कुठ्ला पोऱ्या आणून ठेवला होता घरी?"

मामलेदार स्वभावानं अतिशय थंड होते. पानाचा डबा उघडून पानाच्या शिरा काढत ते म्हणाले

"फौजदारसाहेब, उगाच त्रागा करून घेऊ नका! सगळं सांगतो बसा! पान खाणार?"

"काही नको. बोला तुम्ही?"

"सहा महिन्यामागे आम्हाला डी.ओ.आला होता. घरकामासाठी कचेरीतला पट्टेवाला वापरायचा नाही. मला वाटलं त्याच सुमारास तुम्हालाही वरून सूचना आल्या होत्या. पोलीस आधिकाऱ्यानीही आपल्या घरकामासाठी पोलीस कॉन्स्टेबल 'ऑर्डली' म्हणून वापरायचा नाही. तुम्ही लोक तो आदेश न मानता पूर्वीप्रमाणेच कॉन्स्टेबल्स ऑर्डली म्हणून वापरता ती गोष्ट निराळी! पण आम्ही 'रेव्हिन्यूतले' लोक तुमच्यासारखे धाडशी नसतो! मी ऑफीसच्या पट्टेवाल्याला घरी काम करायचं नाही असं सांगितलं! आता नळाला उन्हाळ्यांत पाणी किती कमी येतं तुम्हाला ठाऊक आहे?"

"पुढं बोला?"

"पिण्यापुरत्या जेमतेम दोन घागरी पाणी मिळतं. पण धुणं, भांडी, घरी वापरायला दहाबारा घागरी पाणी आम्हाला लागतं. आमच्याबायकोची स्थिती तुम्हाला ठाऊक आहे. तिला बाजूच्या तलावावरुन पाणी आणणं शक्य नाही. म्हणून मी केवळ पाण्यासाठी या शिवरामला माझ्याकडं ठेवून घेतला. तो पाणी भरुन घरकाम करुन रात्री नाईट कॉलेजला जात होता - गरीब होता तसा."

"गरीब असूं दे, पण तो कोण कुठला याची काही चौकशी केलीत का?"

"होऽऽ केली ना? कवठ्याचे माझे मेव्हणे तुम्हाला ठाऊक आहेत ना?"

"आहेत पुढं बोला!"

"हा त्यांच्या गावाकडचा होता. त्यानी आपल्या बहिणीसाठी म्हणून त्याला आमच्याकडे पाठवला होतो. शिवराम स्वभावानं गरीब होता, प्रामाणिक होता. म्हणूनच मी त्याला ठेवून घेतला."

"पण त्या भडव्याने माझ्या मुलीला फूस लावून पळवून नेली त्याचं काय?"

"तो इथून गेला ही गोष्ट खरी आहे. पण तुमची कन्या चंपा त्याच्या सोबतच गेली याला काय पुरावा?"

आडकित्त्यानं सुपारी बारीक कातरुन तोंडात टाकत मामलेदार पुढे म्हणाले.

मघाशी हा मुळीक आला तेव्हाच समजलं!"

"पण त्याचं गाव कोणतं, त्याची जात कोणती याची तरी त्याला घरात घेण्यापूर्वी चौकशी केलीत की नाही?"

"केली ना? तो मेंढपाळ समाजातला आहे. त्याचं गाव कवठ्या पासून बारा मैलावर आहे. पण तो गावाकडं जाण्याची बिलकूल शक्यता नाही!"

मामलेदारसाहेब शांतपणे. बोलत असल्याचं पाहून मुरारराव संतापून म्हणाले,

"माझ्या घरी असा भीषण प्रकार घडला असताना तुम्हाला त्याचं काहीच सोयर सुतक नाही?"

"ते का असावं? आजपर्यंत मुलीना आलेली स्थळं केवळ तुमच्या ——— ——— गरीब म्हणून तुम्ही नाकारत होता. त्या पोरीच्या

पानावर शांतपणे कात घालून विडा तोंडात घालण्यापूर्वी मामलेदार म्हणाले

"वाऽऽ! प्रामाणिकपणानं माझ्या घरी पाणी भरणाऱ्या, घरकाम करणाऱ्या शिवरामला इथून तुमची पोरगी पळवून घेऊन जा म्हणून फूस लावण्यात माझा काय स्वार्थ? माझा झालाय तो उलट तोटाच! आता मला दुसरा कोणीतरी शोधावा लागणार आहे! तुम्हाला ते तसं वाटणं बरोबर आहे! तर्कसंगत निष्कर्ष काढणं हे तुमच्या खात्याला कधीच जमत नसते! असो! आपली शिरगांव पोलीस ठाण्याला बदली झाली म्हणून ऐकतो ते खरं का?"

पानखाल्यानंतर तोंडात तंबाखूची चिमूट सोडत मामलेदारानी शांतपणे विचारलं.

मुरारराव काहीसे संतप्त होऊन उत्तरले, "होऽऽऽ! पण आता इतक्यात जॉईन व्हायचं की नाही याचा विचार करतोय! येतो मी! चल रे मुळीक!"

मुरारराव परत बंगल्यात आले. छबू भेदरलेली होती. तिनं भीतभीत पुढं येऊन विचारलं

"काय लागला पत्ता?"

"नाही! कार्टी आता दिसू दे, म्हणजे तिला सांगतो! आजपर्यंत अरोपींची कातडी जशी सोलत होतो. तशीच......!"

मुरारराव मोठ्या संकटात सापडले होते. घोरपडे घराण्याच्या ऐतिहासिक परंपरेचा बडेजाव मारणाऱ्या मुराररावांना आपली कन्या ... शिवराम सोबत पळून गेली याची खबर पोलीस

हजर न होता रजा घेतली. त्यांचा उजवा हात, म्हणून पोलीस खात्याला परिचित असलेल्या जमादार जयसिंग जमदाडेनेही रजा घेतली. रजेच्या मुदतीत सरकारी वाहन वापरता येणं शक्य नसल्यानं मुराररावानी एक टॅक्सीच ठरवली. जमादार जमदाडे सोबत प्रथम ते कवठ्याजवळच्या वाशी या शिवरामच्या गावी गेले. तिथं जाण्याचा त्यांचा एक हेतू होता. शिवरामचा एखादा फोटो मिळाला तर त्याना तो हवा होता. वाशी हे गाव कर्नाटकच्या सीमेवर संपूर्ण मेंढपाळ जमाती गाव होतं. गावोगाव मेंढ्याचे कळप घेऊंन जाणाऱ्या लोकांच्या घरी त्यांच्या म्हाताऱ्या कोताऱ्या आया आणि बायकाच तेवढ्या होत्या. जमादार जमदाडे बहुभाषिक होता. त्याला हिंदी गुजराती आणि कानडी भाषाही बोलता यायच्या. त्यानं गावात शिवरामची चौकशी केली. तो कित्येक दिवसापासून गावी आला नसल्याचं समजलं. एक म्हातारी म्हणाली,

"तो आमचा धंदा न करता कुठंतरी घरकाम करतो, शाळा शिकतो. त्याचं जवळचं असं कोणीच गावात नाही. चार वर्षापूर्वी त्याचे वडील आणि दोनवर्षापूर्वी त्याची आई वारली. तेव्हा दहाबारा दिवस तो गावात होता. नंतर तो गेला!"

मुराररावाना त्याचा फोटो मिळाला नाही. पण दाखवणेसाठी चंपाचे मात्र बरेच फोंटो काढलेले होते, ते पेपरमध्ये दिले असते तर कदाचित तिचा ठावठिकाणा समजण्याची शक्यता होती. पण फोटो देणे म्हणजे पुन्हा बदनामी!

वाशीवरून परत आल्यानंतर मुरारराव सांगली, सातारा, सोलापूर, पुणे अशा शहरात गेले. तेयील परिचित पोलीस अधिकाऱ्यांना त्यानी चंपाच्या फोटोच्या प्रती दिल्या. व त्यांना सांगतले

"फारसा गाजावाजा न करता या माझ्या मुलीचा ठावठिकाण

मुराराव खूप फिरत राहिले. शेवटी हताश होऊन ते शिरगांव पोलीस ठाण्याला रुजू झाले.

मीनलला जेव्हा चंपा पळून गेल्याची वार्ता समजली तेव्हा तिला मात्र फारच समाधान झालं. ती स्वत:शीच म्हणाली 'बरं झालं काकांचं नाकच कापलं! श्रीरंगला कुणब्याचा पोर म्हणून हिणवत होता ना? आता घ्या!"

मोठ्या खुषीत येऊन गाणं गुणगुणत जेव्हा मीनल जिन्यावरुन खाली आली तेव्हा अमृतराव आणि पद्माबाई हॉलमध्ये त्याच विषयावर चर्चा करीत होते. पद्माबाई म्हणाल्या,

"इतकी स्थळं पोरीना चालून आली होती. पण प्रत्येकात भावोजीना काहीतरी दोषच दिसायचा! आता पूर्वीचे दिवस नाही राहिले. घर दार असलेला, कमावता, निर्व्यसनी मुलगा असला तर डोळे मिटून देऊन टाकावं, शहाण्णव कुळीचं उरलंयच कोण आता?"

अमृतराव सिगारेटचा झुरका घेत म्हणाले," तशी खूप स्थळं आहेत, पण योग यावा लागतो ना?"

तुम्ही काही म्हणा, भावोजीनी हा शहाण्णवकुळीचा अट्टाहास आता सोडायला हवा! विकीच्या प्रकरणात त्यानी काय कमी गोंधळ घातला?"

माडीवरून खाली आलेली मीनल फ्लॉवरपॉट जवळ उगीचच घुटमळत होती. तिच्या अगदी ओठावर आलेलं होतं बोलायचं मग माझ्याच बाबतीत असा अन्याय का? श्रीरंग गरीब घराण्यातला आहे म्हणून?"

मीनलकडं पहात पद्माबाई म्हणाल्या, "कळलं का तुला चुलत बहिणीचे प्रताप?"

"होऽऽ! समजलं!"

"[illegible] पोरी जन्माला न येता तर बरं!" अमृतराव म्हणाले

त्यांची चर्चा सुरु असतानाच अचानक विश्वास तिथं आला.

त्याने अमृतरावाना आणि पद्मावाईना वाकून नमस्कार केला. बाजूच्या खुर्चीवर बसत त्यानं विचारलं.

"ऐकलं ते खरं काय?"

"चंपाबद्दल ना?"

"हो ऽऽऽ!"

"खरंय ते! दहादिवस झाले तिचा पत्ता नाही!"

विश्वास अमृतरावांच्याकडं पहात म्हणाला,

"फौजदार साहेबानी पेपरमधून चंपाचा फोटो द्यायला हवा होता!"

त्यावर अमृतराव सिगारेटची राख झटकीत म्हणाले", म्हणजे आज फक्त मोजक्याच लोकाना हे समजलंय, तो दिला असता तर जगभर डांगोरा पिटला गेला असता!"

"तसं नाही सरकार, वृत्तपत्रात फोटो दिला की ठावठिकाणा समजण्याची शक्यता असते, शिवाय तुम्हाला असं वाटतं, की ही गोष्ट कोणाला समजलेली नाही? ताकाला जायचं आणि मोगा लपवायचा असला हा प्रकार आहे! अहो मी परवा औरंगाबादला गेलो होतो, एका अधिवेशनाला- तिथल्या प्रतिनिधीनी मला विचारलं फैजदार घोरपडेंच्या कन्येच्या काही तपास लागला का म्हणून? असो! मी आलो होतो एका दुसऱ्याच कामासाठी!"

"बोल!" पद्मावाई म्हणाल्या,

"आपल्या कॉलेजला बाहेरच्या गावातून बरीच मुलं येतात. रोज त्याना चारपाच रुपये गाडीखर्च करावा लागतो. तेव्हा गावातं एक पन्नास मुलांच हॉस्टेल सुरु करावं असं डोक्यात आहे".

... चटकन म्हणाले

निघालास? त्याना ठेवणार कुठं? त्यांच्या जेवणाखाण्याची सोय कुठं करणार? उगाच नसते व्याप मागे कशाला लावून घेतोस?"

त्यावर विश्वास म्हणाला, "सरकार, वाड्याच्या मागे तुमची जुनी घोड्याची पागा आहे. आता तुमच्याकडे घोडी नसल्यामुळे ती पागा मोकळीच आहे. ती दुरुस्त करुन घेतो. मुलांच्या कडून हॉस्टेलसाठी पैसे न घेता धान्य घ्यायचं! या हॉस्टेलमध्ये रहाणाऱ्या मुलानीच पाळीपाळीनं आपलं जेवण बनवायचं!"

"पोराना जेवण करायला जमेल?" विश्वासच्या योजनेची कीव करावी अशा अविर्भावात अमृतराव म्हणाले.

"का जमू नये? जेवण हे फक्त बायकामुलीनीच करावं असा काय कायदा आहे? उद्या या हॉस्टेलमध्ये शिकणाऱ्या पोरांची लग्नं झाली आणि बायकोची प्रकृती ठीक नसली तर हे जेवण बनवण्याचं ज्ञान त्याना संसारात उपयोगी नाही पडणार?"

"वेडा आहेस झालं! लग्न झाल्यावर म्हणे पुरुष जेवण बनवतील!"

"त्याला का वेडा म्हणता? वेळी प्रसंगी पुरुषानं का जेवण बनवू नये?"

पद्मावाईनी मध्येच हस्तक्षेप केला.

"आम्ही किती बनवतो?"

अमृतराव आपला बडेजाव दर्शवीत म्हणाले.

"तुम्ही? तुम्ही जन्माला येऊन काय शिकलांत ते तुम्हाला

अमृतरावांनी तिरकं पहात म्हटलं.

"अहो ते पुणं आहे. विकीचं रहाण्याचं ठिकाण कुठं? कॉलेज कुठं? शिवाय यंदा त्याचं बी.ए.च वर्ष. तो अभ्यास करील का जेवण बनवत राहील? काही तरी बोलायचं म्हणून बोलत नका जाऊ, याला शहाणपणा म्हणत नसतात!"

तो अप्रिय विषय बदलण्याच्या हेतूनं मीनलकडं पाहत विश्वास म्हणाला, " काय ताईसाहेब? काय म्हणतंय् कॉलेज?"

"ठीक आहे?"

"यंदाचं वर्ष झालं की मीनलचं लग्न ठरवून टाकायचं! चंपाचं हे प्रकरण झाल्यापासून आम्हालाही झोप नाही!" अमृतराव म्हणाले.

त्यावर पद्मावाई म्हणाल्या, "चंपाची आणि मीनलची बरोबरी कशाला करता? त्या पोरींना भावोजींनी एकतर शिकवलं नाही, आणि दुसरं म्हणजे त्यांची वयं वाढत चालली असताना चिकित्सक दृष्टीनं आलेली स्थळं नाकारत राहयले!"

"मग काय उगाच कोणा लुग्या सुंग्याला मुली द्यावात त्यानी?" अमृतराव म्हणाले.

"अहो माझ्या माहिति प्रमाणे छबूसाठी आठ चांगली स्थळं आली होती, चंपालाही सहासातानी मागणी घातलेली होती! ते जाऊ द्या विश्वास तू इतका महाराष्ट्रभर फिरतोस तेव्हा मीनलला योग्य असा एखादा मुलगा तुझ्या आढळात आला तर सांग! लग्नानंतर बायकोला पुढं शिकण्याला प्रोत्साहन देणारा असला तर फारच बरं! विकीनं आपला प्रश्न सोडवलाच आहे. हिच्या जबाबदारीतून मी एकदा मुक्त झाले की सुटले बघ!"

"मला एवढ्यात लग्नच करायचं नाहीए!"

त्यावर विश्वासराव हसत हसत म्हणाले

"आजपर्यंत बऱ्याच मुलींनी हे वाक्य उच्चारलेलं मी ऐकलंय!"

असं म्हणून विश्वास निरोप घेऊन गेला.

१३.

विक्रमची परीक्षा झाली. परीक्षा झाल्यानंतर सुट्टीत तो दोन महिने चिंचलीला येत असे. या वेळी त्याचे पद्माबाईंना पत्र आले.

सौ मां ना विकीचा मुजरा,

परवाच माझी परीक्षा झाली. सर्व पेपर बरे गेले. फर्स्टक्लास नसला तरी हायर सेकंड क्लासतरी नक्कीच मिळेल. अमिताचा इकॉनॉमिक्सचा पेपर जरा अवघड गेला म्हणते, पण मला वाटतं ती त्या विषयात काठावर का होईना पास होईल.

यंदा मी सुट्टीत तिकडे येत नाही. पंचवीस मे रोजी माझे अमिताशी रजिस्टर पद्धतीने लग्न होईल. त्याच दिवशी संध्याकाळी कर्नलसाहेबांनी मोजक्याच अशा दीडशे लोकाना गार्डन पार्टी अरेंज केली आहे. आजकाल 'रिसेप्शन' नावाचा जो भोंगळ सोहळा साजरा केला जातो तसा प्रकार माझ्या बाबतीत घडणार नाही! सर्व निमंत्रिताना रात्री बरोबर आठ वाजता बोलावलेलं आहे. आठ वाजून पाच मिनिटांनी आमिता व मी घरातून बाहेर येऊ आणि उपस्थितांना अभिवादन करू. सव्वा आठला 'बुफेला' सुरुवात होईल. सव्वा नऊला कार्यक्रम संपलेला असेल. तुम्ही म्हणाल हे असं वेळेचं बंधन का? तर कर्नलसाहेब म्हणाले संध्याकाळी सात वाजल्यापासून ते रात्री [illegible]

त्या दिवशी सकाळी नऊ वीसला आम्ही रजिस्ट्रारसमोर विवाहबध्द होऊ. 'नऊ वीसचा मुहूर्त मोहिनी आन्टीनी कुठल्यातरी कॅलेंडरमध्ये वाचलाय म्हणे! कर्नलसाहेबानी आन्टीची थोडी चेष्टा केली त्याबद्दल, पण शेवटी त्याच मुहूर्तावर आम्ही दोघानी सह्या करण्याचं ठरलेलं आहे. काल अनादि आहे हे मी मानतो शुभ अशुभ वेळ यावर माझा विश्वास नाही. पण त्याबाबत आग्रही भूमिका नाही.

ति. आबासाहेब लग्नाला आणि संध्याकाळचा समारंभाला येतील अशी आम्हा सर्वांची अपेक्षा आहे. ति. मुरारकाका येणार नाहीत हे मला माहीत आहे. तरी पण ते आलेच तर सुसंस्कृत आणि खऱ्या अर्थानं प्रतिष्ठित मंडळी कशी वागतात, बोलतात याचे त्यानाही दर्शन घडेल. मध्यंतरी चंपाताईच्या बाबतीत एक विचित्र बातमी कानावर आली होती. पण माझा विश्वास बसला नाही. त्यात खरे काय ते तुम्ही लोक इकडे आल्यावर समजेलच. ति. आबाना मुजरा चि. मीनलला आशीर्वाद.

आपला आज्ञाधारक विकी

ता.क येत्या चौदा तारखेला सकाळी वाट पहात आहे.

पद्माबाईनी ते पत्र नंतर अमृतरावाना वाचायला दिले. पत्र हातात घेण्यापूर्वीच ते उद्‌गारले," एकदा लग्न ठरवले आहे म्हणून कळवलं, आता लग्न झाले म्हणून कळवत असेल!"

"अहो अगोदर वाचून तरी पहा, उगाच का अंदाज करीत राहता? लग्न व्हायचंच अजून!"

"वा ऽऽऽ!"

असं म्हणून अमृतरावानी पत्र वाचायला सुरुवात केली. प्रत्येक वाक्यागणिक ते 'कॉमेंटस' करीत पत्र वाचू लागले.

"लग्न रजिस्टर पध्दतीने होणार! होऊ द्या इथं कोणाला उत्साह दाटलांय?"

'रिसेप्शन नामक भोंगळ सोहळा होणार नाही. वधूवर आठ वाजून पाच मिनिटानी घरांतून बाहेर येणार!' वाऽऽऽ काय आधुनिक कल्पना आहे. अगदी मिलिट्रीच्या शिस्तीत सगळं होणार तर?'

"त्यात काय चूक आहे? नवरानवरीला सजवून स्टेजवर उभं करायचं, जशी माणसं येत जातील तसं वधुवरांनी खूर्चीवर उठून त्यांचं स्वागत करायचं! खोटे खोटे हसायचं! खोटे खोटे विनोद करायचे! मलासुध्दा अलीकडं शहरातून रिसेप्शन नामक जो संपत्तीचं प्रदर्शन करण्याच्या भोंगळ प्रकार चालतो तो बिलकूल पसंत नाही. जवळच्या माणसाना लग्न झालंय हे समजण्यासाठी फार तर बोलवावं, त्याना चांगलं जेवण द्यावं, हे मान्य, पण त्यासाठी हा डामडौल आणि खर्च करावा हे मलाही नाही पटत!"

"हूंऽऽऽ म्हणजे पुण्याच्या एका भेटीत तुमच्याही दृष्टिकोनात आमूलाग्र बदल घडलाय तर!"

"हे पहा, तुम्ही थोडं गप्प बसा. कर्नलसाहेबानी त्या दोघाशी चर्चा करुन हा कार्यक्रम ठरविलेला आहे. लग्नाचा आनंदसोहळा कशा तऱ्हेनं साजरा करायचा ते ठरविण्याचा तिऱ्हाईताना काय हक्क आहे? शिवाय उगाच संध्याकाळी सात वाजल्यापासून दहा वाजेपर्यंत वेळेचा अपव्यय. कशासाठी करायचा? आहेर न घेण्याचा त्यांचा निर्णय मलाही आवडला! कोणी कोणाला देऊ नये आणि घेऊही नये!"

"मग हे जेवण द्यायचं तरी काय कारण?"

"कर्नलसाहेब सैन्यात अधिकारी आहेत हे विसरता? मित्राना अधूनमधून पार्टीला बोलवणं ही मिलिट्रीतल्या आधिकाऱ्यांची प्रथा असते. मुलीच्या लग्नानिमित्त ते पार्टी देताहेत!"

"पण पार्टी ओली की सूकी हे का नाही लिहिलं विकीनं?" खवचटपणे अमृतरावानी विचारलं.

"तुमचे बंधूराज बॅरिस्टर देशमुख नाही येणार?" अमृतरावांनी विचारलं, "अंतर्जातिय लग्न ठरवल्याबद्दल आभिनंदनाचं पत्र अरविंदनं विकीला पाठवलंय! सवड असली तर तोही पार्टीला येईल." पद्मावाई म्हणाल्या,

दोघांची ही चर्चा चालू असताना बंगल्याच्या फाटकात गाडी आल्याचा आवाज आला. पद्मावाईनी खिडकीजवळ येऊन बघितलं. टॅक्सीतून मुराररावांच्या पत्नी रत्नमाला आणि कन्या छबू उतरत होत्या.

पद्मावाई बाहेर व्हरांड्यांत आल्या.

"रत्नाऽऽऽ छबूऽऽऽ अशा अचानक कशा काय आलात? भावोजी कुठं आहेत?"

त्या दोघीना हाताला धरुन आपल्या खोलीत नेत पद्मावाईनी विचारलं.

रत्नमालाबाईना हुंदका आवरता येईना. त्या हमसाहमशी रडू लागल्या. त्यांचं रडणं पाहून छबूही मुसमुसू लागली. दु:खाचा उमाळा थोडासा कमी झाल्यावर रत्नमाला म्हणाल्या, "आम्हा दोघीना जगणं मुश्कील केलंय्!"

"पण तुम्ही दोघींनी काय गुन्हा केलात? चंपा पळून गेली यात तुमचा दोघींचा काय दोष?"

"ते म्हणतात ती त्या पोराशी बोलत होती. त्याच्याशी तिचं प्रेम जमलं होतं हे तुम्हा दोघीना ठाऊक असलं पाहिजे! आता मामलेदारांच्या घरात काम करायला, तलावाचं पाणी आणायला ठेवलेला गडी तो! त्याच्याशी चंपा प्रेम करते हे कळालं असतं तर आम्ही गप्प बसलो असतो का?"

पाठीवरची साडी वर करुन रत्नमालानी दाखवलं.

या कडेपासून त्याकडेपर्यंत लालभडक काठीचा ओळ उठला होता.

पद्मबाई अचानक गंभीर होऊन म्हणाल्या, "भावोजीचं डोकं फिरलंय की काय? ही काय मारायची तऱ्हा झाली?"

त्यावर रत्नमाला डोळे पुसत म्हणाल्या, "आम्हा दोघीना तिथं जगणं कठीण झालंय, मी छबूला घेऊन सावळजला जाते! कुठंही पोट भरून खावू. पण आता हे अपमानाचं जिणं काही सहन होत नाही!

"असं करु नको रत्ना! भावोजीना मी बोलावून घेते!"

"नको नको, इकडं गाऱ्हाणं गात का आलात म्हणून पुन्हा खवळतील."

"तुम्ही गप्प रहा. माझं मी काय करायचं ते ठरवते. अशा प्रसंगी घर सोडून जायचं नसतं! तुमच्यावर आत्ता हा प्रसंग आलेला आहे. मी विकीच्या जन्मापासून असल्या अनेक प्रसंगाना तोंड दिलेलं आहे यानी माझ्या आंगावर हात टाकण्याचा एकदा प्रयत्न केला होता, तेव्हा त्याना बजावलं तुम्ही मला मारुन तर पहा मग काय होतं ते? समोरचं माणूस गरीब दिसलं की पुरुष मडंळी टुरटुर करतात. जरा या लोकाना आपला हिसका दाखवला की शेपूट घालतात! चंपा पळून गेली यात तुमचा दोघींचा काय दोष?"

"ते म्हणतात तुम्हा दोघीना ते ठाऊक असलं पाहिजे!"

"ठाऊक असताना तुम्ही गप्प बसाल?"

"बघा ना? मला तर एकदा वाटलं की सरळ दोघीनी वीष आणून प्यावं! नको हे जगणं असं झालंय्!"

पद्मावाई गंभीर होऊन म्हणाल्या, "या सर्व प्रकारला भावोजीच जबाबदार आहेत. चालून आलेल्या प्रत्येक स्थळात त्याना दोष दिसायचे! 'पदर' लागायला हवा म्हणे पदर! कालबाह्य झालेल्या गोष्टी किती वर्षं कुरवाळीत बसणार आहेत कुणास ठाऊक? पण रत्ना मला

येत नाहीत! तुम्हीच सांगा? ही छबू बिचारी घाबरट आहे म्हणून आजपर्यंत गप्प बसली. पण चंपा तशी नव्हती! मला ती वारंवार म्हणायची 'तुम्हाला या जन्मात मनासारखा जावई मिळणार नाही. तुम्ही आम्हा दोघीना खानदानीच्या नावाखाली अशाच झिजवून मारणार!"

त्यावर पद्माबाई क्षणभर विचार करुन म्हणाल्या, "खरं होतं ते तिचं म्हणणं!"

"घरातून बाहेर जायची बंदी! सिनेमा नाटक तर दूरच राह्यलं, ऑर्डर्लीकडून लायब्ररीतून कथा कादंबऱ्यांची पुस्तकं देखील आणायला बंदी! का तर म्हणे त्या कथा कादंबऱ्या वाचून उपवर मुली बिघडतात".

"काहीतरीच काय? त्याचं काय असतं रत्ना तशा समज आलेल्या सर्वच मुली थोड्या स्वप्नाळू असतात. पण त्याना जरा समजावून घेतलं की त्या ऐकतात सुध्दा! परवा आमच्या मिनूचं देखील तेच झालं! बलभीमचा मुलगा श्रीरंग दिसायला अतिशय देखणा आहे. कॉलेजात गॅदरिंगला त्यानं चार पाच बक्षीसं मिळविली, म्हणून कर्नलसाहेबानी त्याला बंगल्यावर बोलावून त्याचं कौतुक केलं. मिलिट्रीत भरती 'हो म्हणाले, स्पोर्टसमनना भराभर प्रमोशन मिळ्तं! तर त्याची आई बायजा आड आली. त्याला आहे कुस्तीची आवड. पण घरची गरिबी, मग कर्नलसाहेबांच्या सांगण्यावरुन मी त्याला आमच्या डेअरीतलं दूध द्यायला सुरुवात केली. तो एकदा दुधाला आला असताना बांडा खोंड सुटला, पांढऱ्या खोंडाशी टक्कर घेऊ लागला. तेव्हा श्रीरंगानं धाडसानं पुढं होऊन त्या खोंडाला खेचून बाजूला केला आणि बांधून टाकला. आता गॅदरिंगला पाचसहा बक्षिसं मिळवलेल्या, डेअरीत धाडस दाखवलेल्या श्रीरंगबद्दल मिनूच्या मनांत थोडी आपुलकी निर्माण होणं साहजिक होतं की नाही? पण मी वेळीच तिला जागरूक केलं. म्हटलं [illegible] आयुष्य पुढं आहे! शिवाय.....? पुढं पद्माबाईना काय

"आपल्या मुलीना अगदीच तोलामोलाचं स्थळ जरी मिळू शकलं नाही तरी त्यानी आगदीच खालच्या पातळीलाही जाऊ नये, नाही का? जाऊ द्या, त्या श्रीरंगाला परवा भावोजीनी पोलिसांत नंतर भरती करुन घेतला आहे. त्याची शिरगांव पोलीस ठाण्याला बदलीही भावोजीनी करुन घेतलीय्! बायजा मुलाकडं रहायला जाणार आहे! श्रीरंगचं एकदा लग्न करुन टाकलं की ......!"

पद्माबाई तशा अत्यंत धोरणी होत्या. श्रीरंगचं लग्न करू टाकल्यानंतर मीनल त्याचा विचार करणार नाही अशी त्यांची समजूत होती.

पद्माबाईनी रत्नमालाबाईना आणि छबूला चार दिवस ठेवून घेतलं. मुराररावाना बोलावणं पाठवलं. ते आले.

"या दोघी इथं आहेत होय? मला वाटलं सावळजला गेल्या असतील!"

"भावोजी तुम्ही हे काय चालवलंय्?"

"का काय झालं?"

"रत्नाला तुम्ही निष्कारण मारलंत चंपा पळून गेली यात रत्नाचा काय दोष?"

"घरातल्या मुलीं काय करतात, कुठं जातात, कोणाशी बोलतात हे पहायची जबाबदारी कोणाची?"

"पण रत्ना समोर असताना का चंपा कोणाशी बोलेल? मला सांगा, आता चंपाचं तुम्ही काय करणार आहात?"

"काय करु? ती कार्टी आता मला मेल्यातच जमा आहे! तिचं तोंडसुध्दा पहाणार ही यापुढं!"

"मग तिथा शोध करण्यासाठी का वणवण केलीत?"

मुराररावाना काही उत्तर देता देईना. ते हात चोळत बसले.

"हे पहा भावोजी. आता एक करा, छबूला सत्ताविसावं वर्ष चालू आहे. एखादा गरीब मिळवता शाळामास्तर, किंवा कारकून जरी असला

तरी चालेल, उगाच नात्या गोत्याची जास्त चिकित्सा न करता छबूचं लग्न उरकून टाका!"

"एक स्थळ आलंय्, त्यांची पहिली बायको गेलीय्, दोन लहान मुलं आहेत, पण घराणं चांगलं आहे, जावळीच्या मोरे घराण्याशी त्यांचे नात्यागोत्याचे संबंध आहेत."

"नातंगोतं जाऊ दे, खड्ड्यात स्वभावानं बरा आहे का तो?" पद्मावाईनी विचारलं.

"आता स्वभाव कशाला बघत बसायचं वैनी?"

"पहिली बायको कशामुळं वारली ही तर चौकशी करायला हवी की नको?"

"तशी चौकशी केलीय तिसऱ्या बाळंतपणात गेली. पण नवरा मुलगा स्वभावानं बरा आहे."

ही चर्चा ऐकत बसलेल्या रत्नमाला उपहासानं म्हणाल्या, "नवरा मुलगा नव्हे माणूस म्हणा माणूस! शेहेचाळीस वर्षाचा आहे. केवळ त्याचं घराणं मोठं म्हणून हे त्याला छबूला द्यायला उठलेत!"

"छबूला तो पसंत आहे का?" पद्मावाईनी विचारलं.

त्यावर मुरारराव म्हणाले," छबूच्या पसंतीचा प्रश्नच कुठे येतो? आम्हाला पसंत असला की झालं?"

त्यावर पद्मावाई म्हणाल्या, "भावोजी अशी घाई नका करु, उद्या छबूला जियं जन्म काढायचा आहे, तो दिसायला कसा आहे, त्याचा स्वभाव कसा आहे हे नको समजायला?"

"वैनी, आता जास्त चौकशी करत बसायला सवड आहे कुणाला?"

"तुम्हाला नसली तर मी सवड काढते, मी जाऊन पहाते!"

मी ते घर पाहयलं की मला सगळं समजेल!"

"घरावरुन माणसांचा स्वभाव समजणार आहे थोडाच?"

"हे पहा भावोजी. मी भल्याभल्यांची घरं बघितलीत, घरात जिकडं बघेल तिकडं कपडे, भांडी कुंडी, इतर सामान अस्ताव्यस्त पडलेलं असलं की घरातली माणसं अजागळ आहेत असं बेशक समजावं. जिथली वस्तू तिथं असणे, घरात फक्त गरजेच्याच वस्तू असणे, या गोष्टी खूप काही सांगून जातात. शिवाय ज्यांच्या घरांत देवदेवतांचे असंख्य फोटो असतात. त्या माणसाना आपण भक्तिमार्गी आहोत याचं खोटं प्रदर्शन करायचं असतं! अशा कितीतरी लहानसहान गोष्टी वरुन तिथं वास्तव्य करणाऱ्यांच्या स्वभावाचे अंदाज बांधता येतात."

"बरं, बरं, जाऊन या एकदा जावळीला."

"जाईन, पण भावोजी तुम्ही यापुढं रत्नाला चंपाच्या प्रकरणात दोष देता कामा नये, तुम्ही तिला बेदम मारलंत! यापुढं असा काही प्रकार घडता कामा नये! आपल्या खानदानीत असं घडलेलं नाही".

पद्मावाईनी मुराररावाना कडक शब्दात समज दिली. मुराररावही समजून चुकले की आपण रागाच्या भरात ते कृत्य करायला नको होतं.

पुढे चार दिवस पद्मावाईनी रत्नमालेला आपल्याकडं ठेऊन घेतलं.

छबूसाठी जे स्थळ मुराररावांनी कांढलेलं होतं त्याची त्यानी बारकाईनं चौकशी केली. विनायकराव मोरे त्या भागात बऱ्याच लोकाच्या परिचयाचे होते. त्याच्या पहिल्या पत्नीला संशयास्पदरीत्या मृत्यू आल्याचं जेव्हा पद्मावाईना समजलं तेव्हा त्यानी त्या स्थळाला चक्क नकार दिला.

मुराररावाना त्यानी ते कारण सांगताच तेही गप्प बसले.

मुराररावानी चंपाचा शोध घ्यायचे थांबवले ते बदली झालेल्या

१४.

विक्रमचा रिझल्ट लागण्या अगोदरच त्याचं आमिताशी रजिष्टर पध्दतीनं लग्न झालं. लग्नानंतर आठ दिवसानी कर्नलसाहेबानी जवळच्या मित्राना पार्टी दिली. निळा सर्जचा सूट घातलेला. गळयाला 'बो' बांधलेला विक्रम आतिशय हँडसम दिसत होता. आमिता अस्मानी रंगाच्या रेशमी साड़ीत सुरेख दिसत होती. कर्नलसाहेबानी निमंत्रित केलेल्यामधे बरेच ब्रिगेडियर, लेफ्टनंट कर्नल्स, मेजर आणि कॅप्टन असे वरिष्ठ आणि कनिष्ठ सैन्याधिकारी होते. सपत्नीक आलेल्या निमंत्रितानी आमिताचं अभिष्टचिंतन करण्यासाठी फुलांचे गुच्छ आणले होते.

मोहिनीने स्त्रियांचे स्वागत केले. गार्डनमध्ये बाजूला टेबलावर निरनिराळा प्रकारचे उंची मद्य ठेवले होते. स्त्रियासांठी 'सॉफ्ट ड्रिंक्सची व्यवस्था होती. दुसऱ्या कोपऱ्यात पांढऱ्या शुभ्र पँटस् आणि हिरव्या रंगाचे बंद गळयाचं कोट, डोक्यावर 'क्रिम्झन कलरच्या' टोप्या अंसलेला मिलिटरी बँडचा ताफा होता. त्या प्रसंगाला अनुरुप असे स्वर त्यांच्या चकचकीत -वाद्यातून उमटत होते. बागेतल्या बोगन वेलीवर रंगीत दिव्यांच्या माळा सोडलेल्या होत्या.

अमृतराव या प्रसंगी उपस्थित होते. त्यानी जन्मात असा सोहळा बघितलेला नव्हता. शंभर दीडशेच निमंत्रित होते, पण कुठे गडबड ...ची आरडाओरडा नव्हता. ब्रिगेडियर भोसले हे

बंदगळ्याचा गुडघ्याइतका लांब कोट, डोक्याला फरची पांढरी टोपी घालून 'सिवाज रिगलचे' घोट घेत बाजूला बसले होते.

पद्माबाई मात्र अशा प्रसंगाचा सराव असल्याप्रमाणे आलेल्या महिलांची ओळख करुन घेत होत्या.

लेफ्टनंट कर्नल केदारनाथ याच्या पत्नी मिथिला फारच विनोदी आणि बोलक्या होत्या. पद्माबाईना म्हणाल्या,

"ही पार्टी कर्नलसाहेबांची की तुमची ?"

"कोणाचीही समजा", हसत हसत पद्माबाई म्हणाल्या

"तसं नाही, विकी तुमचा मुलगा, तुम्ही सुध्दा अशी 'ग्रँडगाला' पार्टी द्यायला हवी," मिथिला बिअरचा घोट घेत म्हणाली.

"हो जरुर देऊ की, पण तुम्हा सर्वांना तिकडं चिंचलीला आमच्या शेतावर यावं लागेल."

"खास दुर्गापूरचा पांढरा रस्सा मिळणार असेल तर चिंचलीच काय पण कुठंही यायची तयारी आहे आमची !"

त्यावर मोहिनी म्हणाल्या, "मिथिला चिंचलीला जर गेलीस तर चार दिवस तेथून येणार नाहीस. फारच रमणीय मळा आहे यांचा! पद्माबाई स्वत: त्यावर देखरेख करतात."

ती चर्चा चालू असताना उजव्या हातातला आपला स्कॉच व्हिस्कीचा ग्लास सांभाळत लेफ्टनंट कर्नल केदारनाथ तिथं आले आणि मोहिनीना म्हणाले

"काय म्हणते मिथिला ?"

"या म्हणतात विकीच्या मां नी पार्टी द्यायला हवी !"

"आमची बायको पार्ट्या उकळण्यात पटाईत आहे! स्वत: मात्र

मी श्रीनगरला होतो, तेव्हा कर्नल डोग्रांच्या मुलाच्या लग्नाची पार्टी होती जम्मूला! या जम्मूला जाऊन आल्या!"

पतीपत्नीत किती खेळकर असा संवाद होऊ शकतो हे पद्माबाईना ठाऊक होतं. बाजूला आंब्याच्या झाडाखाली निमूटपणे बसलेल्या अमृतरावाना मात्र त्यात रस नव्हता. स्त्रिया पुरुषाशी इतक्या मोकळेपणानं बोलतात हास्यविनोद करु शकतात हे त्यानी आयुष्यात पाहिल्यांदाच पाह्यलं होतं.

अमृतरावाना मुद्दामच बाजूला बसवण्याची व्यवस्था केलेली होती. एक तर त्याना हिंदी किंवा इंग्रजी चांगलं बोलता येत नसे. दुसरं म्हणजे त्याला अशा सुसंस्कृत आणि 'सोफिस्टिकेटेड' समुहात वागण्याचे रीतीरिवाजही ठाऊक नव्हते. नातेवाईक किंवा परिचित भेटले की वाकून मुजरा करणे हा एवढा एकच शिष्टाचार त्याना ठाऊक होता. म्हणूनच पद्माबाईनी त्यांच्यासाठी खास बाजूला व्यवस्था केली होती.

विक्रमचे मामा बॅरिस्टर देशमुख या सोहळ्यांस यावयाचे होते, पण अचानक हायकोर्टात 'ट्रिपल मर्डर'चे एक अपील लागल्याने त्याना येता आले नाही. त्यानी विक्रमला आणि कर्नलसाहेबाना अभिनंदनाची तार पाठवली.

बटर चिकन, तंदुरी चिकन्, मोगलाई मटण, पुऱ्या, रायतं, व्हेजिटेबल पुलावा, सॅलड, असा खास बेत होता. एक दोन पेगचे राऊंड संपल्यानंतर मंडळीनी जेवण घेतले. स्वीट डीश म्हणून मोहिनीनीं ग्रीनसुफले पुडिंग बनवले होते.

रात्री साडेनऊला पार्टी संपली. बंगल्यासमोर उभ्या असलेल्या पन्नास साठ गाड्या एकामागून एक निघून गेल्या.

सगळी मंडळी निघून गेल्यानंतर कर्नलसाहेबांनी बँडवाल्याना दोन रमच्या बाटल्या दिल्या. बँडवालेही खूष होऊन जेवण करुन गेले.

रात्री साडेदहाच्या सुमारास बंगल्यासमोरच्या हिरवळीवर कर्नलसाहेब, मोहिनी आणि पद्माबाई बोलत बसले होते. "आज विक्रम

इतका छान दिसत होता की मला वाटतं आज त्याची दृष्ट काढावी" मोहिनी म्हणाल्या.

त्यावर पद्माबाई म्हणाल्या, " तुमचा विश्वास आहे असल्या गोष्टीवर ?"

"कधी कधी ठेवावा लागतो! तुम्हाला कल्पना नाही, काही बायकांच्या नजरा चांगल्या नसतात. ती कॅप्टन रॉड्रिगची बायको तर तीन तीन वेळा त्याच्याजवळ जाऊन त्याच्यांशी हस्तांदोलन करीत होती."

त्यावर कर्नलसाहेब सिगारेट शिलगावून म्हणाले, "तिला जीन जास्त झाली होती. कुठंही गेली तरी ती अशीच विक्षिप्त वागते. मागे नाही का, आपण मेजर सक्सेनाच्या वाढदिवसाला गेलो होतो तेव्हा मिसेस रॉड्रिग्जनं मेजर सक्सेनाच्या गालाचं चक्क चुंबनच घेतलं! बापरे काय प्रसंग होता तो? मिसेस सक्सेना रागानं लालबुंद झाली होती. तिथं काहीतरी गडबड होणार असं वाटलं होतं तेव्हा मिसेस् चौधरी रॉड्रिग्जबाईला हाताला धरुन बाजूला निघून गेल्या म्हणून निभावलं!"

"तिला पेलवत नाही इतकं पितेच का?" पद्माबाईनी विचारलं.

"स्वभाव एखाद्याचा! चालायचंच! असे आम्हा लोकाना पार्ट्यातून अनेक वेळा अनुभव येतात. आमचा एक दोस्त होता. कर्नल लंबा! तो पार्टीत प्यायचा आणि चक्क डान्स करायचा! दुसरा एक कॅप्टन महेंद्रसिंग होता, तो प्यायचा प्यायचा आणि आपल्या दिवंगत आजोबाची आठवण काढून चक्क गळा काढून रडायचा! जाऊ द्या आपले सरकार कुठं दिसत नाहीत?" कर्नल साहेबानी विचारलं

त्यावर पद्माबाई म्हणाल्या

"ते आता झोपले असतील!"

"पण तुम्ही त्याना फारच बंधनात ठेवता बुवा! त्यांच्याशी कोणाची ओळखसुध्दा होऊ दिली नाहीत तुम्ही?"

"मुद्दामच ते टाळलं मी! तुमची उगाच 'ऑकवर्ड पोझिशन' झाली असती. त्याना अशा मेळाव्यात वागायचा बोलायचा सराव कुठे आहे? समजा एखाद्या निमंत्रिताशी तुम्ही ओळख करुन दिली असती, तर कदाचित ते आपल्या घराण्याची वंशावळ त्याना सांगत बसले असते."

"हा चक्क आमच्या व्याह्यांच्यावर अन्याय आहे. तुम्ही त्याना माणसात वावरायची संधीच देत नाही?"

"कर्नलसाहेब, माझा जन्म गेला त्यांच्या सहवासात! ही सरकार लोकांची जमात आहे त्याच ठिकाणी रहाणार आहे! बरं विकी आणि अमिता काय करताहेत?" पद्माबाईनी विचारलं.

"उद्या सकाळी ते दोघे हनिमूनला जाणार आहेत ना? बॅग भरताहेत." मोहिनी म्हणाल्या.

"विसरलेच की!"

बॅगा केव्हाच भरुन झालेल्या होत्या. माडीवर अमिता विक्रमच्या बाहुपाशात विसावलेली होती.

विक्रम आणि अमिता मधुचंद्रासाठी नैनितालला जाणार होते. कर्नलसाहेबांच्या मित्राचे लेक नैनीजवळ हॉटेल पॅरामाऊंट नावाचे पंचतारांकित हॉटेल होते. तियं त्या दोघासाठी आठदिवस रहाण्याची व्यवस्था करण्यांत आलेली होती.

राजधानी एक्सप्रेसनं ती दोघं प्रथम दिल्लीला गेली. अमितानं बऱ्याच वेळा दिल्ली बघितलेली होती. कर्नल ओबेरॉय यांचे बरेच नातेवाईकही दिल्लीत होते. पण यावेळी ती दोघं कोणा नातेवाईकाना भेटण्याच्या मूडमधे मुळीच नव्हते.

आपला विवाह अडयळयाशिवाय पार पडेल असं अमिताला आणि विक्रमलाही कधी वाटलं नव्हतं. अमृतराव हे विवाहाच्या संदर्भात मुराररावांचा नेहमी सल्ला घेत. मुरारराव या विवाहाला मुळीच संमती देणार नाहीत अशी विक्रमची समजूत होती. आणि तसे थोडे घडलेही. मुराररावानी विक्रमच्या लग्नाला विरोध केलाच. पण पद्माबाईनी तो

जुमानला नाही. पुण्याला आल्यानंतर त्यानी आमिताला पहिल्यांदा पाहयलं. पसंत केलं आणि तिला आपल्या गळ्याला लावून घेतलं! तो पद्मावाईंचा स्पर्शच आमिताला सांगून गेला, आता काही अडचण उरली नाही.

पद्मावाईंची पसंती ही अत्यंत महत्वाची होती. विक्रमनं अमिताला वेळोवेळी आपल्या मातापित्यांच्या स्वभावाची कल्पना दिलेलीच होती. 'आमच्या मा आहेत म्हणून आमचं घराणं तरलं! नाहीतर आबासाहेबानी साऱ्या जमीन जुम्त्याची केव्हांच वाट लावून टाकली असती. आमच्या पिताजींचं जग फारच मर्यादित आहे. त्याना बाहेरचं काहीच ठाऊक नाही. त्यांचा सर्वात आवडीचा विषय म्हणजे आपली ऊच्चकुळीची वंशावळ आणि खानदान! बस्स!

पण आमच्या मांचं तसं नाही. त्यानाही तसा थोडा आपल्या जातकुळीचा अभिमान आहे, नाही असं नाही, पण त्या तो इतका पराकोटीला जाऊ देत नाहीत एवढंच!'

अमितानंही कर्नलसाहेबांची आणि मोहिनीच्या स्वभावाची विक्रमला कल्पना दिली होती. ब्रिगेडियर भोसलेंची आणि कर्नलसाहेबांची दाट मैत्री होती. ब्रिगेडिअर साहेबांच्याकडे दक्षिण महाराष्ट्रातील काही जहागिरदार, इनामदार लोक अधूनंमधून यायचे. त्या लोकांचे रीतिरिवाज, हुजरे, मुजरे, हा प्रकार कर्नलसाहेबाना ठाऊक होता. ते म्हणत 'हे लोक मनानं दिलदार असतात, पण याना बाहेरचं जग ठाऊक नसतं! विक्रम. हा घोरपडे जहागिरदारांचा मुलगा आहे हे समजल्यावर सुरुवातीला कर्नलसाहेबांची प्रतिक्रिया काहीशी प्रतिकूल झाली होती. त्यानी अमिताला विश्वासात घेऊन सांगितलं. 'विक्रम तुला आवडलेला आहे, त्याचंही तुझ्यावर प्रेम आहे हे सर्व मला मान्य, पण तू ज्या घरी सून म्हणून वावरणार ती माणसं जर जनाब [illegible]

अमितानं कर्नलसाहेबांचं म्हणणं विक्रमला सांगितल्यानंतर त्यानं अमृतरावांना पत्र लिहून आपण अमिताशी लग्न करण्याचा निर्णय घेतल्याचं स्पष्ट कळवलं होतं. सुदैवानं त्यांच्या विवाहात कसलंही विघ्न न येता ते पार पडलं. मुराररावांनी थोडीफार आगपाखड केली पण आता चंपा पळून गेल्यामुळं त्याना विक्रमच्या विवाहाला विरोध करण्याचा काही नैतिक आधारच उरला नव्हता.

हॉटेल पॅरामाऊंटच्या सहाव्या मजल्या वरची खोली त्यांच्यासाठी रिझर्व्ह करण्यात आलेली होती. वरून नैनितलावाचे विहंगम दृश्य दिसत होते. उत्तरेला बर्फाच्छादित पर्वतांच्या दूरवर पसरलेल्या शुभ्र रांगा दिसत होत्या.

ती दोघं खोलीच्या गच्चीत हातात हात धरुन उभी होती. विक्रम म्हणाला, "त्यादिवशी आपल्या पार्टीला फार मजा आली नाही?"

पार्टीचा विक्रमनं उल्लेख करताच आमिता म्हणाली.

"पार्टी छान झाली. फक्त मला एक गोष्ट खटकली!"

"कोणती?"

"मिसेस रॉड्रिग्ज वारंवार येऊन तुझ्याशी हस्तांदोलन करीत होती ती!"

त्यावर विक्रम मोठ्याने हसून म्हणाला

"ती बाई वेडपटासारखी वागली हे खरं!"

"पण तू प्रत्येक वेळी तिच्या हातात हात का देत होतास?"

"अरेच्या! तीच चक्क माझा हात वारंवार हातात घेत होती! मी काय करणार?"

"एकदा ठीक होतं. तीन तीन वेळा ती येऊन तुझा हात हातात घेत होती हे बघून मला काय वाटलं असेल?"

बोलली ते मी ऐकलंय् ?"

"काय म्हणाली ? मी नाही ऐकलं ते ?"

"ती म्हणाली मला अमिताचा हेवा वाटतो !"

"असं म्हणाली ती ?"

"होऽ होऽऽ मी स्पष्ट ऐकलंय ! विकी ती बाई थोडी लूज 'कॅरेक्टरची' आहे हे सर्वांना ठाऊक आहे. पण आपल्या लग्नाच्या पार्टीत येऊन तिनं हे वाक्य बोलावं ते मला फार खटकलं." "त्यात माझी काय चूक आहे सांग बरं ?"

"चूक नव्हती कशी ? पहिल्यावेळीच तू जरासा फटकून वागला असतास तर ती दुसऱ्यांदा तुझ्याकडं कशाला कडमडली असती ?"

"माय गॉड अमित, अशा निसर्गरम्य वातावरणात कशाला हा अप्रिय विषय काढलास ?"

"मी मम्मीलासुध्दा सांगितलंय ते ! तिला तर ती बाई बिलकूल आवडत नाही ! पुन्हा तुला ती कधी भेटली तर ओळखसुध्दा दाखवू नकोस !"

"ती आता पुन्हा मला कशाला भेटतेय ?"

"का नाही भेटणार ? केदारनाथनी जाताना नाही का सांगितलं की तुम्ही नैनितालवरुन आल्यावंर मला सांगा. वुई वूईल मीट वन इव्हीनिंग ॲट माय प्लेस"

"हो , पण ती केदारनाथांच्या घरी कशाला येईल ?"

"मिथिलाची आणि तिची दाट मैत्री आहे. त्या दोघी एकमेकींना सोडून कसलाच 'फंक्शन' करीत नाहीत !"

"ओह ! हे तू सांगितंलस ते बरं झालं !"

"कोणती !"

"आबासाहेबाना बाजूला बसवलेली ! त्या बिचाऱ्याना काय वाटलं असेल? इकडं सगळे ऑफिसर्स ड्रिंक्स घेत हास्यविनोद करीत होते आणि तिकडं ते बिचारे आंब्याच्या झाडाखाली एकटेच बसले होते. मांनी त्याना असं वागवणं मला नाही आवडलं !"

त्यावर विक्रम म्हणाला, "अमित, तुला आबांच्याबद्दल सहानुभूती वाटणं साहजिक आहे पण तुला त्यांच्या स्वभावाची कल्पना नाही, ते अशा मेळाव्यात मिसळूचं शकले नसते. त्याना बाहेरचं जगच ठाऊक नाही !"

"हो, पण म्हणून काय झालं? आपल्याला असं वाळीत टाकण्यात आलेलं आहे. हे त्याना समजत नसेल?"

"जाऊद्या, कशाला उगाच तो विषय पुन्हा पुन्हा काढतेस? आबाना त्यामुळं काहीही वाटणार नाही, छान व्हिस्की पीत बसले होते ते !"

"या खेपेला मीनलसुध्दा थोडीशी 'रिझर्व्ह' वाटली ! पहिल्यावेळी आली तेव्हा माझ्याशी फार मनमोकळेपणानं बोलत होती. या खेपेला मात्र तिच्या वागण्यात मला थोडा फरक जाणवला ! तिच्या इच्छेविरुध्द काही घडलंय का?"

विक्रम म्हणाला, "ते थोडसं नाजूक प्रकरण आहे आमिता !"

"मला सांगण्यासारखं नाही?"

"तसं काही नाही ! तू चिंचलीला कर्नल साहेबांच्या सोबत गेली होतीस ना, तेव्हा गॅदरिंगच्या बक्षिस समारंभाला हजर होतीस ना?"

"होऽऽऽ मी, मम्मी, मां, आम्ही सर्वजण होतो. आम्हाला अगदी स्टेजवरच बसवलेलं होतं !"

"त्यावेळी स्पोर्टस्मधली बरीचशी बक्षिसं मिळवणारा मुलगा आठवतो तुला?"

"होऽऽऽ चांगला आठवतो, डॅडीनी नंतर त्याला बंगल्यावरही बोलावून घेतलं होतं, प्रिन्सिपॉलच त्याला बंगल्यावर घेऊन आले होते. डॅडी त्याला 'आर्मीत' भरती हो म्हणत होते!"

"तोच श्रीरंग! आमच्या मीनलला त्याच्याबद्दल काहीतरी वाटू लागलं होतं!"

"मग त्यात वाईट काय होतं? तो पोऱ्या फारच देखणा वाटला मला! मांनी नंतर त्याला रोज दूध देण्याचा निर्णय घेतला होता."

"अमिता, पण तो श्रीरंग एकंदम हलक्या कुळात जन्मलेला आहे. मीनलला त्याच्याविषयी आपुलकी वाटणं हे आमच्या घराण्याला मानवण्यासारखं नाही!"

"म्हणजे? तूही तुझ्या आबासाहेबांच्या सारखाच दिसतोस?"

विक्रम हसला आणि म्हणाला.

"तसं नाही ते अमिता, तुला आमच्या गावातलं वातावरण एका भेटीत नाही समजणार! आम्ही गावचे जहागिरदार आहोत, आबासाहेब किंवा मी गावात गेलो की आमच्यापेक्षा वयानं जेष्ठ असलेले लोकसुध्दा आम्हाला लवून मुजरा करतात. 'मां'ना तर सारी पंचक्रोशी ओळखते. संस्थानं विलीन झाली आणि राजेशाही नष्ट झाली. आता दुर्गापूरच्या नामधारी राजाला दुर्गापुरातं कोणी साधा नमस्कार सुध्दा करीत नाहीत. पण आमच्या चिंचलीत घोरपड्याना मात्र अजूनही पूर्वीचेच मान सन्मान आहेत. घोरपड्यांच्या घराण्यात जन्मलेल्या मीनलनं कुणब्याच्या कुळात जन्मलेल्या. श्रीरंगबद्दल कसलीही जवळीक दाखवणं हे आबानाच काय पण मा ना सुध्दा पटण्यासारखं नाही!"

"...ज्ञी पटतं की नाही?" मीनलनं विचारलं.

आवडणार नाही याला काय म्हणायचं? म्हणजे तुझ्यामध्येसुध्दा, जुन्या बुरसटेल्या विचारांचा कोणीतरी दडलेला आहे!"

"अगं पण आमच्या मीनलचं अशा गोष्टी करायचं हे वय नाही! ती ग्रॅज्युएट झाल्यावर तिला आपल्या पसंतीचा कोणीही निवडता येईल!"

"सध्या तो श्रीरंग काय करतो?"

"त्याला मुरारकाकानी पोलिसांत भरती केला आहे! शिरगांव पोलीस स्टेशनला मुरारकाकांच्या हाताखाली तो आहे!"

"परवा मां आणि मम्मी काहीतरी बोलत होत्या. मी तिथं गेल्यावर त्या दोघींची चर्चा एकदम थांबली. पण 'मां'नी उच्चारलेलं शेवटचं वाक्य मात्र स्पष्ट ऐकलं", काही झालं तरी तिनं असं करायला नको होतं ' हे कोणाला उद्देशून होतं हे मात्र मला समजलं नाही!"

"ते माझ्या चुलत बहिणीला, चंपाला उद्देशून होतं. आमची चंपा एक मेंढपाळ जातीच्या तरुणासोबत कुठंतरी पळून गेलीय!"

"अस्सं? पण तुझे मुरारकाका पोलीस अधिकारी आहेत ना? ते तिला शोधून काढतीलच की?"

"त्यानी खूप शोधलं म्हणे, मां सांगत होत्या. रजा घेऊन ते महिनाभर वणवण हिंडले, पण चंपाचा पत्ता नाही लागला! आपल्याला ती मेली समजून आता त्यानी तिचा नाद सोडून दिलाय!"

"विकी, तू काही म्हण, देव काही लोकाना अशीच अद्दल घडवत असते! तुझ्या त्या फौजदारकाकानी आपल्यासुध्दा लग्नाला असाच विरोध केला होता ना? म्हणूनच त्याना हो अशी शिक्षा मिळाली! ते जाऊ द्या, पण त्या बिचाऱ्या श्रीरंगवर ते काही सूड तर उगवणार नाहीत ना?"

"तो कशाबद्दल?"

"त्यानं मीनलवर प्रेम केलं म्हणून?"

"छेऽऽऽ! प्रेमबिम काही घडलं नसेल, पण तसं पुढं काही घडू नये म्हणून [illegible]!"

दूरवर पसरलेल्या पर्वतराशीकडं पहात अमिता म्हणाली

"एकूण काय तर तुम्ही सर्वचजण तसे एखाद्याला समजायला थोडेसे कठीण आहात!"

विक्रम हसत हसत म्हणाला".

"अमिता तसा काही गैरसमज करुन घेऊ नकोस, श्रीरंगला मुरारकाकानी काही त्रास देण्याच्या हेतूनं पोलिस कॉन्स्टेबल बनवलेला नाही. त्याला कुस्तीचं भलतं वेड आहे. त्याचा बाप बलभीम प्रख्यात कुस्तीगीर होता आर्मीप्रमांणेच पोलीस खात्यातही स्पोर्टसमनना फार सवलती असतात! श्रीरंग चांगला 'डेव्हलप' होईल".

"ते खरं, पण मीनलपाससून त्याला दूर ठेवण्याचंच हे कारस्थाक आहे! तुझे काका काही उदात्त हेतूने त्याला तेथून घेऊन गेलेले नाहीत!"

विक्रम म्हणाला, "एनी वे, आता त्या विषयावर·पडदा पडलेला आहे. मा स्वत:च मीनलला चांगलं स्थळ शोधत आहेत. आपली पार्टी झालेल्या दुसऱ्याच दिवशी त्या ब्रिगेडियर भोसल्यांच्या घरी जाणार होत्या."

"होऽऽ ब्रिगेडिअर अंकलना तुमच्या जहागीरदार घराण्यातले बरेच लोक मानतात. त्यांच्या ओळखीनं मीनलला चांगलं स्थळ मिळूही शकेल!"

होईन याची खात्री आहे. पण त्यानंतर 'लॉ'ची तीन वर्ष मला काढायची आहेत. त्यानंतर मी वकिली करायला लागेन! स्वत:च्या पायावर उभं राहयल्याशिवाय अपत्य नको!"

त्यावर अमिता म्हणाली, "ते तू एकटा कसं काय ठरवतोस?"

"माझ्या एकटयाचं असं नव्हे, तुलाही त्याबाबतीत काही मत आहेच की?"

"माझं मत निराळं आहे! म्हतारपणी मुलं होण्यात काही अर्थ नसतो!"

विक्रम हसला आणि म्हणाला, "इतक्यात आपण म्हातारे कशाला होतोय? तीन चार वर्षे बघता बघता निघून जातील! बाप कमाईवर फारकाळ जगू नये असं माझे बॅरिस्टर मामा मला नेहमी सांगतात!"

"ते सांगतात ते ठीक आहे, पण माचं म्हणणं काय आहे?"

"आमच्या मा आजी व्हायला फार उतावीळ आहेत. काल कँपातून लोकर घेऊन आल्या आहेत. मी विचारलं कशासाठी? तर म्हणाल्या छोटं स्वेटर आणि पायमोजे विणायचे आहेत!"

त्यावर अमिता म्हणाली, "म्हणजे मेजॉरिटी माझ्या बाजूला आहे!"

"ती कशी?"

"मां आणि मी एकमताची झाल्यावर तुझ्या मंताला कोण विचारतो?"

त्यावर विक्रम म्हणाला

"वाऽऽ असं कसं होईल? आबांचं. मत कुठं विचारात घेतलंय अजून?"

अमिता हसत हसत म्हणाली". पण तुझ्याघरी तुझ्या आबांच्या मताला किंमत शून्य आहे, हे मी फार लवकर ओळखलंय्" विक्रमही

मुक्त हसला

१५.

दुर्गापूर जिल्ह्यात शिरगांव पोलीस ठाणे फार महत्वाचं मानलं जात असे. याच पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक साखर कारखाना आणि एक सूत गिरणी होती. साखर कारखाना आणि सूत गिरणी आपल्या हातात रहावी म्हणून पुढाऱ्यात नेहमी संघर्ष होत असे. राजकीयदृष्ट्याही हा विभाग अतिशय जागरूक असा मानला जात असे. शिरगांवच्या उत्तरेला तोरणा नदी होती. या नदीकाठाला 'तोरणाखोरे' असे संबोधले जाई. या तोरणाखोऱ्यात सदैव गुंडगिरी आणि हाणामाऱ्या करणाऱ्यांचं प्रमाण मोठं होतं. म्हणून या भागातल्या पोलीस ठाण्यावर नेहमी अनुभवी आणि खंबीर अशा पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती होत असे.

मुरारराव घोरपडे यानी चंपाचा शोध घेण्यासाठी महिनाभर रजा घेतली होती, पण तिचा पत्ता न लागल्याने त्यानी शेवटी शिरगांव पोलीस ठाण्याचा चार्ज घेण्याचे ठरवले.

पोलीस स्टेशन आणि मामलेदार कचेरी एकाच इमारतीत होती. इमारतीत प्रवेश केल्यानंतर समोर मोठा चौक होता. डाव्या बाजूला पोलीस स्टेशन आणि समोर मामलेदार कचेरी होती. कचेरीच्या उजव्या बाजूला पोलीस लॉकअप् रुम होती. ज्या गुन्ह्यांचा तपास अपूर्ण असे अशा गुन्ह्यात अटक झालेले आरोपी या लॉकअप रुममधे बंदिस्त केलेले असत. या लॉकअप रुमसमोर पोलिसांचे 'गार्ड'होते.

कचेरीच्या प्रवेश द्वारातून आत येणाऱ्या मामलेदाराना आणि फौजदाराना हे पोलीस गार्ड बंदुकीच्या दस्त्यावर हात आपटून 'सलामी' देत असे.

'बॉंडरायटर्स' यांच्या लहान लहान दुकानवजा खोल्या होत्या. या खोल्यांच्या मागेच पन्नास फुटावर पोलीस कर्मचाऱ्यांचे निवासस्थान होते. त्याला 'पोलीस लाईन' असे संबोधले जात असे. एका मागे एक अशा चार पोलीस लाईन्स होत्या. प्रत्येक लाईनमध्ये सहा पोलिसांच्या कुटूंबासाठी निवासाची सोय होती. एंक खोली पुढे आणि एक मागे, पण खोलीत पुढच्या प्रवेश द्वारातून प्रवेश केल्यानंतर बाहेर पडायचे असल्यास त्याच प्रवेशद्वारातून बाहेर जावे लागे. खोल्यांना मागचे दार नव्हते.

शिरगांव पोलीस ठाण्याला तीस पोलीस कॉन्स्टेबल्स आणि सहा हेडकॉन्स्टेबल्स नेमणुकीला होते. हेड कॉन्स्टेबल्सना पोलीस लाईनमध्ये जरी जागा मिळत असली तरी त्यानी तिथंच रहावे असे त्यांच्यावर बंधन नसे. ते खासगी घरात राहू शकत.

पोलीस ठाण्याच्या समोर उजव्या बाजूला अर्ध्याफर्लांगावर एस्.टी. स्टँड होता. दुर्गापूरवरून गणेशपूरला जाणारा हमरस्ता स्टँडसमोरून जात होता. त्यामुळं हा भाग सदैव गजबजलेला दिसे. एस्.टी. स्टँडच्या अवतीभवती चारपाच हॉटेल्स, एक दोन कोल्ड्रिंक हाऊस, आणि पानसिगारेटची दुकानं होती.

कचेरीच्या मागच्या बाजूला शिरगांव रेल्वे स्टेशन होतं. दुर्गापूर हे जिल्ह्याचं ठिकाण शिरगांवपासून अवघ्या बारा मैलावर होते. दुर्गापूरला जाण्यासाठी व येण्यासाठी सहा रेल्वेगाड्या सोयीच्या होत्या. त्यामुळं या विभागातले विद्यार्थी आणि विद्यार्थिनी नेहमी स्टेशनवर दिसत. या शिरगांवच्या परिसरांत भूगर्भात खूप पाणी होतं. वीस एक फूट खोदलं तरी पाणी लागत असे. त्यामुळं शिरगांवच्या आसपास भाजीपाल्याचं अमाप पीक येत असे. तसेच या विभागात बरेच पानमळेही होते.

शिरगांव कचेरीच्या पश्चिमेला ओढ्याकाठी फौजदारांचा बंगला होता.

बदली झाल्यावर महिन्यानंतर मुरारराव आपल्या कुटुंबियासमवेत बंगल्यात रहायला आले. आजपर्यंत मान ताठ करून चालणाऱ्या

मुराररावांना चंपाच्या पळून जाण्याने जबरदस्त धक्का बसला होता. ते वरून काही दाखवत नव्हते, पण ती वार्ता सगळ्या जिल्ह्याला समजली होती.

हवालदार जयसिंग जमदाडे हा मुराररावांच्या खास विश्वासातला होता. पस्तीस वर्षाचा जयसिंग जमदाडे साडेपाच फूट उंच, सरळ नाक, आणि ओठावर कोरलेल्या तलवार कट मिशा, यामुळे तो प्रथम त्याला पहाणाऱ्यावर आपली छाप पाडत असे. कॉलेजात एक दोन वर्षे काढल्यानंतर जयसिंग दुर्गापूरला पोलीस कॉन्स्टेबल म्हणून भरती झाला होता. खंडाळ्याच्या पोलिस ट्रेनिंग स्कूलमंध्ये त्याचं प्रशिक्षण चालू असताना श्री. बांडे हे सरकारी वकील पोलीस कॅडेट्सना कायदा शिकवत होते. श्री. बांडे शिकवलेल्या विषयावर कॅडेटस्‌ना अधूनमधून प्रश्न विचारत. ग्रामीण भागातून आलेल्या कॅडेटस्‌चा उत्तर देता येत नसे. पण हा गोरा, प्रसन्न व्यक्तिमत्वाचा 'कॅडेट' जयसिंग जमदाडे मात्र प्रत्येक वेळी उत्तर देण्यासाठी आपला हात वर करत असे.

चोरी, घरफोडी, जबरी चोरी, माणूस पळवून नेणे, खून, सदोष मनुष्यवध, या गुन्ह्यांच्या व्याख्या जयसिंगच्या तोंडपाठ होत्या. प्रोसिजर कोडची महत्वाची कलमंही त्यानं आत्मसात केलेली होती. भारतीय पुराव्याच्या कायद्यातील, सर्वात महत्वाचे असे सत्ताविसाचे कलम त्याला काही समजत नव्हते. म्हणून त्यादिवशी 'लॉ'क्लास संपल्यावर तो बांडे प्रॉसिक्यूटरना म्हणाला–

"सर मला हे पुराव्याच्या कायद्यातले सत्ताविसावे कलम काही

समजावून सांगितले. जयसिंग हा बुद्धिमान होताच, पण त्याच बरोबर अत्यंत धाडसीही होता. तोरणा नदीच्या काठी त्याचा गाव होता. जमदाडेची थोडी शेती होती, पण शाळेत असल्यापासून याची महत्वाकांक्षा होती की पोलीस खात्यातच नोकरी करायची! तो लहान असताना गावी अधून मधून 'व्हिलेज व्हिजिटेशन'साठी फौजदार यायचा. त्यावेळचा फौजदाराचा तो रुबाब, चावडीत खुर्चीवर बसल्याबसल्या तो पोलीस पाटलाला निष्कारण खडसावत असे. पोलीस पाटील म्हणजे गावची जबरदस्त असामी. या पोलीस पाटलावर फौजदार रागावतो मग तो किती मोठा असला पाहिजे, असा छोटा जयसिंग सदैव विचार करीत असे.

रंगाने उजळ, डोळयात आत्मविश्वास, साडेपाच फूट उंच अशा जयसिंगला पोलिसांत भरती होण्यासाठी कोणा खासदार आमदाराच्या चिठ्ठी चपाटीची गरज भासली नव्हती. सिलेक्शनसाठी आलेल्या डी.आय.जी.नी त्याला प्रश्न विचारला.

"तुला पोलिसात नोकरी कशासाठी हवी आहे?"

क्षणाचाही विलंब न लावता जयसिंगने पोलिसांच्याच ध्वजावरील वाक्य उच्चारले

"सद्रक्षणय, खलनिग्रहणाय्!"

मराठीचे चार शब्द निर्भयपणे न बोलता येणाऱ्या त्या अनेक उमेदवारांत जयसिंगचे उत्तर ऐकून डी.आय.जी. म्हणाले, "तुझं शिक्षण किती झालंय्?"

"दोन वर्ष कॉलेजात होतो सर!"

"पुढं का नाही शिकला?"

आता नोकरी करायची! स्वार्थ आणि परमार्थ दोन्ही साधता येतील अशी ही सेवा आहे!"

"स्वार्थ कसला? आणि परमार्थ कसला?"डी.आय.जी.नी विचारलं.

"स्वार्थ अशासाठी की मी माझ्या पगारात माझे कुटुंब चालवू शकेन, आणि परमार्थ एवढ्यासाठी की समाज कंटकाना पकडून त्यांच्यावर खटले दाखल करून मला त्याना तुरूंगाची वाट दाखवता येईल!"

डी.आय.जी.नी त्याला कोणकोणतें खेळ खेळता येतात हे विचारताच तो म्हणाला. खरं सांगतो साहेब आजपर्यंत मला विटीदांडूशिवाय कुठलाच खेळ खेळता आलेला नाही. पण खात्यात नोकरी मिळाली तर मी व्हॉलीबॉल, हॉकी, फुटबॉल हे खेळ खेळू शकेन, शिवाय साहेब मला पोहण्याची फार आवड आहे. आमच्या तोरणेला पावसाळ्यात महापूर येतो. मी दरवर्षी पुरात तोरणापार करून जात असतो!"

सर्वसामान्य ज्ञानाच्या परीक्षेतही जयसिंगला शंभरपैकी पंच्याऐंशी गुण मिळाले होते. तो नित्यनियमाने वृत्तपत्रांचे वाचन करीत असे. त्यामुळं महाराष्ट्रांच्या मुख्यमंत्र्यापासून ते दुर्गापूरंच्या कलेक्टरपर्यंत सर्वांची नावे त्याला तोंडपाठ होती. ती त्याने निवडसमिती समोर धडाधड सांगितली होती.

खंडाळयाच्या पोलीस ट्रेनिंग स्कूलमधून पहिल्यानंबरने उत्तीर्ण झालेल्या जयसिंगला दुर्गापूर जिल्ह्यात नंदगड या खट्याळ पोलीस ठाण्याला नेमण्यात आले. खट्याळ एवढ्यासाठी की इथले नागरिक कुठल्याही क्षुल्लक आणि क्षुद्र कारणास्तव पोलीस ठाण्याकडे तक्रार अर्ज ... ऱ्याच तक्रारी निखालस खोट्या असायच्या.

कामीही फौजदाराना मार्गदर्शन करू लागला. खात्यात त्याचे नाव झाले. पाच वर्षातच त्याला हेडकॉन्स्टेबलची बढती मिळाली

जयसिंगच्या आयुष्यात एक प्रेमभंगाचे प्रकरण झाले होते. त्याच्या घरासमोर रहाणारी मालन ही दादा पाटलांची लेक बालपणापासून त्याची मैत्रीण होती. नोकरी लागल्यानंतर मालनशी लग्न करून घ्यायची त्याची मनीषा होती. पण मालनच्या वडिलाना जयसिंगचं स्थळ पसंत नव्हतं. जयसिंगच्या चार सहा एकर खडकाळ जमिनीत फारसं काही पिकत नव्हंतं. त्यात जयसिंगची आई दुसऱ्यांच्या शेतात मजुरीला जात असे. दादा पाटलाना मोठा जमीनदार जावई हवा होता. शिवाय मालनही दिसायला गोरीगोमटी होती. बापानं पसंत केलेल्या नवऱ्याच्या गळ्यात मालन माळ घालून मोकळी झाली. पण त्यामुळं जयसिंगचा समस्त स्त्री वर्गाकडं पहाण्याचा दृष्टिकोन बदलला. 'बायका विश्वासघातकी असतात, बायकाना पुरुषांच्या प्रेमाची किमतच नसते,' असे त्याचे पक्के मत झाले. नंतर त्याला नोकरी लागली. नोकरी लागल्यानंतर स्थळं सांगून येऊ लागली. पण काही ना काही दोष काढून तो लग्नाची टाळाटाळ करू लागला. नोकरी लागल्यानंतर त्यानं वर्षादोन वर्षांत आपल्या पाठच्या भावाचं आणि बहिणीचं, दोघांचीही लग्न उरकून टाकली.

स्वत : तो अविवाहितच राह्यला. पोलीस खात्यात अल्पावधीत नाव मिळविलेल्या जयसिंगला विवाह नको असला तरी विवाहबाह्य संबंधाचं मात्र वावडं नव्हतं. तशी त्याची पाचसहा प्रकरणंही झाली. पण या कानाची वार्ता त्या कानाला लागणार नाही याची तो खबरदारी घेत असे.

साखर कारखाना आणि सूतगिरणी यामुळं या भागात बाहेरून बराच मजूरवर्ग आलेला होता. शिवाय सूतगिरणीमुळं शिरगावच्या परिसरात हँडलूमचा व्यवसाय झपाट्यानं वाढत चालला होता. केरळ, आंध्र, आणि तमिळनाडूतूनही कामगार वर्ग आलेला होता. बहुसंख्य

कामगारवस्तीच्या ठिकाणी तीन व्यवसाय अत्यंत तेजीत चालतात, पहिला बेकायदा दारू विक्रीचा, दुसरा जुगाराचा आणि तिसरा वेश्याव्यवसाय !

शिरगावच्या परिसरात हे तिन्ही व्यवसाय तेजीत असल्यामुळं पोलीस खात्यातील कर्मचाऱ्यांची चंगळ असे. फौजदारांची प्राप्ती दहाबारा हजारांच्या आसपास असायची शिवाय 'अडप झडप' असे एखाद्या गुन्ह्याच्या तपासातही 'घबाड' मिळायचे. अगदी तालुक्याला हत्यारी कॉन्स्टेबल म्हणून जरी नेमणूक झाली तरी त्यांला पगाराला धक्का न लावता महिन्याकाठी दीड दोन हजार विनासांयास मिळायचे.

पोलीस भरतीच्यावेळी सज्जनांचे संरक्षण, आणि दुर्जनांचे ताडन करण्यासाठी मला या खात्यात नोकरी करायची इच्छा आहे असं सांगणारा जयसिंग जमदाडे कधी कधी पैशाच्या मोहामुळे दुर्जनांचे संरक्षण. आणि सज्जनांना उपद्रव द्यायलाही मागेपुढे पहात नव्हता.

त्याचे खास असे एक वैशिष्ट्य होते, ज्या फौजदाराच्या हाताखाली तो नोकरी करीत असे त्यांच्याशी तो अत्यंत प्रामाणिक असे. त्यामुळेच फौजदार मुरारराव घोरपडेंची त्याच्यावर मर्जी बसलेली होती. गेली आठ दहावर्षे ज्या पोलीस ठाण्याला मुरारराव बदलून जात त्या पोलीस ठाण्याला ते जयसिंग जमदाडेची नेमणूक होईल अशा हालचाली करीत.

मुरारराव सहसा भावनाविवश होत नसत. आपल्या मनातलं असं ते पत्नीजवळदेखील कधी बोलत नसत. पण याला अपवाद होता तो जयसिंगचा ! चंपा पळून गेल्याची वार्ता समजताच मुरारराव भलतेच संतापले होते. प्रथम त्यानी बायकोवर आणि छब्रूवर आग पाखडली. नंतर त्यांना कळून चुकलं की त्या दोघींना चंपाच्या प्रेम प्रकरणाची

मुराररावाना मद्य निषिद्ध नव्हतं, पण ते मद्याच्या आहारी कधीच गेले नव्हते. अतिशय मन स्तापाचा एखादा प्रसंग आला की मग मात्र ते एक दोन पेग घ्यायचे. पण ते घेतात हे पोलीस खात्यात जयसिंग जमदाडे शिवाय दुसऱ्या कोणालाही ठाऊक नव्हते.

त्यादिवशी सुतकट्टीच्या रेस्टहौसवर त्याना रहावं लागलं होतं. गुन्ह्याच्या तपासासाठी ते नंदगंडला गेले होते. परत येताना गाडी नादुरुस्त झाल्याने त्याना सुतकट्टीला रहावे लागले होते.

रात्रीचे दहा वांजले होते. खानसाम्याला जेवणाची ऑर्डर दिली होती. रेस्टहौससमोर मुरारराव खुर्चीवर बसले होते. टेबलावर रमचा ग्लास होता. रेस्ट हौसच्या पायरीवर जयसिंग बसला होता. घटप्रभेच्या प्रवाहावरून येणारा गार वारा, निरभ्र आकाशात चमचमणाऱ्या असंख्य तारका आणि ग्रह याकडं मुराररावांचं बिलकूल लक्ष नव्हतं.

"जयसिंग, तुला एक आतला ग्लास घे!"

जयसिंग अदबीनं उठून पुढे येत म्हणाला," मला नको साहेब!"

"अरे घे, मला ठाऊक आहे कधी कधी घेत असतोस!"

"पण साहेब आपल्यासमोर मी कसं घेऊ?"

"घे ऽऽ घे, मी आता कोण आहे? माझी खानदान कार्टीनं धुळीला मिळवली. माझी समाजात आणि खात्यात सुद्धा बेअब्रू झाली. आता तुला माझ्यासमोर संकोच बाळगायचं काय कारण आहे!"

"असं का म्हणता साहेब? आजही खात्यातले लोक आपल्याला मानतात, गुंतागुंतीच्या गुन्ह्यांच्या तपासात वरिष्ठ अधिकारी देखील आपला सल्ला मोलाचा मानतात!"

"ते झालं रे! पण समाजात आज माझी काय किंमत उरली? अरे हलक्या घराण्याशी संबंध जोडणाऱ्यांच्या लग्नाला देखील मी जात

नसता ? निमकहराम ! ग्लास घे तुला !"

जयसिंगनं ओळखलं आता साहेबांच्या इच्छेविरुद्ध जाण्यात अर्थ नाही. तो आतून एक ग्लास घेऊन आला. मुराररावानी बाटलीतली रम त्याच्या ग्लासात ओतली. जयसिंगनं तांब्यातलं थोडं पाणी त्यात घातलं. अदबीनं तो ग्लास उचलून पायरीवर जाऊन बसला आणि त्यानं त्यातला एक घोट घेतला.

विषय बदलावा म्हणून जयसिंग म्हणाला, "साहेब ही रम कोणती ? फारचं चांगली वाटते ?"

"ही सिक्कीमची रम आहे. मघाशी येताना बेळगावात कॅप्टन जोतिबा पाटलाकडे गेलो होतो ना, त्यावेळी त्यानी दिली ही बाटली."

"मी आजपर्यंत अशी इतकी चांगली रम कधीच घेतली नव्हती !"

"म्हणूनच तुला आज आग्रह केला, पण जयसिंग या पोरीचं पुढं काय करायचं ?"

मुरारराव पुन्हा त्याच विषयावर आल्याचं पाहून जयसिंग म्हणाला

"साहेब आपल्याला एकच मुलगी होती असं समजायचं यापुढं !"

"ते खरं रे, पण मला तो हरामखोर एकदा सापडायला हवा ! अमीर- उल-मुल्क मुरारराव घोरपड्यांची मुलगी पळवून घेऊन जायच्यावेळी त्यानं शंभरवेळा विचार करायला हवा होता. पण कांही म्हण जयसिंग आपलंच नाणं खोटं !"

"साहेब आता आपण तो विषयच डोक्यातून काढून टाका. अशानं आपल्या प्रकृतीवर विपरीत परिणाम होईल !"

"आता मी जगलो काय आणि मेलो काय दोन्हीही सारखंच आहे !"

"बेशक विचारा साहेब !"

"तू अद्याप लग्न का नाही केलंस ?"

मुरारराव असा प्रश्न विचारतील याची मुळीच कल्पना नसलेला जयसिंग म्हणाला

"त्याचं काय आहे साहेब, उगाच मागे प्रपंचाची कटकट नसावी असं वाटतंय !"

"म्हणजे लग्न न करताही बाईचा सहवास मिळू शकतो, असंच ना ?"

"तसं नाही साहेब! माझ्या बायकांच्या जातीवर तसा फारसा विश्वास उरलेला नाही !"

"मला ठाऊक आहे, तुझ्या गावच्या दादा पाटलाच्या पोरीवर तुझं प्रेम होतं, पण ती पोर दुसऱ्याबरोबर लग्न करून गेली म्हणून तू सगळीच स्त्रीजात बेभरवंशाची असं समजायला लागला आहेस ! तुझा ग्लास कुठंय् घे, आणखीन एक पेग !"

"नको साहेब., फार स्ट्राँग आहे ही रम !"

"असं म्हणत म्हणत जयसिंगनं आपला मोकळा झालेला ग्लास मुराररावांच्यापुढे केला.

मुराररावानी स्वत:च्या रिकाम्या ग्लासात थोडी रम घेतली आणि जयसिंगच्याही ग्लासात थोडी ओतली.

"जयसिंग, मला आता आमच्या छबूचीसुद्धा काळजी वाटायला लागलीय् बघ !"

जयसिंग त्यावर काहीच बोलला नाही. ज्या ज्या वेळी जयसिंग कामानिमित्त मुराररावांच्या घरी जायचा, त्या त्यावेळी हीच छबू त्याच्याकडं आशाळभूत नजरेनं पहायची.

जयसिंगाला आपली पायरी ठाऊक होती. छबूला प्रोत्साहन वाटेल असं कधीही तो वागत नव्हता. तेव्हा मुराररावानी छबूच्या नावाचा उल्लेख करताच तो काहीसा गंभीर होऊन म्हणाला—

"हो, त्यांचं लवकरात लवकर कुठेतरी जमलं तर बरं होईल!"

"आता ते कसं काय जमणार रे? एकतर तिचं वय झालंय् आणि दुसरं म्हणजे चंपा त्या हरामखोरासोबत पळून गेल्यामुळं मला जगापुढं तोंड दाखवायची पंचाईत झालीय्! शेवटी पद्मावहिनीच शहाण्या ठरल्या. विक्रमला ती पंजाबी मिलिटरी ऑफिसरची पोरगी पसंत पडली, तिच्याशी त्याचं लग्न करून मोकळ्यासुद्धा झाल्या."

जयसिंग हा मुरारराववांच्या खास विश्वासतला तरीही त्यांनी आपल्या घरगुतीबाबतीत त्यांच्याशी कधीही चर्चा केलेली नव्हती. त्यामुळं बोलता बोलता काहीसे भावनाप्रधान झालेल्या मुराररावाशी चटकन् काय बोलावे हे जयसिंगला सुचत नव्हते. तो काहीसं धाडस करून म्हणाला, "छबूताईना आता एखादं मध्यमवर्गातलं स्थळ सांगून आलं तर अधिक चौकशी न करता ठरवून टाकलेलं बरं!"

"तेचं माझ्या मनांत आहे रे!

जयसिंग, पण मध्यमवर्गातलं सुद्धा कोणी येईल असं वाटेनासं झालंय्!"

खानसाम्यानं जेवण तयार झाल्याची वर्दी आणली. मुरारराव आणि जयसिंग आत डायनिंग टेबलाकडे गेले. अचानक जेवणाची ऑर्डर दिल्यामुळे खानसाम्यानं अंड्याचा रस्सा, भाकरी, भात एवढेच पदार्थ बनवले होते.

जेवल्यानंतर ते दोघे पुन्हा बाहेर आले. आकाश ग्रहताऱ्यानी भरलेलं होतं. मघापेक्षा त्यांचे तेज वाढले होते.

कॅप्स्टन सिगारेट शिलगावून मुरारराव जयसिंगला म्हणाले–

"पण जयसिंग काही झालं तरी चंपाचा शोध हा लागायलाच हवा! मी तिला जन्माची याद राहील असा धडा शिकवणार आहे."

एक तेज:पूंज उल्का तुटली. तिच्या पाठोपाठ आकाशात प्रचंड रेघ उमटली. दुसऱ्या क्षणीच ती नाहीशी झाली.

"जयसिंग, तारा तुटला की पृथ्वीवर काहीतरी अनिष्ट घडतं म्हणतात, तुझा विश्वास आहे त्यावर?"

जयसिंग म्हणाला, "नाही साहेब, आपण आणखीन एक तास भर असं आकाशाकडं पहात राहयलो तर आणखीन दोनतीन उल्का कोसळलेल्या दिसतील."

दूर घटप्रभेच्या पात्रावर एक टिटवी टिंव टिंव टिट्याव्, टिट्यांव्य करीत होती.

आकाशातून कोसळलेली मघांची ती उल्का आणि टिटवीचं ओरडणं या दोन्ही घटना अशुभ आहेत असं मुराररावाना वाटत होतं. थोड्यावेळानं ते आत कॉटवर येऊन पडले. बराच वेळ त्यांचे डोळे सताड उघडे होते.

पलीकडच्या खोलीत झोपलेला जयसिंग मात्र अंथरूणावर पडल्यापडल्या संथ लयीत घोरत होता.

१६.

सकाळचे साडेनऊ वाजले होते. मुरारराव शिरगांव पोलीस ठाण्यात आपल्या ऑफिसात बसलेले होते. इतक्यात त्यांच्या टेबलावरचा फोन खणखणला.

रिसिव्हर कानाला लावून ते म्हणाले, हॅल्लो ऽऽ पी.एस्.आय् घोरपडे हिअर."

कोणाचा फोन असावा याचा अंदाज करू लागले.

"मी निळकंठराव बोलतो आहे!"

निळकंठराव हे शब्द कानावर पडताच मुरारराव बसल्याजागीच थोडेसे ठाकठीक बसत म्हणाले, "बोला चेअरमन साहेब, काय सेवा करू आपली?"

"सेवाबिवा काही नको, तुमचा तो समाजसेवक विश्वास फारच

उपद्रव द्यायला लागलाय. आता तर तो कामगार पुढारी होऊ इच्छितो आहे. आजपर्यंत आमच्या शुगर फॅक्टरीत एकजात सगळे कामगार गुण्यागोविंदानं रहात होते. पण या विश्वासनं अलीकडं त्याना चिथावणी द्यायला सुरूवात केलीय्. तो म्हणतो तुम्हा लोकाना कारखान्याच्या व्यवस्थापनात अधिकार मिळायला हवेत! तुम्हाला ठाऊक आहे, अगोदरच आमच्या संचालक मंडळाच्या परवाच्या निवडणुका किती अटीतटीनं झाल्या! सध्याच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनी मला चेअरमन म्हणून निवडून दिलंय खरं, पण आतून भलताच विरोध आहे मला! ते काही असो. त्यांचं बघून घ्यायला मी समर्थ आहे. पण या विश्वासनं अलीकडं कामगाराना चिथावणी देण्याचं जे सत्र सुरू केलेलं आहे, त्यामुळं मात्र मी व्यथित झालो आहे. त्याचा काहीतरी बंदोबस्त करा बुवा!"

"हे पहा चेअरमनसाहेब, त्या विश्वासनं केवळ तुम्हालाच उपद्रव द्यायला सुरुवात केलीय असं समजू नका! आमच्या बंधुराजाना, चिंचलीकरानाही त्यानं त्रास द्यायला सुरुवात केलीय्!"

"काय म्हणतो काय?"

"आता काय सांगायचं तुम्हाला? चिंचलीतला भला मोठा वाडा कॉलेजसाठी म्हणून त्यानं बळकावला. आता पोरांचं हॉस्टेल काढण्यासाठी म्हणून वाड्यामागची घोड्यांच्या पागेची जागा मागू लागला आहे. आणि त्याच्या मागण्याची पद्धत तुम्ही जाणताच! तो विनंती करत नसतो तर मला पाहिजेच, असं म्हणतो! विरुपाक्ष सावकाराकडून त्यानं वर्षापूर्वी पंधरा हजार रुपये धनगर मोळातील शाळेसाठी घेतले, ईश्वरपूरच्या डॉक्टरकडून आठ हजार रुपये जबरदस्तीनं वसूल केले. खरं म्हणजे हे 'एक्स्टॉर्शन'चे गुन्हे आहेत. पण ज्यांच्याकडून तो जबरदस्तीनं पैसे वसूल करतो, ते लोक फिर्याद द्यायलाच तयार नसतात ना?"

"मोठं कठीण काम आहे हे! पण काहीतरी करा फौजदारसाहेब,

आता गळिताचा हंगाम अगदी तोंडावर आला असताना जर यानं कामगारवर्गाला चिथावणी द्यायला सुरुवात केली तर आम्ही काय करायचं ?"

मुराररावाना विश्वासबद्दल मनातून द्वेष होताच. त्यात निळकंठरावानी हे प्रकरण सांगितल्यावर मुरारराव म्हणाले, "चार दोन कामगार फोडता येतात का बघा! त्याना दहशत घालतो अशी एखादी फिर्याद नोंदवता आली तर मी त्याला ताब्यात घेतो! पण काहीतरी लेखी-टाकी मात्र हवं!"

"बघतो तसा प्रयत्न करून! पण अन्य काही मार्गानं त्याचा बंदोबस्त करता आला तर बघा! खर्चाची काही चिंता करू नका! आणि हे पहा यंदाच्या दिवाळीसाठी मी तुमच्याघरी एक साखरेचं पोतं पाठवतो आहे. कृपया त्याचा स्वीकार करा! तुम्ही कोणाकडं कधी काहीच मागत नसता हे मला ठाऊक आहे!"

"साखरेची काही गरज नाही निळकंठराव, पण तुम्ही कारखान्याचं रेस्ट हौस फार चांगलं केलंय् म्हणे ?"

"होऽ होऽऽ होऽऽ! त्याचं काय आहे फौजदार साहेब, मिनिस्टर लोक दुर्गापूरच्या दौऱ्यावर आले की त्याना लोक त्या सर्किटहौसवर क्षणाचीही उसंत मिळू देत नाहीत. अहो मिनिस्टर बाथरुमला गेले तर लवकर बाहेर या म्हणून दारावर थापा मारत उभे रहातात! लोक प्रतिनिधि झाले तरी त्याना वैयक्तिक असं काही स्वातंत्र्य हवं की नको? सकाळपासून निवेदनाची भेंडोळी घेऊन जत्रेसारखी गर्दी करतात, गेल्या महिन्यात कलेक्टर गोखलेबाई सर्किटवर गृहराज्यमंत्र्याना भेटायला आल्या असताना, त्या गर्दीतल्या एकानं चक्क बुटाचा पाय त्यांच्या पायावर दिला! अहो त्यांच्या पायाचा आंगठा फ्रॅक्चर झाला! बोला ऽऽऽ? असे हे आपले गावगन्ना झालेले कार्यकर्ते! आपल्या मिनिस्टर लोकाना इतकी कामं असतात, इतके दौरे असतात की सतत प्रवास करून ते संध्याकाळी थकून जातात. त्याना 'रिलॅक्स' व्हायला निवांत

... ...जबरदस्त कूक आहे! तुम्ही फर्माईश कराल ती डिश तो बनवतो!"

"चेअरमनसाहेब, आपण म्हणता ते सगळं खरं, पण या शिरगांव पोलीस ठाण्याचा चार्ज घेतल्यापासून मला एक मिनिटाची फूरसद नाही! तोरणाखोऱ्यात सहा सात फरारी आरोपी आहेत, तुमच्या सूतगिरणीचं राजकारण गाजतच आहे, तशात कॉग्निजेबल गुन्ह्यात यावर्षी वाढ झालीय्, स्टाफ म्हणाल तर एकदम बेकार! एक माझा विश्वासू हेडकॉन्स्टेबल जयसिंग जमदाडे सोडला तर बाकी सगळे एक जात हरामखोर!"

"बरं, मग त्या विश्वासचं काय करुया म्हणता? कोणातरी कामगाराला दहशत घालतो म्हणून खोटी फिर्याद द्यायला लावू? पण ते थोडं कठीण आहे हो! तो विश्वास कामगार लोकांत फारच प्रिय आहे हो?"

"लेखी तक्रार असल्याशिवाय मला त्याच्याविरूद्ध कसलीही ॲक्शन घेता येणं अशक्य आहे! हो ऽऽऽऽ गेस्ट हौसवर ना? येतो, नक्की येतो! जयसिंग तपासासाठी बाहेर गेला आहे तो परत आला की त्यालाही सोबत घेऊन येतो!"

मुराररावांनी फोन संपल्यावर रिसिव्हर स्टँडवर ठेवला आणि त्याचं क्षणी जयसिंग जमदाडेनं दारात येऊन मुराररावांना सॅल्यूट ठोकला.

"अरे जयसिंग? काय योगायोग आहे बघ? आता हेच मी तुझं नाव उच्चारलं आणि त्याच क्षणी तू दारात उभा! अगदी शंभरवर्षे आयुष्य आहे तुला!"

जयसिंग काहीसा गंभीर होता. मुराररावांनी व्यक्त केलेल्या दीर्घायुष्याच्या सदिच्छेबद्दल कसलीही प्रतिक्रया व्यक्त न करता तो

साहेबांच्या खुर्चीजवळ आला. किंचित् वाकून त्यानं मुराररावांच्या कानाजवळ तोंड नेलं. त्यानं त्यांच्या कानात काहीतरी सांगितलं. त्यासरशी मुराररराव ताडकन खुर्चीतून उठून उभे राहिले. त्यानी जयसिंगला ऑफिसचे दार बंद करायला सांगितले. जयसिंग दार बंद करून पुन्हा त्यांच्याजवळ आला तेव्हा मुराररावानी त्याला विचारलं.

"चंपाला तिथं बघितलंस?"

"होय अगदी डोळ्यांनी बघितलं, तो शिवरामही तिथंच आहे! विश्वासनं मेंढपाळांच्या मुलासाठी केटलोंडच्या जंगलात आश्रमशाळा सुरू केलेली आहे. त्या आश्रम शाळेत तो व्यवस्थापक म्हणून काम पहातोय! चंपाताईच्याकडे मुलांच्या जेवणाखाण्याची व्यवस्था सोपवलेली आहे!"

"हरामखोर विश्वासची ही शामत? हंऽऽऽ! त्याला भडव्याला चंपा पळून गेल्याचं ठाऊक असताना तो तिला आश्रय देतो काय? ठीक आहे! पण जयसिंग तुला कसा काय तो ठावठिकाणा समजला?"

"विश्वासनं धनगरांच्या मुलासाठी आश्रमशाळा सुरू केल्याचं उडत उडत कानावर आलेलं होतं. पण मी त्याकडं दुर्लक्ष केलं कारण हा विश्वास असल्या फुकटच्या उचापती हमेशा करत असतो, हे मला ठाऊक होतं. पण त्या आश्रमशाळेत एक चोवीसपंचवीस वर्षाची देखणी मुलगी राहत असल्याचं समजल्यानं मी वेषांतर करून गेलो. बघतो तर त्या चंपाताई!"

"पण ती नक्की चंपाच होती का?"

"आता तुम्हाला का सांगावं साहेब त्यांच्या हातून मी पाण्याचा पेलासुध्दा घेतला."

"तिच्याशी काही बोलला नाहीस?"

"बोलणार कसा? त्यानी चटकन् माझा आवाज ओळखला नसता?"

"हो हो तेही खरंच!"

...रावण !"

"होता !"

"कसा आहे रे दिसायला ?"

"ते मी सांगण बरं नाही ! आपण प्रत्यक्षच त्याला बघाल !"

जयसिंगनं शिवरामचं वर्णन सांगायचं का टाळलं हे काही मुरारराावाना समजेना. ते प्रश्नार्थकमुद्रेनं जयसिंगकडे पहातच राहिले. त्यांची जिज्ञासा उगाच फार ताणवू नये म्हणून जयसिंग म्हणाला—

"मेंढपाळ जमातीत एवढं देखणं पोर कसं जन्मलं हेच मला समजत नाही !"

"जयसिंग, ते काही असो, तो देखणा असो अगर नसो, त्यानं माझे कूळ कलंकीत केले आहे. त्याला आता क्षमा नाही !"

चिंचलीच्या पश्चिमेला पंचेचाळीस मैलावर केटलोंडचं घनदाट जंगल होतं. या केटलोंड गावाला पूर्वी मोठा बाजार भरत असे. आजुबाजूला बहुसंख्य वस्ती होती ती धनगर समाजाची. पण इथले धनगर लोक मेंढ्या न पाळता गाईम्हशी पाळत. प्रत्येक धनगराकडे पाच पंचवीस जनावरं असतं.

तोरणानदीवर धरण बांधल गेलं. त्यामुळं पाणलोट क्षेत्रातली खेडी उठवावी लागली. तोरणेच्या काठी जी खेडी, धनगरवस्त्या होत्या त्या उठवाव्या लागल्या. धनगर लोक डोंगरमाथ्यावर गेले. तेथेच त्यानी नवीन वस्त्या बांधल्या. हे लोक पूर्वापार शेती करीतच नव्हते. कुठेतरी डोंगरमाथ्यावरील जंगल जाळायचे आणि त्या जागी नाचणी किंवा वारली ही धान्यं पेरायची. या जंगलात बरेच सुपारी माड होते. या सुपारी माडाला बारीक गोंडे फुटत. या झाडांना जरी सुपारी माड म्हणत असले तरी त्याला सुपाऱ्या लागत नसत. पण त्यापासून उत्तम माडी

मात्र मिळत असे. काही धनगर माडी विकून चरितार्थ चालवीत. वर्षानुवर्ष अज्ञानी असलेल्या या धनगरजमातीत सुधारणा करण्याच्या हेतूनं विश्वासनं या भागात धनगरांच्या मुलासाठी शाळा बांधली. शाळेला फारसा प्रतिसाद मिळेना म्हणून विश्वासनं या डोंगराळ भागात एक आश्रमशाळा सुरू केली. तीस चाळील मुलं तियं रहात होती. अशा डोंगराळ भागात येऊन रहायला कोणी फारसे उत्सुक नसे.

चंपाला विश्वासनं केटलोंडच्या जंगलात आश्रमशाळा काढल्याचे ठाऊक होते. चंपाला आपण कुठल्याही शहरात गेलो तरी मुरारराव आपला तपास काढल्याशिवाय गप्प बसणार नाहीत याची कल्पना होती. म्हणून तिने सरळ केटलोंडच्या या घनदाट अरण्यात विश्वासन सुरू केलेल्या आश्रमशाळेत काही दिवस काढायचे असं ठरवलं.

विश्वासनेही त्या दोघांचं स्वागत केलं. शिवरामसारख्या मागास जातीच्या तरुणानं चंपासारख्या खानदान कुळातील मुलीशी लग्न केल्यामुळं विश्वासला अतोनात आनंद झाला होता. मुळापासूनच विश्वासला घराणेशाही बद्दल तिरस्कार होता. तो स्वत: जातपात मानत नव्हता. मुराररावांशी त्याच कधीच पटल नव्हते, हे चंपाला ठाऊक होते. घोरपडे घराण्यात विश्वासाचे जिव्हाळ्याचे संबंध होते ते फक्त पद्मावाईशी! विश्वास देखील पद्मावाईचा विषय निघाला की गमतीनं म्हणे, सेनापतींच्या नंतर घोरपडे कुळात फक्त, 'पती'च निर्माण झाले. त्यांच्या नावामागची 'सेना' केव्हाच लुप्त झाली. पण पद्मावाईच्या रूपानं मात्र उल-मुल्क घोरपड्यांच्या घराण्यात एक वीरांगना निर्माण झाली आहे.''

चंपाला हे सर्व ठाऊक होतं म्हणून तिनेच शिवरामला काही दिवस अशा डोंगराळ भागात जाऊन रहायची कल्पना सांगितली होती.

हवालदार जयसिंग जमदाडेला जेव्हा चंपा शिवराम सोबत केटलोंडच्या जंगलात विश्वासनं सुरू केलेल्या आश्रमशाळेत आहे असं समजलं तेव्हा त्याला ते खरं वाटलं नाही. शिवराम चंपाला घेऊन

पुण्यामुंबईसारख्या एखाद्या मोठ्या शहरात गेला असावा असे वाटले होते. गणेशपूर, दुर्गापूर या जिल्ह्यात गुन्हे करून फरारी होणारे आरोपी नेहमी केटलोंडच्या जंगलात एखाद्या धनगरवाडी जवळ रहात. धनगराना शिकार करून एखादे सांबर भेकर, किंवा रानडुक्कर मारून दिले की चार सहा महिने दूध आणि नाचणीची भाकरी त्याना बिनबोभाट मिळत असे.

जयसिंग जमदाडे अधूनमधून या वस्त्यावर पाळत ठेवत असे. त्याचे धनगरसमाजाचे असे काही बातमीदारही त्या भागात होते.

विश्वासनं सुरू केलेल्या आश्रमशाळेत एक देखणी तरुणी आणि तिच्यासोबत एक तरुण आलेला आहे ही बातमी त्याला समजली. चटकन त्याच्या डोळ्यासमोर उभी राहिली ती चंपा! पण चंपा चिंचलीपासून अवघ्या पन्नास साठ मैलावर आश्रमशाळेत आश्रय घेईल यावर जयसिंगचा विश्वासच बसेना. पण त्यानं विचार केला साहेबांचं आणि विश्वासचं आजपर्यंत कधीच पटलेलं नव्हतं. तेव्हा साहेबांच्या कन्येनं मागासजातीच्या तरुणाबरोबर जर लग्न केलं असेल तर विश्वास त्या दोघांना अश्रय द्यायला मागेपुढे पहाणार नाही. पण ती चंपाच आहे याची खात्री करण्यासाठी आपल्या बातमीदाराबरोबर जयसिंग वेषांतर करून तिथं गेला. त्यानं प्रत्यक्षच चंपाला तिथं बघितली. तेथून परत आल्या आल्या त्यानं ती वार्ता मुराररावना सांगितली.

"जयसिंग तू त्या दोघांचा ठावठिकाणा शोधून काढलास हे ठीक झालं. पण आता आपल्याला तात्काळ कारवाई करावी लागेल! दुर्गापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ती दोघं पळून गेलेली आहेत तेव्हा दुर्गापूर तालुक्याच्या फौजदारांच्या मदतीनंच आपल्याला ही कारवाई करावी लागेल!"

"होय! आणि त्या शिवरामनं धाकट्या ताईसाहेबाना फूस लावून पळवून नेलं म्हणून त्याच्यावर इंडियन पिनल कोड कलम तीनशे सासष्ट प्रमाणे फिर्याद द्यावी लागेल! आणि त्या दोघांना आश्रय दिला म्हणून

VILAS

विश्वासलाही आता आपल्याला अटक करता येईल!''

''खरंच की रे जयसिंग! हे माझ्या लक्षातच आलं नाही! मघाशीच निळकंटरावांचा फोन आला होता. काहीतरी करा आणि त्या विश्वासचा बंदोबस्त करा! आता त्या हरामखोराला अटक करायला ही आपल्याला अगदी नामी संधीच चालू आलीय्!

''पण बरं का साहेब विश्वासला अटक केल्यावर लोकात फार मोठा प्रक्षोभ निर्माण होण्याची शक्यता आहे!''

''आता काय व्हायचं ते होऊ दे!

आजपर्यंत अब्रू जाईल म्हणून मी त्या शिवराम विरुद्ध फिर्याद द्यायचं टाळत होतो. पण मी फिर्याद न देताच, आता चंपा पळून गेल्याचं सगळया जगाला ठाऊक झालंय्! आता अब्रू राहयलीच कुठं? आता बघू, हे दोन हरामखोर माझ्या कचाट्यातून कसे सुटतात?''

१७.

दुर्गापूर तालुका पोलीस स्टेशनचे फौजदार शामराव शेलार हे मुराररावांच्याबरोबरच फौजदार झालेले होते. त्या दोघाचा खात्यातला अनुभव मोठा होता. मुराररावांनी आपल्या कन्येला पळवून नेल्याची फिर्याद दुर्गापूर तालुका पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या क्षणापासून तपासाची चक्रं वायुवेगानं फिरू लागली.

चंपा आणि शिवरामचा ठावठिकाणा समजल्याने फौजदार शेलार दोन हेड कॉन्स्टेबल्स आणि आठ कॉन्स्टेबल्स सोबत घेऊन केटलोंडच्या रोखानं निघाले होते. सोबत शिरगांव पोलीस ठाण्याचा, मुराररावांचा उजवा हात हवालदार जयसिंग जमदाडे जागा दाखविण्यासाठी आलेला होता.

अहिल्यादेवी आश्रमशाळा ज्या डोंगरमाथ्यावर होती तियं कोणतंही वहान जाऊ शकत नव्हतं. रस्त्यापासून आश्रमशाळा दीड पावणेदोन मैल

अंतरावर घनदाट झाडीत होती. तीच जागा आश्रमशाळेसाठी पसंत करण्याला दोन कारणं होती. एक म्हणजे त्या ठिकाणी पाण्याचा जिवंत झरा होता. आणि दुसरं कारण म्हणजे त्या ठिकाणावरून नवीन झालेली शाळेची इमारत अगदीच जवळ होती. ही शाळा सुरू करताना त्या परिसरातील मेंढपाळांची मुलं शिकावीत ही विश्वासची इच्छा होती. पण त्याना सुरूवातीला फारच अल्प असा प्रतिसाद मिळाला. धनगर वाड्यात घरोघर जाऊन विश्वास आणि रोहिणी ,मुलाना शिकवणं किती गरजेचं आहे हे समजावून सांगत होते. पण आपली पोरं शिकली तर हा पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेला धंदा कोण करणार असा म्हातारे लोक प्रश्न करीत.

विश्वास त्याना सांगे, "लिहायला वाचायला आल्यानंतर तुमची मुलं शहाणी होतील, त्याना जगात कोणीही फसवणार नाही!"

त्यावर एखादा वृद्ध मेंढपाळ म्हणे.

"निस्तं शानं हून प्वाट कसं भरंल? धंदापानी कराय नगो?"

"जगण्यासाठी प्रत्येकाला काहीतरी धंदा करावाच लागतो, पण तुम्हा लोकांच्या अज्ञानाचा आजपर्यंत लोकानी किती फायदा करून घेतलाय याची तुम्हाला कल्पना नाही! तुम्ही विरुपाक्ष सावकाराकडून ग़रज लागेल तसे पैसे घेता, तो तुम्हाला शंभर रुपये दिले तर दोनशे लिहून ठेवतो, उसने दिलेल्या पैशासाठी तो तुम्हाला वर्षभर राबवून घेतो."

"नशिबवान हाय त्यो सावकार."

"तो नशिबवान बनला आहे तुम्हा लोकांच्या अडाणीपणामुळं! तिकडं शहरात कष्ट करणाऱ्याला रोज पंचवीस रुपये हजरी मिळते. तुम्हाला पाच दहा रुपयाच्या वर तो मजुरीचा एक पैसा देत नाही! बाहेर जगात काय चाललंय हे तुमच्या पोरांबाळाना तरी आता समजायला हवंय्!"

विश्वास जीव तोडून त्या लोकाना शिक्षणाचं महत्व सांगत असे.

पण काही केल्या ते त्यांच्या डोक्यात शिरत नसे.

सुरुवातीला दहापाच पोरं जबरदस्तीनं जमवून सुरू केलेल्या शाळेत आताशी पन्नास एक पोरं शिकत होती. ज्यांच्या वाड्या शाळेपासून दूर होत्या अशा मुलांच्यासाठी विश्वासरावनं ती अहिल्यादेवी आश्रमशाळा सुरू केली होती.

ज्यावेळी फौजदार शेलार, जयसिंग जमदाडे आणि इतर पोलीस आश्रमशाळेजवळ आले तेव्हा शिवराम ऑफिसात होता. चंपा जेवण घरात होती. ऑफिसच्या दारातून शेलार फौजदार म्हणाले, "शिवराम आम्ही तुला अटक करण्यासाठी आलो आहोत. चल, लवकर आवर." फौजदार शेलारांचा आवाज ऐकून चंपाही बाहेर आली. तिनं जयसिंगला ओळखलं. शेलारनाही ती ओळखत होती.

चंपानं विचारलं, "कशासाठी त्याला अटक करता?"

"तुला पळवून आणल्याबद्दल."

"पण त्यानं मला पळवून आणलेलंच नाही, मी माझ्या स्वखुषीनं आलेले आहे!"

"चंपाताई, आता उगाच ती चर्चा नको, चला, तुम्हालाही सोबत न्यायचं आहे."

"कशासाठी?"

"आपल्या घरी परत जाण्यासाठी!"

"मला यायची इच्छा नसेल तर?"

"तसं कसं होईल? यावंच लागेल तुम्हाला!"

"मी येणार नाही!"

शेलार फौजदार लाकडाच्या ओंढक्यावर बसता बसता म्हणाले—

"चंपाताई, नको ते धाडस केलंत! आता निमूटपणानं चला. नाहीतर जबरदस्तीनं न्यावं लागेल!"

"जबरदस्ती कशासाठी? आम्ही दोघानी लग्न केलंय्! मी शिवरामची लग्नाची कायदेशीर बायको आहे!"

"जे काय असेल ते कोर्टात सांगा! हवालदार आवरा, त्याला ताब्यात घ्या."

"ठीक आहे. चल शिवराम ते कोर्ट काय आपल्याला फाशी देतं का बघू!" चंपा त्वेषानं म्हणाली.

चंपाला आणि शिवरामला दुर्गापूरला आणण्यात आलं. विश्वासला त्या दोघाना पोलिसानी घेऊन गेल्याचं समजताच तो तडक दुर्गापूरला आला. फौजदार शेलार त्यांचीच वाट पहात होते.

"या विश्वासराव!"

"हे तुम्ही काय चालवलंय्?"

"मुरारराव घोरपड्यानी आपली मुलगी फूस लावून पळवून नेल्याची फिर्याद दाखल केलेली आहे. म्हणून आम्ही शिवरामला अटक करून आणलेले आहे."

"चंपा कुठं आहे?"

"आपल्या घरी!"

"म्हणजे मुराररावांच्याकडे?"

"हो! मुलगी बापाशिवाय दुसऱ्या कोणाकडे जाईल?"

"शेलार साहेब, चंपा सज्ञान आहे, ती आपल्या इच्छेप्रमाणं कोणाशीही विवाह करू शकते! तुम्ही या शिवरामला बेकायदेशीररित्या अटक केलेलं आहे."

फौजदार शेलार टेबलावरचा गोल पेपरवेट फिरवत फिरवत म्हणाले–

"कायदेशीर आणि बेकायदेशीर यातला फरक आम्हाला चांगला समजतो विश्वासराव!"

"पण याचा परिणाम बरा होणार नाही लक्षात ठेवा!"

शेलार फौजदार विकट हास्य करीत म्हणाले–

"विश्वासराव, परिणामाची भीती आम्हाला घालता?"

"शिवरामला तुम्ही सोडावं हे बरं!"

"शिवरामला तर सोडता येतच नाही. पण आता तुम्हालाही मी अटक करणार आहे."

"मला ? कशासाठी ?"

"शिवरामनं गुन्हा केल्यानंतर त्याला आश्रय दिल्याबद्दल! कोण आहे रे तिकडं? विश्वासरावांच्या अटकेचा पंचनामा करण्यासाठी दोन पंच बोलवा!"

विश्वास म्हणाला–

"फौजदारसाहेब मला वाटतं तुम्ही या प्रकरणात नको तितकं लक्ष घालून निष्कारण गोत्यात येणार आहात!"

"बघू! गोत्यात कोण येतं ते!"

विश्वासला अटक झाल्याची वार्ता दुर्गापुरात हां हां म्हणता पसरली. त्या दिवशीच्या 'सायंकाळ' या दुर्गापूरातून प्रसिद्ध होणाऱ्या पेपरात ठळक अक्षरात बातमी छापलेली होती.

"समाजसेवक विश्वास धुमाळ याना अटक."

दुसऱ्या दिवशी सकाळी दुर्गापुरातल्या कार्यकर्त्यांनी कोर्टाकडे विश्वासच्या सुटकेसाठी जामिनाचा अर्ज केला. पाच हजारांच्या जामिनावर विश्वासची मुक्तता झाली. त्या लोकानी शिवरामच्या सुटकेसाठीही अर्ज केला होता, पण त्याला मॅजिस्ट्रेटनी सात दिवसांची पोलीस कोठडीची रिमांड दिली होती. शिवरामच्या सुटकेसाठी दिलेला अर्ज नामंजूर करण्यात आला.

चिंचलीला ती वार्ता आली तेव्हा अमृतराव पद्माबाईना म्हणाले–

"तुमचा विश्वास आता यातून सुटत नाही बरं!"

पद्माबाई शांतचित्तानं म्हणाल्या–

"विश्वासनं चंपाला आश्रय द्यायला नको होता हे मलाही पटतंय् पण यात विश्वासला हे लोक दोषी कसा काय समजतात कळत नाही."

"साधी गोष्ट आहे. फरारी गुन्हेगाराना आश्रय देणं हा देखील गुन्हाच आहे! मुरारराव आता त्याच्या समाजसेवेचा बुरखा

फाडल्याशिवाय रहाणार नाहीत! लोकाना लुबाडून समाजसेवेचं ढोंग करतो काय? आजपर्यंत तुम्ही त्याला पाठीशी घालत होता म्हणूनच तो शेफारलाय्! कल्पना करा, घोरपड्यांच्या कुळातील अविवाहित मुलीला पळवून नेणाऱ्याला हा आश्रय देण्याचं धाडस करतो याला काही अर्थ आहे का?''

''अर्थ असो वा नसो, त्यानं चंपाला आश्रय द्यायला नको होता एवढं खरं!''

''निदान एवढं तरी मान्य करता आहात हेच मोठं म्हणायचं!''

त्या दोघांची चर्चा चालू असतानाच मीनल तियं आली. तिनं विचारलं –

''मां? विश्वासदादाला अटक झाली म्हणतात हे खरं आहे?''

''होय!''

''चंपाताईनं तियं जायलाच नको होतं!'' मीनल हळहळ व्यक्त करीत म्हणाली. त्यावर अमृतराव म्हणाले, ''म्हणजे ती सापडायला नको होती असं तुझं म्हणणं आहे की काय?''

मीनल डोळे बारीक करून अमृतरावांच्याकडं पंहात म्हणाली, "आबा तुम्ही माझ्या प्रत्येक शब्दाचा असा विपरीत अर्थ का लावता?''

''ती दुनियेच्या पाठीवर कुठंही गेली असती तरी मुराररावानी तिला शोधून काढलंच असतं! त्या शिवरामची आता कातडी सोलली जातील! आहेस कुठं?''

'' कातडी सोलली जातील? आरोपीच्या अंगाला पोलिसांना हात लवता येत नसतो. परवा विकीदादा आला होता तेव्हा सांगत होता.''

''एवढ्यातच तो कायदा शिकवायला लागला वाटतं? एक महिना तरी झाला 'लॉ'ला नाव घालून?''

''विकीदादानं पहिल्या दिवसापासून कायद्याच्या अभ्यासात लक्ष घातलंय्!''

''चांगली गोष्ट आहे! शिक्षणपूर्ण होईपर्यंत लग्न न करण्याचा निर्णय घेतला असता तर अधिक बरं झाल असतं!''

त्यावर इतकावेळ गप्प बसलेल्या पद्माबाई उसळून म्हणाल्या
"असं विधान करायला काय वाटतं का तुम्हाला? असं काही तुम्ही बोललेलं अमिताच्या कानावर गेलं तर काय वाटेल तिला?"
"तुम्ही काही म्हणा, विकीनं स्वत:चं लग्न ठरवायला थोडी घाई केली असं अजूनही आम्हाला वाटतंय्!"
"अमिताला दिवस गेले आहेत, हे ठाऊक आहे का तुम्हाला? आणखीन तीन चार महिन्यानी आजोबा व्हाल! आणि म्हणता विकीनं लग्न ठरवायला घाई केली? माणसानं जीभ टाळयाला लावण्याअगोदर थोडातरी विचार करायला हवा!"
"मां ऽऽऽ मी कॉलेजकडं जाऊन येते!" मीनल म्हणाली,
"कॉलेजकडं? आज सुट्टी आहेना?"
अमृतराव मीनलकडं साशंक नजरेनं पहात म्हणाले.
"हो, कॉलेजला सुट्टी आहे. पण मुली स्टडीरुमला अभ्यासाला येतात!"
"घरी अभ्यास होत नाही?"
अमृतरावानी सिगारेट शिलगावली.
"काय बिघडलं, मुलीमुली मिळून अभ्यास करत असतील तर?" पद्माबाईनी विचारलं
तुम्ही अजून अजाण आहात? काल मी श्रीरंगला गावात बघितला. तो चार दिवसांच्या रजेवर आलाय्!"
"त्याला शिरगांवला पोलीस लाईनमध्ये खोली मिळालीय्, बायजाला तिकडं घेऊन जाण्यासाठी आला असेल." पद्माबाई म्हणाल्या.
"बायजा जाणार आहे?"
"कालच मला भेटली होती, ती म्हणते परक्या गावात आपल्याला करमणार नाही! पण थोडे दिवस तरी ती जाईल. आता तिच्या डोक्यात एकच विचार आहे! लवकरात लवकर श्रीरंगचं लग्न करून टाकायचं! तिच्या भावाची मुलगी लग्नाची आहे!"

"कोणाची? त्या दौलत हवालदाराची?"

"होय! छान आहे मुलगी. चार पाच यत्ता शिकलेली आहे."

मीनलने दातात ओठ घट्ट दाबून धरला काहीशा तिरस्कारानं ती म्हणाली–

"मां, आता माझ्यासमोर हे सर्व बोलायची गरजच काय?"

"म्हणजे? जे घडतंय तेच मी बोलले! यात तुला राग यायचं काय कारण आहे?"

"राग येण्याचा प्रश्न नाही मां! तुमचा दोघांचा त्याच्याकडं बघण्याचा दृष्टिकोन कसा आहे हे मला चांगलं ठाऊक आहे! पण श्रीरंग निंबोतला होणारी पाडव्याची कुस्ती झाल्याशिवाय लग्नच करून घेणार नाही!"

"हे तुला कसं ठाऊक?"

टेबलावर मूठ आपटून अमृतरावानी प्रश्न केला.

"ते सगळ्या गावाला ठाऊक आहे. त्याच्या बापाचं सुद्धा तेच ध्येय होतं. पण ते अपुरं राहयलं!"

पद्मावाईनी डोळे बारीक केले आणि त्या मीनलकडं रोखून पहात म्हणाल्या–

"मिनू. श्रीरंगच्याबाबतीत तुला इतकी खोल माहिती असायचं कारण नव्हतं! मी एकदा तुला समज दिली होती. तू ती विसरलेली दिसतेच?"

"मुळीच विसरलेली नाही. मां तुम्ही लोकानी मुरारकाकाना हाताशी धरून श्रीरंगला चिंचलीतून बाहेर कशासाठी काढलंत याची मला पूर्ण कल्पना आहे!"

"मिनू ऽऽऽऽ आज तू जास्तच बोलायला लागली आहेस! आत जा! वडिलधाऱ्या माणसापुढं असं बेमुर्वतीनं बोलणं मला खपणार नाही."

मीनलने माडीवर आपल्या खोलीत येऊन आतून दार बंद करून घेतलं. श्रीरंग चार दिवसांच्या रजेवर आल्याचं तिला समजलेलं होतं. जमल्यास त्याला भेटायचं असं तिच्या मनात होतं. मागे मीनलला पद्मावाईनी श्रीरंगावद्दल तिनं कसलीच अपेक्षा बाळगू नये म्हणून कडक शब्दात समज दिलेली होती. पण मीनल त्याला विसरू शकत नव्हती. स्वत: पुरोगामी असल्याचं भासवणाऱ्या पद्मावाईही अंतर्यामी अत्यंत प्रतिगामी आहेत अशी तिची खात्री झालेली होती.

श्रीरंगची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची आहे म्हणून त्याला पद्मावाईनी मुराररावाना सांगून पोलिसांत भरती करायला लावले असे भासवले असले तरी त्यात पद्मावाईचा मुख्य हेतू होता, श्रीरंगला चिंचलीतून बाहेर काढायचा.

त्याचं लवकरात लवकर लग्न करून टाकलं की मीनल त्याचा विचार सोडून देईल ही कल्पनाही पद्मावाईचीच!

त्याला नोकरी लागल्याचे पेढे द्यायला तो आणि बायजा दोघे मिळून शेतावर आले होते तेव्हा पद्मावाई बांधावरच्या आंब्याच्या झाडाखाली सतरंजीवर बसलेल्या होत्या. ती दोघं दुरून येताना पद्मावाईनी पाहयलं आणि त्यानी त्याचं येण्याचं कारणही अजमावलं.

"या या ऽऽऽ काय पेढे आणलेस काय श्रीरंगा?" पद्मावाईनी हसत हसत विचारलं.

श्रीरंगनं पुढं येऊन पद्मावाईच्या पायावर डोकं ठेवलं. त्याच्या पाठोपाठ बायजांनही तेच केलं.

"कालच ऑर्डर आली. परवा पोलीस ट्रेनिंग स्कूलला जाणार आहे."

"छान झालं!"

बाजूला कृतज्ञतेनं डोळे पुसत उभ्या असलेल्या बायजाला पद्मावाई म्हणाल्या–

"आता एक छानशी मुलगी बघून याचं लग्न करून टाक म्हणजे तुझी मोठी जबाबदारी संपली."

"बगायचं कारन नाही वैनीसाब! माज्या भावाची लेक हाय की!

"कोणाची? दौलतची?"

"व्हय गेल्यासाली पदूर आलाय्!"

"अग मग आता वाट कसली बघतेस? याचं ट्रेनिंग संपवून परत आला की करून टाक!"

"ह्यो न्हाई म्हंतोय न्हवं?"

श्रीरंग लग्नाला तयार नाही हे ऐकताच पद्माबाईंच्या डोक्यात निरळीच शंका उद्भवली.

"का रे? का नाही म्हणतोस?"

"निंबोतची कुस्ती जिकल्याबिगार लगीन करनार न्हाई म्हणतोय्!" बायजा म्हणाली,

"अरे वेडा आहेस काय? लग्न झाल्यावरसुद्धा कुस्त्या करणारे पहिलवान असतातच की?"

"आवो त्या म्हैप्या वस्तादानं हेच्या डोस्क्यात काय भरीवलंय् न्हवं?"

"महिपती वस्ताद ना? मी त्याला चांगला ओळखते, त्याला काही काही कळत नाही."

बायजा आणि श्रीरंग निघून गेल्यानंतर पद्माबाईंच्या डोक्यातली चक्रं वेगानं फिरू लागली "श्रीरंगला नोकरी लागली! त्याला चिंचली सोडावीच लागेल! पण मीनलन यापुढं त्याचा विचार सोडून द्यावा यासाठी आणखीन एक गोष्ट करायला हवी, श्रीरंगचं लग्न! पण या महिपती वस्तादानं त्याच्या डोक्यात हे निंबोतच्या कुस्तीचं आणि लग्न न करण्याचं वेड कशाला भरवलंय?"

"कोण आहे रे तिकडं?"

वसल्या जागेवरून मागे वळून पहात पद्माबाईनी हाक मारली.

फ्लॉवरच्या वाफ्यात भांगलत बसलेला सदाशिव हातातलं खुरपं घेऊन आंब्याकडं आला.

"सदा, गावात जा. आणि त्या महिपती वस्तादला पुढं घालून घेऊन ये! मी वाट बघतेय् म्हणावं!"

पंधरा वीस मिनिटातच महिपती वस्ताद आणि सदा आले. "तू जा सदा तुझ्या कामाला! बस वस्ताद! काय करत होतास?"

"काय करनार घरात बसलोतो!"

" हे बघ, तू श्रीरंगला निंबोतची कुस्ती जिंकल्याशिवाय लग्न करायचं नाही असं सांगितलंस?"

"व्हय वैनीसाब! लगीन झालं का पैलवान सपतो."

"मूर्ख आहेस! लग्न झाल्यानंतरसुद्धा मोठमोठ्या कुस्त्या जिंकणारे खूप लोक मला माहिती आहेत! बलभीम गेला तेव्हा बायजा गरोदर होती. बाप मेल्यावर जन्मलेल्या या श्रीरंगला बायजानं हाडाची काडं करून लहानाचा मोठा केला. आता त्याला नोकरीही लागलीय्. बायजाच्या भावाची, दौलत हवालदाराची मुलगी सून म्हणून घरात आणायची बायजाची इच्छा आहे. पण तू श्रीरंगच्या डोक्यात जे निंबोतच्या कुस्तीचं वेड घातलं आहेस, त्यामुळंच तो लग्नाला तयार नाही. महिपती तू कुस्तीतला माहितगार आहेस हे मला ठाऊक आहे. तरीही मी तुला निक्षून सांगते, एखाद्याच्या वैवाहिक आयुष्यात आडकाठी आणणं हे महापाप आहे. अरे उद्या श्रीरंगचं लग्न झालं, एखादंदुसरं नातवंड त्या बायजाच्या मांडीवर खेळलं तर तिच्या आजपर्यंत हालाखीत काढलेल्या आयुष्याचं सार्थक झालं असं नाही का होणार? निंबोतची ती कुस्ती? काय करायचीय् ती जिंकून? चार पाच हजार मिळतील, पण ते पैसे काय आयुष्यभर पुरतात थोडेच?"

"तसं न्हाई वैनीसाब, मान हाय त्या कुस्तीत!"

"कसला ढेकळाचा मान घेऊन बसलास महिपती? अरे श्रीरंग पोलीस झालाय्, पोलीस खात्यातल्या लोकाना वारंवार मोहाचे प्रसंग

येतात. कधी पैशाच्या स्वरूपात तर कधी तरण्याताठ्या स्त्रियांच्या स्वरूपात! तेव्हा या श्रीरंगचं लवकरात लवकर लग्न होणं जरूरीचं आहे! एखाद्याची वंशवेल वाढत असेल तर ती आपण कशासाठी अडचण निर्माण करायची? तेव्हा ते निंबोतच्या कुस्तीचं वेड त्याच्या डोक्यातून काढून टाक! पुन्हा त्यानं निंबोतच्या कुस्तीसाठी लग्नाला नकार दिला तर मी तुलाच जबाबदार धरणार! लक्षात ठेव! गाठ माझ्याशी आहे!"

शेवटची दोन वाक्ये पद्मावाईनी उच्चारताच महिपती वस्तादला घाम फुटला. आजपर्यंत शेकडो लहानमोठ्या कुस्त्या जिंकलेल्या महिपती वस्तादला पद्माबाईच्या रागाची पूर्ण कल्पना होती. गावच्या पोलीस पाटलापासून ते सरपंचापर्यंत कोणाचीही पद्माबाईचा शब्द ओलांडण्याची हिम्मत नसे.

महिपती वस्तादनं कपाळावर जमलेला घाम डाव्या हाताच्या अस्तनीने टिपला आणि तो हात जोडून म्हणाला—

"न्हाई न्हाई वैनीसाव्, ह्या म्होरं मी तेला निंबोतच्या कुस्तीचं काय बी सांगनार न्हाय्! तावडतोब लगीन करून घे म्हणून सांगतो, मग तर झालं?"

"जा. आता तो पुन्हा जेव्हा तुला भेटेल तेव्हा त्याला पटवून दे! निंबोतची कुस्ती जिंकली म्हणून त्याला कोणी 'पद्मश्री' देणार नाही म्हणावं!"

या प्रसंगानंतर महिपती वस्ताद दुर्गापूरला कुस्ती बघायला आला असताना कुस्त्यांच्या बंदोबस्तासाठी पोलीस ड्रेसातला श्रीरंग त्याला भेटला.

"काय वस्ताद? आजची कुस्ती कोण जिंकणार? सलीम पैलवान का बाबू वडार?"

"कोणतरी एकटा जिंकल घे! तूज काय चाललंय?"

"सगळं व्यवस्थित चाललंय्, पहाटे तीनला उठतो. पाचशे जोर

आणि हजार बैठका मारतो. त्यानंतर सकाळी परेडलाही जातो. आमचे आर.एस्.आय्. चांगले स्पोर्टसमन् आहेत. मी येत्या पाडव्याला निंबोतला कुस्तीसाठी जाणार म्हटल्यावर त्याना खूप आनंद झाला!''

निंबोतचं नाव निघताच महिपती वस्ताद म्हणाला,'' श्रीरंगा डोस्क्यातलं कुस्तीचं याड काढून टाक आता! गड्या तुजी म्हातारी लागलीय् झुरायला! दौलू हवालदार तुजा मामा तुला जावाई करून घेनार हाय्!''

''वस्ताद्, काय बोलता काय? अहो परवा परवापर्यंत तुम्ही मला म्हणत होता निंबोतची कुस्ती जिंकल्याशिवाय माझ्या वडलांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही आणि आज म्हणता निंबोतचं वेड डोक्यातून काढून टाक? तुम्हाला काय झालंय तरी काय?''

''काय झालंय ? ते मलाबी ठावं न्हाई श्रीरंगा! पर आता तू निंबोतच कारन सांगून लग्नाला हुवा न्हाई राहयलास तर मी मेलोच म्हनून समज!''

महिपती वस्ताद गर्दीत फेटा सांभाळत निघून गेला.

इतकी वर्ष निंबोतची कुस्ती केव्हा ना केव्हा तू जिंकायला हवी असं वारंवार सांगणाऱ्या महिपती वस्तादनं श्रीरंगला कुस्तीचं वेड डोक्यातून काढून टाक आणि लग्नाला तयार हो म्हणावं याच कारण श्रीरंगला समजेना. शेवटी जाता जाता वस्ताद म्हणाला होता, ''निबोतच कारण सांगून तू लग्नाला नकार दिलास तर मी मेलोच म्हणून समज! हे वस्तादाचं विधान श्रीरंगला अधिकच बुचकळ्यात टाकणारं होतं. बराच वेळ तो गोंधळलेल्या अवस्थेत त्या गर्दीत विचार करीत उभा होता.

१८.

मुराररावानी दुर्गापूर पोलीस ठाण्यावर शिवराम विरुद्ध इंडियन पिनल कोड कलम ३६२, ३६६, ४९३ आणि ४९६ अशा विविध

कलमाखाली फिर्याद नोंदवली होती. त्याच फिर्यादीत त्यानी विश्वासरावावरही शिवरामला आश्रय दिल्याबद्दल इंडियन पिनल कोडातल्या २१२ कलमानुसार आरोप ठेवला होता.

शिवरामच्यावतीने दिलेला जामिनाचा अर्ज फेटाळला गेल्याने त्याला तालुका पोलीस स्टेशनच्या लॉकअप्‌रूम मधे ठेवण्यात आले होते.

त्या संध्याकाळी मुरारराव दुर्गापूर पोलीस ठाण्यात आले. शेलारानी अदबीने उठून त्यांचे स्वागत केले.

"शेलारसाहेब, काय म्हणतो आरोपी?"

"काही बोलत नाही. अगदी शांत आहे!"

"गुन्हा कबूल कर म्हणावं, मॅजिस्ट्रेटना सांगून शिक्षा कमी करता येईल!"

शेलार म्हणारे, "घोरपडेसाहेब, तो काही गुन्हा कबूल करेल असं वाटत नाही."

"मग घ्या फैलावर! ढुंगणावर पट्ट्याचे चार तडाखे बसेल की झक् मारत गुन्हा कबूल करतो की नाही बघा!"

"या आरोपींच्या बाबतीत ते थोडं कठीण आहे साहेब!"

"कठीण वाटतं? का?"

"विश्वास जामिनावर सुटलाय ना?" तो सुटल्यासुटल्या मला सांगून गेलाय्.

"काय म्हणून?"

"शिवरामच्या आंगाला हात लावाल तर मॅजिस्ट्रेटसमोर तक्रार करीन, सिव्हिल सर्जनकडून शिवरामची तपासणी करून घेईन. जर त्याच्या अंगावर मारहाणीच्या निशाणी किंवा ओळ दिसला तर ते तुम्हाला महागात पडेल म्हणाला!"

"म्हणून तुम्ही घाबरता?"

"घाबरतो अशातला भाग नाही साहेब! दिवस वाईट आहेत! समजा आपण त्याला चार तडाखे लगावलेच आणि त्यानं उद्या

मॅजिस्ट्रेटसमोर मारहाणीची तक्रार केली तर आपल्यालाच ते जड जाईल ना ?''

मुरारराव त्या विधानावर नापसंती व्यक्त करून म्हणाले, ''साधी गोष्ट आहे शेलारसाहेब त्याला ठोकायचं पण त्याचवेळी त्याच्या अंगावर काही ओळ दिसणार नाहीत याची खबरदारी घ्यायची! आजपर्यंत आम्ही तेच करत आलोय्! त्याला बोलवून तरी घ्या काय म्हणतोय ते तरी बघू ?''

शेलार फौजदारानी आपल्या दप्तर ऑर्डर्लीला शिवरामला घेऊन येण्यासाठी पाठवला.

साडे पाच फूट उंच, गोरा, गव्हाळी रंगाचा शिवराम निर्विकार मुद्रेनं ऑफिसात आला.

त्याला नखशिखान्त न्याहाळत मुरारराव म्हणाले, ''काय रे? चंपाला पळवून नेल्याबद्दल पश्चाताप वाटतो का ?''

शिवराम हसला. आणि म्हणाला—

''पळवून कशाला नेऊ साहेब? ती स्वखुषीनंच आली!''

''स्वखुषीनं काय ?''

असं म्हणत मुरारराव ताडकन उठले आणि त्यानी शिवरामच्या श्रीमुखात भडकावली.

त्या अनपेक्षित थप्पडेने शिवराम गालावर हात ठेवून म्हणाला

'' झालं समाधान ?''

''मादरचोद, मलाचं प्रश्न करतोस ?''

''साहेब, मला एकच काय तुम्ही शंभर थोबाडीत जरी दिल्यात तरी मी म्हणेन मी चंपाशी लग्न केलंय् ती माझी कायदेशीर बायको आहे.''

मुराररावांनी पुन्हा त्याला मारण्याचा पवित्रा घेतला तोच शेलार फौजदारानी त्याना मागे खेचले.

''असं काय करता साहेब, तो विश्वास जामिनावर सुटला आहे.

त्याला हा प्रकार समजला तर तो आपल्या मागे हात धुवून लागेल!"

"त्याचाही बंदोबस्त करणार आहेच मी! तो फार मातलाय भडवा!"

शेलारानी शिवरामला परत लॉकअप् रुमकडे पाठवले. मुराररावांच्याकडं पहात म्हणाले–

"तुम्हाला राग येणं साहजिक आहे साहेब, पण आता त्याला मारून काय उपयोग? जे घडायचं ते घडून गेलंय!"

"ही सुरवात आहे शेलार! या भडव्याला मुरारराव घोरपड्यांची लेक म्हणजे आलतू फालतूची वाटली काय?"

"साहेब, चंपाताईचं प्रोत्साहन असल्याशिवाय त्याच्या हातून हे धाडस करणारच नाही."

"पोरीना काय कळतं हो? आमच्या अमृतरावांच्या लेकीनंही आता आईवडिलाना त्रास द्यायला सुरुवात केलीय्! गावातल्या कुणब्याच्या पोरावर प्रेम करीत होती. त्याला तेथून उचलला आणि पोलिसात भरती करून टाकला!"

शेलार काहीसे गंभीर होऊन म्हणाले–

"एक गोष्ट महत्वाची आहे, आजकाल सिनेमा-टीव्ही यामुळं पोरी चेकाळल्यासारख्या झाल्या आहेत. वेळीच त्यांची लग्न करणं हाच एकमेव उपाय आहे!"

"आता काय सांगायचं तुम्हाला? आमच्या मुलीना खूप स्थळं आलेली होती, पण आमच्या दर्जाला शोभेल असं एकही नव्हतं. उगाच कुणालाही पसंत करून त्याला लेक द्यायची का? 'अमीर-उल मुल्क' ही पदवी महाराष्ट्रात फक्त आमच्या घोरपडे कुळाकडेच आहे! कुणाच्याही गळ्यात मुलगी बांधून त्या पदवीला बट्टा का लावायचा?"

"पण मुली फार काळ अविवाहित रहाणही धोक्याचं असतं!"

"आम्ही काय सुखासुखी त्याना तसं ठेवलंय का? मुलगा दिसायला बरा पाहिजे, किमान ग्रॅज्युएटतरी हवा. शिवाय पोटापुरती जमीन

पाहिजे, पण यागोष्टी आमच्या दृष्टीनं गौण आहेत! आमच्या खानदानीशी मुलाचा पदर जुळायला हवा!"

शेलार अत्यंत व्यवहारी होते. ते म्हणाले, "आपल्याला काही शिकवण्याची माझी पात्रता नाही. पण मला मात्र अगदी प्रामाणिकपणे वाटतं की मुलीच्या लग्नाच्या बाबतीत आजकाल घराण्याच्या बाबतीत इतकी खोलवर चिकित्सा करीत बसू नये! मुलगा दिसायला बरा, स्वभावानं सरळ, निर्व्यसनी आणि कमावता असला तर घराण्याकडं थोडं दुर्लक्ष करावं!"

"जे आमच्या बापजाद्यांच्या हातून घडलं नाही, ते आमच्याही हातून घडणार नाही!"

"मग मुलीनी असं धाडस केलं तर डोळेझाक करावी! आता तुम्हीच मला सांगा, अमीर-उल-मुल्क घोरपडेयांची कन्या एका कनिष्ठ जातीच्या तरुणासोबत पळून गेली आणि तिनं त्याच्याशी लग्न केलं ही गोष्ट जगजाहीर झालीच ना?"

"होऊ द्या, होऊ द्या! पण आमच्या घराण्याला बट्टा लावणाऱ्याला मी तसा सरळ सोडणार नाही!"

शेलार ओळखून चुकले की घोरपडे अत्यंत दुराग्रही आहेत. ते शेवटी आपलंच म्हणणं कसं रास्त आहें हेच सांगत बसणार.

मुरारराव थोडेसे शांत झाल्यावर शेलार म्हणाले—

"चंपाताई काय म्हणतात?"

"बोललंय कोण तिच्याशी?"

"मला त्यांचा जबाब घ्यावा लागेल ना? शिवरामनं आपल्याला फूस लावून पळवून नेलं असं त्यानी सांगितलं तरच मला शिवराम विरुद्ध चार्जशीट पाठवता येईल"

"हा, ते बरोबर आहे. मला शिवरामनं फूस लावून पळवून नेलं असा तिचा जबाब तयार करा! एकशे बासष्टच्या जबाबावर साक्षीदाराच्या सहीची गरज कुठं असते?"

"गरज नसते हे खरं, पण त्यानी तसा प्रत्यक्ष माझ्यासमोर जबाब द्यायला नको?"

"शेलार, आजपर्यंत तुम्ही सगळ्याच गोष्ट कायद्याला अनुसरून केल्या आहेत असं म्हणायचं आहे तुम्हाला?"

"या खटल्याच्या बाबतीत प्रत्येक गोष्ट कायद्याला धरून व्हायला हवीय्! तो विश्वास शिवरामच्या पाठीशी आहे ही गोष्ट आपल्याला विसरून चालणार नाही साहेब!"

विश्वासच्या नावाचा उल्लेख व्हायला आणि विश्वास फौजदारांच्यापुढे येण्याला एकच गाठ पडली.

बाजूला बसलेले मुरारराव तिरस्काराने विश्वासकडे पाहत राहयले. पण विश्वासने त्यांच्या अस्तित्वाची दखल न घेताच शेलाराना खिशातून लखोटा काढून दिला.

शेलारानी डोळ्याला चष्मा चढवून एक ओझरता दृष्टिक्षेप मुाररावांच्या कडं टाकून म्हटलं, "काय आहे यात?"

"वाचा म्हणजे समजेलचं!"

त्या लखोट्यात कोर्टाचे दोन आदेश होते. पहिला आदेश होता तो शिवरामला पाच हजार रुपयांच्या जामिनावर खुला करण्याचा, आणि दुसरा होता चंपाला क्रिमिनल प्रोसिजर कोड कलम शंभरान्वये कोर्टासमोर तात्काळ हजर करण्याचा!"

समोर बसलेल्या मुाररावांच्याकडे पहात शेलार म्हणाले," साहेब चंपाताईना ताबडतोब कोर्टासमोर हजर करावं असा हा आदेश आहे!'

"चंपाला? कशासाठी?"

"त्यांच्या जीविताला धोका आहे असा विश्वासरावानी कोर्टाकडं अर्ज दिलेला आहे, त्यावर कोर्टानी ही ऑर्डर केलीय्. या ऑर्डरची विनाविलंब अंमलबजावणी व्हावी असा हा हुकूम आहे!"

मुरारराव विश्वासकडं पहात म्हणाले," चंपा कुठं आहे हे मलाही ठाऊक नाही! शेलार ती तुम्हाला कुठे सापडत असेल तर घेऊन जा

तिला कोर्टासमोर ! माझं काही एक म्हणणं नाही !"

परिस्थिती गंभीर बनली होती. एकीकडं विश्वासनं चंपाला तात्काळ कोर्टासमोर हजर करावं, अशी त्यानं केलेली विनंती कोर्टानं मान्य केली होती. आता मुरारराव तर ती कुठे आहे हे आपल्याला ठाऊक नाही असं म्हणत होते. शेलारांची मोठी कुचंबणा झाली. मुराररावांची कन्या शिवरामबरोबर पळून गेली खरी पण या प्रकरणात आपल्याला प्रचंड मन:स्ताप होणार आहे याचा अंदाज आल्याने शेलार मुराररावाना बाहेर घेऊन जात म्हणाले, "साहेब आता उगाच कोर्टाच्या हुकूमाचा अनादर केला असं होऊ नये ! चंपाताई कुठं आहेत तेवढं सांगून टाका !"

दोन्ही हात हवेत उडवून मुरारराव म्हणाले, "मला तरी कुठं ठाऊक आहे तिचा पत्ता ?"

"असं कसं म्हणता ? आश्रमशाळेतून तुम्हीच नाही का त्याना आपल्यासोबत नेलं ?"

"मी नाही नेलं. ती सोबत येतो म्हणाली हे खरं, पण नंतर ती कुठं गेली हे मलाही ठाऊक नाही !"

मुरारराव हट्टालाच पेटले होते. विश्वास त्यांच्यामागे हात धुवून लागला होता. त्या दोघांच्या रस्सीखेचीत शेलाराना मात्र त्रास होणार होता. मुरारराव गेल्यानंतर शेलार ऑफिसात आले. विश्वास त्यांच्याकडं प्रश्नार्थक मुद्रेनं पहात म्हणाला–

"मग काय करता या हुकूमांचं ?"

"शिवरामला जामिनावर सोडतो !"

"चंपाताईचं काय करता ? तिला तात्काळ कोर्टासमोर हजर करावं असा हा आदेश आहे !"

"तो वाचला मी. पण....!"

"मग आता अडचण कसली ?"

"अडचण अशीतशी नाही विश्वासराव ! चंपाताईचा ठावठिकाणा मुरारराव सांगायला नाहीत !"

"ते सांगत नसतील तर ती कुठे आहे हे तुम्हाला शोधून काढावं लागेल."

"हो ते तर आहेच !"

शेलार फौजदारानी शिवरामला ऑफिसात बोलावले. तो आला. गालावर हात ठेवून तो उभा राहिला. विश्वासनं विचारलं,

"काय झालं तुझ्या गालाला ?"

शिवराम हात तसाच ठेवून म्हणाला, "काय झालं ते या फौजदार साहेबानाच विचारा !"

"काय झालं शेलारसाहेब ?" विश्वासनं विचारलं

शेलारसाहेबांची मोठी पंचाईत झाली. आपल्यासमक्ष घोरपड्यानी शिवरामला थोबाडीत मारली हे सांगण्याचं त्याना धाडसच होईना. ते शिवरामला म्हणाले,

"ते जाऊ द्या सोडा, आता मी तुला या हुकूमाप्रमाणे जामिनावर सोडणार आहे !"

त्या उत्तरानं विश्वासचं समाधान झालं नाही. तो शेलारना म्हणाला,

"याला काय झालं ते मला समजायला हवं, शेलारसाहेब !"

"काही नाही हो विश्वासराव, रागाच्या भरात मुराररावानी मघा त्याला एक चापट मारली होती !"

"काय म्हणालात ? मुराररावानी याला चापट मारली ? आणि ती तुमच्या समक्ष ? शेलारसाहेब ही बाब हलकी समजू नका ! जोपर्यंत शिवरामवर कोणताही गुन्हा कोर्टात शाबीत होत नाही तोपर्यंत तो निरपराध आहे असं समजावं लागतं. निरपराध माणसाच्या अंगावर हात टाकणं ही बेकायदेशीर कृती आहे हे मी नव्याने तुम्हाला सांगायची गरज नाही. ठीक आहे. मी आत्ताच्च त्याला मॅजिस्ट्रेटपुढे घेऊन जातो. ते त्याचं स्टेटमेंट घेतील आणि मग जी कारवाई व्हायची ती होईल !"

"विश्वासराव माझं जरा ऐकता ? कृपा करून तसं करू नका. मला

रिटायर व्हायला चार वर्षं बाकी आहेत. यातून काही लफडं निर्माण झालं तर निष्कारण मलाच निस्तरावं लागेल! मेहेरबानी करा!"

असं म्हणून शेलारानी विश्वासला चक्क हात जोडले.

"ठीक आहे. माझी तशी तुम्हाला अडचणीत टाकायची बिलकूल इच्छा नाही. पण आता तुम्ही एक करा, विनाविलंब चंपाला कोर्टासमोर आणून हजर करा."

"हो. हो. ऽऽ मी आत्ताच डी.एस्.पी. साहेबाशी त्याबाबत बोलतो."

"डी.एस्.पींचा काय संबध आहे यात?"

"या हुकूमाची अंमलबजावणी मुराररावांच्याविरुद्ध होणार आहे! अशा गुंतागुंतीच्यावेळी वरिष्टांचं मार्गदर्शन असलेलं बरं, नाही का?"

"ते तुमचं तुम्ही ठरवा! चंपा गरोदर आहे. तिला तिसरा महिना चालू आहे. शिवरामची ती कायदेशीर पत्नी आहे. एखाद्याच्या कायदेशीर पत्नीला जबरदस्तीनं अज्ञातवासात ठेवणं हा भयंकर गुन्हा आहे."

"हो हो. विश्वासराव मला ते सर्व ठाऊक आहे. म्हणूनच पुढं काय कारवाई करायची याबद्दल डी.एस्.पी साहेबांचा सल्ला मी घेणार आहे."

बोलता बोलताच शेलारानी टेबलावरच्या फोनचे नंबर फिरवले. पलीकडे फोन लागताच ते म्हणाले–

"हॅल्लो कोण? डी.एस्.पी. साहेबांचे पी.ए. का? साहेब आहेत का? मी शेलार बोलतोय. जरा साहेबाशी बोलायचंय्."

"यस्..वेट ए मिनिट." असं म्हणून पी.ए.नी. डी.एस्.पी. साहेबाना फोन जोडून दिला.

"हॅल्लो, सर मी दुर्गापूर तालुका पोलीस स्टेशन, फौजदार शेलार बोलतोय!"

"बोला ऽऽऽ"

शेलारानी डी.एस्.पी.ना कोर्टाच्या ऑर्डरची माहिती दिली. डी.एस्.पी. म्हणाले, "Execute the court order immediately."

१९.

लग्नानंतर अमिता विक्रमच्या फ्लॅटवर रहायला गेली. अधूनमधून ती आपल्या घरीही जायची. विक्रमने बी.ए. झाल्यानंतर 'लॉ'ला नाव घातले होते. त्यादिवशी विक्रम आणि अमिता दोघेही कर्नलसाहेबांच्या बंगल्यावर गेले होते.

अमिताला दिवस गेल्यापासून मोहिनीबाईना तिच्यासाठी काय करू अन् काय नको असं होऊन गेलं हातं. अशातच चिंचलीहून पद्मावाईचं पत्र आलं. त्यानी चिंचलीला डोहाळजेवण करायचं ठरवलं होतं. अमिता, विक्रम यांच्यासोबत कर्नलसाहेब आणि मोहिनी यानाही बोलावलं होतं.

"मग विकी तू जाणार असशील?" कर्नलसाहेबानी विचारलं.

"नाही बुवा! माझे पिरिअडस् बुडतात शिवाय हा बायकाचा कार्यक्रम असल्यामुळं मी तिथं जाऊन काय करू?"

कर्नलसाहेब पाईप शिलगावून हसत हसत म्हणाले, "अमिताबरोबर तुलाही जावंच लागेल." "का?" विक्रमनं विचारलं,

"या डोहाळजेवणाच्या कार्यक्रमाला तूच कारणीभूत आहेस!"

विक्रम काहीसा ओशाळून म्हणाला–

"पपा काहीतरीच काय बोलता?"

"अरेच्या काहीतरीच कसं? अमिताचं कौतुक करताना तुझही व्हायला नको? Are you not responsible for her pregnancy?"

मोहिनी म्हणाल्या, "काय उगाच त्याची चेष्टा करता! विकी तू तिकडं आला नाहीस तरी चालेल!"

कर्नलसाहेब म्हणाले, "पण मी जाणार बुवा! मला व्याह्यांचा पाहुणचार घ्यायचा आहे! शिवाय मला एकदा त्यांच्या त्या मुराररावानाही बघायचंय्."

"मुरारकाकाना? कशासाठी?" विक्रमनं विचारलं.

"तुझ्या लग्नाला विरोध करणारा तो महाभाग कसला आहे हे पहायची फार उत्कंठा लागून राहयलीय्."

"पण पप्पा सध्या ते थोडे अडचणीत आहेत!"

"कसली अडचण?"

"माझी चुलत बहीण चंपा शिवराम नावाच्या तरुणाबरोबर पळून गेली होती. तिला विश्वासनं आश्रय दिला होता,"

"अरे केवळ घराणं जमत नाही म्हणून पोरींची लग्न न करणाऱ्या वेडपट बापाला पोरींनी असा धडा शिकवायलाच हवा!"

"पण झालंय् काय, काकांनी विश्वासला दुखवायला नको होतं. आमच्या तालुक्यांत आणि जिल्ह्यात तो फारच लोकप्रिय आहे!"

"हो, मागे एकदा आला होता ना तो आपल्याकडं?"

"त्याच्याविरुद्ध काकानी फिर्याद दाखल केलीय्, चंपाला आणि तिच्या नवऱ्याला आश्रय दिला म्हणून!"

"ओ ऽऽऽ आय सी ऽऽऽ! मग सध्या चंपा कुणाजवळ आहे?"

"ती कुठं आहे ते कोणालाच माहिती नाही! काका म्हणतात मी तिला घेऊन आलो पण पुन्हा ती कोठेतरी निघून गेलीय्."

"आय डोंट बिलीव्ह विकी! माझा बिलकूल विश्वास बसत नाही!"

"माझाही नाही बसत! पण आता झालंय् काय विश्वासनं चंपाला कोर्टासमोर हजर करावं म्हणून क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या शंभर कलमानुसार वॉरंट घेतलंय्. पोलीस तिला शोधताहेत. परवा दुर्गापूरचे फौजदार शेलार माझ्याही फ्लॅटवर आले होते. इकडं काकानी तिला आणून ठेवलंय का याची चौकशी करण्यासाठी! त्यावेळी शेलार फौजदार सांगत होते."

"काय म्हणाले ते?"

"ते म्हणाले मुराररावानी आम्हाला फार मोठी डोकेदुखी निर्माण करून ठेवलीय्! खात्यातला अनुभवी माणूस म्हणून काकाना आजपर्यंत

ते लोक मानत होते! बरं आता चंपानं पळून जाऊन त्या शिवरामशी लग्न केलं म्हटल्यावर यानी तिचा नाद सोडून द्यायचा की नाही? उगाच प्रतिष्ठेचा प्रश्न करून राह्यलेत! आता त्यानी तिला कुठं तरी लपवून ठेवलं असेल तर ते तसं किती दिवस ठेवू शकतील?"

"तिच्या जीविताचं काही बरं वाईट तरी करणार नाहीत ना?" अमितानं विचारलं.

"काय सांगताच येत नाही! घराण्याचा इतका दुराभिमान बाळगणारा दुसरा माणूस मी आयुष्यांत बघितलेला नाही!"

"चिंचलीला तुमच्या बंगल्यात तरी ठेवलेलं नसेल ना?" मोहिनीनी विचारलं.

" छे SSS ! मांचं आणि त्यांचं बिलकूल पटत नाही! चिंचलीला ती असणंच शक्य नाही!"

"मग आता पुढं काय होणार?"

"तेच समजत नाही!"

मोहिनीनी विचारलं, "विकी, पण बापाच्या संमत्तीशिवाय दुसऱ्याशी लग्न करणं हा गुन्हा नाही का?"

"मुलगी जर अठरा वर्षाची असेल तर ती कोणाशीही लग्न करू शकते! काका पोलीस खात्यात असूनही अशा चुका करतील असं वाटलं नव्हतं! उगाच ईर्षेला पेटलेत!"

त्यावर कर्नलसाहेब म्हणाले, "मला ब्रिगेडियर या लोकांच्याबद्दल खूप सांगायचे पण मला खरं वाटायचं नाही! जग किती झपाट्यानं बदलतं आहे. आणि ही सरदार घराण्यातली माणसं आहेत तिथंच आहेत! प्रथम अमितानं मला तू सरदार घराण्यातला आहेस म्हणून सांगितलं होतं तेव्हा मीही थोडा विचारात पडलो होतो."

विक्रम म्हणाला, " पण मांच्याबद्दल मला खात्री होती. त्यानी अमिताला फक्त पहायला हवं एवढंच मला वाटत होतं!"

"हे बघ विकी, मी 'डेस्टिनी' मानतो. अमिता आणि तू, तुम्ही दोघे एकमेकासाठीच जन्मलेले आहात. हिच्या गाडीचं चाक ऐन पावसात पंक्चर व्हावं, आणि नेमका तियून जाताना हिला पहावं, या घटना साध्या नाहीत. देवानं तुम्हा दोघांना एकत्र आणण्यासाठीच तो प्रसंग निर्माण केला नसेल कशावरून? अरे मी या पुण्यात गेली पंचवीस वर्षे गाडी वापरतोय्, एकदाही ती कधी पंक्चर झालेली नाही!"

त्यावर मोहिनी हसत हसत म्हणाल्या, " आणि पंक्चर झाली असती तरी तुमच्या मदतीला कोणी तरुणी आली नसती!"

"कुणी सांगावं कदाचित् यापुढे येईलही" कर्नलसाहेब हात हवेत उडवून म्हणाले,

"मी घरी असताना काय बिशाद आहे कोणाची?"

"हा हे मात्र खरं! मी एकटा असताना कोणीही तरुणी माझ्या मदतीला येऊ शकेल, पण तू सोबत असताना कोणी फिरकणार नाही."

"एवढी का मी भयानक आहे?"

"तसं नाही म्हणत मी! पण एकदा लग्न झालं की बिचारी पुरुष मंडळी स्वत्वच गमावून बसतात की! या विकीचंच बघ की? लग्नाच्या अगोदर अमिताला भेटायला आला की कसा यायचा? आणि आता?"

"पप्पा तसा याच्यात काही फरक पडलेला नाही हं!" अमिता म्हणाली

"बरं ते जाऊ द्या. चिंचलीला केव्हा जायचं ते बोला. मला रजा टाकावी लागेल!" कर्नल साहेबानी पाईप विझवून विचारलं—

"आमचं काय? तुम्ही केव्हाही ठरवा!" मोहिनी म्हणाल्या?

"व्हॉट अबाऊट यू विकी?"

"मी नाही येणार!"

"ओ. के. ऽऽऽ!"

पद्मावाईनी डोहाळजेवणाचा बेत शेतात आंब्याच्या झाडाखाली केला. आश्चर्य म्हणजे त्या समारंभाला दुर्गापुरातल्या अनेक सरदार घराण्यातल्या स्त्रिया आल्या होत्या. बऱ्याच बायकांनी अमिताच्या

सौंदर्याचं वर्णन ऐकलेलं होतं. त्याना अमिताला बघायची उत्कंठा लागून राहिली होती.

हिरवी जरीकाठी साडी, हिरवा ब्लाऊज घातलेल्या गोऱ्या अमिताची कांती गर्भारपणामुळं अधिकच उजळली होती. तिच्या मोत्याच्या बिलवरापेक्षा बायकांचं लक्ष तिच्या रेखीव हातावर आणि रसरशीत बोटावरच स्थिरावलं होतं. पुण्यात अमिता नेहमीच पंजाबी ड्रेस घालत असे. पण अलीकडं विकीशी लग्न झाल्यापासून ती साडी नेसत असे. आजतरी तिनं चक्क डोक्यावरूनच पदर घेतला होता. संस्थानी जमाना संपल्यानंतर सरदार आणि जहागिरदारही खऱ्या अर्थानं संपले होते. पण अजूनही आपल्याला तीच प्रतिष्ठा आहे याचा आभास निर्माण करणाऱ्या बऱ्याच स्त्रिया त्या घराण्यात होत्या. डोहाळेजेवण होतं चिंचलीकरांच्या सुनेचं, पण जमलेल्या 'सरकारबायाच' अधिक नटूनथटून आल्या होत्या.

आंब्याच्या झाडाखाली ओटी भरण्याचा कार्यक्रम होत असताना पलीकडच्या फणसाच्या झाडाखाली मंदस्वरात शहनाई वाजत होती. या कार्यक्रमाला चिंचली गावच्या कुणबी समाजातील सर्व स्त्रियांना पद्मावाईनी निमंत्रित केले होते. त्यातील सवाष्णीनी आपआपल्या ऐपतीनुसार अमिताला नारळ आणि कापड आणले होते.

'चिंचलीकरबाईनी सून म्हणून पंजाबी पोरगी कशी काय पसंत केली?' अशी चर्चा करणाऱ्या त्या उच्चकुलीन स्त्रिया अमिताचं सौंदर्य पाहून अवाक् झाल्या होत्या.

आम्रखंड, पुऱ्या, मसालेभात याच्या जोडीला तिळाची, कोरट्याची, खोबऱ्याची आणि शेंगदाण्याची चटणी होती. चार पाच प्रकारची लोणचीही वाढली होती.

आमराईत जेवणाची पंगत वाढण्यात आली होती. सरदार जहागिरदारांच्या बायकांच्या पंक्तीला चिंचलीतल्या पद्मावाईच्या शेतात काम करणाऱ्या बायकांचीही पानं मांडण्यात आली होती. निमंत्रिता पैकी

बऱ्याचजणींना ती गोष्ट खटकली.

जाताना हैबतराव निंबाळकरांच्या पत्नी पद्मावाईना बाजूला घेऊन म्हणाल्या,

"पद्मावाई, तुम्ही डोहाळजेवण छान घातलंत, पण या कुणब्याच्या बायका आमच्या पंक्तीला बसवायला नको होत्या!"

पद्मावाई म्हणाल्या, "शीलाताई, या बायका आहेत म्हणून आमची ही शेरीवाग पिकते. या गावातल्या पुरुषापेक्षा इथल्या बायकांच मनापासून कष्ट करतात. त्याना एकदिवस मी असं सन्मानानं वागवलं म्हणून काय बिघडलं?"

"पण आमच्यापैकी बऱ्याचजणींना ही गोष्ट खटकली."

पद्मावाई हसत हसत म्हणाल्या,

"या कष्टकरीवर्गाच्या श्रमावरच तुम्ही आम्ही जगत आलो आहोत. त्याना असा कमीपणा देणं बर नव्हे शीलाताई!"

"तुम्ही काही म्हणा, पुन्हा असा प्रकार घडणार असेल तर आम्ही बारशालासुद्धा येणार नाही!"

एवढावेळ समजूतदारापणानं ऐकून घेणाऱ्या पद्मावाई म्हणाल्या, "त्यामुळं काहीही खोळंबणार नाही! या आपण आता!"

पद्मावाईचा निर्भीड आणि सडेतोड स्वभाव सर्वांना परिचित होता. खुद्द अमृतरावानादेखील त्यांचं हे वागणं पसंत पडत नसे. पण त्यांचे म्हणणे पद्मावाई कधी विचारातच घेत नसत.

त्या संध्याकाळी कर्नलसाहेब आणि अमृतराव ड्रिंक्स् घेत बसले होते. कर्नलसाहेबाना कधी कोणाच्या खासगी बाबतीत चर्चा करायला आवडत नसे. पण त्यादिवशी अमृतरावानीच चंपाचा विषय काढला.

"आमच्या बंधुराजांच्यामागे त्यांच्या कन्येनं एक निष्कारण व्याप लावून ठेवला आहे."

कर्नलसाहेबाना विक्रमकडून पुण्यात ते कळलेलंच होतं. पण तरीही त्याबाबत फारशी उत्सुकता न दर्शवताच ते म्हणाले, "हां ऽऽ! विकी

काहीतरी म्हणत होता खरं! त्याच्या फ्लॅटवर पोलीस गेले होते त्या मुलीला शोधायला!''

''ती पोलिसांच्या बापालाही सापडणार नाही! मुरारराव काय कमी तयारीचे नाहीत!''

''पण सरकार मला काय वाटतं ते जरा बोलू?''

''बोला ना?''

''मुराररावानी आता त्या प्रकरणावर पडदा टाकावा! ज्यातून काहीही निष्पन्न होणार नाही त्यामागं धावण्यांत काय अर्थ आहे?''

''अर्थ नाही कसा? ज्या हरामखोरानं चंपाला पळवून नेण्याचं धाडस केलं त्याला शिक्षा नको व्हायला?''

''विकी म्हणतो ती सज्ञान आहे. ती तिच्या इच्छेच्या कोणाही तरुणाशी लग्न करू शकते!''

''पण घरातून पळून जाऊन? तिला त्या हरामखोरानं फूस लावून पळवून नेलेलं आहे. तो तसा सहजासहजी मुराररावांच्या कचाट्यातून सुटू शकणार नाही! शिवाय त्या बदमाष विश्वासनं त्या दोघाना आश्रय दिल्यामुळं तोही आता या प्रकरणात सापडला आहे! तुम्ही गॅदरिंगच्यावेळी ज्याचं कौतुक केलं तोच बरं का हा विश्वास!'' खोचकपणे अमृतराव म्हणाले.

''हो ते मला ठाऊक आहे. पण माझं असं प्रांजळ मत आहे की विश्वास आपण काय करतो आहोत याचं भान ठेवून नेहमी वागत असतो!''

''कर्नलसाहेब, तो अलीकडं फारच मस्तवाल बनलेला आहे! कल्पना नाही तुम्हाला! त्याच्या ढोंगी समाजसेवेचा बुरखा कोणीतरी एकदा फाडायलाच हवा होता. चंपाच्या प्रकरणात मुरारराव त्याला त्याची नेमकी जागा दाखवून दिल्याशिवाय रहाणार नाहीत!''

''मला आणखीन एका गोष्टीचं फार आश्चर्य वाटतं आहे!''

''कुठल्या?''

"तुम्ही विश्वासबद्दल इतकं वाईट बोलता पण तुमची सर्व कुटुंबिय त्याच्याबद्दल गौरवानं बोलतात हे कसं काय?"

"खरं सांगू तुम्हाला, आमच्या बाईसाहेबानीच त्याला फार शेफारून ठेवलाय! त्यांच्या पावलावर मीनल आणि विकी चालतात! पण या तरुण पोराना काही अक्कल नाही!"

"अक्कल नाही? असं कसं म्हणता? मीनल कॉलेजात जाते, विकीतर बी.ए. ऑनर्स होऊन आता 'लॉ' करतो आहे! या मुलांना अक्कल नाही असं म्हणता येईल?"

"अहो शाळा शिकण्यानं व्यवहार ज्ञान येत नसते कर्नलसाहेब!"

"पण सध्याची तरुणपिढी आपल्यापेक्षा अधिक हुशार आहे अस विद्वान् लोक मानतात!"

"विद्वान्! हं हे विद्वानसुद्धा मग व्यवहारशून्य म्हणायला पाहिजेत!"

कर्नलसाहेब व्हिस्कीचा घोट घेत म्हणाले, "सरकार, ही 'जनरेशन गॅप' आहे! जुन्या पिढीनं थोड्या समजूतदार दृष्टीनं या पोरांच्याकडं पहायला हवंय्! मला जेव्हा अमितानं विक्रमबद्दल सांगितलं तेव्हा क्षणभर वाटलं, की ती चुकतेय्. पण तिनं जेव्हा मला सांगितलं की गेले वर्षभर आम्ही एकत्र हिंडलो फिरलो, आम्हा दोघाना एकमेकांच्या स्वभावाची ओळख झाली आहे, भविष्यात आमच्यात मतभिन्नता होणार नाही. तेव्हा मी म्हणालो, 'गो अहेड'! पण सरकार तुम्ही अगदी मनापासून सांगा आम्ही शहाण्णव कुळीतले नाही, तरी माझ्या अमितात तुम्हाला काही कमतरता जाणवते?"

अमृतरावानी ग्लासातली व्हिस्की संपवली आणि म्हणाले,

"खरं सांगायचं तर आमचं भाग्य म्हणून अशी गुणी सून लाभली!"

"डॅटस इट्!" असं म्हणत कर्नलसाहेबानी अमृतरावांच्या ग्लासात दुसरा पेग ओतला.

२०.

शिरगांवच्या मामलेदार कचेरीतला एक क्लार्क लोकाना फारच सतावत होता. लहान लहान कामासाठी लोकाकडून पैसे खात होता. खरा तर त्याला 'अँटि करप्शन' खात्याकडून 'ट्रॅप'च करायला हवं होतं. पण विश्वास अशा शेवटच्या टोकाचा सहसा अवलंब करीत नसे. तो म्हणे 'भ्रष्टाचारी माणसाला जाळ्यात पकडणं फारसं कठीण नसतं, पण तो जाळ्यात अडकला की त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या त्याच्या कुटुंबिय मंडळीवर आपत्ती ओढवते. ज्या लोकांना त्या कारकुनाने सतावले होते त्या लोकासमवेत त्यादिवशी विश्वास मामलेदाराना भेटून गाऱ्हाणं घालणार होता.

मामलेदार नेमके त्या दिवशी दौऱ्यावर गेले होते. आता ते येईपर्यंत तिथं थांबावं की परत जावं अशा विचारात असतानाच विश्वासला समोरून खाकी ड्रेसात येणारा श्रीरंग दिसला. श्रीरंगला चिंचलीतून बाहेर काढण्यासाठी मुरारराव आणि पद्मावाईनी केलेली कारवाई विश्वासला समजलेली होती. पद्माबाईशी सलोख्याचे संबंध असलेल्या विश्वासला त्याबद्दल थोडे वाईटही वाटलं होतं. मीनलशी श्रीरंगची होणारी जवळीक पद्माबाईना मान्य नव्हती. म्हणूनच त्यानी मुराररावना हाताशी धरून श्रीरंगला पोलिसांत भरती केलेला होता. घोरपडे जहागिरदाराच्या कन्येनं एका कुणबी घराण्यात जन्मलेल्या पोरावर प्रेम करावं हे घोरपडेघराण्यात कोणालाही मान्य होण्यासारखं नव्हतं. पण पुरोगामी विचारसरणीच्या पद्माबाईही त्यात सामील झाल्याचे पाहून विश्वासला थोड वाईटही वाटलं. श्रीरंगसारख्या क्रीडाप्रेमी तरुणाला जवळ करून त्याच्या उत्कर्षाला पद्माबाईनी हातभार लावायला हवा होता असं विश्वासला वाटत होतं. तशी अपेक्षा बाळगायला एक जबरदस्त कारणही होतं. श्रीरंगच्या वडिलांचा, बलभीमचा मृत्यू या जहागिरदारांची सेवा

करतानाच घडलेला होता. श्रीरंगला जरूर ते सहाय्य करून त्याला स्वत ःच्या पायावर उभं करणं हे घोरपड्यांचं नैतिक कर्तव्य आहे असं विश्वासला वाटत असे. पण स्वत : पद्माबाईनीच मीनल आणि श्रीरंग या दोघांची ताटातूट करण्याचा निर्णय घेतल्यामुळे विश्वासला त्या बाबतीत काहीही करता येणं शक्य नव्हतं.

समोरून येणारा श्रीरंग दिसताच विश्वास थांबला.

"काय रे? या ड्रेसात तू मला एकदम ओळखूच आला नाहीस! कसं काय चाललंय तुझं? कुस्ती काय म्हणते?"

"कसली कुस्ती आलीय विश्वासदादा, आई इकडं आल्यापासून एकसारखी मागं लागलीय् लग्न करून घे म्हणून! आता तुम्हीच सांगा, हे काय माझं लग्नाचं वय आहे?"

विश्वास त्याचा हात हातात धरून म्हणाला, "प्रेम करायचं वय झालं की लग्नाचंही वय झालं असं मानायला काय हरकत आहे? चल त्या बागेत जरा बोलत बसू!"

विश्वासनं सोबत आलेल्या मंडळीना सांगितलं, "आमचा गाववाला भेटलाय, मी जरा पलीकडे बागेत आहे. मामलेदारसाहेब तासाभरात येणार आहेत असं पट्टेवाला म्हणत होता. ते आले की मला बोलवायला या. इथं पलीकडं बाग आहे!"

विश्वास आणि श्रीरंग बागेत बकुळीच्या झाडाखाली कट्ट्यावर येऊन बसले.

"हं बोल श्रीरंगा, कसं चाललंय् तुझं?"

"तसं ठीक चाललंय्!"

"पण तुझ्या चेहऱ्यावरून तसं वाटत नाही! चिंताग्रस्त दिसतोस?"

"त्याचं काय आहे दादा, तसा मला नोकरीत कसला त्रास नाही. आमचा हवालदार जयसिंग जमदाडे मला कुस्त्या बघायला दोन दोन तीन तीन दिवस बाहेर गावी जायला परवानगी देतो. मीही हातात चार पैसे मिळायला लागल्यापासून खुराक वाढवलाय्. आठवड्यातून एक दोन

वेळा 'आकनीचा सोप' घेतो, बदामाचा घोटा घेतो, सकाळी तालमीत जातो. पाचशे जोर आणि हजार बैठक मारतो. तेवढी येत्या गुढी पाडव्याची निंबोतची कुस्ती मारावी एवढीच एक इच्छा आहे! पण आईनं लग्न करून घे म्हणून एकसारखा घोशा लावलाय्! काय करू सांगा?''

''मीनलची आठवण येते का कधी?''

श्रीरंग हसत म्हणाला, ''अधूनमधून तिची पत्रं येतात.''

''तूही तिला पाठवतोस काय?''

''नाही. नाही. तो धोका मी कशाला पत्करू? आमच्या घोरपडे फौजदाराना ते समजलं तर अंगावर कातडं शिल्लक रहाणार नाही माझ्या! अगोदरच पोरगी पळून गेल्यापासून सर्वांवर आग पाखडतात.''

''म्हणजे? चंपा पळून गेली आणि तिनं शिवरामशी लग्न केलं हे तुलाही समजलंय तर?''

त्यावर श्रीरंग म्हणाला, ''त्याचं काय आहे विश्वास दादा, फौजदाराच्या घरात माशी जरी शिंकली तरी आमच्या स्टाफला ते ऐकू येतं! फौजदारांच्या घरातल्या बारीकसारीक घडामोडी जर स्टाफला समजतात, आणि त्यांची पोरगी शिवरामबरोबर पळून गेल्याची जगजाहीर झालेली वार्ता समजणार कशी नाही? पण दादा तुम्हाला त्या प्रकरणात का अटक केलं?''

''अरे शिवराम आणि चंपाला मी धनगरवाड्यातल्या अहिल्यादेवी आश्रमशाळेत आश्रय दिला म्हणून माझं नाव त्यानी फिर्यादीत घातलंय्! घालू देत! मी नाही त्याला भीक घालत! लगेच दुसऱ्या दिवशी माझ्या कार्यकर्त्यांनी मला जामीनावर सोडवून घेतलं! परवा शिवरामही जामीनावर सुटला! पण या तुझ्या फौजदारनं चंपाला कुठं दडवून ठेवलंय् याचा काही पत्ता लागत नाही! अरे आठ दिवस झाले शंभर कलमाखालंचं वॉरंट निघून! तो दुर्गापूरचा फौजदार वणवण हिंडतोय तिचा शोध घेत! परवा विक्रमच्या फ्लॅटवर पुण्यालाही जाऊन आला.

पण चंपा सापडत नाही. या मुराररावानी तिला कुठंतरी जाम बंदोबस्तात ठेवलंय्! ती चंपा एकदा का कोर्टापुढं आली की मुराररावांची केस क्षणार्धात ढासळणार आहे!''

श्रीरंगला विश्वासबद्दल नितांत आदर आणि जिव्हाळा होता. केवळ विश्वासच्या प्रयत्नामुळेच चिंचलीत कॉलेज निघू शकलं याची श्रीरंगला जाणीव होती.

श्रीरंग विश्वासच्या कानाजवळ तोंड नेत म्हणाल, ''दादा एक गोष्ट बोलू का? पण माझं नाव कुणाला समजता कामा नये!''

विश्वास श्रीरंगचा हात हातात घेत म्हणाला, ''त्याची चिंता नको. तुझं नाव मी कुठंही बोलणार नाही! बोल काय तुला ठाऊक आहे?''

''सरवडेकर सरकारना तुम्ही ओळखता?''

''होऽऽऽते तांबड्या मिशावाले? गुडघ्याइतका कोट, ब्रिचेस आणि फरची टोपी घालतात, नाटकातल्या पात्रासारखे दिसतात तेच ना?''

''हो तेच, हातात श्वानमुखी काठी आणि पायात जोधपुरी चढाव घालून आपल्याच तोऱ्यात चालल्यासारखे दिसतात तेच सरवडेकर सरकार आठ दिवसामागे मुराररावांच्या बंगल्यावर रात्री साडे आठ वाजल्यापासून ते साडेदहापर्यंत होते. दारं बंद करून दोघांचे कसलेतरी खलबत चालले होते!''

''हे तुला कसं समजलं?''

''आमच्यातला दोनशे त्रेचाळीस साहेबाकडं आर्डर्ली आहे तो सांगत होता.''

''दोनशे त्रेचाळीस?''

''अहो बक्कल नंबर दोनशे त्रेचाळीसचा कॉन्स्टेबल सूर्याजी सावंत, मला सांगत होता, सूर्याजीही पूर्वी कुस्ती करायचा! तो पोलिसात भरती होण्याअगोदर पासून मला ओळखतोय.''

गंभीर होऊन विश्वास म्हणाला, ''अस्सं आहे काय? सरवडेकर सरकारांचा रानजाईच्या डोंगरात बंगला आहे. चंपाला तियंच डांबून

ठेवलं असण्याची दाट शक्यता आहे! श्रीरंग तू मला फार महत्त्वाची बातमी दिलीस!"

"पण दादा माझं नाव एवढं कोणाला समजू नये बरं!"

"अरे तू का चिंता करतोस? माझ्यानावापुढे मी आजवर 'घात' हा शब्द कधीच लावून घेतलेला नाही!"

"म्हणजे?" श्रीरंगनं त्या वाक्याचा अर्थ न समजल्यानं विचारलं.

"म्हणजे मी आजपर्यंत कोणाचाही 'विश्वासघात' केलेला नाही."

त्यादिवशी शिरगावला मामलेदार आलेच नाहीत. विश्वास तेथून जो निघाला ते सरळ त्याने दुर्गापूर गाठले. शेलार फौजदार घरीच होते.

"या विश्वासराव, काय खबरबात."

"बात काही नाही. पण खबर मात्र आहे!"

"कसली?"

"चंपाला सरवडेकर सरकारांच्या मालकीच्या जंगलातल्या बंगल्यात लपवून ठेवलं असण्याची दाट शक्यता आहे."

"अस्सं? पण हे तुम्हाला कोणी सांगितलं?"

"कोणी सांगितलं त्याचं नाव मी तुम्हाला सांगू शकणार नाही! पण मला दाट शंका आहे, चंपा तिथल्याशिवाय दुसऱ्या ठिकाणी असूच शकणार नाही! आपण विनविलंब तिथं जाऊन खात्री करून घ्यायला हवी!"

"ठीक आहे. काल रात्री डी.आय.जी. साहेबांचाही फोन आला होता. त्या मुलीचा शोध का लागत नाही याचा त्यानी खुलासा विचारलाय!"

बोलता बोलता शेलार फौजदारानी पोलीस स्टेशनला फोन जोडला.

"हॅल्लोऽऽऽ मी शेलार बोलतोय्. मला तावडतोब जीप पाठवा, आणि हे बघा. एक तीनची पार्टी तयार ठेवा!"

"जी ऽऽऽऽ!"

शेलार फौजदार स्वत: जीप चालवायला बसले. त्यांच्याशेजारी

विश्वास बसला. मागे एक हेड कॉन्स्टेबल आणि तीन कॉन्स्टेबल्स बसले. त्याना साहेब कुठं नेणार आहोत याची बिलकूल कल्पना नव्हती.

शिरगांव पासून अंदाजे पन्नास किलोमीटर अंतरावर सरवड्याचे जंगल होते. पूर्वपार हा भाग सरवडेकर जहागिरदारांच्या मालकीचा होता. जंगलात किजळ, मत्ती, सागवान, शिरसं यांची प्रचंड झाडं होती. सरवडेकर जहागिरदारानी या जंगलात डोंगरावर बंगला बांधलेला होता.

बंगला अशा ठिकाणी होता की तेयून दूर पश्चिम क्षितिजावर असलेला समुद्र दिसत असे. रात्रीच्या वेळी बोटींचे दिवेही दिसत.

जंगल खासगी मालकीचं असल्यामुळं सरवडेकरानी झाडांच्या संरक्षणासाठी तियं चार नोकर ठेवलेले होते. जंगलात फिरावं लागत असल्यामुळे त्या नोकरांच्याकडे बंदुका होत्या. अधूनमधून वर्दी आली की एखादं भेकर किवा रानडुक्कर मारून सरकाराना पाठवलं जायचं! जंगलात रानकोंबड्याही विपूल होत्या. उन्हाळयांत सरवडेकरांचा मुक्काम या बंगल्यावरच असे. सरवडेकर तसे खूप रसिक होते. त्याना संगीत नाटकं पहाण्याचा खूप शौक होता. नामवंत गायक त्या परिसरात आले की त्यांची एखादी मैफल या जंगलातल्या बंगल्यात व्हायची. गच्चीवर गालीचा पसरला जायचा. टेकायला लोड आणि तक्के ठेवलेले असत. डोक्यावर असंख्य तारका आणि ग्रह लुकलुकत. पश्चिमवाऱ्याची झुळूक रानफुलांचा गंध घेऊन येई. गायक आपला 'तानपुरा' छेडायला प्रारंभ करीत. नीरव अशा वातावरणात यमन, भूप आणि बिहाग रागाचे स्वर आसमंतात घुमू लागत. सरवडेकर सरकार आपल्या काही मोजक्या मित्रमंडळीसमवेत त्या स्वरांचा आस्वाद घेत. गाण्यानंतर मद्यप्राशनाचा कार्यक्रम रंगत असे. खाली रानकोंबड्या आणि 'कस्तरं' याचा रस्सा तयार असे.

सरवडेकरांची नाटकमंडळीशी मैत्री असल्यामुळं तेही नाटकातल्या लोकासारखेच वागायचे. साधं बोलतानादेखील ते रंगभूमीवरच्या

नटासारखे हातवारे करीत बोलायचे. या रसिक माणसात एक फार मोठा दोष होता. अमृतराव, मुरारराव यांच्याप्रमाणं सरवडेकरानाही आपल्या जातकुळीचा अतिशय अभिमान होता. शिवाय चिंचलीकर घोरपड्यांशी त्यांचे जवळचे नात्याचे संबंध होते.

सूर्यास्त झाला. जीप सरवड्याच्या नागमोडी रस्त्यावरून तांबड्यामातीचा धुरळा उडवत चालली होती. शेलार फौजदार म्हणाले,

"विश्वासराव, तुम्ही यापुढं जरा सांभाळून रहा बरं ?"

"का ?"

"मुराररावांचा रोष तुम्ही ओढवून घेतलेला आहे याची जाणीव असू द्या."

"ती जाणीव मला चांगली आहे. म्हणून सहसा मी एकटा कुठेच जात नाही. पण मुरारराव तुमच्या खात्यात असताना तुम्ही मला त्यांच्यापासून सावध रहाण्याचा इशारा देता हे कसं काय ?"

शेलार किंचित् हसून म्हणाले, "बरोबर प्रश्न विचारलात! ते आमच्या खात्यात आहेत. अनुभवी आहेत, हे सगळं खरं, पण त्याच्या खानदानीच्या ज्या कल्पना आहेत त्या हास्यास्पद आहेत. आज जग कुठं चाललंय् आणि हे लोक कुठं चाललेत? मी यांना गेली वीस वर्षे ओळखतोय्! छबू आणि चंपा वयात आल्यानंतर दहावीस स्थळं त्याना येऊन गेली. पण प्रत्येक स्थळात यानी काहीना काही दोष काढले. माझ्या स्वत:च्या पुतण्याबद्दल, मी त्याना विचारलं होतं!"

"मग काय म्हणाले ?"

"म्हणाले शेलार तुम्ही आमच्यात बसत नाही! आत्ता हे कुठं बसले सांगा की ?"

विश्वासला प्रश्नाचं नकळत उत्तर मिळालं होतं. शेलारांचा स्वाभिमान मुराररावानी दुखावला होता. म्हणून एका खात्यात काम करत असूनही शेलाराना मुराररावांबद्दल आत्मीयता वाटत नव्हती.

म्हणूनच त्यानी विश्वासला त्यांच्यापासून थोडं जपून रहाण्याचा सल्ला दिलेला होता.

जीप घाट चढून वर आली तसा अंधार पडला. दिव्याच्या उजेडात ठिणग्यासारखे डोळे असलेले ससे आडवे पळत होते. जीपमध्ये पुढे चाललेलं बोलणं मागे ऐकू जात नव्हते. म्हणून शेलारानी गाडी एका वळणावर थांबवली. मधली काच सरकावली आणि मागे वळून हेड कॉन्स्टेबलला म्हणाले,

"गायकवाड मस्केटस् लोड करून ठेवा! सरवडेकरांनी बेरड नेमलेले आहेत ते कदाचित् आडवे येतील! ते तसे आलेच तर त्याना दहशत घालण्यासाठी हवेत एक दोन फैरी झाडायची तयारी ठेवा!"

"जी साहेब!"

शेवटचं वळण घेतल्यानंतर जीप सरवडेकरांच्या दगडी बंगल्यासमोर येऊन उभी राहिली. जीपचा आवाज येताच मल्लू रामोशी डब्बल बॅरलची बारा नंबरची बंदूक घेऊन पुढे सरसावला.

शेलार जीप मधून उतरले. बॅटरीच्या झोतात त्याना राक्षसासारखा भला दांडगा मल्लू दिसला. तो बंदूक रोखून म्हणाला, "कोण हाय तुमी?"

शेलारानी बॅटरीचा झोत स्वत:वर आणि मागून उतरलेल्या पोलिसांवर टाकला. आणि म्हणाले,

"कोण आहे दिसलं का?"

"व्हय्, पर हितं काय काम हाय तुमचं?"

"बंगल्याची झडती घ्यायची आहे! वॉरंट आहे माझ्याकडं!"

"आसलं तरी बी म्या झडती घिऊ देनार न्हाई!"

"वेडा आहेस काय?"

"येडाबिडा न्हाई, पर मालकाची परमानगी आसल्याबिगार मी काय कुनाला आत सोडनार नाही!"

त्याला समजावण्याचा पवित्रा घेत हेड कॉन्स्टेबल हळूहळू पुढं गेला

आणि त्यानं चित्यासारखी झडप घालून मल्लूच्या हातातली बंदूक हिसकावून घेतली. त्याच क्षणाला सोबत आलेले तिघे पोलीस मल्लूच्या अंगावर झेपावले. त्या चौघानी त्याला पकडला. सरकारी कामात अडथळा आणल्याबद्दल शेलारानी मल्लूला तिथंच अटक केली.

इतक्यात माडीवरून जोराची हाक आली. 'विश्वासदादा मी इथं आहे!"

तो आवाज चंपाचा होता. शेलार विश्वासकडं पहात म्हणाले,

"तुमच्या खबऱ्यानं अगदी 'परफेक्ट' माहिती दिली बरं का?"

चंपाला आत कोंडून ठेवलेलं होतं. दाराचं कुलूप फोडून शेलार फौजदार आणि विश्वास आत आले. विश्वासला बघताच चंपा धाय धाय रडत त्याच्याजयळ आली आणि म्हणाली,

"दादा आबानी घात केला."

"काय केलं?"

"चार दिवसांपूर्वी कोणी डॉक्टरीण आणून त्यानी इथं माझा जबरदस्तीनं गर्भपात केला. होऽऽऽ!" धाय धाय रडत ती म्हणाली.

चंपाला शांत करीत विश्वास म्हणाला, "ते असं काहीतरी करतील याची मला शंका होतीच!"

शेलार फौजदारांच्याकडं पहात चंपा म्हणाली, "साहेब मला माझ्या वडिलाविरूद्ध फिर्याद द्यायची आहे!"

शेलार विश्वासकडं पहात म्हणाले, "तुम्हाला जे काय सांगायचंय् ते मॅजिस्ट्रेटसमोर सांगा! आम्ही तुम्हाला त्यांच्यापुढचं हजर करणार आहोत."

२१.

दुर्गापूर जिल्ह्यांच्या डी.एस्.पी. साहेबांच्या बंगल्यापुढे सरवडेकर सरकारांची गाडी सकाळी सव्वा नऊ वाजता आली. शिपायाने सरवडेकर

भेटायला आल्याची वर्दी देताच डी.एस्.पी. साहेब त्याना भेटायला बाहेर आले.

"याऽऽऽ! बसाऽऽ! काय काम काढलंत सरकार सकाळी सकाळी?" डी.एस्.पी. साहेबानी खुर्चीवर बसता बसता विचारलं.

"तुमच्या तालूका पोलीस स्टेशनच्या फौजदारानी हे काय चालवलंय्?"

"काय झालं?"

"त्यानी माझ्या बंगल्यांत बेकायदेशीर प्रवेश करून कुलूप आणि दार फोडलंय्!

"हो, रात्रीचं मला फौजदारानी फोनवर तो प्रकार सांगितलेला आहे. फौजदारानी त्यात बेकायदेशीर असं कोणतंच कृत्य केलेलं नाही."

"म्हणजे? एखाद्याच्या बंगल्यात प्रवेश करून कुलूपं फोडणं हे कायदेशीर कृत्य आहे?"

"एरव्ही तसं घडलं असतं तर ते बेकायदेशीर नक्कीच ठरलं असतं पण या बाबतीत ते पक्कं कायदेशीर आहे. शेलारानी मॅजिस्ट्रेट साहेबांच्या हुकूमाची अंमलबजावणी केली आहे. चंपाला तुमच्या वाड्यात डांबून ठेवण्यात आलेलं होतं! खरं तर तुम्हीसुद्धा या बाबतीत दोषी आहात. मुराररावानी तिथं तिचा गर्भपात घडवून आणलेला आहे. ती म्हणतेय् की तिला वडिलांच्या विरूद्ध फिर्याद दाखल करायची आहे! सरकार आता जमाना बदलला आहे. पूर्वी संस्थानी जमाना असताना तुम्ही लोक दुर्गापूर महाराजांच्या कृपाछत्राखाली अनेक बेकायदेशीर कृत्यं करीत होता. पण आता तसं चालणार नाही! ही लोकशाही आहे, लोकशाहीत कायद्यांचं पालन काटेकोर रीतीनं करावं लागतं! समजलं?"

आल्यानंतर सरवडेकरांचा जो आवेश होता तो काहीसा ओसरला. तरीही ते म्हणाले,

"लोकशाहीत एखाद्या खानदान कुटुंबातली मुलगी पळवून नेणं हे समर्थनीय ठरतं का?"

"चंपा सज्ञान आहे. ती स्वत:च्या इच्छेनुसार कोणाशीही लग्न करू शकते. तिनं शिवरामशी केलेला विवाह पूर्णपणे कायदेशीर आहे!'

"मग आता काही बोलायचं शिल्लकच उरलं नाही म्हणा?"

डी.एस्.पी. साहेबानी टेबलाला जोडलेली बेल दाबली. आतून ऑर्डर्ली धावत आला.

"अरे दोन कप चहा घेऊन ये!"

पुन्हा सरवडेकरांकडे पहात डी.एस्.पी. म्हणाले, "सरकार, मुराररावानी चंपाला तुमच्या वाड्यात नेऊन डांबलं, आणि तिथं तिचा तिच्या इच्छेविरूद्ध गर्भपात केला हा अतिशय भयानक स्वरूपाचा गुन्हा केला आहे. तुम्ही या गुन्ह्याला सक्रिय पाठिंबा दिलात म्हणून तुम्हालाही मी आता इथं अटक करण्याची कारवाई करू शकतो! पण मी तसं करण्याची घाई करणार नाही! मुरारराव माझ्या खात्यातले अनुभवी अधिकारी आहेत. तीन साडेतीन वर्षानंतर ते रिटायर होणार आहेत. आज जर त्यांच्यावर मी हा गुन्हा दाखल केला तर त्याना शिक्षा तरी होईलच, पण त्याचबरोबर साडेतीन वर्षानंतर मिळणाऱ्या पेन्शनवर त्याना पाणी सोडावं लागेल. मला तसं घडावं असं वाटत नाही. म्हणून मी आज सकाळी चंपाची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण ती ऐकायलाच तयार नाही. आता तुम्हीच सांगा, चंपा स्वत:च्या बापाविरूद्ध फिर्याद द्यायला जर मागेपुढे पहात नाही तर ती तुम्हाला सोडेल का? तेव्हा मी सांगतो तेवढं करा!"

आपण या प्रकारात गुंतले जाणार आहोत याची जाणीव झालेल्या सरवडेकराना अक्षरश: घाम फुटला. कोरड्या पडलेल्या ओठावरून जीभ फिरवीत ते म्हणाले,

"साहेब हे असं काही लफडं निर्माण होईल याची मला काही कल्पना नव्हती हो?"

"इग्नरन्स ऑफ लॉ इज नो एक्सक्यूज."

आर्डर्लीनं आतून चहा आणला. ट्रेमधून त्याने एक कप उचलून

सरवडेकराना दिला. दुसरा साहेबांच्यापुढे ठेवला.

"घ्या सरकार !"

चहाचा एक घोट घेऊन डी.एस्.पी. म्हणाले, "आता यातून तुम्हा दोघाना सुटकेचा एकच मार्ग आहे, चंपाची क्षमा मागणे."

"बापरे ? साहेब मी तिची क्षमा मागू शकेन, पण मुरारराव तिची क्षमा मागतील असं काही वाटत नाही."

"अरोपी म्हणून सेशन कोर्टासमोर उभं रहायचं नसेल, नोकरीवर आणि पेन्शनीवर पाणी सोडायचं नसेल तर त्याना चंपाची माफी ही मागावीच लागेल ! हं. चहा थंड होतोय् घ्या !"

"आता काय करायचं ? मोठा कठीण पेचप्रसंग निर्माण झालेला आहे ! ते मला म्हणाले थोडे दिवस चंपाला एकांतवासात ठेवलं तर तिचे मतपरिवर्तन होईल. म्हणूनच मी त्याना तिला तियं ठेवायला सम्मती दिली."

"हो हो. तुमचा हेतू स्तुत्य असेलही पण तुम्हीही गर्भपाताचा गुन्हा करायला सहाय्यभूत झालांत म्हणून दोषी ठरता !"

डी.एस्.पी. साहेब इतकी वर्ष मी अब्रूनं जगलो हो ! आता म्हातारपणी एवढी बेअब्रू होऊ नये यासाठी आपणच काहीतरी मार्ग सुचवा !"

"सांगितला ना मार्ग ? तुम्ही आणि मुराररावानी चंपाची बिनशर्त माफी मागायची ! तिला अजूनपर्यंत मी थोपवून धरलेलं आहे."

"पण ती आता आमचं काहीही ऐकणार नाही हो !"

"मग दुसरा एक मार्ग आहे. विश्वासनं जर तिला समजावून सांगितलं तरच ते शक्य होईल !"

"विश्वास ? अहो तो तर आम्हा सरकार लोकाना बदनाम करायलाच बसलेला आहे. तो काय तिला काय समजावून सांगतो ?"

"तुम्हाला विश्वासच्या स्वभावाची कल्पना नाही. म्हणून तसं म्हणता ! मी विश्वासला फार जवळून ओळखतो. त्याच्याइतकी

माणुसकीची जाण असलेला सामाजिक कार्यकर्ता मी अद्याप बघितलेला नाही. तो एकटाच तुम्हाला आणि मुराररावांना वाचवू शकेल!'

"असं म्हणता? मग त्याला भेटू मी?"

"होऽऽऽ आज संध्याकाळपर्यंत जर तुम्ही आणि मुराररावानी काही हालचाल केली नाही, तर मला चंपाची फिर्याद नोंद करून घेण्याचा हुकूम द्यावा लागेल!"

थंड झालेला चहा निळकंठरावानी तोंडाला कप लावून संपवला. आणि साहेबांचा निरोप घेऊन ते बाहेर पडले.

मुराररावानाही डी.एस्.पी. साहेबानी त्यांच्या कृत्याच्या घोर परिणामाची जाणीव दिल्याने ते तातडीनं चिंचलीला आले. पद्मावाईना भेटून ते म्हणाले,

"वहिनी फार मोठा घोटाळा झालाय्. चंपा माझ्याविरूद्ध दुर्गापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करणार म्हणते?"

"तुमच्या विरूद्ध? ती का म्हणून?"

"मी सरवडेकरांच्या बंगल्यात तिला डांबून ठेऊन तिचा गर्भपात केला म्हणून!"

"माय गॉड? पण भावोजी ही गोष्ट खरी आहे?"

मुरारराव मान खाली घालून म्हणाले, "होऽऽऽ त्या हरामखोराचा वंश घोपडेच्या कन्येनं वाढवू नये म्हणून मीच ते करवून घेतलं!"

"फार वाईट गोष्ट केलीत तुम्ही! त्या निष्पाप बालकानं तुमचा काय गुन्हा केला होता?"

"आता जे घडलं ते द्या सोडून! चंपाची समजूत घालायला हवीय्. फिर्याद देऊ नको म्हणून! ऐकलं तर ती फक्त तुमचं आणि त्या हरामखोराचंच ती ऐकेल!"

"हरामखोर? कोण? शिवराम?"

"तो नाही हो, विश्वास! आमचं घराणं बदनाम करायला तो टपलेलाच होता,.तो कसचा यावेळी आम्हाला मदत करणार? चंपानं

ऐकलं तर तुमचंच ऐकेल म्हणून तातडीनं तुमच्याकडं आलोय मी!"

पद्माबाईनी क्षणभर विचार केला आणि त्या म्हणाल्या,

"हे प्रकरण तुमच्यावर उलटेल याची तुम्हाला कशी काय कल्पना आली नाही?"

"काय सांगायचं तुम्हाला वैनी? मला वाटलं चंपाचं हळूहळू मतपरिवर्तन होईल!"

"भावोजी तिच्या पोटचा गोळा तुम्ही जन्माला येण्याआधी नष्ट केलात, वाईट गोष्ट केलीत. 'तुमच्यासारख्या अनुभवी पोलीस अधिकाऱ्याच्या हातून असं कसं घडलं?"

"सांगितलं ना, ते आता पुन्हा विचारू नका. आता माझ्यासोबत चला आणि चंपाला तेवढं समजावून सांगा!"

"ती माझं मुळीच ऐकणार नाही. आपल्याला विश्वासचीच मदत घ्यावी लागणार आहे!"

मुरारराव आले तेव्हा अमृतराव बाहेर गेलेले होते. ते बंगल्याकडे आले तेव्हा त्यानी दारासमोर उभी असलेली टॅक्सी बघितली. कोण आलं असावं, याचा अंदाज करीत ते दिवाणखान्यात आले. तो समोर पद्माबाईशी बोलत असलेले मुरारराव त्याना दिसले. प्रथेनुसार त्यानी मुराररावाना मुजरा केला. मुराररावानीही अर्धवट उठून त्या मुजऱ्याचा स्वीकार केला.

"आज टॅक्सी आणली? तुमची जीप कुठं गेली?"

"जीप आहे शिरगांवातच!"

"बरं, चंपा काय म्हणते? आलीय का आता ताळ्यावर?"

अमृतरावाना काय प्रकार घडलेला आहे याची कल्पना नसल्याने ते नेहमी प्रमाणेच बोलत होते. "मग शिवराम किती वर्षं खडी फोडायलं जाणार?" अमृतरावांनी विचारलं त्यावर मुरारराव म्हणाले,

"तो मुळीच जाणार नाही खडी फोडायला जायची माझ्यावरच वेळ आलीय्."

"दादा असं काय वेड्यासारखं बरळता?"

"आता वेड लागायचंच तेवढं बाकी राह्यलंय् अमृतराव! चला वैनी आता वेळ दवडून उपयोग नाही. डी.एस्.पी.नी आज संध्याकाळपर्यंतच ती संधी दिलीय्!"

अमृतराव म्हणाले, "काय बोलता तुम्ही? मला काही समजेनासं झालंय्?"

"समजेलेलं नाही तेच बरं आहे. नाहीतर तुम्हीही स्वत:चं स्वास्थ्य गमावून बसाल! चला वैनी आवरा लवकर!"

अमृतराव 'आ'वासून बराचवेळ मुराररावांच्याकडं पहात राह्यले.

पद्माबाई आत जाऊन साडी बदलून आल्या. अमृतरावाना म्हणाल्या,

"मी दुर्गापूरला चाललेय्! भावोजींचं काम होईपर्यंत मला तिथंच थाबावं लागेल!"

"मीही येतो की सोबत! माझंतरी इथं काय काम आहे?"

"नको, तुम्ही बिलकूल येऊ नका तुमच्या येण्यानं कदाचित् अधिकच गुंतागुंत होईल!" पद्माबाई म्हणाल्या.

"हो मलाही तसंच वाटतंय!" कोटाची बटणं चाळवत मुरारराव म्हणाले.

टॅक्सी निघून गेल्यावर अमृतराव बराच वेळ नेमकं काय घडलं असावं याचा अंदाज करीत राहयले. जे घडलं होतं. त्याना त्याचा अंदाज करता येणंच अशक्य होतं. सिगारेट शिलगावून काहीसे.अस्वस्थ झालेले अमृतराव झुरके घेत राहयले.

मुरारराव आणि पद्माबाई दुर्गापूरला आले. चंपाला महिलाश्रमात ठेवण्यात आले होते. ज्या मॅजिस्ट्रेटसमोर तिला हजर करायचं होतं ते मॅजिस्ट्रेट दोन दिवस रजेवर होते.

"भावोजी विश्वास आता कुठं असेल याची चौकशी करायला हवी!"

"त्याचं सिंधू चौकात ऑफीस आहेत, तिथं समजेल कुठं आहे तो!"

"मग तिकडेच प्रथम जाऊ!"

"ठीक आहे."

दुर्गापूरात सिंधू चौक नावाचे मध्यवर्ती ठिकाण होते. तेथे एका जुनाट इमारतीत तिसऱ्या मजल्यावर विश्वासचे ऑफीस होते.

मुराररावानी टॅक्सी ड्रायव्हरला चौकशीसाठी धाडले. ड्रायव्हर खाली येताना विश्वासला सोबत घेऊनच आला.

टॅक्सीत पद्माबाई आणि मुराररावाना पाहून त्यानां तिथं येण्याचं कारण विश्वासनं ओळखलं. रिवाजाप्रमाणे त्यानं पद्माबाईना वाकून नमस्कार केला.

"विश्वास, गाडीत बस, जरा तुझ्याशी महत्वाचं बोलायचं आहे." गाडीत बसताना विश्वासनं मुराररावांच्याकडं एक ओझरता दृष्टिक्षेप टाकला आणि तो म्हणाला,

"मला वाटतं ज्या कारणासाठी आपण माझ्याकडं आलेले आहात. त्यांबाबतीत मला काही करता येईलसं वाटत नाही! चंपा अतिशय प्रक्षुब्ध अवस्थेत आहे."

गाडी सुरू झाल्यावर पद्माबाई म्हणाल्या, "अरे पण मी काय म्हणते ते तरी ऐकून घे!"

"बोला."

"भावोजींच्यावर चंपानं गर्भपाताबद्दल जर फिर्याद दाखल केली तर त्यांच्या नोकरीवर गदा येईल."

"हा विचार यानी अगोदर करायला हवा होता. आश्रमशाळेतून तिला घेऊन गेल्यानंतर मी याना सांगितलं होतं, चंपाला दिवस गेलेले आहेत. तुम्ही आता तिला कसलाही त्रास देऊ नका, त्यावेळी हे मला काय म्हणाले ते त्यानाच विचारा नां?"

मुरारराव निर्विकार दिसत होते ते काहीच बोलत नव्हते..

विश्वास म्हणाला, "ते म्हणाले माझ्या कुळाला बट्टा लावणाऱ्या प्रत्येकाला मी संपवणार आहे! मी चंपाला आणि शिवरामला आश्रय दिला म्हणून माझ्यावरही यांनी खोटी फिर्याद दाखल केली होती. असा 'जुलूम' फार काळ चालत नसतो. आमच्या साम्राज्यावर कधीही सूर्य मावळत नाही असं उन्मत्तपणे म्हणणाऱ्या इंग्रज सरकाराला भारत सोडून जावे लागले. संस्थानी जमान्यात नागरिकांना कस्पटासमान मानणाऱ्या राजे रजवाड्याना आपली संस्थानं गमवावी लागली! मुराररावाना मुळांत घराण्याचा अभिमान. त्यांत पोलीस खात्याची सत्ता त्यामुळं त्याना कोणाच्याही भावनेची कदर करण्याची आवश्यकता भासत नव्हती. शिवराम मागास आणि गरीब, कुळात जन्मलेला असला तरी तो अतिशय सद्गुणी आहे. चंपाचं त्याच्यावर प्रेम होतं, पण तरीही त्यानं मुराररावांचा रोष पत्करणं आपल्याला जड जाईल याची तिला वारंवार कल्पना दिली होती. पण शेवटी चंपानंच पळून जाऊन लग्न करण्याचा निर्णय घेतला. 'तू न येशील तर मी आत्महत्या करीन' असं तिनं स्पष्ट सांगितलं तेव्हाच तो तयार झाला होता. चंपा सज्ञान आहे, ती स्वत:च्या इच्छेनुसार कोणाशीही कायदेशीर लग्न करू शकते. तिनं तो शिवरामशी केलेला आहे. तीस वर्षे पोलीस खात्यात काम करणाऱ्या मुराररावाना कायदा काय आहे हे पूर्णतया ठाऊक होतं, तरीही घराण्याच्या खोट्याप्रतिष्ठेमुळं त्यानी कायदा हातात घेतला. आता त्याना त्यांच्या कृत्याची फळं भोगावीच लागतील!"

मागे बसलेले मुरारराव ते सर्व ऐकून चकार शब्द बोलत नव्हते. त्यांच्या दृष्टीने घराण्याची अब्रू केव्हाच चव्हाट्यावर आलेली होती, आता चंपानं त्या प्रकरणांत जर मुराररावांच्याविरुद्ध फिर्याद नोंदवली तर मुराररावाना अटक होणार होती. ते स्वत: पोलीस खात्यात अधिकारी आहेत म्हणून त्यांना कसलीही सवलत मिळणार नव्हती. आणि ती केस जर कोर्टात गेली तर प्रत्यक्ष मुलगीच बापाविरुद्ध साक्ष देणार होती. मुलीनं बापाविरुद्ध कोर्टात शपथप्रतिज्ञेवर दिलेली साक्ष

जर कोर्टानं ग्राह्य मानली तर मुराररावाना तुरुंगात जावं लागणार होतं. यातून सुटकेचा एकमेव मार्ग होता आणि तो म्हणजे चंपानं ती फिर्याद न देणं!

आयुष्यभर घराण्याची प्रतिष्ठा, सतत जपणाऱ्या मुराररावांची स्थिती शोचनीय झाली होती.

गाडी दुर्गापूरच्या पूर्वेला असलेल्या दुर्गामंदिराच्या टेकडीकडं आली. पद्माबाईंनी टॅक्सी ड्रायव्हरला बाजूला जाऊन थांबायला सांगितलं. पुढे बसलेल्या विश्वासच्या खांद्यावर हात ठेवून त्या म्हणाल्या, " विश्वास, मी तुला हात जोडते, तू चंपाला समजावून सांग, फिर्याद दिल्यानं जन्मदात्याबापाला शिक्षा होईल. पण त्यामुळं तुझं मूल काही तुला मिळू शकणार नाही!"

"ते तर खरं आहेच. पण या गोष्टीची मी या फौजदार साहेबाना संपूर्ण कल्पना दिलेली होती."

""मागचं काही आता काढू नको, माझ्यासाठी एवढं कर, चंपाची समजूत घाल!"

"घालतो, पण एका अटीवर!"

"बोल!"

"शिवरामची यानी माफी मागायला हवी! दुसरं त्याच्याविरूद्ध दिलेली फिर्यादही काढून घ्यायला हवी!" इतकावेळ असहाय्य होऊन ती चर्चा ऐकणारे मुरारराव म्हणाले, " ती केस मला काढून घेता येणार नाही!"

"का?"

"कायद्यात तशी तरतूद नाही!"

"याचा अर्थ तुम्ही शिवरामाविरूद्ध दिलेली फिर्याद केस घेऊन कोर्टात जाणार आणि तुमच्याविरूद्ध दिलेली फिर्याद पोलिसानी नोंद न करून घेताच काढून टाकायची? हा भला न्याय आहे?"

हात हवेत अडवून विश्वास म्हणाला, "वैनी तुमच्यासाठी मी काहीही करायला तयार आहे. पण या फौजदार साहेबानी शिवरामची माफी मागितल्याशिवाय मी या प्रकरणात लक्ष घालू इच्छित नाही!"

"अरे असं करू नको विश्वास!"

"जाऊ द्या वैनी, त्याला नका हात जोडू, मला काय व्हायचं आहे ते होऊ दे!"

मुरारराव आपल्या गुर्मीत म्हणाले,

"नाही भावोजी असं नका बोलू! हा काय म्हणतो ते नीट ऐकून घ्या, तुम्ही शिवरामविरूद्ध दिलेली फिर्याद जर कोर्टात जाणार असेल तर हा चंपाला तुमच्याविरूद्ध फिर्याद देऊ नको असं कसं सांगेल? हा साधा व्यवहार आहे! एका हातानं द्यावं आणि दुसऱ्या हातानं घ्यावं हा जगाचा न्याय आहे!"

"पण वैनी मी ३६६ कलमाखाली शिवरामविरूद्ध दिलेली फिर्याद मला आपसात करता येणार नाही. कायद्यात तशी तरतूद मुळीच नाही!"

"फौजदारसाहेब मला कायदा चांगला समजतो. ती केस 'कंपौंडेबल' नाही हे मलाही ठाऊक आहे. पण तुम्ही शिवरामची प्रथम माफी तर मागा!"

"समज माफी मागितली आणि नंतर कोर्टात केस गेली तर?"

"तुम्ही शिवरामची माफी मागितल्यानंतर पोलीस तपासात पुरवणी जबाब द्या, ती फिर्याद गैरसमजुतीने दिलेली होती असा! शेवटी खटला कोर्टात पाठवणं किंवा न पाठवणं हे 'इन्व्हेस्टिगेशन' करणाऱ्या अधिकाऱ्याच्या मनावर अवलंबून असते. कोर्टात खटला पाठवून तो शाबित होणार नाही असा सिनियर पोलीस प्रॉसिक्युटरचा अभिप्राय घेणं काही कठीण नसतं. इतकंच नव्हे तर नोंद झालेले अनेक खटले शासनामार्फत काढूनही घेता येतात. मी स्वत: वकील नसलो तरी दोन वर्षे कायद्याच्या अभ्यास केलेला आहे!"

"ते मला ठाऊक आहे विश्वास पण आता झालं गेलं विसरू या, कायद्याच्या कचाट्यातून काहीतरी मार्ग काढू, दाजीसाहेबाना यातून

वाचवणं जरूरीचं आहे!" पद्माबाई विनवणीच्या स्वरांत म्हणाल्या.

"याना जोपर्यंत पश्चाताप होत नाही, तोपर्यंत यातून काही मार्ग निघेल असं मला वाटत नाही!"

"मी तुझी माफी मागते!"

"तुम्ही माझी माफी मागून काय उपयोग आहे? यानी शिवरामची माफी मागायला हवीय!"

पद्माबाईनी मुराररावांच्याकडं पाह्यलं आणि विचारलं, "काय करायचं?"

काही क्षण विचार करून मुरारराव शेवटी एकदा म्हणाले,

"ठीक आहे."

मुराररावानी शिवरामची बिनशर्त माफी मागितली. चंपानं आपला वडिलानी गर्भपात केल्याची फिर्याद दाखल केली नाही. नंतर मुराररावानी आपण शिवरामविरूद्ध दिलेली फिर्याद गैरसमजुतीने दिली होती असा शेलार फौजदारापुढे जबाब दिला. चंपा सज्ञान असल्यामुळे ती आपल्या इच्छेच्या कोणाही तरुणाबरोबर विवाह करू शकते. या सदराखालीं सरकारी वकिलानी ती केस कोर्टांत पाठवू नये असा अभिप्राय दिला.

शेवटी एकदाचं मुराररावांच्या नोकरीवरचं, आणि प्रतिष्ठेवरचं संकट टळलं.

या साऱ्या प्रकरणामुळे घोरपडेच्या घरात थोडं समाधान आलं. मीनलला मात्र मनातून थोडं वाईट वाटलं. श्रीरंगची अन् आपली ताटातूट करणाऱ्या काकाना जरा 'झटका' बसायला हवा होता असंच तिला सतत वाटत होतं.

२२.

चंपा प्रकरणाचा धडा घेऊन पद्माबाईनी लवकरात लवकर मीनलचं

लग्न करून टाकायचं ठरवलं. त्यासाठी त्यानी उज्जैन, इंदोर, ग्वाल्हेर, देवास, कोल्हापूर या ठिकाणी वर संशोधनाची मोहीम काढली. घोरपड्यांच्या खानदानीशी मिळतीजुळती अशी काही घराणी त्या भागात होती. खरं तर स्वत: अमृतरावानीच हे कार्य हाती घेणं जरूरीचं होतं. पण अमृतरावांचं व्यक्तिमत्व त्याला पोषक नव्हतं. त्याच्याजवळ स्वत:च्या घराण्याच्या वंशावळीशिवाय दुसरं काहीच बोलण्यासारखं नव्हतं. अमृतराव पद्माबाईच्या समवेत जायचे, पण ते आपले उतरलेल्या ठिकाणी दिवसभरं धुम्रपान करायचे आणि सूर्यास्त झाला की बाटली उघडून बसायचे. या कामासाठी एकट्या पद्माबाईच बाहेर पडल्या असे कोणी म्हणू नये म्हणून त्या अमृतरावाना सोबत नेत इतकंच!

ग्वाल्हेरच्या दाभाडे घराण्यातील सत्यजितसिंह हा मुलगा त्यानी पसंत केला. सत्यजितसिंहाचे आजोळ दुर्गापूर असल्याने घरच्या वडील मंडळीनाही चिंचलीकर घोरपड्याशी आपली सोयरीक जमली तर बरे असे वाटले.

सत्यजितसिंह ग्रॅज्युएट होता. ग्वाल्हेरमध्ये त्यांचे पंचतारांकित हॉटलेच्या दर्जाचे एक हॉटेल होते. त्या हॉटेलचा कारभार स्वत: सत्यजितसिंह पहात होता. त्याला उत्तम व्यक्तिमत्व होते. लहानपणापासून त्याला टेनिसची आवड होती. व्यवसायात पडल्यानंतर देखील तो नित्यनियमाने ग्वाल्हेरच्या रेसिडेन्सी क्लबवर टेनिस खेळायला जायचा. शिकार आणि टेनिस हे त्याचे आवडीचे छंद होते. त्याला फक्त एकं लहान बहीण होती. पण ती जन्मत:च मंदबुद्धी असल्यामुळे त्या घराण्याचा तो एकमेव असा वारस होता.

पद्माबाईनी येताना सोबत मीनलचे फोटो आणले होते. मीनलला पाकशास्त्राची थोडी आवड होती. पण पद्माबाईनी ती पाहुणेमंडळीना अधिक खुलवून सांगितली.

'काय सांगायचं तुम्हाला, मी कुठे बाहेरगावी असले आणि घरी

दहावीस पाहुणे आले तरी आमची मीनल कोणाच्याही मदतीशिवाय अर्ध्यातासात जेवण बनवते. राजस्थानी, मुगलाई, पंजाबी जेवण तर ती उत्तम बनवंतेच पण त्याचबरोबर 'इंचिलाडा' सारखे मेक्सिकन् पदार्थही बनवते. परवा आमच्याकडे काही इटालिएन पाहुणे आले होते, त्यादिवशी आमच्या मीनलने जो 'पिझ्झा' बनवला होता तो तिने बनवला हे पाहुण्याना खरेच वाटेना! निरनिराळे चायनीज सूप्स्, चिकन चाऊ चाऊ, रोल्स्, फ्राईडराईस हे प्रकार बनवण्यात तिचा अगदी हातखंडा!"

स्वत:च्या घरचे हॉटेल असलेल्या दाभाड्याना पाकशास्त्रनिपुण अशी सून मिळाल्यास सत्यजितसिंहाला आपल्या व्यवसायात तिचीही मदत होईल असे वाटले. दाभाड्यानी चिंचलीला येऊन प्रत्यक्ष मुलगी बघायचा निर्णय घेतला.

चिंचलीला परतल्यानंतर पद्माबाई मीनलला म्हणाल्या–

"परवा तुला पहायला ग्वाल्हेरचे पाहुणे येणार आहेत!"

"मला इतक्यात लग्न करायचं नाहीए!"

"म्हणजे?"

"मी तुम्हाला पुन्हा स्वच्छ मराठीतून सांगते, मला इतक्यात लग्न करायचं नाही! समजलं?"

"पण त्याचं कारण सांगशील की नाही?"

"कारण ऐकायचंय् का? मला ग्रॅज्युएट झाल्याशिवाय लग्न करायची इच्छा नाही."

"लग्न झाल्यावर तू ग्रॅज्युएट होऊ शकशील मीनल! पुन्हा असं खानदानी घराणं मिळणार नाही. सत्यजितसिंह अतिशय चांगला मुलगा आहे, शिवाय एकुलता एक आहे!"

"ते काही असो! गेला महिनाभर तुम्ही आणि आबा वरसंशोधनाची मोहीम करता आहात, पण जाण्यापूर्वी माझी संमती तरी घ्यायची!"

"आपल्या घराण्यात मुलीची संमती घेण्याची प्रथा नाही मीनल!"

किंचित् आवाज चढवून पद्माबाई बोलल्या.

"मग मी काय बोलते तेही ऐका, जमाना बदलला आहे. तुम्ही पसंत केलेला मुलगा लाख चांगला असेल, पण मला लग्न करायचं आहे की नाही हे अगोदर विचारणं तुमचं कर्तव्य होतं!"

"मीनल, जीभ आवरून बोल, कर्तव्याची भाषा माझ्यासमोर करतेस?"

"का करू नये? विक्रमदादानं अमिताला पसंत केली, तिच्याशी लग्न करणार म्हणून त्यानंच प्रथम कळवलं होतं, त्याला हे स्वातंत्र्य आहे, आणि मी मुलगी म्हणून मला नाही? म्हणे घराण्यात मुलींची संमत्ती घेण्याची प्रथा नाही! मां साहेब, पुन्हा सांगते, मला इतक्यात लग्न करायचं नाही!"

"तू लग्न करायचं का नाकारते आहेस हे मलाही समजतंय मीनल!"

"काय समजलंय तुम्हाला?"

"तुला श्रीरंग आवडलाय्, त्याच्याशी डेअरीत गुलूगुलू बोलायचीस्, पण लक्षात ठेव श्रीरंग आमच्या आश्रिताचा मुलगा आहे, तो कुणबी आहे, आपण उंचकुळातले जहागिरदार आहोत, राजेरजवाड्याशी आपल्या घराण्याचे संबंध आहेत, आम्हाला ती परंपरा सोडायची नाही!"

"कर्नल ओबेरॉय् तुमच्या खानदानीत बसतात का?"

"विक्रम मुलगा आहे, मुलानं काही केलं तरी चालतं, पण आपल्यात मुलीना ते स्वातंत्र्य नसतं. तू श्रीरंगचा विषय डोक्यातून काढून टाक! तो आता इथं नाही, शिवाय लवकरच त्याचंही लग्न होणार आहे. त्याच्या मामाच्या मुलीशी! दौलत हवालदार एक पंधरा दिवसांत श्रीरंगला आपला जावई करून घेणार आहे."

"मला सगळं समजतं, प्रथम तुम्ही मुरारकाकांच्याशी संधान बांधून

त्याला इथून उचलला त्याची पोलिसात भरती केलीत, माझ्याशी त्याचा संपर्क राहू नये म्हणून मुरारकाकानी शिरगांव पोलीस ठाण्यालाच त्याची नेमणूक करून घेतलीय! आता तुम्ही लोकानी त्याचं जबरदस्तीनं लग्न करायचं ठरवलंय्. तुमची सगळी कारस्थानं समजतात मला."

आतामात्र पद्माबाई काहीशा प्रक्षुब्ध झाल्या. आणि ओरडून म्हणाल्या,

"बेशरम, लाज नाही वाटत असं बोलायला? म्हणे आम्ही कारस्थान करतो?"

"मग हे कारस्थान नव्हे तर काय? बायजाला म्हणे नातवाचं तोंड पहायचंय् डोळे मिटण्यापूर्वी! पण श्रीरंगच्या मनाची आजपर्यंत कोणी पर्वा केलीय् का? त्याला प्रतिष्ठेची अशी ती निंबोतची कुस्ती जिंकायची आहे. मला काही त्याच्याशी लग्न करायची घाई नाही झालेली. मलाही ग्रॅज्युएट व्हायचंय्!"

ते ऐकून पद्माबाई थोड्या शांत होत म्हणाल्या, "माझं ऐक मीनल, खूप मुली लग्न झाल्यानंतर शिकतात. सत्यजितसिंहानाही शिक्षणाबद्दल आस्था आहे. तुलाही ते लग्नानंतर बी.ए.पर्यंत शिकवतील! हवं तर तुझं कॅटरिंग कॉलेजमधे नावही घालतील. तुलाही पाकशास्त्राची आवड आहे."

"हो, हे सगळं खरं, पण मला अजून दोन वर्षे लग्न करायचं नाही समजलं?"

"मी सांगते त्यापैकी एक ऐक, परवा दाभाड्यांची मंडळी येतील, तू सत्यजितसिंहाना बघ, हवं तर तुम्ही दोघं एकमेकाशी थोडा वेळ बोला. तुला सत्यजितसिंह आवडले नाहीत तर मात्र मी काही अट्टाहास करणार नाही, मग तर झालं?"

"ठीक आहे!"

ठरल्याप्रमाणे ग्वाल्हेरवरून दाभाडे कुटुंबिय आले. घोरपड्यांचा बंगला, शेरीबाग, बागेतल्या तुडुंब पाण्यानं भरलेल्या विहिरी, कॉलि

फ्लॉवर, कोबी, नवलकोल, टॉमेटोपासून ते भेंडी गवारीपर्यंतच्या रसरशीत भाज्या, डेअरीतल्या धष्टपुष्ट गाई म्हशी पाहून दादासाहेब दाभाडे म्हणाले, "हा सारा व्याप पद्मावाई तुम्ही एकट्या कशा काय सांभाळता? आश्चर्य आहे!"

पद्मावाई विनम्रपणे म्हणाल्या, "बालपणापासूनच मला शेतीची आवड आहे. तिकडं नगरदेवाळयाला आमच्या केळीच्या बागा होत्या, वडिलांच्या सोबत दिवस दिवसभर मळयातच मुक्काम असायचा माझा! पण आमच्या भागात पाण्याचं तसं थोडं दुर्भिक्षच! इकडं तसं नाही. आमच्या इथल्या विहिरीना भरपूर पाणी असतं!"

"पाणी खूप लोकांच्या विहिरीना असतं हो, पण त्या पाण्याचा वापर करण्याची अक्कल कितीजणाना असते?"

"अगदी बरोबर बोललात, आमच्या भागात आताही साखर कारखान्याचं पेव फुटलंय् त्यामुळं जो तो ऊस करतो. पण या मूर्ख लोकाना ठाऊक नाही की वारंवार ऊसाचं पीक घेतल्यामुळं दहा पंधरा वर्षानंतर या जमिनी हळूहळू नापिक होत जाणार आहेत. जमिनीला एकदा का मीठ फुटलं की पुढं पन्नासवर्षे त्या जमिनीत काहीही पीक घेता येत नाही! गणेशपूर जिल्ह्यात कृष्णाकाठची हजारो एकर जमीन मीठ फुटल्यानं नापिक झालीय्! त्या गावचे जमीनदार पोट भरण्यासाठी गावोगाव पांगले आहेत."

त्यांची अशी शेतीविषयक चर्चा चालू असताना बंगल्याच्या गच्चीत मीनल आणि सत्यजितसिंह बोलत उभे होते.

पद्मावाईना आत्मविश्वास होता, मीनल सत्यजितसिंहाला पसंत करणार. आणि खरंच त्याला नापसंत करण्यासारखं त्याच्यात काहीही नव्हतं. सव्वापाच फूट उंच, गोरा गव्हाळी रंग, भव्य कपाळ, बाणासारखं सरळ नाक, तेजस्वी, आत्मविश्वास व्यक्त करणारे डोळे, बोलण्यात कमालीची विनम्रता, यामुळं प्रथम भेटीतच त्याची समोरच्या माणसावर छाप पडत असे.

दुपारी गप्पा मारत जेवणं झाली. जेवायला शेजारी शेजारी बसलेले सत्यजितसिंह आणि मीनल मनमोकळेपणानं बोलत होते.

मंडळी निरोप घेऊन गेल्यानंतर पद्माबाईनी मीनलच्या खांद्यावर हात ठेवून तिला विचारलं.

"कसे वाटले सत्यजित?"

"कल्पनेपेक्षा चांगलेच आहेत!"

"मग मी उगाच नव्हते सांगत! लग्नानंतर तुला शिकवण्याची तयारी आहे असं म्हणाले की नाही?"

"होऽऽऽ म्हणाले ना!"

"माझी पसंती अशी तशी नसते याची आता तरी खात्री पटली का?"

"होऽऽ! पटली ना!"

पद्माबाईनी खुषीत येऊन मीनलला गळ्याशी लावून घेतलं. त्यांचा ऊर आनंदानं भरून आलेला होता.

आठ दिवसानंतर दाभाड्यांचं नकाराचं पत्र आलं. पद्माबाई कमालीच्या अस्वस्थ झाल्या. मीनलनं सत्यजितसिंहाला पसंत करूनही त्यानी तिला का नाकारावं हे काही केल्या त्याना समजेना.

मीनल मात्र या पत्रामुळे खूषीत होती. वरवर आपल्याला धक्का बसला असं पद्माबाईना ती भासवत होती.

"मीनल हे असं कसं झालं? जाताना दाभाडे वैनी मला म्हणाल्या देखील!"

"काय म्हणाल्या?"

"आता कार्याला उगाच उशीर नको, सत्यजितनं इतक्या मुली बघितल्या पण त्याला एकही पसंत पडली नाही. तुमच्या मीनलला बघता क्षणीच तो खुषीत होता!"

"हो ना! माझ्याशी गप्पीत फारच मनमोकळेपणानं बोलले ते! माझ्या आवडीनिवडी त्यानी विचारल्या; आपल्या आवडी निवडी मला

सांगितल्या, गमतीनं मला म्हणाले देखील, आता तुझ्यावर हॉटेल सोपवून मला चारसहा दिवस निश्चिंत बाहेरगावी जाता येईल, गेली चार पाच वर्षे कुठं कुठं बाहेर जाता आलेलं नाही!"

"मग त्यांचा नकार का यावा?"

"मा, मला वाटतं चंपाचं प्रकरण त्यांच्या कानावर गेलेलं असावं!" मीनल गंभीर होऊन म्हणाली.

पद्माबाई चिंताग्रस्त होत्या., त्या काहीशा गंभीर होत म्हणाल्या, "ती शक्यताही नाकारता येत नाही! मुरारदाजींनी कारण नसताना ते प्रकरण चव्हाट्यावर आणलंय!"

"शिवराम आणि विश्वासदादा या दोघाविरूद्ध फिर्याद देण्याचं कारणच नव्हतं! आता शेवटी ते प्रकरण त्याना मिटवावं लागलंच ना?"

"मीनल, काय घडलं असावं ते आज़ मला निश्चित सांगता येत नाही. पण हे आपलं फार वाईट झालं. असं सधन, सुशिक्षित आणि खानदानी घराणं मिळणं दुर्मिळ! मी पुन्हा एकदा ग्वाल्हेरला जाऊन त्याना समक्ष विचारून तरी येऊ का?"

"नको मा! आपल्याला त्यात कमीपणा आहे! तुम्ही पुन्हा त्यांच्या दारी जाणं मला पसंत पडणार नाही!"

"मला काय करावं समजेनासं झालंय मीनल! या गधड्या चंपानं निदान तुझं लग्न होईपर्यंत तरी असा मूर्खपणा करायला नको होता!"

पद्माबाईचा हात हातात घेत मीनल म्हणाली, "मा, आता उगाच मनःस्ताप नका करून घेऊन माझं लग्न करायचाच निर्णय तुम्ही घेतला आहात तर तुम्ही दुसरी स्थळं पहायला माझी काही हरकत नाही!"

"अग मीनल, इथं जवळपास असलेल्या, घराण्यात सर्वांना हे चंपाचं प्रकरण समजलेलं आहे म्हणून मी तिकडं ग्वाल्हेरला जाऊन हे स्थळ शोधून आले होते, तर त्यानासुद्धा हे समजावं हे दुर्दैव आहे!"

"जाऊ द्या, आता तो विचार मनातून काढून टाका! मी जरा कॉलेजकडं जाऊन येते."

"ये, घरात बसून तरी काय करायचंय्!"

मायलेकींचं बोलणं चालू असताना सिगारेटचे झुरके घेत अमृतराव तिथं आले. त्यानी विचारलं–

"कसली चर्चा चाललीय एवढ्या गंभीरपणानं?"

"तुमच्या पुतणीचे प्रताप!"

"पुतणीचे प्रताप? छबूसुद्धा पळून गेली काय?"

"तिनं पळून जावं ही इच्छा का करता? एक गेली तिनं एवढा हाहाकार उडवलाय, दुसरीही गेली म्हणजे जगाला तोंड दाखवायला जागाच उरणार नाही. तुम्हाला कसल्या जबाबदारीची जाणीव नाही. मीच आपली सगळ्या जबाबदाऱ्या पेलून मरते आहे!"

"अहो पण झालं काय ते तरी सांगाल की नाही?"

"दाभाड्यांचं ग्वाल्हेरवरून पत्र आलंय्, नकाराचं!"

"नकाराचं?"

असं म्हणून सिगारेटचा पुन्हा एक मोठा झुरका घेऊन अमृतराव म्हणाले "जाऊ द्या, दाभाडे गेले उडत!.अशी छप्पन स्थळं मीनलसाठी येतील! अमीर-उल-मुल्क घोरपड्यांची कन्या म्हणजे काय साधीसुधी आहे का?"

त्यांच्या वक्तव्याने प्रक्षुब्ध झालेल्या पद्माबाई अमृतरावांच्याकडं तुच्छतेनं पहात उद्गारल्या, "या पदवीशिवाय तुमच्याजवळ दुसरं काय आहे? आज काल या जगात तुमच्या पदव्याकडं कुत्रंसुद्धा ढुंकून पहात नाही."

"मा मी जाते हं!"

मीनलला त्या चर्चेत बिलकूल रस नव्हता. ती माडीवर आपल्या खोलीत आली. टेबलाखालच्या कापडाखाली श्रीरंगचा छोटा फोटो होता. तो हातात घेऊन फोटोवर ओठ टेकवून ती स्वत शीच म्हणाली.

"माझा डाव सफल झाला!" मला आता सत्यजितना आभाराचे पत्र पाठवायलाच हवे!"

मीनलला गच्चीत सत्यजितसिंहाशी झालेलं तिचं संभाषण आठवलं. ती सत्यजितसिंहाला म्हणाली.

"खरं तर कोणाही मुलीनं अगदी डोळे झाकून तुमचा स्वीकार करावा असं तुमचं व्यक्तिमत्व आणि स्वभाव आहे. पण माझी आपल्याला एक विनंती आहे!"

"कोणती?"

"परत गेल्यानंतर तुम्ही मला नाकारल्याचं पत्र पाठवावं!"

"का?"

"कारण सांगितलं तर राग नाही ना येणार?"

"मुळीच नाही येणार! जरूर सांगा?"

"माझं आमच्या गावातल्या एका तरुणावर प्रेम आहे. श्रीरंग त्याचं नाव! मांनी आणि मुरारकाकानी कारस्थान करून त्याला इथून बाहेर जाणं भाग पडलंय!"

"कुठं गेला तो?"

"त्याला काकानी पोलिसात भरती केलाय, सध्या शिरगांव पोलीस ठाण्यात त्याची नेमणूक झालीय्, मुरारकाकाच त्या पोलीस ठाण्याचे फौजदार आहेत! आता त्याच्या आईला हाताशी धरून त्याचं लग्न करून टाकायचं कारस्थान सुरू आहे!"

बोलताना मीनलचे डोळे भरून आले होते. सत्यजित म्हणाले—

"मीनल, वाईट वाटून घेऊ नका, मी तुमची ताटातूट करणार नाही!"

मीनल डोळे पुसत म्हणाले, "तुमच्या डोळयातूनच मला तुमचा दिलदार स्वभाव समजला. म्हणून मी हे धाडस केलं"

"पण तुमच्या घरी त्या श्रीरंगबद्दल विरोध का?"

"तो गरीब घराण्यातला आहे.

आमच्यात घराण्याचा अभिमान बाळगणारी एकजात सारी मंडळी आहेत!"

"जग इतकं झपाट्यानं बदलत असताना अजूनही घराण्याचा अभिमान? गंमत आहे!"

"अहो काय सांगायचं तुम्हाला. मुरारकाकांच्या दोन मोठ्या मुली घरी होत्या. छबूताई सत्तावीस वर्षाची तर चंपा पंचवीस वर्षाची. त्या दोघी दिसायलाही छान आहेत. पण आमच्या काकानी त्या मुलीना आलेली दहावीस स्थळं नाकारली. का तर आपल्या खानदानीत पदर लागत नाही म्हणून! परवा चंपा गेली पळून, शिवराम नावाच्या एका अगदी गरीब तरुणाबरोबर! काकानी खूप आग पाखडली! चंपानं शिवरामशी लग्नही केलं, ती दोन अडीच महिन्याची गरोदर असताना काकानी तिला आपल्या ताब्यात घेऊन तिचा गर्भपात करवला! चंपा त्यांच्याविरुद्ध फिर्याद देणार म्हटल्यावर मात्र काका टरकले. विश्वास नावाचे एक सामाजिक कार्यकर्ते आहेत आमच्या भागात. त्यानी चंपाची समजूत घालून प्रकरण मिटवलं. काकाना शिवरामची माफी मागावी लागली शेवटी!"

"बरेच कारस्थानी दिसतात हे मुरारकाका! तरीच तुमच्या वडिलानी मघाशी बोलता बोलता आमचे एक बंधू फौजदार आहेत असा उल्लेख करताच तुमच्या मांनी त्याना डोळ्यानी दटावल्याचं माझ्या लक्षात आलं होतं."

"त्याचं कारण तेच! तसे आमचे आबा थोडेसे भोळसट आहेत! मांचे आणि त्यांचे नेहमीच मतभेद होतात, पण घराण्याच्या प्रतिष्ठेचा सवाल निघाला की मांचे आणि आबांचे मतभेद क्षणात मिटतात.".

"गंमत आहे की! तुम्ही लोकानी बाहेरचं जग बघितलेले दिसत नाही. आमच्या मध्यप्रदेशांशा असल्या जुनाट विचारांची मंडळी आता फारशी उरलेली नाहीत. खुद्द ग्वाल्हेरमध्ये आमच्या नातेवाईकानी 'इंटरकास्ट मॅरेजेस' केलेली आहेत! माझ्या चुलत भावानं त्याच्या कॉलेजमधल्या ख्रिश्चन मुलीशी लग्न केलंय्. त्याला दोन मुलं आहेत संजीवनी भाभींचं आमच्या मांसाहेबाशी फारच जुळतं!"

इतक्यात खालून मीनलला हांक आली आणि ते दोघेही गच्चीवरून खाली आले होते. पण तेवढ्यात मीनलने आपला कार्यभाग साधला होता. आता तिला ते सारं घडलेलं आठवत होतं.

२३.

पोलिसात भरती झाल्यापासून श्रीरंगमध्ये झपाट्यानं बदल होत गेला. आता महिन्याकाठी हातामध्ये हजारभर रुपये येत होते. पूर्वी 'खुराकासाठी लोकाकडं हात पसरावा लागत होता. पण आता ती जरूर उरली नव्हती. शिरगावात जुनी तालीम होती. पहाटे उठून तो तालमीला जायचा. पाचशे जोर, हजार बैठका आणि डंबेल्सचा व्यायाम करून त्याचं शरीर पिळदार, मजबूत आणि आकर्षक बनलं होतं.

मुराररावनीही त्याच्या कुस्तीच्या षोकाला प्रोत्साहन द्यायचं ठरवलं होतं. पोलिसाना नोकरीमध्ये हजार प्रकारची कामं करावी लागत. मंत्र्याच्या बंदोबस्त, समन्स ड्युटी, आरोपी पार्टी, रात्रीची गस्त, अशा विविध प्रकारच्या कामावर कॉन्स्टेबल्स लोकांची नेमणूक होत असे. पण मुराररावानी श्रीरंगची नेमणूक शिरगांवला झाल्यापासून त्याला 'ऑफीस पाळी'चीच 'ड्युटी' दिली होती. त्यामुळं त्याला शिरगांव सोडूंन कुठे बाहेरगावी जावं लागत नसे. पहाटे व्यायाम झाल्यानंतर तो सकाळी नऊ साडेनऊच्या सुमारास ड्रेस घालून पोलीस स्टेशनला येत असे. संध्याकाळी साडेपाचला त्याची ड्युटी संपली की तो पुन्हा कुस्तीच्या सरावासाठी तालमीत जायचा. शिरगांवच्या तालमीत पांडू मास्तर नावाचा जुना अनुभवी मल्ल होता. तो श्रीरंगला कुस्तीतले डावपेच शिकवू लागला. एखादा प्रतिस्पर्धी जबरदस्त असेल तर त्याच्याची थोडीशी 'खडाखडी' झाल्यावर त्यांचा अंदाज घेणे, समोरून 'पट' काढून देत नाही म्हटल्यावर 'बगली डुबून' त्याला खाली घेणे, जमल्यास 'धोबीपछाड' डाव करून त्याला नामोहरम करणे, जमल्यास 'ढाक मारणे' किंवा

'छडी टांग मारणे' जेणे करून प्रतिस्पर्ध्याला खाली लोळण घ्यायला लावणे, ते सर्व डाव पांडू मास्तरने श्रीरंगला शिकवले. परवाच पांडू मास्तर त्याला म्हणाला, ''एकदा प्रतिस्पर्ध्याला खाली घेतले की मग त्याला 'घिश्शा मारून' किंवा 'घुटण्याचा डाव' करून खाली घ्यायचं, त्याची पुरती दमछाक झाल्यावर त्याची तंगडी धरून त्याला पाठीवर पाडून 'अस्मान' दाखवले की कुस्ती जिंकली! कधी कधी समोरचा पहिलवान खाली पडत नसेल तर त्याच्या लांगेला हात घालून त्याला खाली घ्यायचं, कुस्तीच्या जगतात मान्य असलेला एक महत्वाचा डाव आहे.''

पांडू मास्तरने प्रात्यक्षिक करून श्रीरंगला ते डाव शिकवले. महिपती वस्तादापेक्षा पांडू मास्तर अनुभवाने अधिक समृद्ध होता. लाहोर, लखनौ, उज्जैन, दिल्ली अशा ठिकाणी ऐन जवानीत त्यानं कुस्त्या केलेल्या होत्या. अलीकडं शिरगावातली तरुण पोरं सिनेमे, टी.व्ही पाहून हिजड्यासारखे केस वाढवून गावातून सिगारेटी बिड्या फुंकत हिंडतात म्हणून पांडू वस्ताद तरुण पिढीला शिव्या घालत असे. कधीतरी तालमीत एखाददुसरा मुलगा येऊन पाच पन्नास जोर बैठका मारून जायचा शिरगाव पोलीस ठाण्यात नव्यानं बदलून आलेला श्रीरंग मात्र खरोखरच कुस्तीवर मनापासून प्रेम करतो हे पाहिल्यावर पांडू मास्तर एकदम खुषीत आला.

बोलता बोलता एकदा श्रीरंग त्याला म्हणाला, ''मास्तर मला एकदा निंबोतला गुढीपाढव्याच्या दिवशी होणाऱ्या कुस्तीत भाग घ्यायचा आहे! माझ्या बापाचंसुद्धा तेच स्वप्न होतं पण ते पुरं होऊ शकलं नाही!''

श्रीरंगच्या गळ्यातली काळ्या दोऱ्यातली चांदीची पेटी हाताळीत पांडू मास्तर म्हणाला, ''अशी रोज तालीम करत राहयलास तर ते काही अशक्य नाही! खुराक काय घेतोस आता?''

"खुराकात आता काही कमतरता नाही मास्तर आठवड्यातून दोनदा 'आकनीचा सोप' घेतो, एक दिवस आड पाव किलो मटण तुपात शिजवून खातो, बदामाचा घोटा हस्त्यातनं दोन तीन वेळा होतोय्, खाण्यापिण्याची काही हयगय नाही करत, पण अलीकडं माझ्या आईनं माझं डोकं खाल्लंय!"

"का? काय म्हणते? कुस्ती करू नको म्हणते?"

"तसं म्हणत नाही! गळ्यात बायकोचा 'लोढणा' अडकवायचं म्हणते!"

"लग्न? अरे खुळा का शहाणा तू? लग्न झालं का पहिलवान संपलाच!"

"तेच काय करावं समजेनासं झालंय!"

"अरे आत्ता तर तू तेवीस चोवीस वर्षाचा आहेस आणि दोन तीन वर्षं थांब म्हणावं आईला!"

"दोन तीन महिने थांबायला तयार नाही ती! दोन तीन वर्षे कसली थांबतीय?"

"मग लेका आता यातनं मार्ग काय रे ?"

"तेच समजेनासं झालंय्!"

"तुझा फौजदार काय म्हणतो?"

"तेच म्हणतात लग्न झाल्यावरसुद्धा कुस्त्या करणारे बरेच पहिलवान आपण बघितलेत!"

"लग्न झाल्यावर, आणि कुस्ती? लेका त्यानी लगीन झाल्यावर कुस्ती करणारे पहिलवान बघितले असतील, पण ते तालमीत आणि मैदानात कुस्ती करत नसतील!"

"मग कुठं?"

पांडू वस्ताद मिस्कील हसत म्हणाला, "घरात गादीवर कुस्ती करत असतील!"

श्रीरंगला त्याच्या बोलण्यातली खोच समजली पण त्या विनोदावर न हसता तो म्हणाला, "वस्ताद, काल जमादारही मला म्हणाला!"

"कोण ? जयसिंग जमदाडे ? काय म्हणाला ?"

"दौलू हवालदार माझा मामा आहे. त्याची मुलगी शालन लग्नाची आहे. तिच्याशी लग्न करून घे म्हणतो एकसारखा !"

"तुझ्या लग्नाची जमदाडे का उठाठेव करतो ?"

"जमदाडेची आणि माझ्या मामाची थोडी ओळख आहे ! मामाही मला लहानपणापासून 'जावई' म्हणून हाक मारतो !"

"तुझं म्हणणं काय आहे ?"

"एवढी निंबोतची कुस्ती झाल्यावर लग्न करावं म्हणतो, पण तेही शालनशी नव्हे !"

"मग ? दुसरी कुठली पोरगी गटवून ठेवलास काय ?"

"गटवून असं नाही वस्ताद ! तिचं माझ्यावर प्रेम आहे ! पण आमचं लग्न होईलच याचा भरवसा नाही !"

"का बरं ?" मास्तराने विचारलं.

"तिचा बाप मोठा जहागिरदार आहे. मी त्याच्या दृष्टीनं अगदी खालच्या कुळातलं आहे, मी त्या मुलीवर प्रेम करतो म्हणूनच मला या नोकरीत अडकवलंय्, आमचे फौजदार मुरारराव घोरपडे आहेत ना त्यांची ती पुतणी !"

"बापरे ?" तोंडावर हात ठेवून पांडू मास्तर म्हणाला, "श्रीरंगा लेका फुकट मरशील ! विस्तवासंगट खेळू नकोस ! मला ते घोरपड्यांचं घराणं माहीत आहे ! जातीला बट्टा लागतो असं वाटलं तर तुला खलास करून टाकतील."

"परवाचं प्रकरण समजलं का तुम्हाला ?"

"कसलं रे ?"

पांडू मास्तरच्या कानाजवळ तोंड नेऊन श्रीरंगने 'चंपा-शिवरामचे' प्रकरण त्याला सांगितले. आणि शेवटी म्हणाला, "फौजदारांच्यावर डाव उलटत होता. पण विश्वासदादानं मन मोठं केलं आणि त्याना वाचवलं ! सरकारबाईनीसुद्धा खूप प्रयत्न केले !"

"सरकारबाई, एवढी गोरगरिबाची बाजू घेते म्हणतात, मग तुझ्याशी लेकीचं लग्न का नको म्हणते?"

"हे बघा, शेवटी मी त्यांच्या आश्रितांचा मुलगा! त्यांचे नातेवाईक राजघराण्यापर्यंत पोहचलेले! मला सुद्धा आपण त्यांच्या पोरीवर प्रेम करून चूक केली असं कधी कधी वाटतं!"

पांडू मास्तर टाळी वाजवून म्हणाला, "श्रीरंगा, तू म्हणतोस ते अगदी खरं आहे! आपण गरिबानी असल्या लोकाशी नातं जोडू नये! तुला वाटलंच लग्न करावं तर तुझ्या मामाच्या लेकीशीच करून घे!"

"आणि निंबोतची कुस्ती?"

पांडू वस्ताद व्यवहारी होता, तो क्षणभर विचार करून म्हणाला, "लग्न करायचं, पण लग्नापूर्वी कुस्ती झाल्याशिवाय बायकोला हात लावणार नाही ही अट घालायची!"

रात्रभर श्रीरंगला झोप लागली नाही. या कुशीवरून त्या कुशीवर होत तो तळमळत होता. मीनलने त्याच्यावर मनापासून प्रेम केले होते. त्यानेही तिच्यावर तितकेच प्रेम केले होते. पण घोरपड्यांचं घराणं, त्या लोकाना आपल्या घराण्याबद्दल असलेला अभिमान विचारात घेता आपलं मीनलशी सहजासहजी लग्न होऊ शकणार नाही याची त्याला खात्री वाटू लागली होती. तशात पांडू मास्तरने त्याला 'विस्तवाशी खेळ खेळू नको' असे स्पष्ट शब्दात सुनावल्याने त्याने यापुढे मीनलला विसरून जायचे ठरवले. पण हा निर्णय घेताना त्याला अतोनात दु:ख होत होते. खोंड उधळलेल्या प्रसंगापासून त्या दोघांच्यात जी जवळीक निर्माण झालेली होती. त्या जवळिकेचे नकळत प्रेमात रूपांतर झाले होते. पण पद्माबाईना त्याची चाहूल लागताच त्यानी मुराररावाना हाताशी धरून श्रीरंगला पोलिसात भरती करून टाकलं होतं.

पोलिसी वेष अंगावर चढल्यानंतर हळूहळू श्रीरंगलाही व्यवहारी जगाची जाण येऊ लागली होती. मीनलवर त्याचे प्रेम जडले होते पण हे

प्रेम कधीही सफल होणार नाही याची आता त्याला खात्री वाटू लागली होती.

त्यादिवशी सकाळी दौलू हवालदार शिरगांवला आला. त्याची बरीच वर्ष शिरगांवात नोकरी झाल्यामुळं गावात बरीच माणसं त्याच्या ओळखीची होती. त्याना भेटूनन नंतर तो पोलीस लाईनमध्ये श्रीरंगला भेटायला आला.

श्रीरंग नुकताच तालमीतून येऊन, आंघोळ करून ड्युटीवर जायच्या तयारीत होता.

"या मामा. आज सकाळी सकाळीच येणं केलंत?"

"आलो झालं! तुझी आई कुठंय्?" कालच चिंचलीला जाऊन येतो म्हणून गेलीय्."

"बरं, हे बघ. यंदा मला शालनच लग्न करून टाकायलाच पाहिजे! तू तिला करून घेणार आहेस का मी तिच्यासाठी दुसरी स्थळं बघू हे विचारायला आलोय्! नोकरी लागल्यापासून तुझं काही लक्षण बरं दिसत नाही मला!"

श्रीरंगनं मामाच्या बोलण्याचा रोख ओळखला. तो डोक्यावर तिरकी टोपी ठेवीत आरशात पहात म्हणाला.

"तसं काही नाही मामा. मी शालनशी लग्न करून घेईन, पण एका अटीवर!"

"कोणती अट?"

"निंबोतची कुस्ती झाल्याशिवाय मी तिला स्पर्श करणार नाही!"

त्याच्या त्या उद्‌गाराचा अर्थ न समजल्याने दौलू हवालदार म्हणाला, "असं का बरं?"

"निंबोतची पहिल्या नंबरची कुस्ती जिंकायचं माझं बऱ्याच वर्षाचं स्वप्न आहे. म्हणून मी अजूनही रोज तालीम करतो."

"ते तुझ्या तब्बेतीवरून दिसतंच आहे."

"मग आता सहा सात महिन्यांनी गुढीपाडव्या दिवशी मी तिथं

पहिल्या नंबरची कुस्ती करणार, मी ती जिंकेन असा मला आत्मविश्वास आहे! पण एवढ्यात लग्न झाले आणि....."

दौलू हवालदार अत्यंत व्यवहार चतूर होता. तो म्हणाला, "समजलं समजलं! लग्न झाल्यावर पैलवानकी जमत नसते हे मलाही ठाऊक आहे. तू म्हणतोस ती अट मला मान्य आहे. तुझं लग्न झाल्यावर सहा सात महिने मी शालनला माझ्याकडंच ठेवून घेतो मग तर झालं?"

"पण मी म्हणतो एवढा गुढी पाडवा झाल्यावर लग्न केलं तर काय बिघडलं?"

"बिघडत काहीच नाही! पण परत सहा सात महिन्यानंतर तुझ्या विचारात जर बदल झाला तर काय करायचं?"

"मी शब्द देतो तुम्हाला, माझ्या विचारात बदल घडणार नाही!"

दौलू हवालदाराची उभी हयात पोलीस खात्यात गेलेली होती. त्यात त्यानं सी.आय.डी खात्यात चौदावर्षे काम केलेलं होतं. सी.आय.डी. खात्यात काम करताना जी सूक्ष्म अशी चौकसबुद्धी लागते ती दौलू हवालदार जवळ होती. श्रीरंगची मुराररावानी पोलिसात भरती इतक्या तातडीनं का केली? पद्माबाईनी त्यात लक्ष का घातलं. हे सर्व दौलू हवालदार जाणून होता. मीनलच्या बाबतीत काहीतरी लफडं व्हायच्या अगोदरच श्रीरंगला चिंचलीबाहेर घालवण्याचा पद्माबाईचा हेतू दौलू हवालदाराच्या कानावर आलेला होता. पण त्याची उघड वाच्यता न करता दौलू हवालदार म्हणाला–

"श्रीरंगा, निंबोतची कुस्ती जिंकावी असं तुझ्या बापालाही वाटत होतं. पण बिचाऱ्याला ते जमलं नाही, तू त्याचं स्वप्न पूर्ण करायचं म्हणतोस त्यात वावगं काहीच नाही. माणसानं आयुष्यात असं काहीतरी चांगलं ध्येय डोळयासमोर ठेवायलाच पाहिजे. पण त्याबरोबर जगातल्या व्यवहाराशी फारकतही होऊ देता कामा नये!"

"म्हणूनच मी तुम्हाला माझी ती 'अट' सांगितली ना?"

"मीही ती मान्य केलीच की? आता उशीर नको. पहिल्या मुहूर्तालाच उडवून टाकू बार!"

पंधरा दिवसानंतर सांगावला दौलू हवालदाराच्या दारात मांडव उभा राहिला. दुपारी चारच्या सुमारास मुहूर्त होता. दौलू हवालदाराचा लोकसंग्रह प्रचंड होता. नोकरीत असलेले आणि निवृत्त असे बरेच पोलीस अधिकारी आणि कर्मचारी लग्नाला आले होते. फौजदार मुरारराव दोन दिवसांची रजा घेऊन सांगावला मुक्काम ठोकून होते. मीनलने श्रीरंगचा विषय आपण कायमचा डोक्यातून काढून टाकावा यासाठी काकानी आणि मानी रचलेले हे कारस्थान आहे अशी मीनलची खात्री होती. पण ती बिचारी आता काहीही करू शकणार नव्हती. खुद्द श्रीरंगनेच शालनशी लग्न करायला संमत्ती दिलेली होती.

हवालदार जयसिंग जमदाडे, मुराररावांचा उजवा हात, तो ही या कार्यासाठी फौजदारांच्या सोबत सांगावला आला होता. पांढरी फरची टोपी बंद गळयाचा रेशमी कोट, पायात ब्रिचेस घातलेला जयसिंग जमदाडे एखाद्या जहागिरदारासारखा दिसत होता. तो विवाहाला येणाऱ्या पाहुण्यांच्या स्वागतासाठी मांडवाच्या प्रवेशद्वाराजवळ उभा होता.

मुहूर्त चार वाजून एकतीस मिनिटाचा होता. सव्वाचार वाजता एक निळयारंगाची फियाट मांडवाच्या प्रवेश द्वाराजवळ येऊनं थांबली.

गाडीतून कर्नल ओबेरॉय, पद्मावाई, आणि अमिता ही मंडळी आली होती. जयसिंग जमदाडेनं कर्नल साहेबांचे स्वागत केले. त्याना हाताला धरून तो पहिल्या रांकेतल्या.वेताच्या खुर्चीकडे घेऊन आला. पद्मावाई व अमिताही त्यांच्या बाजूला येऊन बसल्या. श्रीरंगने रेशमी झब्बा आणि पायजमा घातलेला होता, त्यानं राजस्थानी पद्धतीचा फेटा बांधलेला होता. कपाळावर मोत्याच्या मुंडाळया बांधलेल्या होत्या. सकाळी लावलेल्या हळदीनं त्याचा गोरा रंग अधिकच उजळला होता. नऊवारी नवंकोरं इरकली लुगडं नेसलेल्या बायजाला आनंदाश्रू आवरता येत नव्हते. मुराररावानी या लग्नात पुढाकार घेतल्यामुळं

तालुक्याचे आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष. शिरगांवच्या आसपासच्या खेड्यातले सरपंच अशी बरीच प्रमुख मंडळी विवाहाला उपस्थित होती.

श्रीरंगनं कर्नलसाहेबाना काही पत्रिका पाठविलेली नव्हती. म्हणून त्याना पहाताच त्याला थोडं आश्चर्य वाटलं. अमिताला काही दिवस पद्माबाईनी चिंचलीला ठेऊन घेतलेलं होतं. तिला पुण्याला घेऊन जाण्यासाठी ते गाडी घेऊन आले होते. पद्माबाई त्याना बोलता बोलता म्हणाल्या होत्या,

"तुम्ही ज्याला 'गेल्यावर्षी कॉलेजात बरीच बक्षिसं दिली होती, त्या श्रीरंगचं उद्या लग्न आहे!"

"काय सांगता? कुठं आहे?"

"सांगावला, त्याच्या मामांच्या दारात, मामानेच त्याला आपली मुलगी दिलीय्!"

"अरे व्वा, वंडरफूल! पण पद्माबाई इतक्यात त्यानं लग्न करावं असं त्याचं वय नाही, असं नाही वाटत तुम्हाला?"

"हो. पण काय आहे, त्याची आई बायजा आता फार थकलीय्, आपल्या डोळ्यासमोर एवढं कार्य पार पडावं असं तिला वाटत होतं! आता तो पोलीस म्हणून काम करतो, ठाऊक आहे ना तुम्हाला?"

"हांऽऽ मागे विकी काहीतरी सांगत होता. स्पोर्टसमन् म्हणून त्याला खात्यात काही सवलतीही मिळत असतील."

"हो, मिळतात तर, भावोजीच त्या पोलीस ठाण्याला फौजदार आहेत. त्याला तालमीत जायला मिळावं म्हणून त्यानी त्याला फक्त ऑफीस ड्युटी दिलीय्."

"ओह,व्हेरी नाईस ऑफ हीम्! आपण लग्नाला जाणार असाल?"

"मला तर जायलाच हवं, आपणही अनायासे आलाच आहात, तर अक्षता टाकून येऊ!"

"वुईथ प्लेजर! अमिता तू पण चल सोबत!"

"हो, येईन ना!"

त्या रात्री अमिता मीनलच्या खोलीत आली तेव्हा मीनलचे डोळे लालेलाल झालेले पाहून अमितानं ओळखलं, दिवसभर ही रडलेली आहे.

अमिताला श्रीरंग आणि मीनलचं प्रेम प्रकरण ठाऊक होतं. तिच्या शोकाचं कारणही तिला ठाऊक होतं. ती मीनलचा हात हातात घेत म्हणाली,

"मिनू तो लग्नाला कसा काय तयार झाला?"

"काय करणार बिचारा, एकीकडून मुरारकाकांचा दबाव. दुसरीकडून बायजाचा आग्रह, आणि तिसरे म्हणजे आमच्या मांसाहेबांचं पडद्याआडूनचं कारस्थान, याला तो बळी पडला!"

"मांचं पडद्या आडूनचं कारस्थान?"

"त्यानी त्या दौलू हवालदाराला तीन चार वेळा चिंचलीला बोलावून घेतलं होतं. त्याला भीती घातली. आता श्रीरंग चार पैसे मिळवू लागला आहे. स्वतःच्या पायावर उभा आहे. उद्या कोणीतरी पैसेवाल्या पोरीचा बाप त्याला आपल्या जाळ्यात अडकवण्यापूर्वी तू तुझी लेक त्याच्या गळ्यात अडकवून टाक! मांनी त्या अगोदर माझं ही लग्न ठरवण्याचा एक प्रयत्न केला. पण मी ते लावलं उधळून! त्यानी आता हे त्याच्या लग्नाचं कारस्थान मात्र यशस्वी केलंय्! तो बिचारा श्रीरंग भावडा म्हणून बळी पडला, पण मी मात्र आजन्म अविवाहित राहणार!"

"काय बोलतेस तू हे?"

"बघालच! मी कधीही लग्न करून घेणार नाही!"

"असं बोलू नको! आपल्याला हव्या त्या सर्व गोष्टी आयुष्यात मिळतातच असं नाही!"

"पटतं मला ते. पण माझी एक श्रद्धा आहे. श्रीरंग माझा आहे, आणि केव्हा ना केव्हा आम्ही.......!"

"आता उद्याच त्याचं लग्न होत असताना असं कसं बोलतेस?"

"होऽऽ! एक नाही दोन जरी त्याची लग्नं झाली, तरी शेवटी तो माझाच आहे, आणि शेवटपर्यंत माझाच रहाणार आहे!"

अमिताला त्यावर काय बोलावे हे सुचेना. ती म्हणाली–

"उद्या मांच्यासोबत डॅडी आणि मी त्याच्या लग्नाला जाणार आहोत."

"वेशक जा. माझं एक काम करा!"

"बोल!"

"मी त्याला एक पाकीट देते, तेवढं त्याच्या हातात द्यायचं!"

"जरुर पण काय देणार त्यातून!"

"एक दोन ओळीचं पत्र!"

"ठीक आहे मी देईन ते त्याला."

लग्न घटिका भरताच वधूला मांडवात आणण्यात आलं. बापासारख्या किंचित् सावळ्या रंगाच्या शालनला तिचा मामा बोहल्याकडे घेऊन आला. मोठे बदामी, मादक डोळे, किंचित् जाड ओठ, असलेली शालन् आकर्षक दिसत होती.

"गंगा सिंधू सरस्वतीच् यमुना, कावेऽऽऽऽऽरी नर्मदाऽऽऽ" अंतरपाट धरलेल्या भटजींनी मंगलाष्टकं म्हणायला प्रारंभ केला. दोन्ही भटजींनी पाळी पाळीनं चार चार मंगलाष्टकं म्हटल्यावर विवाह सोहळा संपन्न झाला. उपस्थितांनी टाळया वाजवल्या. दुर्गापूर हेडक्वार्टरचा शुभ्र कोट आणि नेव्ही ब्ल्यू रंगाच्या पँटी घातलेल्या पोलीस बँडचा ताफा सभारंभाला योग्य असे स्वर वाजवू लागला. बाहेर चांद शिकलगारने बनवलेले तारनळे आणि औटगोळे उडाले. सारा परिसर दुमदुमला.

पद्मावाईंनी सुटकेचा निःश्वास सोडला.

S. Kirmate

२४.

निंबोतची कुस्ती झाल्याशिवाय पत्नीला स्पर्श न करण्याची श्रीरंगची अट दौलू हवालदारानं मान्य केल्यामुळं शालनचा विवाह विनाविलंब पार पडला. लग्नानंतर पद्धतीप्रमाणे शालन पाच दिवस शिरगांवला श्रीरंगच्या पोलीस लाईनमध्ये राहिली. पाचही दिवस श्रीरंग पोलीस स्टेशनमध्ये झोपायला जात होता. नवीन लग्न झालेला श्रीरंग पोलीस स्टेशनमधे झोपायला येतो हे पाहून काही खट्याळ कॉन्स्टेबल्सनी त्याची चेष्टाही केली. पण श्रीरंगनं त्याना सांगितलं

"लग्न झालेली पाहुणे मंडळी घरी आहेत ती परत तरी जायला पाहिजेत!"

"कसला पोलीस रे तू लेका? लग्न झालेल्या दिवशीच सूप वाजवून मोकळं व्हायचं!"

"तसं नसतं ते!"

पाच दिवसानंतर दौलू हवालदार शालनला सांगावला माहेरी घेऊन गेला. त्यानंतर श्रीरंग परत लाईनमध्ये आपल्या खोलीवर मुक्कामला राहू लागला.

बायजाची तब्येत अचानक बिघडली. तिला पकवा जाणवू लागला. उपचारासाठी श्रीरंग तिला दुर्गापूरला घेऊन गेला. डॉक्टरनी तिला संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला. औषधाच्या बाटल्या, गोळ्या घेऊन श्रीरंग बायजाला शिरगांवला आपल्या लायनीतल्या घरी घेऊन आला. तिला संपूर्ण विश्रांतीचा सल्ला दिल्यामुळं दौलू हवालदार शालनाला बायजाच्या शुश्रूषेसाठी शिरगांवला घेऊन आला.

बायजा आतल्या खोलीत कॉटवर झोपून होती. शालन स्वयपाक करताना चुलीच्या ज्वालाप्रकाशात अतिशय आकर्षक दिसायची. श्रीरंग आपल्याला स्पर्श करायचे का टाळतो हे तिला काही समजेना. तिच्या

वार्गीच्या सांगावच्या काही मुली लग्नानंतर पाच दिवस सासरी नांदून आल्यानंतर, त्या पाच दिवसात काय काय घडलं ते लाजत लाजत सांगायच्या. पण त्यापैकी एकही गोष्ट इथं शालनच्या बाबतीत घडत नव्हती. उलट श्रीरंग तिच्याकडे पहायचेच टाळायचा. शालनची आणि त्याची चुकून नजरानजर झाली तर तो झटकन् मान फिरवून दुसरीकडेच पहायचा. अगोदर तो घरी फारसा नसायचाच! बायजाला बरं नव्हतं म्हणून तो नाइलाजानं पुढच्या खोलीत झोपू लागला होता. शालन आतल्या खोलींत बांयजाच्या कॉटजवळ खाली झोपत होती. बायजालाही ते थोडसं खटकत होतं ती श्रीरंगला म्हणाली "हे काय चाललंय रे तुझं! लगीन काय सोबंला करून घेटलास?"

"तुला मामानं काय सांगितलं नाही?"

"नाही, तू काय सांगितलास दौलूला?"

"आता तो आल्यावर त्यालाच विचार की!"

बिचारी बायजा चिंताग्रस्त झाली. आपल्या डोळ्यासमोर श्रीरंगला एखादं आपत्य व्हावं एवढीच तिची इच्छा होती. पण श्रीरंग शालनला टाळतो हे पाहून तीही कोड्यांत पडली होती.

पहाटे चारला उठून श्रीरंग शिरगावातल्या तालमीत व्यायामाला नित्यनेमाने जात होता. तालमीतून परत आल्यावर आंघोळ करून लिटरभर दूध पिऊन ऑफीसकडं जायचा. दुपारी दीडला फौजदार साहेब जेवायला बंगल्यावर गेले की श्रीरंगही घरी येऊन जेवून जात होता. पहिलवानकीचा खुराकही नियमानं घेत होता.

चारदिवसानंतर दौलू हवालदार आला. शालन बाहेरच्या नळावर पाणी भरत होती. बहिणभाऊ हळूहळू आवाजात बोलत बसले. निघायच्या वेळी दौलू हवालदार बायजाला म्हणाला "आक्का आता लग्नाला महिना उलटला. सहा सात महिने बघता बघता निघून जातील. निंबोतची कुस्ती झाली की याच्या वागण्यात कसा फरक पडतो बघ!"

"आसलं कसलं आक्रित ह्यानं डोक्यात घिटलंया कुनास ठावं? असं

म्हणताना बायजाला अक्षरशः धाप लागली.

"आक्का तू लवकर बरी हो, नातवाचं तोंड बघायचंय् नव्हं तुला?"

"दौलू पर ही गोष्ट त्यो मला का बोल्ला नाही?"

"नसंल बोलला! पण मला त्यानं लग्नाअगोदर त्याची पूर्ण कल्पना दिली होतीच की!"

"मग तू ते शालनला का नाही. सांगितलंस?"

"तसं स्पष्ट कसं सांगू?"

"आता तू सांग तिला! अशा नाजूक गोष्टी बायकांनीच बायकाना सांगायला पाहिजेत!"

"तेबी खरंच! पर दौलू समज त्यो त्या निंबोतची कुस्ती हारला तर?"

"हारला तर हारला! ती कुस्ती होईपर्यंतची अट मी मान्य केलीय, त्यानं ती कुस्ती जिंकली काय किंवा तो ती हरला काय दोन्ही सारखंच!"

"व्हय. न्हाईतर ती कुस्ती जिकस्तवर ह्यो आसाच वागायला लागला तर?"

दौलू हवालदार अतिशय व्यवहारी होता. तो म्हणाला, "तसं काही होणार नाही."

डोक्यावर आणि काखेत पाण्याची कळशी घेऊन शालन आत आली. डोक्यावरच्या कळशीतलं थोडं पाणी हिंदकळून तिच्या ब्लाऊजवर पडलं होतं. भिजलेल्या साडीतून तिचे उन्नत उरोज दिसत होते. नवरा आपल्याशी विक्षिप्तपणे वागतो हे पाहून तिचा चेहरा मात्र काहीसा चिंताग्रस्त दिसत होता.

दौलू हवालदार गेल्यानंतर थोड्यावेळाने जयसिंग जमदाडे आला. दारातूनच त्यानं हाक मारली.

"बायजामावशीऽऽऽकाय म्हणते तब्येत?"

"बरी हाय, या की आत!"

लाल गोंड्याचं कोल्हापूरी पायताण दारांत काढून ठेवीत जयसिंग सरळ आतल्या खोलीत आला.

"शालन, भाईरची खुर्ची दे गं जयशिंगाला!"

"नको नको. मी घेतो खुर्ची. शालनकडे एक ओझरता दृष्टिक्षेप टाकून जयसिंगनं बाहेरच्या खोलीतली लोखंडी खुर्ची उचलून आत आणली. बायजाच्या उशाकडं तो बसला, पण त्याची नजरमात्र चुलीसमोर बसलेल्या शालनकडं होती.

"जयशिंग माजं आता काय खंरं न्हाई बग बाबा!"

जयसिंग हसत हसत शालनला न्याहाळत म्हणाला, "असं का बोलतेस मावशी? मनासारखी सून आलीय घरात, लवकर पाळणा हलंव की!"

जयसिंगनंही तो विषय काढल्यामुळं बायजा काहीशी भावनाविवश होत म्हणाली, "जयशिंगा, शिरीरंगाला शानपनाच्या एकदोन गोस्टी सांग की रं?"

जयसिंगला कुणकुण लागलेली होती. श्रीरंग बायकोपासून चार हात दूर कशासाठी राहतो हे त्याला समजलं होतं. पण त्याची फारशी वाच्यता न करता तो म्हणाला", तू काही चिंता करू नको मावशी, सगळं तुझ्या मनासारखं होईल."

जयसिंगच्या अंगाला चंदनच्या अत्तराचा मंद वास येत होता. तो घरात आलेल्या क्षणालाच शालनला तो जाणवला होता. बायजाच्या उशाला बसलेला जयसिंग आपल्याला अधूनमधून निरखून पहातो आहे हे शालनला जाणवत होतं. ती पदर आंगाभोवती घट्ट लपेटून स्वयंपाक करीत होती.

"अग शालू, जयशिंगला च्या तरी करुन दे!"

"नको नको मावशी आत्ताच चहा घेऊन आलोय, माजगावचा पोलीस पाटील आला होता त्याच्यासोबत गेलो होतो स्टँडवर, तियंच घेतला चहा!"

"च्याला काय हुतंय, घे की!"

"बरं, करा तर!"

शालनकडं पाहताना जयसिंग ओठावरून जीभ फिरवत राहयला. बाहेरख्याली स्वभावाच्या जयसिंगला लायनीत आलेल्या या शालनला तिचा नवरा आणखीन सहा सात महिने स्पर्श करणार नाही हे समजलं होतं. अशा तारुण्यानं मुसमुसलेल्या शालनकडे दुर्लक्ष करणाऱ्या श्रीरंगची तो मनातून कीव करत होता.

शालननं चहाचा कप भरला. तिने तो जयसिंगला दिला. चहाचा एक घोट घेऊन जयसिंग म्हणाला

"काय फक्कड चहा केलाय हो मावशी तुमच्या सूनेनं?"

"अरे च्याचं काय घिऊन बसलास जयसिंगा, हिच्या हातचा रस्सा खाऊन बग एकडाव! सारखा जेवायला न्हाई आलास तर इच्यार!"

गालातल्या गालात हसत जयसिंगनं मोकळा कप खाली ठेवला आणि म्हणाला

"बाकी श्रीरंग भाग्यवान बरंका बायजामावशी! आमचे साहेब त्याच्या कुस्तीवर बेहद्द खूष आहेत! पुढच्या महिन्यात आमच्या पोलीस खात्याच्या 'रेंज स्पोर्टस' व्हायच्या आहेत. त्यानंतर कुस्तीगिरांची एक टीम पतियाळाला पाठवण्यात येणार आहे. बहुतेक श्रीरंगकडेच त्या टीमच नेतृत्व राहील! परवा डी.एस.पी. साहेब आले होते. त्यानी श्रीरंगला ब्लेझरचा कोट शिवण्यासाठी पाचशे रुपये मंजूर केले आहेत! आमच्या फौजदारसाहेबाना त्यानी सांगून ठेवलंय, श्रीरंगला जादा काम द्यायचं नाही. गावोगावी कुस्त्या पहायला, त्यात भाग घ्यायला 'ऑन ड्यूटी सोडायचं!"

"तू काय बोलतोस त्यातलं मला समजत न्हाई रं जयसिंगा?"

"मावशी तुझा मुलगा तुझ्या घराण्याचं नाव काढणार एवढं लक्षात ठेव!" तोंडाने श्रीरंगची स्तुती करीत आणि त्याचवेळी कामांध नजरेनं शालनला न्याहाळत जयसिंग बोलत होता. डोळ्यांवर आडवा हात धरुन

पडलेल्या बिचाऱ्या भोळसट बायजाला जयसिंगच्या मनात काय चाललं आहे ते समजणं अशक्य होतं.

शालनकडे पहांत जयासिंग म्हणाला, "बरं निघतो मी! आता तुमच्या सुनेच्या हातचा रस्सा खायलाच येईन बरं! पण चहा मात्र एकदम् फस्तक्लास! येतो मावशी!"

त्या दिवशी बायजाच्या तब्येतीची चौकशी करण्याचा बहाणा करुन आलेला जयसिंग नंतर वारंवार येऊ लागला. तो आला की त्याच्या कपड्याना येणारा चंदनाचा गंध जाणवत असे. तो वास आताशी शालनला हवाहवासा वाटू लागला. त्यात जयसिंगचं बोलणंही अत्यंत गोड आणि लाघवी होतं.

श्रीरंगला रेंज स्पोर्टच्या वेळी होणाऱ्या कुस्तीच्या सरावासाठी आठवड्यातून दोन तीन दिवस दुर्गापूर इथं हेडक्वार्टरला जावं लागलं होते.

श्रीरंग दुर्गापूरला गेला रे गेला की जयसिंगला बायजाच्या तब्येतीची विचारपूस करण्याची.लहर येई!

त्यादिवशी तो अर्धकिलो ब्रायलर कोंबडीचं मटण घेऊन आला. पूर्वी तो आला की काहीशी संकोचणारी शालन आताशी मोकळेपणानं त्याचाशी बोलत होती.

"हे काय, तुम्ही कशाला आणलं?"

"मी काही विकत नाही आणलं, परवा तो पोल्ट्रीवाला दारुप्यालेला सापडला होता. त्याला. लगेच जामिनावर सोडला. पैसे नाही घेतले. आता वर्षभर कोंबडी फुक्कट खायची त्याच्याकडून". असं म्हणून जयसिंग हसला.

आताशी तो आला की शालन खुषीत येई. त्यादिवशी तिने बनवलेला कोंबडीचा रस्सा खाऊन तिचे कौतुक करीत तो निघून गेला.

जयसिंग तसा फार धूर्त! एकदाच तो दिवसा तियं गेला होता. त्यानंतर मात्र तो दिवस मावळल्यानंतर अंधार पडल्यावर जाऊ लागला.

बायजाची प्रकृती थोडी सुधारली. ती लाईनमध्ये शेजाऱ्याकडं जाऊ लागली.

जयसिंगनं शालनला चार दिवसानी इंपोर्टेड फेस पावडरचा एक डबा दिला. तेंव्हा ती म्हणाली

"एवढा महागाचा डबा कशाला आणलांत?

"अगं मी तो काय विकत आणलेला नाही. हनीफ नावाचा माझा एक दोस्त दुबईला असतो. तो वर्षातून एकदा सुट्टीवर येतो. आला की माझ्यासाठी अशा काही चिजा घेऊन येतो! मावशी कुठं आहे?"

"शेजारी गेल्यात, पण हा पावडरचा डबा कुठून आणला म्हणून पैलवानानी विचारलं तर त्याना काय सांगू?"

तिचा हात हातात घेत जयसिंग म्हणाला

"सांग विकत घेतला म्हणून, त्याला काय कळतंय, पैलवानांचा वरचा मजला रिकामाच असतो!"

त्या विनोदावर शालनही खुद्‌खुदू हसली.

बायजाची सारी हयात चिंचलीत गेली होती. तिला शिरगांवला फारसं करमतही नसे. तब्बेत थोडीशी सुधारल्यावर ती श्रीरंगला म्हणाली

"मी जाते बाबा चिंचलीला. मला हितं गमत नाही"

"तिथं तुला कोण बघणार?"

"माप मला बगनारी मानसं हैत, न्हाईतर सरकारबाई हैतच की, त्या काय मला टाकनार हैत?"

पद्मावाईच्या नावाचा उल्लेख होताच श्रीरंग म्हणाला, "आपलं हक्काचं घर सोडून तिथं लोकांच्या आश्रयाला कशाला जातेस?"

"लोकाच्या? अरे ते घर परक्याचं म्हनू नगो शिरीरंगा, आपल्यावर डोंगराएवढं उपकार हैत सरकारबाईचं! तुला आन्नाला कुनी लावलं?"

"हं ऽऽऽ म्हणं अन्नाला लावलं! आई मला एवढ्या तातडीनं नोकरी लावण्याचं कारण तुला नाही समजलं! बरं ते जाऊ दे! परवा पासून दहा दिवस मी पुण्याला चाल्लोय्! आमचे 'रेंज स्पोर्टस' आहेत!"

"परवा तर आट दिवस जाऊन आलास की रं?"

"हो ऽऽ पण ते सरावासाठी आता प्रत्यक्ष कुस्त्या होणार तिथं!"

"जा बाबा, मग हिला एकटीला हितं कुटं ठेवतोस? सांगावला दौलूकडं तरी सोडून ये जा!"

बाहेरच्या खोलीत त्यांच बोलणं ऐकत असलेली शालन म्हणाली

"मी कुठं जाणार नाही!"

बिचाऱ्या बायजाला शालनच्या उद्गाराचं कौतुक वाटलं. वारंवार माहेरी जाणाऱ्या पोरींची माहेरीदेखील किमत रहात नाही म्हणूनच ती तसं म्हणते असं बायजाला वाटलं. पण तिच्या न जाण्याचं खरं कारण निराळं होतं. जयसिंगकडे आकर्षित झालेली शालन श्रीरंगशी वरवर फार चांगली वागत होती. त्याला आकनीचा सूप बनवून देणे, बदाम, खसखस् वेलदोडे वाटून 'घोटा' करून देणे, ही कामं ती अत्यंत तत्परतेनं करीत असे. बायजा तिला म्हणाली,

"शिरीरंग आट दिवस हितं न्हाई तर सांगावला का जात नाहीस?"

"कशाला उगीच जा जा ये ये! आता हे पाडव्याला निंबोतला जाणार आहेत, तेव्हा जाऊन येईन चार दिवस!"

बायजाला सुनेचं कौतुक वाटलं. श्रीरंग आठ दिवसासाठी पुण्याला गेला. बायजा चिंचलीला गेली. शालन्‌ला आणि जयसिंगला 'रान मोकळे' मिळाले.

पोलीस स्टेशनवर रात्री आठला हजरी झाली की जयसिंग इकडं तिकडं पहात अंधारात येऊन शालनच्या दारावर हलकेच थाप मारी. दारावर नजर आणि कान रोखून बसलेली शालन चटकन उठून दार उघडत असे. लगेच दार आतून बंद होई. शालनला घट्ट मिठीत घेऊन तो तिचं चुंबन घेई. तीही त्याला घट्ट बिलगून प्रतिसाद देई. प्रत्येकवेळी येताना जयसिंग तिच्यासाठी काहीतरी आकर्षक वस्तू घेऊन येई. यावेळी तो 'लिली' नावाच्या उंची सेंटची बाटली घेऊन आला. त्या बाटलीचं टोपण उघडून त्यानं तिच्या अंगावर 'स्प्रे' उडवला आणि विचारलं."

"कसा आहे वास?"

"चांगला आहे. पण मला तुम्ही वापरता ते चंदनाचं अत्तरच अधिक आवडतं!"

त्याच्या खांद्यांवर मान टेकवून त्याचं मनगट हातात धरून हुंगत शालन म्हणाली.

"बरं आज जेवायला काय केलंय?"

"अंड्याचा रस्सा केलाय्!"

"ठीक आहे! मी आज एक गंमत आणलीय्! घरांत लिंबू आहे का सरबत करायला!"

"आहे, पण सरबत, कशासाठी?"

नेहरू शर्टाच्या खिशातून जीनची क्वार्टर काढून शालनला दाखवत म्हणाला, "हे औषध लिंबूच्या सरबतातून घ्यायचं असतं!"

किंचित् गंभीर होऊन शालन म्हणाली–

"हे काय तुम्ही दारू पिणार?"

"छे ऽऽऽ! ही दारू नसतेच मुळी! थांब तुला याचा वास दाखवतो!" असं म्हणत जयसिंगनं बाटलीचं सील उघडून ती शालनच्या नाकाला लावली. शालन् ती हुंगून म्हणाली, "ताप भरला की पाण्यात घालून कापडाची पट्टी भिजवून डोक्यावर ठेवतात, तसलं हे औषध दिसतंय्!"

"अगदी बरोबर ओळखलंस! त्या औषधाला 'लव्हेंडर' म्हणतात, हे तसल्याच वासाचं आहे. बरं, लवकर सरबत कर एक दोन ग्लास! रात्री नाईट राऊंडला जाऊन यायला पाहिजे! चोऱ्या व्हायला लागल्यात. घरफोड्याही हद्दीत दोनतीन झाल्या आहेत!"

शालननं सरबत बनवलं. जयसिंगने काचेच्या ग्लासात अर्धाकप जीन ओतली. त्यात सरबत मिसळलं. आणि तो ग्लास शालनच्या ओठाजवळ नेत म्हणाला, "हं घे एक घोट!"

"नको बाबा, मी एकदा आबांच्या बाटलीतली थोडी रम प्याले

आणि डोकं लागलं गरगरायला!"

"पण ही रम नाही. जीन आहे जीन्, हिला 'लेडीज ड्रिंक्स' म्हणतात. खास बायकांच्यासाठी हे बनवलेलं असतं!"

"नको हो, तुम्हीच घ्या!"

"माझी शप्पथ आहे एकच घोट घे." जयसिंगचा अतिशय आग्रह झाला म्हणून शालनने एक घोट घेतला. डोळे मोठे मोठे करीत ती म्हणाली,

"काय छान लागतं हो आणि जरा बघूऽऽ?"

हसत हसत जयसिंगने दुसऱ्यांदा तो ग्लास तिच्या ओठाला लावला. उरलेला ग्लास जयसिंगने संपवला. खिशातून सिगारेट काढून शिलगावून नाकातोंडातून धूर सोडत तो कॉटवर पडला. सिगारेट ओढून संपली. शालन त्याच्याजवळ बसली. तिच्या कमरेभोवती हाताचा विळखा घालत जयसिंग म्हणाला, "तू सांगावला गेली असतीस तर मला करमलं नसतं!"

शालन् खाली वाकून त्याच्या गालावर गाल घासत म्हणाली, "म्हणूनच टाळलं जायचं! पण हवालदार मला बाई भीती वाटते. पैलवानाला कुणी चुगली केली तर?"

"घास नाही कुणाचा! मुरारराव घोरपडे जोपर्यंत इथं फौजदार आहेत तो पर्यंत माझं कोणीही वाकडं करू शकणार नाही!"

"पण आपल्या लग्नाच्या बायकोबरोबर तुमचे संबंध आहेत हे समजल्यावर पैलवान गप्प बसेल असं वाटतं?"

"तुझ्या पैलवानाचं नको कौतुक सांगू! हा काय धुतल्या तांदळासारखा आहे काय? तिकडं चिंचलीत त्या मीनलशी चाळे करत होता म्हणून तर मुराररावानी त्याला खात्यात आणून अडकवलाय्!"

"काहीतरीच सांगता! त्याला ती निंबोतची कुस्ती करायची आहे ना?"

"ते सगळं खोटं आहे शालन्, त्याचं खरं प्रेम त्या मीनलवरच

आहे! उगाच ही म्हातारडी डोकं उठवत होती म्हणून तुझ्याबरोबर लग्न करून घेटलाय! म्हणे निंबोतची कुस्ती होईपर्यंत बायकोला हात लावणार नाही. आजपर्यंत लग्न झालेल्या कैक पैलवानानी कुस्त्या मारलेल्या आम्ही बघितल्या आहेत! हा उगाच खोटं कारण सांगतो."

जयसिंगने शालनचे श्रीरंगबद्दल मत कलुषीत करण्याची ती संधी दवडली नव्हती.

त्यारात्री साडे अकरा वाजता दाराची कडी हलकेच काढून आजूबाजूला कोणी नाही असे पाहून जयसिंग घराबाहेर पडला.

तृप्त झालेली शालन डोळे मिटून अंथरूणावर पडली होती. बराच वेळ तिला झोप आली नाही.

२५.

अमिता बाळंत होऊन मुलगा झाल्याची पुण्याहून तार येताच पद्मावाईना अत्यानंद झाला. त्यानी मीनलला हाक मारली.

"मिनूऽऽऽ ए मिनूऽऽऽ खाली ये! पुण्याहून तार आलीय!"

अमिता दिवसात होती हे मीनलला ठाऊक होतं आता तार आली म्हणजे ती बाळंत झाली असावी असा अंदाज करीत मीनल पद्मावाईच्या खोलीत आली. पद्मावाई आपली बॅग भरत होत्या.

"काय मुलगाच ना?"

"हो ऽऽ तू कसं ओळखलंस?"

"तुमच्या आवाजावरून! मुलगी झाली असती तर एवढा मोठा आवाज आला नसता!"

"बरं आता मी चालले. पुन्हा काही दिवस डेअरीचं काम तुला बघावं लागेल. शेतातलीही बरीच कामं पडली आहेत. गहू कापून ठेवलाय. ते सुबराव पाटलाकडचं मळणीचं यंत्र मागवून घे! गहू तेवढा पोत्यात भरून वाड्यात ठेवायला हवा! त्यानंतर चार दिवसानी टॉमेटो

काढायला येतील. बायकांना बोलावून टॉमेटो तोडून घे! करंड्या आणून ठेवलेल्याच आहेत. तोडलेल्या दिवशीच करंड्या दुर्गापूरला रवाना व्हायला हव्यात. जहांगीरचा टेंपो अगोदरच सांगून ठेव! मागच्या खेपेला वेळेला टेंपो मिळाला नाही. वीस पंचवीस किलो टॉमेटो खराब होऊन गेले!"

"एका वेळेला किती कामं सांगता मला?" उजव्या हाताच्या आंगठ्याचं नख दातानं कुरतडत मीनलनं विचारलं.

"हे बघ, घरी तुझे डॅडी असून नसल्यासारखेच! आजपर्यंत त्यानी घरचंसुद्धा काही बघितलं नाही, तर ते शेतातलं काय बघणार? आणि यापुढं हळूहळू मी सगळीच जबाबदारी तुझ्यावर सोपवणार आहे! विक्रम काही आता पुणं सोडून इकडं येण्याची लक्षणं दिसत नाहीत! तुलाच एखादा छानसा मुलगा शोधून त्याला घरजावई करून घेते म्हणजे मी मोकळी झाले!"

"घर जावई? पण मी सांगितलं ना इतक्यात माझ्या लग्नाची घाई नको!"

"तुला काही समजत नाही मीनल! मुलींचं योग्य वयातच लग्न व्हायला हवं! अमिताचं बघ! एकविसाव्या वर्षी ती आई झाली! उगाच वय वाढल्यावर मुलं होण्यात काय अर्थ आहे? ग्वाल्हेरकराना कुणी काय सांगितलं कुणास ठाऊक? सत्यजितसारखा मुलगा शोधून सापडेल की नाही शंकाच आहे!"

"आता पुन्हा ते कशाला उकरून काढता मां?"

"हे बघ विक्रमचं कसं सगळं सुरळीत झालं, तशी तू एकदा मार्गाला लागलीस की मी सगळ्या जबाबदारीतून मुक्त होईन!"

अमृतराव बाहेरून आले. ते सरळ पद्माबाईच्या खोलीत. त्या बॅग भरत असल्याचं पाहून त्यानी विचारलं,

"हे काय? कसली तयारी?"

"ती टेबलावरची तार वाचा!"

अमृतरावांनी तार हातात घेण्यापूर्वीच मीनलने सांगून टाकले, "वैनी बाळंत झाली मुलगा झाला."

"अरे व्वा ऽऽऽ घोरपड्यांच्या घराण्यात खातेदार जन्मला! अरे कोण आहे तिकडं?"

संतराम पटका सावरीत पळतच आला.

"संतराम आपली बारा नंबरची बंदूक घे आणि वाड्याच्या गच्चीवर जावून पाच बार उडव! गावकऱ्यांना कळू दे. घोरपड्यांच्या घराण्यात खातेदार जन्माला आलाय! पूर्वी आम्ही तोफा डागून गावाला ही आनंदाची वर्दी द्यायचो, आता निदान बंदुकीचे बार तरी उडवू!"

पद्माबाईंच्याकडे पहात अमृतराव पुढं म्हणाले,

"तुम्ही नातवाचं तोंड पहायला चाललात? आम्ही काय घोडं मारलंय?"

पद्माबाई म्हणाल्या, "मीनल इथं एकटी आहे! मी जाऊन येते अगोदर, मी आल्यावर तुम्ही आणि मिनू जा! शेतात गहू कापून टाकलेला आहे. आपण सगळेच गेलो तर एखाद् दुसरा क्विंटल गहू गायब होईल! गावातली माणसं पूर्वीसारखी आता प्रामाणिक नाही राहिली!"

दुर्गापूरवरून दुपारी एकला सुटलेली एशियाड संध्याकाळी सहाच्या सुमारास पुण्यांत पोहोचली. रिक्षाने पद्माबाई कर्नल साहेबांच्या बंगल्यावर पोहोचल्या.

कर्नलसाहेब व्हरांड्यात बसले होते. रिक्षातून उतरलेल्या पद्माबाईंना पाहून ते हसत हसत म्हणाले,

"या ऽऽऽ ग्रँडमदर! इतक्या लवकर याल असं वाटलं नव्हतं! मोहिनी बाहेर कोण आलंय बघ!" असं म्हणत पुढे येऊन कर्नलसाहेबानी पद्माबाईंच्या हातातली बॅग आपल्या हाती घेतली. मोहिनी आणि पद्माबाईंनी एकमेकींना अलिंगन दिलं.

पद्माबाईंनी विचारलं, "बाळ बाळंतीण कशी आहेत?"

"दोघे उत्तम आहेत. साडेसात पौंडाचा आहे तुमचा नातू! डिलिव्हरी नॅचरल झाली! पण अमिताला बराच त्रासही झाला!"

"मी आता वॉश घेते आणि आपण मॅटर्निटीत जाऊनच येऊ! मला एकदा त्याला बघितल्याशिवाय चैन पडायची नाही! तार आल्या आल्या मी पहिली गाडी पकडून आले."

कर्नलसाहेप पाईप भरता भरता म्हणाले, "आम्हाला ते ठाऊकच होतं. पण आमच्या व्याह्याना का नाही सोबत आणलंत?"

"अहो काय सांगायचं, घरची आणि शेतीची कामं इतकी आहेत की सांगता सोय नाही! त्यात मीनल एकटीच तिथं! आता मी परत गेल्यावर त्या दोघांना पाठवून देईन!"

"तुम्हाला आणखीन एक खूष खबर द्यायचीय्!"

"कसली?"

"तुमच्याकडून आल्यापासून सारखं वाटत होतं की पुण्याच्या आसपास चारपाच एकर जमीन घेऊन त्यात एखादं फार्म हौस बांधावं! रिटायर झाल्यावर निवांत असं चार दिवस जाऊन रहाण्यासाठी स्वत:चं असं ठिकाण असावं! आमचा एक रिटायर्ड सुभेदार मेजर परवा भेटायला आला होता. तो म्हणाला पानशेतच्या जवळ त्याची चार एकर जमीन आहे. त्याला मूलबाळं काहीच नाही. वयामुळं शेती हातून होत नाही. शेत विकून येणारे पैसे पोस्टात किंवा बँकेत ठेवून व्याज खात बसावे म्हणून मला सांगू लागला. मी लागलीच त्याला गाडीत घातले आणि त्याची ती जमीन पाहून आलो. जमीन फारशी दर्जेदार नाही, पण जमिनीजवळून बारमाही धरणातून वहाणारं पाणी आहे. मी त्याला किंमत विचारली, तर तो म्हणाला एकरी वीस हजार!"

"मग?"

"मग काय? चार एकराचे एक लाख रुपये त्याला दिले आणि जमीन अगोदर खरेदी करून टाकली. मी आणि विक्रम दोघे जाऊन व्यवहार करून मोकळे झालोसुद्धा!"

"फार छान केलंत !"

"आता पुढचं सगळं तुमच्या मार्गदर्शनाखाली करायचंय! विक्रम म्हणतो मी वकिली करीत करीत फार्महो बघेन!"

पद्माबाई हसत हसत म्हणाल्या, "घरची एवढी शेती असताना कधी लक्ष घातलं नाही. म्हणे वकिली करीत शेती बघणार! म्हणजे एकही धड नाही!"

"अहो असं म्हणू नका हं! आता तो दुसऱ्या वर्षाला आहे तरी एका प्रख्यात कायदेपंडितांच्या घरी रोज सकाळी तासभर जाऊन बसतो."

"कोण आहेत ते?"

"फौजदारी कायद्यातले तज्ज्ञ वकील आहेत. ते लॉ कॉलेजमध्ये 'व्हिजिटिंग प्रोफेसर' म्हणूनही फौजदारी कायदा शिकवतात! परवा संध्याकाळी इकडं जेवायला आले होते, अतिशय 'ब्रिलियंट' आहेत! पुणे परिसरातील गाजलेले बरेच फौजदारी खटले त्यांच्याकडेच जातात!"

"विकी इतका आवडीनं वकिलीचा अभ्यास करेल असं वाटलं नव्हतं!"

पद्माबाई आणि मोहिनी मॅटर्निटीहोमवर आल्या. स्पेशल रुममध्ये अमिता कॉटवर पडलेली होती. शेजारीच विक्रम बसलेला होता. त्याने पद्माबाईंना पहाताच उठून त्यांचे चरण स्पर्शून नमस्कार केला. पद्माबाईंना पहाताच अमिता कॉटवर उठून बसण्याचा प्रयत्न करू लागली तेव्हा तिच्या खांद्यावर हात ठेवून तिला उठू न देता पद्माबाई म्हणाल्या–

"उठू नको अमिता! अशावेळी रीतिरिवाज पाळायची गरज नसते! अमिताच्या कुशीत झोपलेल्या नातवाच्या कपाळावरून हलकेच हात फिरवीत पद्माबाई म्हणाल्या, "अगदी विकीची प्रतिकृती आहे! अगदी अस्सा दिसत होता लहानपणी!"

जवळ उभ्या असलेल्या मोहिनी म्हणाल्या, "पण हनुवटी मात्र अमितासारखी दिसते नाही?"

त्यावर विक्रम म्हणाला. "मला तर जन्मलेली सगळी मुलं एकसारखीच वाटतात. इतक्या लहान अवस्थेत ते असं दिसतं, तसं दिसतं म्हणणं काही मला पटत नाही!"

"आम्हा बायकांना चांगलं समजतं!" पद्माबाई विक्रमकडं पहात म्हणाल्या,

"बरं, बरं, उगाच मतभेद नकोत! मिनू काय म्हणते? खरं तुम्ही तिला सोबत आणायला हरकत नव्हती!" मोहिनी म्हणाल्या.

"अरे विकी, शेतातली कामं कोण बघणार? तुझे डॅडी सिगारेट फुंकत वाड्यात बसणार, तिकडं खळयावर गहू कापून टाकलेला आहे. त्याची मळणी करायची, टोमॅटोला बहर आलाय्. बायकांना बोलावून ते तोडून घेऊन दुर्गापूरला पाठवायचे! मिनू शिवाय जबाबदारीनं हे काम दुसरं कोण पहाणार? मी परत गेल्यावर पाठवीन तिला चार दिवस!"

तासभर अमिताजवळ बसून पद्माबाई. आणि मोहिनी बंगल्यावर परत आल्या.

"काय बघितला नातू?" कर्नलसाहेबानी विचारलं,

"हो ऽऽऽ अगदी विकीची प्रतिकृती आहे!" असं म्हणून त्यानी मोहिनीकडं बघितलं. त्याही आपला अभिप्राय सांगतील असं वाटलं होतं. पण यावेळी त्या काहीच बोलल्या नाहीत.

पद्माबाई समोरच्या कोचावर बसल्या. मोहिनी आत गेल्यानंतर कर्नलसाहेब म्हणाले, "अमिता मोठी धीराची म्हणून तिनं 'लेबर पेन्स' सहन केल्या बरं! डॉक्टर म्हणत होते 'सीझर' करु या, पण तिनं ते कबूल नाही केलं!"

"तेच बरं झालं! उगाच जन्मभर दुबळं होऊन रहाण्यात काय अर्थ आहे?"

"दुबळं असंच काही नाही, पण दुसऱ्या खेपेसही तेच करावंसं

वाटतं मुलींना!"

"काय सांगायचं तुम्हाला? हे सिझरचं फॅड अलीकडं फार बोकाळलंय्. आम्ही लहान होतो तेव्हा असला प्रकार काही ऐकिवातच नव्हता. आताशी डॉक्टर लोकही चार पैसे मिळतात म्हणून पोरींना सीझर करायला प्रोत्साहन देतात झालं!"

"चला, एक चिंता तरी मिटली!" पद्माबाई मी थोडंस 'ड्रिंक्स' घेतलं तर चालेल का? आय होप यू डोंट माईंड?"

"नॉट ॲट ऑल!"

कर्नलसाहेब अमृतराव सोबत असले की मद्य घेण्यासाठी पद्माबाईंची परवानगी विचारत नसत. पण आज समोर पद्माबाई असल्यामुळं त्यांनी शिष्टाचार म्हणून विचारलं होतं.

व्हिस्कीचा ग्लास आतून भरून आणून समोरच्या टेबलावर ठेवण्यापूर्वी त्यांनी मोलकरणीला हाक मारली.

"शांती, पद्माबाईंना सरबत घेऊन ये ना?"

"नको,. आपलं चालू द्या, मी आत मोहिनीभाभींशी बोलत बसते!" असं म्हणून पद्माबाई उठून आत निघाल्या तेव्हा कर्नलसाहेब म्हणाले. "उद्या सकाळी तेवढं फार्म बघून येऊ! तुमचं मार्गदर्शन निश्चित उपयोगी पडेल! वीस पंचवीस वर्षांचा अनुभव आहे. तुमच्या गाठी!"

"जाऊ यांना आपण!"

रात्री डायनिंग टेबलवर कर्नलसाहेब म्हणाले. "बाळाचं नाव काय ठेवायचं ठरवलंय्?"

"खरं सांगू का? मुलगी झाली तर जिजाबाई आणि मुलगा झाला तर संताजी अशी नावं ठरवूनच टाकली होती मी!"

"पण ही नावं जुनाट नाहीत वाटत?"

"कर्नलसाहेब काही बाबतीत मी थोडीशी प्रतिगामी विचाराची आहे."

"पण जिजाबाई किंवा संताजी ही काही आधुनिक नावं नव्हेत!"

"नाहीत हे मलाही मान्य आहेत. पण त्या नावांच्यामागे फार मोठा इतिहास आणि परंपरा आहे. जिजाऊनी शिवरायाना घडवलं, तर संताजीरावानी अटकेपार झेंडा फडकावला. शिवाय संताजीराव आमच्या घराण्याचे मूळ पुरुष! बाळाला मी त्यांचंच नाव ठेवणार! त्यांचं नाव देण्याच्या अटीवरच मी विश्वासला वाड्याची जागा कॉलेजसाठी दिली होती."

"हो ते मला गॅदरिंगच्यावेळी समजले होते! बाकी तुम्ही चिंचलीसारख्या लहान गावात कॉलेज सुरू करून एक फार चांगला पायंडा पाडलात हो! मला नाही वाटत की तुमच्या जहागिरदारापैकी कोणी आपला वाडा यापूर्वी कॉलेजसाठी दिला असेल!"

"आता विषय निघाला म्हणून सांगते, आमच्या दुर्गापूरच्या राजानी तलावाजवळ एक मोठ्ठा पॅलेस बांधला होता. पण दुर्दैव असं की त्या वाड्यात राजघराण्यातलं कोणीही एक दिवससुद्धा वास्तव्य करू शकलं नव्हतं. राजाना पुत्रप्राप्ती न होताच ते दिवंगत झाले. महाराणीनी आपल्या नात्यातला मुलगा दत्तक घेतला. हा मुलगा राजपुत्र म्हणून गादीवर आल्यानंतर दुर्गापूरच्या कॉलेजसाठी तो वाडा एका शिक्षण संस्थेनं मागितला होता. पण दत्तक राजपुत्राने तो कॉलेजला न देता विकून टाकला. आता ज्यानी तो घेतला त्यात हॉटेल काढलंय्. आपण मला सांगा, ती वास्तू कॉलेजसाठी दिली असती तर त्या दत्तक राजपुत्राचं नाव चिरंतन झालं असतं की नाही? आता तिथं अगदी 'थ्री स्टार' हॉटेल झालंय् पण राजपुत्राचं नाव नाही दिलं त्यानी हॉटेलला! तेव्हा आमच्या लोकाना शिक्षणाबद्दल तशी आस्था फारच थोडी!"

"त्याचं कारण काय आहे ठाऊक आहे ना?"

"ज्या लोकांना कष्ट न करता संपत्ती प्राप्त होते त्याना त्याचं काही मोल नसतं."

मोहिनीनी जेवण तयार झाल्याची शांतीकडून वर्दी दिली.

जेवताना कर्नलसाहेब म्हणाले, "बाळाचं बारसं जोरात घालणार ना?" त्यावर पद्माबाई म्हणाल्या,

"मुळीच नाही! मागे अमिताचं डोहाळ जेवण घातलं तेव्हा मी मला शेतीत मदत करणाऱ्या बायकांना बोलावल्याचं पाहून काही नात्यातल्या बायकांनी नापसंती व्यक्त केली होती. म्हणून यावेळी फक्त चिंचलीतल्या कष्टकरी बायकानाच बोलावणार!"

"बाकी तुमचे काही निर्णय धक्का देणारे असतात असं विकी मला नेहमी म्हणतो!"

"हो ऽऽऽ तसं घडतं खरं!"

विक्रमचं नाव घ्यायला आणि तो घरी यायला एकच गाठ पडली.

"किती वेळ केलास विकी, साडेनऊ होऊन गेले?"

"अमिताशी बोलत बसलो होतो."

"आता मुलगा झाल्यावरही तुमच्यात बोलण्यासारखं काही शिल्लक राह्यलंय् का?" कर्नलसाहेबानी विचारलं.

बेसीनकडे जाऊन हात धुवून नॅपकीनला पुसत डायनिंग टेबलकडे येत विक्रम म्हणाला, "अमिताला मी सतत तिच्या जवळ असावे असे वाटतं!"

त्यावर पद्माबाई म्हणाल्या,

"भाग्यवान आहेस! नाही तरी तुझ्यावेळी मी बाळंत झाले तेव्हा तुझे वडील आणि त्यांचे मित्र गाण्याच्या मैफलीत दारू झोकून बसले होते! मुलगा झाला म्हणून नोकर सांगायला गेला तर त्यालाच त्यानी विचारलं 'कोणाला झाला म्हणून! दोन दिवस मी प्रसूती यातना भोगत होते याची त्याना जाणीवच नव्हती! म्हणून म्हणते तुम्ही भाग्यवान आहात!"

जेवताना कर्नलसाहेबानी श्रीरंगचा विषय काढला.

"आपला 'जिमनॅस्ट' काय म्हणतो? बाकी इतक्या लवकर त्याचं लग्न करायला नको होतं असं मला अजूनही वाटतं!"

त्यावर पद्माबाई म्हणाल्या, "अहो ते करणंच भाग होतं. त्याच्या आईचीच इच्छा होती, आपल्या डोळ्यासमोर त्याचं लग्न व्हावं म्हणून! शिवाय आता तो कमवता झाला आहे!"

"कबूल, पण तरीही त्याला 'करियर' करायची संधी द्यायला हवी होती!"

"लग्न झाल्यावर करीयर करता येतंच की!"

विक्रमला सर्व इतिहास माहीत होता. मीनलचे आणि श्रीरंगचे प्रकरण त्याला अमिताकडून समजले होते. अमिताला मीनलने सर्व सांगितले होते. पुण्यासारख्या ठिकाणी बरीच वर्ष वास्तव्य केलेल्या विक्रमला पद्माबाईनी श्रीरंगच्या बाबतीत केलेली कारवाई खटकली होती. एकीकडं आपण पुरोगामी विचाराच्या आहोत असा आभास निर्माण करणाऱ्या पद्माबाईनी श्रीरंगवर अन्याय केलेला आहे असं त्याला मनापासून वाटत होतं. मुरारराावाना हाताशी धरून प्रथम त्याला नोकरी लावली, श्रीरंगला चिंचली सोडणं भाग पडलं. आता त्याचं लग्न करून मीनलच्या मनात त्याच्याविषयी असलेला जिव्हाळा नष्ट करण्याची त्यांची कृती विक्रमलाही पसंत नव्हती.

अमिताची आणि विक्रमची त्याबाबत सविस्तर चर्चाही झालेली होती. अमितालाही एका गरीब होतकरू विद्यार्थ्यावर अन्याय झालेला आहे असंच वाटत होतं. पण पद्माबाईचं व्यक्तिमत्व इतकं जबरदस्त होतं की, त्याबाबतीत त्यांच्यासमोर तो विषय काढण्याची विक्रमची किंवा अमिताची हिम्मतच नव्हती.

मघाशी कर्नल साहेबानी तो विषय काढताच पद्माबाईनी श्रीरंगच्या लग्नाचं केलेलं समर्थन त्याला खटकलं होतं.

मध्यरात्री कर्नलसाहेबांच्या उशाचा फोन खणखणला. त्यानी बेड लॅम्पचे बटन दाबून दिवा लावला. रिसिव्हर उचलून कानाशी धरला. पलीकडून आवाज आला.

"हॅल्लोऽऽ कर्नल ओबेरॉय यांचा नंबर का?"

"होय! मी कर्नल ओबेरॉयच बोलतोय!"

"तिथं पद्माबाई घोरपडे आल्या आहेत ना?"

"हो, त्या झोपलेल्या आहेत!"

"त्याना सांगा की श्रीरंगने पोलीस हवालदार जयसिंग जमदाडे याचा खून केला आहे!"

"काय म्हणालात? श्रीरंगने खून केला? काहीतरी चुकीची बातमी तरी देत नाही ना?"

"नाही नाही! मी विश्वास बोलतोय, श्रीरंगने काल रात्री साडे अकराच्या सुमारास जयसिंग जमदाडेचा कुऱ्हाडीने खून केला आणि रक्तानं माखलेल्या कुऱ्हाडीसह तो शिरगांव पोलीस ठाण्यात हजर झालेला आहे. मुराररावानी त्याला अटक केलेली आहे!"

"पण कशामुळं हा प्रकार घडला?"

"मला अजून सविस्तर असं काही समजलेलं नाही, तरी पण शालनशी जमदाडेचा अनैतिक संबंध असावा अशा संशयावरून हा भीषण प्रकार घडलेला आहे. डी.एस.पी, डी.वाय.एस.पी, असे वरिष्ट पोलीस अधिकारी शिरगावला रवाना झालेले आहेत. बायजाला हे वृत्त समजताच ती बेशुद्ध पडली आहे. दवाखान्यात ॲडमिट असून तिची प्रकृती चिंताजनक आहे! पद्माबाईना तात्काळ इकडं पाठवून द्या!"

कर्नलसाहेबाना ती वार्ता ऐकून प्रचंड धक्का बसला. कालच रात्री जेवताना आपण श्रीरंगची चर्चा केली आणि तीन चार तासातच तिकडं तो प्रकार घडावा याचं त्याना आश्चर्य वाटलं.

कर्नलसाहेबानी जगमधलं पाणी ग्लासात ओतून घेतलं. पाणी पिऊन झाल्यावर त्यानी क्षणभर विचार केला. 'पद्माबाईना आत्ता रात्री दीड वाजता उठवून ही बातमी सांगावी की उद्या सकाळी? आत्ता सांगून त्या काही तात्काळ निघू शकत नाहीत!'

कर्नलसाहेब दिवा बंद करून परत अंथरूणावर पडले. त्याना चिंचली कॉलेजच्या गॅदरिंगच्या वेळी श्रीरंगला चार पाच पक्षीसं दिलेला

प्रसंग आठवला. त्यावेळी त्यानी प्राचार्यांना श्रीरंगची माहिती विचारली होती. त्याला स्पोर्टसमन म्हणून सैन्यात भरती करून घ्यायची इच्छाही त्यानी त्यावेळी प्रदर्शित केली होती. त्या संध्याकाळी प्राचार्य जांभळे त्याला बंगल्यावर घेऊन आले होते.

त्यानंतर परवा अमिताला आणण्यासाठी कर्नलसाहेब चिंचलीला गेले असताना सांगावला श्रीरंगचं लग्न आहे हे समजल्यावर निमंत्रण नसतानासुद्धा ते पद्मबाई आणि अमितासोबत लग्नाला गेले होते. जोधपुरी पद्धतीचा फेटा, अंगात रेशमी झब्बा, ब्रिचेस घातलेला श्रीरंग एखाद्या राजपुत्रासारखा देखणा दिसला होता. काहीशी सावळी, पण बदामी डोळ्याची वधू शालन त्याला शोभून दिसत होती. त्या लग्नात फरची टोपी, रेशमी स्टॅंड कॉलरचा कोट घालून खाशा पाहुण्यांचं स्वागत करून त्याना पुढच्या रांकेत आणून बसवणारा पोलीस हवालदार जयसिंग जमदाडेही आठवला, गरुडासारखं नाक, ओठावर तलवार कट मिशा कोरलेला, अंगाला चंदनाच्या अत्तराचा घमघम वास येणारा जयसिंग 'जी हां, जी हां' अशी अदबीची खानदानी भाषा करीत होता. मुराररावांचा उजवा हात म्हणून तो ओळखला जातो ही माहिती लग्नाहून परत येताना पद्मबाईनीच कर्नलसाहेबाना दिली होती.

कर्नलसाहेबांना झोप लागणं शक्य नव्हतं. अडीच झाले, तीन, झाले. साडेचार वाजता मात्र ते पुन्हा उठून बसले. खिडकीतून चंद्रप्रकाश आत आला होता. कर्नल साहेब खिडकीजवळ आले. दुधाच्या ट्रक्सची येज़ा सुरू होती. अशा वेळी दूर कुठेतरी सकाळ विकणारा पोऱ्या मोठमोठ्यानं ओरडत होता.

"हवालदार जयसिंग जमदाडे याचा भीषण खून ! आरोपी पोलीस कॉन्स्टेबल श्रीरंग कुऱ्हाडीसह शिरगाव पोलीस ठाण्यात हजर!' तेव्हामात्र कर्नल साहेबानी पद्मबाई झोपलेल्या खोलीचं दार ठोठावलं.

"पद्मबाई, जाग्या आहात का? जरा उठा! एक वाईट बातमी आहे!'

पद्माबाईची झोप अतिशय हलकी होती, 'खट्' वाजलं तरी त्या तात्काळ जाग्या होत.

नातवाचं तोंड पाहून अतिशय आनंदात झोपी गेलेल्या पद्माबाईना उठल्या उठल्या कर्नलसाहेबानी ती भीषण वार्ता सांगितली.

पद्माबाईनी कपाळाला हात लावला आणि उद्गरल्या

"अरे देवाऽऽऽ! हे काय करून ठेवलं हो या पोरानं? आता ती म्हातारी काही जगत नाही! मला निघायला हवं! विकीला उठवलंय का?"

"उठवतो ना? तो आपल्याला स्टँडला सोडून येईल!"

पद्माबाई निघायच्या तयारीला लागल्या होत्या.

विक्रम उठला. त्याला कर्नलसाहेबानी ती वार्ता सांगताच तो म्हणाला,

"मला त्या जयसिंगची थोडी माहिती होती. मुरारकाकांचा उजवा हात होता तो!"

कर्नलसाहेबानी विचारलं "तुला त्याची आणखीन काय माहिती होती विकी?"

"ही वॉज ए नटोरियस वुमनायझर!" विक्रम म्हणाला.

"माय गॉड! पण आता या पोराचं काय होणार?"

"आय वुईल हॅव टू हेल्प हिम! सकाळी ॲडव्होकेट प्रधानांचा सल्ला घेतो ना?"

"अरे पण ज्या कुऱ्हाडीनं त्यानं त्या जमदाडेचा खून केला आहे त्या कुऱ्हाडीनिशी तो पोलीस ठाण्यात हजर झालाय म्हणे! आता यातून त्यची सुटका होणं कठीण आहे!"

पद्मावाई तयार होऊन बाहेर आल्या. विक्रमने तो विषय थांबवला त्यांची बॅग त्याने गाडीत ठेवली.

कर्नलसाहेब म्हणाले, पद्माबाई त्या मुलाला जरूर ती सर्व मदत होईल एवढं पहा! सच ए नाईस यंग चॅप!"

गाडी गेल्यानंतर बराचवेळ सुन्न झाल्यासारखे कर्नलसाहेब व्हरांड्यातल्या वेताच्या खुर्चीवर बसून होते.

२६.

रक्ताने माखलेल्या कुऱ्हाडीसह श्रीरंग शिरगावच्या पोलीस ठाण्यात हजर झाल्यानंतर त्याला मुराररावानी तात्काळ अटक करून त्याच्याविरूद्ध खूनाचा गुन्हा दाखल केला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याना 'एक्सप्रेस' रिपोर्टस् पाठवण्यात आले.

जयसिंग जमदाडेच्या प्रेताचा पंचनामा करण्यात येऊन प्रेत 'पोस्टमार्टम'साठी दवाखान्यात पाठवले. तो प्रकार प्रत्यक्ष कोणी बघितला नव्हता, तरिही तो तीन साक्षीदारानी बघितलेला होता अशा मजकुरांचे साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले. त्या गुन्ह्याबाबत अधिक चौकशीची गजर असल्यामुळे श्रीरंगची पंधरा दिवसांची पोलीस कस्टडीची रिमांड घेण्यात आली.

त्या भीषण प्रकाराची केवळ शिरगावातच नव्हे तर उभ्या दुर्गापूर जिल्ह्यात चर्चा होत राहिली.

ज्या ठिकाणी जयसिंगला मारण्यात आले होते ते ठिकाण पोलीस स्टेशनपासून अवघ्या बत्तीस फुटावर होते. जयसिंगच्या धडापासून त्याचे मुंडके अलग झालेले होते. त्यावरून श्रीरंगने किती ताकतीने तो कुऱ्हाडीचा वार केला असेल याची कल्पना येत होती.

चौथ्यादिवशी विश्वास श्रीरंगला भेटायला आला. मुराररावानी ती भेट नाकारली. ते म्हणाले,

"श्रीरंग पोलीस कस्टडीत आहे, तुला त्याला भेटता येणार नाही, अजून गुन्ह्याचा तपास अपूर्ण आहे, तो पूर्ण झाल्यावर त्याला मॅजिस्ट्रेट कोठडीत पाठवल्यानंतरच तुला त्याला भेटता येईल!"

चंपाच्या प्रकरणात विश्वासची मनधरणी करणारे, अजीजीनं

बोलणारे हेच ते मुरारराव का? असा संभ्रम पडावा इतका त्यांच्यात फरक जाणवत होता.

विश्वास म्हणाला, "पण नेमका प्रकार काय घडला तरी काय?"

"तुला काय घडलंय ते ठाऊक आहे ना? त्यादिवशी रात्री अकरा वाजून वीस मिनिटांनी जयसिंग पोलीस स्टेशनमधून आपल्या खोलीकडं जाण्यासाठी बाहेर पडला असताना लाईनच्या कोपऱ्यावर हातात फरशी कुऱ्हाड घेऊन दबा धरून बसलेल्या श्रीरंगने त्याच्या मानेवर वार करून शीर धडा वेगळे केले' समजलं? पूर्व नियोजनानं 'त्यानं हा गुन्हा केला असल्यामुळं आता त्याला फाशीशिवाय दुसरा पर्याय नाही! विश्वास तू सामाजिक कार्यकर्ता आहेस हे जरी खरं असलं तरी या गुन्ह्याच्या प्रकारात आता तू लक्ष घालू नयेस हे बरं!"

"श्रीरंगला मी फार जवळून ओळखतो त्यानं हा प्रकार का केला हे मला समजायला हवं!"

"ते एव्हाना तुला समजायला हवं होतं! शालनशी जयसिंगचा अनैतिक संबंध असावा या संशयावरून त्यानं जयसिंगचा खून केलेला आहे! मारल्यानंतर दोन मिनिटातच तो पोलीस ठाण्यात रक्तानं माखलेल्या कुऱ्हाडीसह हजर झालेला आहे, मग आता तू त्याला भेटलास तरी तो निराळं असं तुला काय सांगणार आहे?"

"हे बघा साहेब, थोडं स्पष्ट बोलतो, राग मानू नका, माझा पोलीस खात्यावरचा विश्वास केव्हाच उडालेला आहे! खऱ्याचं खोटं आणि खोट्याचं खरं करण्याची तुमच्या खात्याची किमया मला चांगली ठाऊक आहे. आज तुम्ही मला श्रीरंगशी बोलू देणार नाही याचा मला थोडा अंदाज होताच!"

"मग आलास का?"

"वाटलं, तुमच्यावर मी केलेल्या उपकाराची जाणीव तुम्ही इतक्यात विसरणार नाही!"

"उपकार? कसले उपकार केलेस माझ्यावर?"

"चंपानं आपला जबरदस्तीनं गर्भपात केल्याची फिर्याद दाखल केली असती म्हणजे मग समजलं असतं! असो, जातो मी एक गोष्ट सांगायला आलोय मला समजलंय श्रीरंगचा जबरदस्तीनं कबुलीजबाब घेण्याच्या प्रयत्नात तुम्ही आहात! त्यासाठी त्याला मारहाण, किंवा कोणाचं तरी दडपण आणाल तर मी गप्प बसणार नाही! आत्ताच मी सेशन कोर्टाकडं तसा अर्ज देऊन आलोय! जयसिंग तुमचा उजवा हात होता. तुमच्या अनेक कारस्थानात त्याचा सहभाग होता. त्याच्या खुनामुळे तुम्ही चिडून जाऊन श्रीरंग या खटल्यातून सुटू नये म्हणून अटीतटीचे प्रयत्न करणार आहात. पण लक्षात ठेवा, मी श्रीरंगच्या बाजूने उभा आहे! जे करायचंय ते कायदेशीर मार्गानं होऊ द्या! तुम्ही जर या प्रकरणात बेकायदेशी मार्गाचा अवलंब कराल तर तुम्हाला ते महागात पडेल."

"विश्वास, मला ठाऊक आहे तू कायद्याचा दोन वर्षे अभ्यास केलेला आहेस, पण मी गेली पंचवीस वर्षे कायदा प्रत्यक्षात राबवलेला आहे!"

"हो ते ठाऊक आहे मला, म्हणूनच चंपानं फिर्याद देऊ नये म्हणून माझे पाय धरायचे तेवढं तुम्ही बाकी ठेवलं होतं! जाऊ द्या, मी माझी माणुसकी सोडली नाही. म्हणून तुम्ही त्या प्रकरणातून सहीसलामत सुटलात. पण आता वाटतं आपण चूक केली! असो! झालं गेल्याचा उल्लेख करून तुमच्यात काही बदल घडणार नाही, पण एक लक्षात ठेवा शेवटी अंतिम विजय सत्याचाच असतो!"

विश्वास निघून गेल्यानंतर मुराररावानी सिगारेट शिलगावली. ओठ दातात दुमडून ते स्वत:शीच म्हणाले,

"म्हणे अंतिम विजय सत्याचाच असतो! मूर्ख कुठला! अरे कोण आहे तिकडं?"

एक कॉन्स्टेबल डोक्याची टोपी सावरीत समोर आला आणि मुराररावापुढे येऊन सॅल्यूट ठोकून उभा ठाकला.

"हा विश्वास धुमाळ कुठे जातो, कोणाला भेटतो याची माहिती घेण्यासाठी डी.बी.च्या दोन कॉन्स्टेबलना तात्काळ पाठव कुठे आहेत ते दोघे?"

"सकाळी येऊन गेले, लायनीत आहेत. का बघतो आणि आपला निरोप सांगतो."

मुराररावांच्या आदेशानुसार डी.बी.चे साध्या वेषातले दोन कॉन्स्टेबल विश्वासच्या हालचालीवर लक्ष ठेऊन राहिले.

शिरगाववरून विश्वास सरळ चिंचलीला आला. तो येण्यापूर्वी अर्धा तास अगोदर पद्मावाई पुण्यावरून परत आल्या होत्या.

मीनल आणि त्या बोलत होत्या. पद्मावाई विश्वासला पहाताच म्हणाल्या, "काय करून ठेवलं रे हे श्रीरंगानं?"

समोरच्या खुर्चीवर बसत विश्वास म्हणाला, "नेमका काय प्रकार घडला हे त्यालाच विचारावं म्हणून शिरगावला गेलो होतो. पण तुमच्या भावोजीनी माझी श्रीरंगाशी भेट होऊ दिली नाही."

"का?" मीनलनं विचारलं.

"म्हणे तो पोलीस कोठडीत असताना दुसऱ्याला भेटू देता येत नाही!"

"पण भावोजीनी तुला अडवलं?" "पद्मावाईनी विचारलं,

"आता काय सांगायचं तुम्हाला अक्कासाहेब मी उगाच जास्त लांबड लावली नाही, पण त्यांचं आजचं वागणं काही मला आवडलं नाही!"

"त्यांचं वागणं कधी सरळ होतं?" मीनल काहीसी त्वेषानं म्हणाली,

मीनलकडे कांहीशा रागानं पहात पद्मावाई म्हणाल्या, "मिनू तू माडीवर जा! असल्या प्रकरणात तू लक्ष घालू नको, जा म्हणते ना?"

"जाते, पण लक्षात ठेवा मा, मुरारकाका त्याच्याविरूद्ध काही खोटं- नाटं करतील तर मीच त्याना गोत्यात आणेन!"

मीनल दणदण पाय आपटत जिन्यावरून वर गेली. खोलीचं दार

आतून बंद करून कॉटवर जाऊन पडली. हा प्रकार समजल्यापासून ती अस्वस्थ झालेली होती. श्रीरंगवर तिनं मनापासून प्रेम केलेलं होतं. त्याचं लग्न झालं तरीही ती त्याला विसरायला तयार नव्हती.

पद्मावाईनी विश्वासला विचारलं, "पण श्रीरंग असा काही अतिरेकीपणा करील असं कधीही वाटलं नव्हतं मला!"

"मलासुध्दा हा प्रकार समजल्यावर धक्काच बसला! त्याची भेट झाल्याशिवाय नेमकं काय घडलं ते समजणार नाही! पण मुराररावांचं वागणं मात्र मला थोडं खटकलं! त्यानीच श्रीरंगला पोलिसात भरती करून घेतला आणि आता तेच तो या खटल्यातून सुटता कामा नये याच्या प्रयत्नात आहेत! श्रीरंगचा जबरदस्तीनं कबुलीजबाब घेणार आहेत याचा मला सुगावा लागला म्हणून मुद्दाम शिरगावला गेलो होतो तर त्यानी मला त्याची भेटच होऊ दिली नाही!"

"भेटीची कायद्यात तरतूद नसेल तर ते तरी काय करणार विश्वास! बघू मी उद्या शिरगावला जाऊन येते. मग मला सगळं समजेल!" पद्मावाई म्हणाल्या.

"तुम्हाला काही समजणार नाही! जयसिंग जमदाडे हा मुरारराबांच्या खास विश्वासातला होता. फौजदारसाहेबांचे सगळे महत्वाचे व्यवहार जयसिंगमार्फतच व्हायचे! तो गेल्यामुळे ते श्रीरंगवर सूड घेतील अशी मला दाट भीती वाटते!"

"तसं काही होणार नाही!"

"माझा विश्वास नाही त्यांच्यावर! जयसिंगबद्दल तुम्हाला काहीच ठाऊक नाही. त्यानं आजपर्यंत लाईनमधल्या सहा-सात विवाहित स्त्रियांशी लफडी केलेली आहेत. बाहेरची आणखी निराळीच! नवीन लग्न झालेल्या पोलिसाना जयसिंग दूर गावच्या ठिकाणी ड्युटीवर पाठवायचा आणि त्याच्या अपरोक्ष घरी जाऊन त्याच्या पत्नीशी संधान बांधायचा! ही त्याची जुनी खोड होती."

"काय सांगतोस काय? मग ते पोलीस लोक गप्प कसे बसले होते?"

"काय करणार? हा मुराररावांच्या नाकातला बाल! त्याच्याविरूद्ध तक्रार करण्याचं धाडसच कोणाला होत नव्हतं. शिवाय प्रत्येक वेळी स्वत:ची बदली झाली की मुरारराव डी.एस.पी.ना सांगून त्याचीही आपल्याच पोलीस स्टेशनला नेमणूक करून घेत!"

"बरं ते काही असू दे! आपण ज्या गोष्टी प्रत्यक्ष बघितलेल्या नाहीत त्यावर विश्वास ठेवू नये! चंपाचं कसं चाललंय आता?"

"ठीक आहे! शिवराम आणि चंपा धनगरवाड्यातल्या आश्रमशाळेचं सारं काम पहातात. मला काहीच पहावं लागत नाही. आता जवळ जवळ पन्नास मुलं आहेत तियं!"

"बरं केलंस बाबा, तिला तियं डोंगरात नेऊन ठेवलंस, एखाद्या गावात ती राहिली असती तर उगाच लोकानी घोरपड्यांची पळून गेलेली लेक म्हणून तिची चर्चा केली असती!"

"म्हणजे अजून तुमच्याही मनातली ही घराणेशाहीची कल्पना जात नाही?"

"ती कशी जाईल विश्वास! काही संस्कार हे जपायलाच हवेत! उगाच सुधारणा सुधारणा म्हणून लेकी काय झोपडपट्टीत द्याव्यात!"

"झोपडपट्टीपर्यंत जाण्याची गरज नाही! कमावता, सुशिक्षित असला तरी अगोदर जातीच्या शाळीग्रामावर तुम्ही त्याला घासून पहाताच की!"

"जाऊ दे! उगाच नको तो विषय, उद्या मी शिरगावला जाऊन येते. मग ये तू! आपण श्रीरंगच्या बाबतीत काय करायचं ते ठरवू!"

पद्माबाई शिरगावला आल्या. मुरारराव डी.वाय.एस.पी. आल्याने पोलीस स्टेशनमध्ये होते. घरात रत्ना आणि छबू होती. पद्माबाई आल्याची वर्दी मुराररावाना देण्यासाठी ऑर्डर्ली ऑफीसकडे गेला.

रत्नानं विचारलं, "पुण्यावरून कधी आलात? नातू कसा आहे?"

"उत्तम आहे! पण हे श्रीरंगचं काय प्रकरण?"

"बघा ना, काहीतरीच करून ठेवलंय त्यानं! त्याला शंका होती म्हणे आपण बाहेरगावी गेलो की जयसिंग घरी येऊन शालनशी बोलत बसतो!"

"असेल बोलत, म्हणून काय एकदम त्याच्याशी संबंध असेल असा संशय धरून त्याला ठार मारायचा?"

डी.वाय.एस.पी. गेल्यानंतर मुरारराव घरी आले. डोक्याची पिक्ड कॅप त्यानी खुंटीला अडकवली. पद्माबाई आणि ते खोलीत चर्चा करू लागले!"

"भावोजी नेमका प्रकार काय घडला?"

मुराररावानी उठून खोलीचं दार बंद केलं. रत्नानं आणि छबूनं ती चर्चा ऐकू नये म्हणून!

"हे पहा वैनी, त्याचं असं झालं, जयसिंग अधूनमधून श्रीरंगच्या घरी बायजा असल्यापासून जात येत होता. बायजाची प्रकृती बरी नव्हती म्हणून विचारपूस करायला जायचा! बायजा थोडी प्रकृती सुधारल्यावर तुमच्याकडे चिंचलीला गेली!"

"हो ते मला ठाऊक आहे. शिरगावात आपल्याला करमत नाही असं इकडून आल्यानंतर म्हणाली मला ती!"

"बरोबर! तर बायजा येथून गेल्यानंतर चार दोन वेळा जयसिंग शालनकडे सहज बोलायला म्हणून गेला असेलही!"

"पण तिचा नवरा घरी नसताना त्यानं का जावं?"

"हे पहा वैनी. जयसिंग तसा थोडा मनमोकळ्या स्वभावाचा होता. आता आमच्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत बावन गावं आहेत. रोज कुठे ना कुठे पंचायत निवडणूक असते, किंवा एखादी म्हसोबाची नाहीतर बिरोबाची यात्रा असते, किंवा गावातल्या दोन पार्ट्यात किरकोळ कारणावरून तणाव वाढतो, मग आम्हाला कायदा आणि सुव्यवस्था ठेवण्यासाठी चार दोन पोलीस बंदोबस्तासाठी पाठवावे लागतात. अशा

बंदोबस्ताला गेलेल्या एखाद्या कॉन्स्टेबलची बायको दिसली तर जयसिंग तिला काही अडचण आहे का विचारायचा! नवरा बाहेरगावी ड्युटीवर गेल्यावर बायकाना काही ना काही अडचणी येतातच की!"

"ते जाऊ द्या, श्रीरंगच्या बाबतीत काय घडलं तेवढं सांगा?"

मुराररराव मुत्सद्दीपणानं म्हणाले, "श्रीरंगला कुस्त्याचा नाद होता हे तर सवश्रुतच आहे! तो रेंजस्पोर्टस्‌साठी आठ-दहा दिवस पुण्याला गेला होता. त्यापूर्वी तो सरावासाठी दुर्गापूरला जात होता, आजूबाजूला कुठं कुस्त्यांचा फड असला तर आम्ही त्याला कुस्त्या पहायला सोडत होतो. नवीन लग्न झालेली शालन घरी असताना तो गावोगावी भटकत होता, त्या बिचारीला घरी करमायचं नाही! मग जयसिंग तिथं गेला की तीही बोलत बसायची! एकटी घरात बसून बसून कंटाळणार की नाही सांगा तुम्ही?"

"बरं पुढं बोल!"

"त्यादिवशी संध्याकाळी हा पंढरपुरला कुस्त्या पहायला जातो म्हणून गेला. नंतर जयसिंग तिच्या दारावरून जाताना तिला सहज म्हणाला,

"काय शालनबाई जेवायला काय केलंय आज?"

ती म्हणाली, "मटण केलंय!"

तो गमतीनं म्हणाला, "मग यावं काय जेवायला?"

ती म्हणाली "या! जयसिंग जेवायला गेल्यानंतर तिनं पुढचं दार बंद करून घेतलं!"

"ते का?" पद्माबाईनी विचारलं.

"अहो वैनी आमच्या पोलीस लाईन जवळ पंधरा-वीस मोकाट कुत्री आहेत. वासावरून घरात शिरतात म्हणून जेवताना सर्वानाच लायनीत दार बंद करावे लगते!"

मुराररावांच्याकडं संशयाने पहात पद्माबाईनी विचारलं, "मग काय झालं?"

"पंढरपुरला कुस्त्या पहायला जातो म्हणून बाहेर पडलेला श्रीरंग पंढरपूरला गेलाच नव्हता. पोलीस लाईनच्या समोर विहिरीच्या बाजूला दाट शेंडाचं झुडूप आहे त्यात फरशी कुऱ्हाड घेऊन दबा धरून बसला होता."

"बरं पुढे?"

"तेथून त्याला आपल्या खोलीत कोण आलं गेलं स्पष्ट दिसत होतं. जयसिंग खोलीत गेल्यानंतर शालनने त्याला जेवायला वाढले! दारातून कुत्री डोकावू लागली म्हणून उठून शालनने दार बंद करून घेतले. दार बंद झाल्याचं पाहून श्रीरंग झुडुपातून कुऱ्हाड घेऊन सरळ दारासमोर आला आणि त्यानं शालनला हाक मारली. आता बंद घरात आपण आहोत, श्रीरंगला शंका येईल म्हणून जयसिंग ताटावरून उठला आणि दाराची कडी काढण्यापूर्वी आतूनच म्हणाला,

"पंढरपूरला नाही गेलास!"

"तुला पंढरपूर दाखवतो, बाहेर ये! असं श्रीरंग म्हणाला, त्याचा आवाज ऐकून जयसिंगला काहीतरी गडबड होणार असं वाटल्याने त्यानं दार उघडून पळून जाण्याचा प्रयत्न केला. पण तो दाराच्या उंबऱ्यात असतानाच श्रीरंगच्या कुऱ्हाडीने त्याचे शीर धडा वेगळे केले! धड बाहेर आणि शीर आत, असा प्रकार घडला!"

त्यावर पद्मावाईनी विचारलं, "भावोजी हा प्रकार श्रीरंगच्या दारात घडला असताना तुम्ही पोलीस स्टेशनपासून बत्तीस फुटावर घडल्याचे पंचनामे केलेत म्हणून मला समजलंय!"

"ते खरंय वैनी, खुनाचा आरोप शाबीत होण्यासाठी मला हा गुन्हा दुसऱ्या ठिकाणी घडला हे दाखवणं जरुरीचं होतं!"

"याचा अर्थ तुम्ही श्रीरंगविरूद्ध खोटा पुरावा तयार केलेला आहे असा होत नाही?"

"हो, नक्कीच तसा अर्थ होईल! पण वैनी तुम्ही एक गोष्ट विसरता, श्रीरंग जर या खटल्यातून सहीसलामत सुटला तर तुमची मीनल पुन्हा

त्याच्याशी संधान बांधायला कमी करणार नाही!"

मुराररावानी मीनलच्या नावाचा उल्लेख करताच पद्मावाई विचारमग्न होऊन म्हणाल्या, "भावोजी हा प्रकार घडल्यापासून ती भलतीच अस्वस्थ झालेली आहे. मी पुण्यावरून आले तर तिचे डोळे रडून रडून सुजलेले! श्रीरंगच्या हातून हा गुन्हा होणेच शक्य नाही असं मला वारंवार म्हणत होती."

"आता काय आहे वैनी, श्रीरंगनं जयसिंगचा खून केला हे सत्य आहे. कारण काही क्षणातंच तो रक्तानं माखलेल्या कुऱ्हाडीसह पोलीस ठाण्यात हजर झालेला आहे! आता हा खटला शाबीत होण्यासाठी मी गुन्ह्याची जागा थोडी बदलली इतकंच! त्यामुळं फारसा काही फरक पडणार नाही!"

"पण श्रीरंगच्या दारात उंबरठ्यावर रक्त पडलं असेल ना?"

"ते मी सारं स्वच्छ करून घेतलं रातोरात!"

"पण बघा हं भावोजी, परवा एका संकटातून वाचला आहात, पुन्हा काहीतरी आफत आली तर यावेळी कोणीही तुमच्या मदतीला येणार नाहीः!"

"ती मला चांगली जाणीव आहे वैनी! पण माझ्या विश्वासू जयसिंगला ठार मारणाऱ्याची मी मुळीच गय करणार नाही! श्रीरंगला फांशी झाल्याचा निकाल ऐकल्याशिवाय माझ्या जिवाला चैन नाही पडणार!"

मुरारराव म्हणाले त्यात काही अतिशयोक्ती नव्हती. श्रीरंग त्या खटल्यातून सुटला तर तो शालनचा पती म्हणून स्वीकार करण्याची शक्यताच नव्हती. उलट एकदा खंडित झालेलं मीनलचे प्रेमप्रकरण पुन्हा उद्‌भवण्याची शक्यता होती. मुराररावानी केलेल्या त्या गुन्ह्याच्या तपासामुळं श्रीरंगवर अन्याय होत आहे याची जाणीव होऊनही पद्मावाई त्यावेळी गप्प बसल्या. त्याना मीनलची भीती वाटत होती. सत्यजितसिंहा सारखं स्थळ तिच्यासाठी शोधूनही त्यानी तिला का नाकारावी हे त्याना

समजलं नव्हतं. त्यांच्या मनात शंका होती, हे सर्व मीनलचंच कारस्थान असावं! पण त्याबबाबतीत त्याना निश्चित असा काही धागा सापडला नव्हता.

"भावोजी श्रीरंगला फाशी मात्र होऊ नये! त्याला दुसरी काही कमी शिक्षा होऊ शकणार नाही?"

अजूनही पद्मावाईच्या मनात श्रीरंगविषयी थोडी कणव होती.

"हे पहा वैनी, मी त्याला फाशी व्हावी याचा प्रयत्न जरी करत असलो, तरी फाशी होईलच असं सांगता येत नाही. त्याचं वय आणि ज्या परिस्थितीत हा गुन्हा त्याच्या हातून घडलेला आहे, या गोष्टी न्यायाधिशानी जर विचारात घेतल्या तर त्याला फाशी ऐवजी जन्मठेपसुद्धा होऊ शकते! ते पुढे खटला चालून संपल्यावर आपल्या पब्लिक प्रॉसेक्यूटरना सांगून करून घेता येईल! आत्ताच त्याचा विचार करण्याची गरज नाही."

पद्माबाई शिरगाववरून चिंचलीला परत आल्या. त्याही काहीशा अस्वस्थ अशा अवस्थेतच! एकीकडं त्या गुन्ह्याच्या तपासाला मुराररावानी जे वळण लावलं होतं ते श्रीरंगवर अन्याय करणार होतं, पण त्याच बरोबर श्रीरंग जर त्या खटल्यातून सहीसलामत सुटला तर पुन्हा मीनल त्याच्या प्रेमात पडते की काय अशी विवंचना त्याना लागून राहिली होती.

पद्माबाई शिरगाववरून परत आल्यानंतर मीनलने त्याना तिथं काय घडलं हे मुळीसुद्धा विचारलं नाही. ती काहीतरी विचारेल अशी पद्माबाईना आपेक्षा होती.

संध्याकाळी अमृतराव बाहेरून आले. त्यानी मात्र विचारलं.

"नेमकं काय घडलंय म्हणे?"

"शालनच्या चारित्र्याचा संशय घेऊन श्रीरंगने जयसिंगला मारलंय!"

"मुरारदादा काय म्हणतात?"

पद्माबाईना त्याविषयावर अमृतरावाशी सविस्तर बोलायची इच्छा नव्हती. त्या म्हणाल्या "केस शाबीत करण्याच्या प्रयत्नात आहेत" ते काही तरी असू दे, तुम्ही उद्या मिनूला घेऊन पुण्याला जा!"

"पुण्याला? का?"

"तुम्हाला नातवाला बघायचं होतं ना?"

"हो, पण तुम्ही नुकत्याच परत आलात, तिकडचं सगळं कुशल आहे म्हटल्यावर मी चार सहा दिवसानंतर एकदा जाईन, मिनूला कॉलेज बुडवून तिकडं कशाला न्यायचं?"

"हे पहा तुमच्यासारखा बेअक्कल माणूस मी उभ्या जगात बघितलेला नाही! श्रीरंगचं ते प्रकरण घडल्यापासून मिनूची काय अवस्था झालीय याची तुम्हाला काही कल्पना आहे का?"

"श्रीरंगच्या त्या प्रकरणाशी मिनूचा काय संबंध? उगाच कशाचाही संबंध कशालाही जोडता?"

"घोरपडे सरकार, अजून तुम्हाला काही समजलेलं नाही! यापुढेही समजण्याची शक्यता नाही! श्रीरंगचे ते प्रकरण घडल्यापासून मीनल अस्वस्थ झालीय! त्याच्याबद्दल अजूनही तिच्या मनात सहानुभूती आहे, त्याचं लग्न झालं होतं म्हणून ती सहानुभूती संपलेली नाही! या खटल्यातून तो जर सहीसलामत सुटला तर पुन्हा ती त्याच्या नादी लागण्याची दाट शक्यता आहे!"

"काय बिशाद आहे तिची? तोंड फोडून ठेवीन मी तिचं, त्या हरामखोर श्रीरंगचं नांवतरी घेऊ दे!"

"तुम्ही भ्रमात आहात! ती किती तयारीची आहे याची तुम्हाला कल्पना नाही! श्रीरंग पोलिसात भरती झाल्यानंतर दुर्गापुरात हे दोघं एकदोन वेळा भेटले होते."

"असं तुम्हाला कोणी सांगितलं?"

"माझ्यावर विश्वास ठेवा!"

"अस्सं? मग तो भडवा या खटल्यातून सुटू नये म्हणून मुरारदादा प्रयत्न करतात त्यात वावगं काय आहे?"

"हो, पण तो प्रयत्नच आहे! अद्याप त्याबाबत काही निश्चित सांगता येत नाही."

अमृतराव आणि पद्मावाई बोलत असताना संतराम सांगत आला.

"बायजा गेली!"

"काय सांगतोस?"

"खोटं कशाला सांगू? दौलू हवालदार दवाखान्यातनं तिचं प्रेत घेऊन आलाय."

"अरेरेऽऽऽ! फार वाईट झालं! नवऱ्याच्या पश्चात लहानाचा मोठा केलेला मुलगा खुनाच्या खटल्यात अडकल्याचं पाहून तिचा धीर सुटला होता! चला जायला हवं!"

पद्मावाई बायजाच्या घरी येताच दारासमोरची बायकांची गर्दी पांगली. 'सरकारबाई आल्यात बाजू सरा गं' असं म्हणत बायकांनी त्यांना आत जायला वाट करून दिली.

भिंतीला टेकवून बायजाचं प्रेत ठेवलं होतं. पद्मावाईच्या डोळयातून अश्रू ओघळले. शेजारच्या बायकांनी गहिवर मांडला होता. पद्मावाईनी बायजाचं अंत्यदर्शन घेतलं आणि त्या बाहेर कठड्यावर दोन्ही हातात डोकं धरून बसलेल्या दौलू हवालदाराजवळ आल्या.

"फार वाईट झालं दौलू!'

दौलू हवालदार श्रीरंगच्या त्या प्रकरणाने अगोदरच खचला होता. एक तर शालनबद्दल लोक चांगलं बोलत नव्हते, तशात बायजाचा मृत्यू घडलेला! ही पांढऱ्या पायाची सून घरात आली आणि या घराचं 'वाटोळं' झालं असं लोक उघड उघड बोलत होते. लोकांच्या तोंडाला हात लावता येत नव्हता. पण तरीही आजपर्यंत पोलीस खात्यात मान ताठ करून जगलेल्या दौलूवर मान खाली घालून जगायची वेळ आली होती.

शालनला त्यानं तिचा जबाब झाल्यानंतर सांगावला नेली होती. ती घरातून बाहेर पडत नव्हती आता यापुढं तिचं भवितव्य अनिश्चित होतं.

श्रीरंग फाशी गेला काय किंवा जन्मठेपेला गेला काय, शालनचं पुढं काय करायचं हा फार मोठ्ठा प्रश्न दौलू हवालदारसमोर उभा होता. तशात बायजाचा हा मृत्यू! सर्व दु:खद घटनांचं खापरं दौलूच्या माथींच फोडलं जात होतं.

तोरणा नदीच्या काठी गावकऱ्यानी वलभीमचं दहन केलं होतं तिथं छोटीशी दगडी समाधी बांधलेली होती. त्या समाधी शेजारीच बायजाचं दहन करण्यात आलं. अग्नी द्यायला देखील श्रीरंगला सोडलेलं नव्हतं! तो शेवटी दौलू हवालदारालाच द्यावा लागला होता.

२७.

अमृतराव आणि मीनल अमिताच्या बाळाला पहायला पुण्याला आले होते. त्यादिवशी कर्नलसाहेबांच्या सोबत अमृतराव मिलिट्री स्टोअर्समधे गेले होते. कर्नलसाहेब महिन्यातून एकदा याच स्टोअर्समधून आपला ड्रिंक्सचा कोटा खरेदी करीत. शिवाय इतर गृहोपयोगी वस्तूही तिथं सैन्याधिकाऱ्याना वाजवी दारात खरेदी करण्याची सुविधा उपलब्ध होती.

घरी मोहिनी किचनमधें होत्या. नुकतीच मॅटर्निटीहोममधून घरी आलेली अमिता बाळाला झोपवत होती. व्हरांड्यात मीनल आणि विक्रम दोघेच होते.

मीनल म्हणाली 'विकी, या खटल्यात श्रीरंगचं काय होणार?"

क्षणभर विचार करून विक्रम म्हणाला, "तोच विचार माझ्या मनात वारंवार येतोय, परवा मी ॲडव्होकेट प्रधानाना ती सर्व घटना सांगितली. तेव्हा ते म्हणाले 'या केसमध्ये फाशी नक्कीच होतं नाही, झाली तर ती जन्मठेप होईल, पण तरीही ती केस थोडा अधिक अभ्यास करून चालवली आणि ग्रेव्ह ॲंड सडन् प्रोव्होकेशन या सदरखाली जर आणता आली तर अगदीच किरकोळ शिक्षा होऊ शकेल!"

"पण तियं मुरारकाका अगदी उघड उघडपणे बोलतात की श्रीरंगला या खटल्यात फाशीशिवाय दुसरा पर्याय नाही. परवा मा ही शिरगावला जाऊन मुरारकाकाना भेटून आल्या!"

"मग काय म्हणाल्या?"

"त्या विषयावर माझ्याशी कुठं स्पष्ट बोलतात? मी विषय काढला तर त्या लगेच तो विषय बदलतात!"

"मीनल, परवा विश्वासदादा आला होता, त्याला या प्रकरणात निराळंच संशय येतो आहे!"

"तो कसला?"

"मुरारकाका या खटल्यात काही खोटानाटा पुरावा करण्याच्या खटपटीत असावेत असा संशय आहे! पण अजून विश्वासदादाची आणि श्रीरंगची भेट होऊ शकलेली नाही. श्रीरंगला मॅजिस्ट्रेट कस्टडी दिली की तो त्याला जामिनावर सोडण्यात यावे म्हणून प्रयत्न करणार आहे! पण आपले काका त्यातही काहीतरी विघ्न निर्माण केल्याशिवाय रहाणार नाहीत!"

विक्रमचा हात हातात धरून काहीशी भावनाप्रधान झालेली मीनल म्हणाली,

"विकी, काही झालं तरी श्रीरंगला जास्त शिक्षा होता कामा नये!"

"असं कसं म्हणतेस? काही झालं तरी मनुष्यवध झालेला आहे! श्रीरंगला शालनच्या चारित्र्याविषयी जर काही संशय येत होता तर त्यानं तिला घटस्फोट द्यायला हवा होता, कायदा हातात घेणं हा काही त्यावर उपाय नव्हता!"

"हो पण श्रीरंग असा मायेफिल्पणा उगाच करणार नाही याची मला खात्री आहे! तो अत्यंत संयमी आणि व्यवहारी आहे! माझ्याशी त्याचा विवाह होऊ शकत नाही हे पाहिल्यावर त्यानं मला पत्र पाठवून कळवलं होतं, तुझ्या न् माझ्या मीलनानं जर सर्वानाच दु:ख आणि मन:स्ताप होणार असेल तर आपण एकमेकांपासून कायमचं दूर होणं

हाच एक उपाय आहे!' मला सांग विकी असा विवेक ज्याच्याजवळ आहे त्याच्या हातून खुनासारखा गुन्हा घडेल का याचा नको विचार व्हायला?"

"व्हायलाच हवा! माझ्या डोक्यात एक कल्पना आहे मीनल!"

"कोणती?"

"खटला जेव्हा दुर्गापूरच्या कोर्टात चालायला उभा राहील तेव्हा ॲडव्होकेट प्रधानानी तो चालवावा! तुला कल्पना नसेल मीनल, ॲड. प्रधान फौजदारी कायद्यातले उभ्या महाराष्ट्रातले एक तज्ज्ञ समजले जातात."

"पण त्यांची फीही तशीच जबर असेल ना?"

"फी जबर घेतात, पण जर का मी त्याना श्रीरंगचा खटला चालवण्याची विनंती केली तर माझ्याकडून पैसेच घेणार नाहीत!"

"काय सांगतोस? एवढे तुझे आणि त्यांचे घनिष्ट संबंध आहेत?"

"परवा कर्नलसाहेबानी त्याना डीनरला बोलावलं होतं तेव्हा ते कर्नल साहेबाना काय म्हणाले आहे ठाऊक आहे?"

"काय म्हणाले?"

"म्हणाले इतके ज्युनिअर माझ्याकडे येऊन शिकून गेले पण एकानेही नाव कमावले नाही. सगळे आपले पैशाच्यामागे लागलेले. एकाजवळही अभ्यासूवृत्ती नाही की 'सिन्सिरीटी' नाही! पण हा विक्रम मात्र माझ्या मार्गदर्शनाचं चीज करणार याची मला खात्री आहे."

"मग विकी तू एवढं काम करच, त्यानाच श्रीरंगचा खटला चालवायची विनंती कर, आपण दोघं त्याना थोडीफार फी सुद्धा देवू!"

"तू त्याची चिंता करू नको, पण त्यात एक प्रॉब्लेम आहे मीनल!"

"कोणता?"

"ह्या खटल्याचा तपास केला आहे मुरारकाकानी ते हा खटला शाबीत करण्याचे अटीतटीने प्रयत्न करणार, आणि प्रधानाना त्या

खटल्यात काकानी काही खोटा पुरावा करण्याचा खटाटोप केल्याचा जर संशय आला तर ते मुरारकाकांची बिलकूल गय करणार नाहीत! आपल्या आबाना आणि मांना ही गोष्ट रुचणार नाही!"

मीनल चट्कन म्हणाली, "एखाद्यावर जर अन्याय होत असेल तर आपल्या आईबापाला काय वाटेल याची आपण तरी का फिकीर करावी?"

"तू म्हणतेस ते अगदी खरं! पण आपण यातून असा एक मार्ग काढू?"

"कसा?"

"ॲड. प्रधानाना मी श्रीरंगचा खटला चालवण्याची विनंती केली ही गोष्ट गुप्त ठेवायची! विश्वासनेच त्याच्या सुटकेसाठी प्रयत्न केला असे भासवायचे! विश्वासचं कोणी वाकडं करू शकत नाही! अन्यायाला वाचा फोडणं हा त्याचा स्वभावच आहे. चंपाच्या प्रकरणात तो शिवरामच्या बाजूनं खंबीररीत्या उभा राह्यला म्हणूनच मुरारकाकाना नमतं घ्यावं लागलं होतं! शिवाय विश्वासचा श्रीरंगवर पहिल्यापासून लोभ आहे! विश्वासनं प्रधान वकीलाना श्रीरंगची केस चालवण्यासाठी आणलं असं आपण जर भासवलं तर मांचं आणि आबाचं आपल्याविषयी मत कुलुषीत होण्याची शक्यताच नाही!"

"करेक्ट! पण विकी ते एवढे मोठे वकील आहेत, तर त्याना हा खटला चालवायला सवड मिळेल का?"

"तू त्याची बिलकूल चिंता करू नको, ती जबाबदारी माझ्यावर! पण एक कर याबाबतीत कोणाशी कसलीही चर्चा करू नको!"

"प्रॉमिज!" असं म्हणून मीनलनं विक्रमच्या हातात हात दिला.

समोरून येणारी कर्नलसाहेबांची गाडी दिसताच त्या बहीणभावानी ती चर्चा थांबवली.

गाडीतून अमृतराव आणि कर्नलसाहेब उतरले. त्यांच्या हातात बाटल्याचं खोकं होतं. विक्रम त्याना मदत करण्यासाठी पढं गेला तेव्हा

"हांऽऽऽ 'धा मुलानी हाताळायच्या वस्तू नव्हेत! दारूगोळा आहे हा!" अमृतरावांच्या हातात दुसरं पॅकिंग होतं. कर्नलसाहेबानी व्याह्यासाठी अर्धा डझन रमच्या बाटल्या खरेदी केल्या होत्या.

चार दिवस पुण्यात राहून अमृतराव आणि मीनल चिंचलीला परत आले. विक्रमशी त्या खटल्याबाबत चर्चा झाल्यापासून मीनल काहीशी समाधानी दिसत होती.

मुरारराावानी खटल्याचा तपास पूर्ण होताच दुर्गापूरच्या सत्रन्यायालयांत श्रीरंगविरूद्ध चार्जशीट पाठवले. पुढे एक महिन्याने खटला सुनावणीस उभा राहिला.

पोलिस कॉन्स्टेबलनेच पोलिस हवालदाराचा खून केल्यामुळे जनतेत त्या खटल्याबद्दल कमालीचं औत्सुक्य होतं.

त्यादिवशी दुर्गापूरच्या सेशन कोर्टाच्या आवारांत प्रचंड गर्दी जमलेली होती. सत्र न्यायाधिश बर्वे यांची एक अत्यंत कडक आणि न्यायनिष्ठूर जज्ज अशी ख्याती होती. आरोपीने गुन्हा केलेला आहे अशी खात्री झाली की पुराव्यातले किरकोळ गैरमेळ बाजूला सारून ते आरोपीला कडक शासन ठोठावित.

बर्वेसाहेबांच्या कोर्टात ही केस चालणार म्हटल्यावर मुरारराव आपल्या सहकाऱ्यांना म्हणाले, "आता हा खटला शाबित झाल्यातच जमा आहे! बेर्वेसाहेब शिक्षा किती देतात एवढाच प्रश्न आहे!"

साडेदहाच्या सुमारास आरोपी श्रीरंगला हातकड्या घालून पोलिसांच्या निळया व्हॅनमधून सेशन कोर्टात आणण्यात आले. त्या आधी विश्वासनं श्रीरंगला जामिनावर सोडावं असा अर्ज दिला होता. तो न्यायमूर्ती बर्वेनी फेटाळून लावला होता. तो फेटाळताना न्यायमूर्तीनी सरकारी वकिलांच्या प्रतिपादनाला दुजोरा दिला होता. 'आरोपी श्रीरंग हा पोलीस खात्यातला कर्मचारी असल्यामुळं तो जर जामिनावर सुटला तर साक्षीदाराना दहशत घालेल म्हणून मी त्याचा जामिनाचा अर्ज नामंजूर करीत आहे!'

या पार्श्वभूमीवर त्याच बर्वेसाहेबांच्या समोर हा खटला चालणार म्हटल्यावर केवळ मुरारराबच खूष झाले असे नव्हे तर अमृतरावही समाधान झाले. आपण श्रीरंगच्या बाबतीत काहीसा अन्याय करतो आहोत अशी सतत टोचणी पद्मावाईना लागून राहिली होती. मुराररावानी खून झालेल्या ठिकाणाचा खोटा पंचनामा केल्याचं पद्मावाईना सांगितलं होतं. पद्मावाईनी त्याबाबत असा बदल का केला असं त्याना विचारताच त्यानी त्याचं समर्थनच केलं होतं. श्रीरंगला कठोर शासन घडणं हे घोरपडे घराण्याच्या दृष्टीनं हितांचं ठरणार होतं.

बायजाचा मृत्यू झाल्यानंतर त्या तिच्या अंत्यदर्शनाला गेल्या होत्या. निर्जीव बायजा त्यांच्याशी एकही शब्द बोलू शकत नव्हती. पण तिचे प्रेत पहाताना त्याना बायजा आपल्याशी बोलते आहे असा क्षणभर भास झाला, "सरकारबाई माजा दाल्ला तुमापायी गेला. मी ह्या शिरीरंगाला लहानाचा मोठ्ठा करून तुमच्या वट्यात घातला. तुम्ही आता त्याचा संबाळ करनार का त्येला फासावर लटंकीवनार?" तुमच्या इक्रमावर आसली पाळी असती. तर काय केलं असतासा?' चक्क बायजा आपल्याशी बोलते आहे असा त्याना भास झाला. त्या बंगल्यावर परतल्या तेव्हा विमनस्क अशा स्थितीत गच्चीत उभ्या होत्या. दूर तोरणा नदीच्या काठी बायजाची चिता भडकली होती. श्रीरंगच्या चिंतेनं बायजा मानसिकरित्या अर्धीअधिक खचून गेलेली होतीच, आता ती लाकडाची चिता तिच्या चिंताग्रस्त देहाला काही क्षणात भस्मसात करून टाकणार होती.

मुराररावांच्या कारस्थानाबद्दल आपण काहीही केले नाही याबद्दल पद्मावाईचे मन एकसारखे त्याना खात होते. घराण्याची प्रतिष्ठा, अमीर-उल-मुल्क या खानदानीचा लौकिक त्याना सोडता येत नव्हता. मुरारराव खोटा पुरावा तयार करून श्रीरंगला दोषी ठरवून शिक्षेस पात्र ठरवणार आहेत हे समजूनही पद्मावाई गप्प होत्या. बायजाच्या अकस्मात मृत्यूमुळं त्या अधिकच अस्वस्थ झाल्या.

बरोबर साडेअकराच्या टोल्याला न्यायमूर्ती बर्वे चेंबरमधून डायसवर आले. उपस्थितांनी त्याना उत्थापन दिले. खटला ऐकण्यासाठी कॉलेजातली मुलं, पहिलवानकी करणारे काही तरुण, पोलीस खात्यातले काही अधिकारी उपस्थित होते. काही ज्युनिअर वकील मंडळी पहिल्या दोन रांगात बसले होते, त्याना या खटल्यासाठी खास पुण्यावरून आलेल्या ॲडव्होकेट प्रधानांची खटला चालवण्याची, साक्षीदारांचा उलट तपास घेण्याची पद्धत अवलोकन करायची होती.

पब्लिक प्रॉसिक्यूटरनी श्रीरंगविरूद्ध दाखल केलेल्या खटल्याची हकीगत न्यायमूर्तींना बर्वे याना थोडक्यात निवेदन केली. ते म्हणाले, "आरोपी श्रीरंगला आपली पत्नी शालन हिचेशी हवालदार जयसिंग जमदाडेशी अनैतिक संबंध असावा असा संशय होता, आणि या संशयावरूनच त्याने शिरगाव पोलीस ठाण्याच्या प्रवेश द्वारापासून अवघ्या बत्तीस फुटावर जयसिंगवर कुऱ्हाडीचा घाव घालून त्याचा खून केला आहे."

त्यावर न्यायमूर्ती बर्वे म्हणाले, "मिस्टर प्रॉसिक्यूटर, मी पोलीस पेपर्स वाचलेले आहेत. तुमचा फिर्यादी बोलवा!'

'सरकारतर्फेचा फिर्यादी पुकारण्यात आला. निळकंठ दामू परब, हा पोलीस हवालदार साक्षीदाराच्या पिंजऱ्यात आला. त्यानं न्यायमूर्तींना कडक सॅल्यूट ठोकला. त्याला शिरस्तेदारानं शपथ दिल्यावर सरकारी वकील त्याला विचारू लागले.

"परब पोलीस खात्यात तुमची किती वर्षे नोकरी झाली?"

"एकोणीस वर्षे!"

"आरोपी श्रीरंग याला ओळखता?"

"हो, तो आमच्या शिरगाव पोलीस स्टेशनलाच नेमणुकीला आहे!"

"जयसिंग जमदाडेला ओळखत होता?"

"हो, तोही आमच्याच पोलीस स्टेशनला नेमणुकीला होता!"

"त्याचं काय झालं?"

"खून झाला!"

"तो कोणी केला?"

"या श्रीरंगनं!"

"ते तुम्हाला कसं कळलं?"

"खून झाला त्या रात्री अकराच्या सुमारास मयत जयसिंग हा पोलीस ठाण्यात होता. त्यावेळी तो नाईट राऊंडसाठी बाहेर पडला. तो बाहेर जातो न जातो तोच आरोपी श्रीरंग रक्तानं माखलेली कुऱ्हाड घेऊन पोलीस ठाण्यात आला आणि म्हणाला 'मी जंमदाडेचा खून केला, या कुऱ्हाडीने! त्यानं ती कुऱ्हाड टेबलावर ठेवली!'

"मग तुम्ही काय केलं?"

"ऑफीस पाळीचा कॉन्स्टेबल सावंत याला साहेबाना तात्काळ बोलावून आणायला पाठवला.

"साहेब म्हणजे कोण?"

"आमचे फौजदार साहेब, मुरारराव घोरपडे!"

"मग त्यानी काय.केलं?"

"त्यानी प्रथम श्रीरंगला अटक करून कस्टडीत टाकले. नंतर इन्क्वेस्ट आणि गुन्ह्याच्या जागेचा पंचनामा केला."

"इन्क्वेस्टमधे काय दिसलं?"

"जमदाडेचं धड आणि शीर अलग झालेलं होतं!"

"ते कोणत्या ठिकाणी होतं?"

"पोलीस स्टेशनपासून बत्तीस फुटावर पोलीस लाईनच्या पूर्व भिंती लगत!"

"बरं मग?"

"फौजदार साहेबांच्या सांगण्यावरून मी स्टेशन डायरीत नोंद केली आणि सरकारतर्फे श्रीरंगवर फिर्याद नोंदवली!"

S. Kumar

ॲडव्होकेट प्रधानानी श्रीरंगकडून सविस्तर माहिती घेतली होती. त्यानं जयसिंगला आपण आपल्या खोलीतून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असतानाच मारल्याचे सांगितले होते. आता या फिर्यादीने मात्र हा गुन्हा पोलीस स्टेशनपासून बत्तीस फुटावर पोलीस लाईनच्या पूर्व भिंतीलगत घडल्याचे सांगितले होते. ॲड. प्रधानानी हवालदार परबच्या उलट तपासाला प्रारंभ केला.

"मिस्टर परब, मयत जयसिंग जमदाडे त्या रात्री नाईट राऊंड ड्यूटीवर होता अशी पोलीस ठाण्यात लेखी नोंद आहे का?"

"असेल! मला निश्चित ठाऊक नाही!"

"हे पहा मला असेल नसेल असली भाषा नको, पोलीस कॉन्स्टेबल किंवा पोलीस हवालदार याना प्रत्येक दिवशी काय ड्यूटी दिली जाते याची पोलीस ठाण्यात नोंद असते, त्यादिवशी जयसिंग जमदाडे नाईट राऊंड ड्युटीवर असल्याची नोंद नाही, असं माझं म्हणणं आहे. हे खरं की खोटं?"

हवालदार परब बुचकळ्यात पडला. त्यादिवशीच्या 'ड्युटी वाटप' पत्रकावर तशी नोंद नव्हती. परब सरकारी वकिलांच्या तोंडाकडे पाहू लागला तेव्हा ॲड. प्रधान किंचित आवाज चढवून म्हणाले "त्यांच्याकडे कशाला बघंता? मला तुमच्याकडून उत्तर हवंय!"

परब गोंधळून तसाच उभा होता. न्यायमूर्ती बर्वेनी साक्षीदार गोंधळलेल्या अवस्थेत आहे हे पाहयलं आणि ते ॲड. प्रधानाना म्हणाले,

"व्हॉट इज द रिलेव्हन्सी मिस्टर प्रधान?"

"सर, मयत जयसिंग जमदाडे त्या रात्री नाईट ड्युटीवर नव्हता आणि तो अकरा वाजता पोलीस स्टेशनकडे बिलकूल आलेला नव्हता ही माझी खात्रीची माहिती आहे!'

"यस् गो अहेड!"

"मिस्टर परब, आरोपी श्रीरंग रक्तानं भरलेली कुऱ्हाड घेऊन पोलीस ठाण्यात आला ही गोष्ट सत्य आहे, पण त्याचवेळी त्यानं असंही

सांगितलं की मी जयसिंगला माझ्या खोलीच्या दारातून पळून जाताना मारलेलं आहे! श्रीरंगची खोली पोलीस स्टेशनपासून दीडशे फुटावर आहे! तिथंच त्याने जमदाडेला मारले?"

परब अद्यापही गोंधळलेल्या अवस्थेत उभा होता. कारण ॲड. प्रधान म्हणत होते ती वस्तुस्थिती होती. फौजदारानीच गुन्ह्याची जागा निराळी असल्याचा खोटा पंचनामा केलेला होता.

न्यायमूर्ती बर्वेनी स्तब्ध उभा असलेल्या हवालदार परबला विचारले, "काय? उत्तर द्यायला एवढा उशीर का लागतो आहे?"

हवालदार परब हतबल होऊन उत्तरला, "साहेब, जमदाडेचा खून श्रीरंगच्या दारातच झाला होता, पण आम्हाला....!" त्यावर ॲड प्रधान तत्परतेनं म्हणाले, "तुम्हाला तो पोलीस स्टेशनपासून बत्तीस फुटावर झाला असं फौजदार घोरपडेनीच सांगायला सांगितलं होतं?"

परबने होकारार्थी मान डोलवली. हवालदार जयसिंग जमदाडेबद्दल 'फोर्सात' फारसं चांगलं मत नव्हतं. त्याचा बाहेरख्यालीपणा सर्वांना ठाऊक होता. दूर नेमणूकीला जाणाऱ्या पोलिसांच्या बायकाशी संधान बांधणाऱ्या जमदाडेबद्दल सर्वच पोलिसांच्या मनात त्वेष होता. पण मुराररावांच्या तो खास विश्वासातला म्हणून कोणी त्याच्याविरूद्ध शब्द काढत नव्हते. आता त्याना आपला त्वेष व्यक्त करण्याची हीच नामी संधी होती म्हणून हवालदार परबने सत्य ते सांगून टाकले.

सरकारी वकिलानी कपाळाला हात लावला. सरकारपक्षाचा पहिलाच साक्षीदार.अन् तोही पोलीस हवालदार 'होस्टाईल' झाल्याचे पाहून 'प्रथम ग्रासे मक्षिकापात:' असे काहीतरी पुटपुटत त्यानी न्यायमूर्तींना परबची उलट तपासणी करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली. त्यावर ॲड. प्रधान म्हणाले "[illegible]

नाही! हवा तर तो तुम्ही नंतर करू शकता!"

न्यायमूर्ती बर्वेनी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले आणि ते म्हणाले,

"मिस्टर प्रधान, साक्षीदार होस्टाईल झाला आहे ही गोष्ट सत्य, पण त्यानी नंतर त्याचा उलट तपास घेण्याची परवानगी आता मागणं यात गैर काय आहे?"

ॲड. प्रधान म्हणाले, "गैर काहीच नाही पण हा साक्षीदार पोलीस हवालदार आंहे. शिवाय तो फिर्यादीही आहे एवढी आपण नोंद घ्यावी ही विनंती!"

त्यावर न्यायमूर्ती हसत हसत म्हणाले 'ती नोंद मी तुम्ही सांगण्याच्या आधीच घेतलेली आहे!'

त्यानंतर ॲड. प्रधानानी परबला विचारले,

"जमदाडे हा फौजदार घोरपडे यांच्या खास मर्जीतला आणि विश्वासातला होता?"

"तसे आम्ही सगळेच विश्वासातले असतो!"

"पण हा थोडा अधिक होता?"

"तसं काही सांगता येत नाही!"

"हे पहा परब, ज्या ज्या पोलीस स्टेशनला घोरपडे यांची बदली व्हायची त्या त्या पोलीस स्टेशनला जमदाडेचीही फौजदारांच्या सोबत नेमणूक होत होती, दुर्गापूर तालुका पोलीस स्टेशन, सावरगाव पोलीस स्टेशन, तुमचं शिरगाव पोलीस स्टेशन, या तिन्ही ठिकाणी फौजदार घोरपडेनी जमदाडेची बदली आपण तियं आल्या आल्या करून घेतलेली होती?"

यावेळी मात्र परबने होकारार्थी मान हलवली.

"मिस्टर परब, तुम्ही विवाहित आहात?"

"होय!"

"तुमच्या घरी तुम्ही कधी जमदाडेला चहाला किंवा जेवायला

बोलावलं होतं का ?"

"नाही !"

"का नाही ? फौजदारांचा तो उजवा हात आहे फौजदारांची मर्जी सांभाळण्यासाठी जमदाडेची मैत्री असावी असं नाही तुम्हाला वाटलं ?"

"नाही !"

"का नाही ?"

"जमदाडेचं बायकांच्या बाबतीत वागणं बरं नव्हतं साहेब !"

"बरं नव्हतं म्हणजे काय ?"

"लाईनमधला कॉन्स्टेबल कामासाठी परगावी रवाना झाला की हा उगाच काहीतरी कारण काढून त्याच्या बायकोशी बोलायचा प्रयत्न करीत असे ! त्यामुळं आम्ही कोणी त्याच्याशी कधी सलगी करीत नव्हतो !"

"आत्ता कसं सरळ उत्तर दिलंत ! हे पहा परब, श्रीरंगला कुस्तीचा षोक आहे. तो रेंज स्पोर्टसमध्ये कुस्तीत सर्वप्रथम आला आहे. कुस्त्या पहाण्यासाठी त्याला फौजदार वेळोवेळी बाहेरगावी जायला परवानगी द्यायचे ?"

"हो हे खरं आहे !"

"श्रीरंग जेव्हा जेव्हा बाहेर जायचा तेव्हा जयसिंग शालनकडे जात असे !'

"प्रत्येकवेळी काय घडत होतं हे मला ठाऊक नाही. पण श्रीरंग पुण्याला स्पोर्टससाठी गेला असताना एक दोन वेळा मी जयसिंगला शालनच्या घरी गेलेला बघितले होते !"

"हाऽऽ दॅटस् गूड ! हे पहा मिस्टर परब त्या दिवशी, म्हणजे खून झाला त्या रात्री, श्रीरंग पंढरपूरला कुस्त्या पहाण्यासाठी म्हणून बाहेर

मुराररावांच्या विरूद्ध साक्ष देऊन बसलोच आहोत, पुन्हा त्यांची बाजू घेण्यात काही अर्थ नाही असे पाहून परब म्हणाला,

. "आपण म्हणता तेच सत्य आहे! श्रीरंग पंढरपूरला गेलाच नव्हता. त्याला शालनच्या वागण्याचा संशय येत होता. पण प्रत्यक्ष डोळ्याने बघितल्याशिवाय काहीही करायचे नाही असे त्याने ठरवले होते. लाईनसमोर दाट शेंडाचं झुडूप आहे तिथं तो लपून बसला. रात्री दहाच्या सुमारास जयसिंग शालनकडे गेला. दार आतून बंद झाले. पाच दहा मिनिटातच श्रीरंग बंद दारापुढे आला आणि त्यानं 'दार उघड' असा आवाज दिला. जयसिंगने आपण रंगेहात सापडलो आहोत हे ओळखले आणि त्याने दारातून पळून जाण्याचा प्रयत्न केला, पण श्रीरंगच्या हातातील फरशी कुऱ्हाडीने एका क्षणातच त्याचे धड आणि शीर अलग केले होते. तेथून तसाच श्रीरंग पोलीस ठाण्यात हजर झाला."

ॲड. प्रधान सहर्ष मुद्रेनं खाली बसले.

पोलीस हवालदार, जो स्वत: खटल्यात फिर्यादी होता, तोच होस्टाईल झाल्यामुळे सरकार पक्षाची केस ढासळली होती. सरकारी वकिलानी नंतर परबचा उलटतपास केला पण त्यात फारसं तथ्य नव्हतं.

'मुरारराव घोरपडे शिस्तप्रिय अधिकारी आहेत, तुम्ही कामात खूप दिरंगाई करता म्हणून त्यानी तुम्हाला दोन-तीन वेळा वॉर्निंग दिलेली होती. म्हणून तुम्ही आज ही खोटी साक्ष देत आहात.' असा खुलासा करण्याचा सरकारी वकिलानी प्रयत्न केला. पण त्याचा फारसा उपयोग नव्हता. न्यायमूर्ती बर्वे सत्य काय आहे हे ओळखून चुकले होते.

कोर्टाची वेळ संपल्याने न्यायमूर्ती उठून चेंबरमधे गेले. पहिल्याच बॉलला त्रिफळा उडावा अशी त्या खटल्याची गत होती.

ॲड. प्रधान श्रीरंगला भेटून म्हणाले, उद्या शालनचा जबाब होईल. तू काही चिंता करू नकोस ती फार शहाणपणा करण्याचा प्रयत्न करील तर गोत्यात येईल.

२८.

हवालदार निळकंठ परबने दिलेल्या जबाबामुळे मुरारराव अस्वस्थ झाले होते. त्याना आपल्या हाताखालचा हा हवालदार 'होस्टाईल' होईल याची बिलकूल कल्पना नव्हती. तरीही शालनच्या जबाबातून आपण सरकार पक्षाच्या खटल्याला पडलेले खिंडार बुजवून घेऊ अशी त्याना खात्री होती.

त्या संध्याकाळी सरकारी वकिलांच्या घरी ते शालनला घेऊन गेले. शालनच्या जबाबातून ती निष्पाप असल्याचे मुराररावाना प्रस्थापित करायचे होते. जयसिंग जमदाडे दारावरून जाताना कधी कधी बाहेर थांबून 'काय कसं काय चाललंय शालनबाई? अशी विचारपूस करून बाहेरच्या बाहेर निघून जायचा असाच फक्त उल्लेख होता. श्रीरंगने जमदाडेचा खून करण्याला सबळ असे काहीच कारण नव्हते असा आभास मुराररावाना निर्माण करायचा होता. कालच्यापेक्षा आज कोर्टात भलतीच गर्दी झाली होती. जयसिंग जमदाडेंचा खून ज्या शालनमुळे झाला त्या शालनला पहायला श्रोते उत्सुक होते.

लाल जरी काठाची साडी, तसलाच ब्लाऊज घातलेली शालन साक्षीदाराच्या पिंजऱ्यात येऊन उभी रहाताच सर्वांच्या नजरा तिच्यावर केंद्रीत झाल्या.

शालनने डोक्यावरून पदर घेतला होता. मान खाली घालून ती अदबीनं उभी होती.

सरकारी वकिलानी तिच्या सर तपासाला सुरुवात केली.

"शालन या आरोपीला ओळखतेस?" शालनने फक्त होकारार्थी मान हलवली. त्यावर सरकारी वकील म्हणाले

"तू मयत जयसिंग जमदाडे याला ओळखत होतीस?"

"हो!"

"त्याची ओळख असायचं काय कारण?"

"मी शिरगावच्या पोलीस लाईनमधे रहायला आल्यानंतर ते कधी कधी दारावरून जाताना 'काय चाललंय? असं विचारायचे!'

"ते तसं तुला एकटीलाच विचारीत की लाईनमधल्या इतर बायकानाही विचारीत?"

"जी कोण दारात असेल तिला ते विचारीत!"

"ठीक. आता सांगा, जमदाडेचं काय झालं?"

"खून झाला."

"तो कोणी केला?"

"माझ्या नवऱ्याने!"

"ते तुला कसं समजलं?"

"लाईनच्या पूर्व भिंतीलगत ते मरून पडल्याचं लोकानी पाहिलं, गर्दी जमली म्हणून मी बाहेर येऊन दारातून पाह्यलं!"

"तू जवळ जाऊन पाह्यलं नाहीस?"

"नाही!"

"का नाही गेलीस?"

"भीतीमुळं!"

"बरं त्या दिवशी श्रीरंग कुठं होता?"

"ते सकाळी पंढरपूरला कुस्त्या बघायला म्हणून गेले होते."

"बरं पुढं? ते तुला केव्हा कळलं?"

"हवालदाराला मारल्यावर पोलीस ठाण्यात कुऱ्हाड घेऊन ते हजर झाल्यावर!"

"बरं शालन, तुझे आणि जयसिंगचे मैत्रीचे संबंध होते का?"

या प्रश्नावर ॲड. प्रधानानी उठून हरकत घेतली. ते म्हणाले 'हा प्रश्न 'क्रॉस'मध्ये विचारल्यासारखा आहे. शिवाय साक्षीदाराला कोणते

उत्तर द्यावे हे सुचवणारा आहे! विद्वान सरकारी वकील तिला तुझे आणि जयसिंगचे संबंध कसे होते?' एवढंच विचारू शकतील!'

न्यायमूर्तींनी ती ॲड. प्रधानांची हरकत मान्य केली व सरकारी वकिलानी (सजेस्टिव्ह) सूचक प्रश्न विचारू नयेत अशी सूचना केली.

"तुझे आणि जयसिंगचे संबंध कसे होते?"

"संबंध कसलेच नव्हते. दारावरून जाताना एखादा शब्द बोलायचे इतकंच"

"बरं, श्रीरंगने जयसिंगचा खून केला असं तू मघा सांगितलंस!"

"हो सांगितलं!"

"मग आता मला सांग श्रीरंगनं जयसिंगचा खून का करावा?"

"संशयावरून!"

"कसला संशय?"

"हवालदाराचा आणि माझा संबंध असावा असा त्याना संशय होता!"

"हे तुला कसं समजलं?"

श्रीरंगकडे पाहून बोट दाखवून शालन म्हणाली, "एक दोन वेळा मला ते यांच्या बोलण्यातून जाणवलं होतं!"

"काय म्हणाला श्रीरंग तुला?"

"तू त्याच्याशी बोलत जाऊ नको!"

"मग?"

"त्याना आवडत नाही म्हटल्यावर मी हवालदाराशी बोलायची बंद झाले!"

'दॅटस् ऑल युवर ऑनर' असं म्हणून सरकारी वकील खाली बसले.

ॲडव्होकेट प्रधानानी शालनकडे रोखून पाहिले आणि म्हणाले,

"हे पहा शालन, आत्ता तू सांगितलंस हवालदार जयसिंग जमदाडे दारावरून जाताना बायका दारात दिसल्या तर प्रत्येकीशी कसं काय

चाललंय असं विचारत विचारत पुढं जायचा, असं किती वेळा घडलेलं तू पाह्यलंस?"

"चार दोन वेळा बघितलं की!"

"हे तू खोटं सांगतेस. जयसिंगशी लाईनमधली एकही बाई बोलत नव्हती!"

"त्यांच्याबद्दल उगाच काहीतरी अफवा उठल्या होत्या म्हणून बायका त्याना पहाताच आत निघून जायच्या!"

"हांऽऽऽ आत्ता तू खरं बोललीस! तर शालन, हवालदार जयसिंग जमदाडे बाहेरख्याली स्वभावाचा आहे म्हणून लाईनमधली एकही बाई त्याच्यापुढे उभी रहात नव्हती!"

"पण ते खोटं आहे. ते तसे नव्हते. फक्त त्यांचा स्वभाव मोकळा होता. त्यांच्या मनात तसं काही नसे!"

"अस्सं? हे तुला कधी समजलं?"

"मामी आजारी असताना ते तिला पहायला यायचे तेव्हा!"

"म्हणजे बायजा जेव्हा तुझ्याकडे रहात होती तेव्हापासून जयसिंग जमदाडेला तू ओळखतेस?"

"होय! मामींच्या तब्येतीची चौकशी करायला ते वारंवार यायचे!"

"आणि तो जेव्हा यायचा तेंव्हा श्रीरंग घरी नसायचा, हो की नाही?"

"ते ड्यूटीवर असायचे नाहीतर कुठे कुस्त्या बघायला गेलेले असायचे! त्याना कुस्तीशिवाय दुसरं काय सुचतंय?"

ॲडव्होकेट प्रधान किंचित हसून म्हणाले, "अगदी बरोबर, घरात नवीन लग्न झालेली तुझ्यासारखी तरणीताठी, सुंदर बायको असताना हा श्रीरंग गावोगांवी कुस्त्या बघायला जायचा म्हणून तुझा त्याच्यावर राग होताच?"

"असणारच की?"

"बरोबर आहे, असायलाच हवा, शिवाय निंबोतची ती पाडव्याची

कुस्ती झाल्याशिवाय तुझ्या अंगाला स्पर्श करणार नाही, या अटीवरच त्यानं तुझ्याशी लग्न करायला सम्मती दिली होती!"

"होय!"

"मग तू ही अट का मान्य केलीस?"

"नाही हो! लग्नाच्या वेळी मला ते कोणीच सांगितलं नव्हतं! आमच्या आबाना फक्त हे माहीत होतं, त्यानीही मला ही कल्पना लग्नाअगोदर दिलेली नव्हती!"

"हो, हो, अगदी बरोबर! पण शालन, समज ही श्रीरंगची अटं तुला समजली असती तर तू त्याच्याशीं लग्नाला तयार झाली असतीस?"

ॲडव्होकेट प्रधानांच्या या प्रश्नावर सरकारी वकिलानी हरकत घेतली. ते म्हणाले, Your Honour this is a hypothetical Question I object" (हा प्रश्न 'जर तर' च्या स्वरुपाचा असलेने माझी त्या प्रश्नाला हरकत आहे.)

न्यायमूर्ती बर्वेनी ती हरकत मान्य केली व ॲड. प्रधानाना तो प्रश्न विचारू दिला नाही. ॲड. प्रधान फार धूर्त होते. त्यानी तोच प्रश्न शालनला निराळ्या स्वरुपात विचारला.

"हे पहा शालन, निंबोतच्या कुस्तीची ती श्रीरंगची अंट तुला ठाऊक नव्हती?"

"नव्हती!"

"ती ठाऊक असती तर तू लग्नाला तयार झाली नसतीस!" त्या प्रश्नाला नेमके कसे उत्तर द्यावे हे न समजल्याने शालन क्षणभर गोंधळून गेली आणि नंतर म्हणाली, "ती समजली असती तर मी काय

आपण जिंकली तरच माझा स्वीकार करायचा अशी काही ती अट नव्हती ! ते ती कुस्ती हरले असते तरीही त्यानी माझा स्वीकार केलाच असता !"

"मग मला आता सांग, इतकी समजूतदार मुलगी तू, बाहेरख्यालीपणाबद्दल कुप्रसिद्ध असलेल्या जयसिंग जमदाडेला आपल्या नवऱ्याच्या अपरोक्ष वारंवार घरी का बोलावत होतीस ?"

"मी काय त्याना बोलवायला जात नव्हते, तेच यायचे !"

यावेळी ॲडव्होकेट प्रधानांनी नेमका प्रश्न विचारला "बायजा बरी होऊन चिंचलीला गेल्यानंतर जयसिंग तुझ्याकडं दहा पंधरा वेळा तरी आला होता ?"

"इतकं नसेल, चार सहा वेळा आले असतील !"

"आणि ज्यावेळी जयसिंग यायचा त्यावेळी श्रीरंगला कुठल्यातरी खेड्यावर बंदोबस्त ड्यूटीला पाठवलेलं असायचं !"

"होय, नोकरी म्हटल्यावर 'ड्यूटी' करायलाच हवी की ?"

"अगदी बरोबर आहे तुझं, बरं का शालन, जयसिंग असा चार सहा वेळा तुझ्याकडं आला होता असं आता तू सांगितलंस, तर जयसिंग जो यायचा तो रात्री ठाण्यात हजरी झाल्यानंतरच, साडे आठ-नऊ नंतर !"

"होय, त्याचवेळी त्याना सवड असायची !"

साक्षीदार आपल्या कह्यात सापडलेला आहे याची खात्री होताच ॲड. प्रधानानी प्रश्न केला,

"ज्या दिवशी जयसिंगचा खून झाला, त्या रात्री तो तुझ्याकडं जेवायला आला होता !"

"आले होते !"

"काय केलं होतं जेवायला ?"

"ते तुम्हाला कसं माहीत?"

"कसं ते नंतर सांगतो, घेतलं होतं की नाही सांग?"

जयसिंग जमदाडेनं दोन-तीन वेळा लिंबू सरबतातून जीन घेतली होती, पण ती गोष्ट या वकिलाना कशी काय समजली हे शालनला समजेना. ती गोंधळून म्हणाली,

"पण दार बंद असताना, त्यानी ते घेतलं. ते तुम्हाला कसं समजलं?"

ॲडव्होकेट प्रधानांनी इन्क्वेस्ट पंचनाम्याच्यावेळी जयसिंगच्या खिशात सापडलेली जीनची मोकळी क्वार्टर शालनला दाखवून म्हटलं.

"ही बघं, हीच ती मोकळी झालेली बाटली, घरात सापडली तर श्रीरंगला शंका येईल म्हणून बाहेर फेकून देण्यासाठी त्यानं पँटच्या खिशात ठेवलेली होती. बरोबर आहे ना? पण काय गं शालन त्यानं त्या रात्री ते औषध तुलाही थोडं चव घ्यायला दिलं होतं नां?"

आता मात्र शालनला या वकिलाजवळ काहीतरी दैवी शक्ती असावी असं वाटलं. ती मान खाली घालून म्हणाली,

"हो, थोडंसं चवीपुरतं दिलं होतं त्यानी!"

प्रधानानी किंचित् हसून न्यायमूर्तीकडं पाहयलं. न्यायमूर्तीनी ॲड. प्रधानाना विचारलं, "हू टोल्ड यू ऑल दीज डिटेल्स?" त्यावर ॲड. प्रधान म्हणाले, "नो बडी हॅज टोल्ड मी, दीज आर माय कॉमनसेन्स इन्फरन्सेस!"

"वेल गो अहेड!" न्यायमूर्ती प्रधानांच्या चाणाक्षपणाचं कौतुक नजरेनं व्यक्त करीत म्हणाले.

चार भिंतीच्या आत जे जे घडलं ते या माणसाला ठाऊक आहे तर दाराबाहेर जे घडलं ते याना संपूर्ण ठाऊक असणार अशी शालनची

"जेवल्यानंतर पंधरावीस मिनिटातच पैलवानांची दारावर थाप पडली ना?"

"कोणाची?"

प्रधानाना जे नेमकं हवं होतं तेच आयतं सापडलं होतं.

श्रीरंगकडं पहात शालन म्हणाली,

"यांचीच की आणि कोणाची?"

"बरं मग?"

"जयसिंगराव मला म्हणाले घोटाळा झाला. पैलवानानं पंढरपूरला जातो म्हणून आपल्याला खोटं सांगितलं! आता असं कर तू दार उघड मी एकदम ग्रुसंडी मारून पळून जातो. पैलवान मला सरळ सोडणार नाही, पकडून बोंबाबोंब करील!"

"मग तू काय केलंस?"

"हवालदारानी कपडे चढवले!"

"म्हणजे त्यानी जेवल्यावर कपडे काढले होते तर?" डोळे बारीक करून प्रधानानी विचारलं.

शालन थोडी सावध होऊन म्हणाली,

"लुंगी लावली होती, लुंगी सोडून पँट घातली!"

"ही लुंगी कोणाची?"

"पैलवानांची!"

"अरे व्वा, म्हणजे मुक्कामासाठीच त्या रात्री आले होते तर?"

"मुक्काम कशाला करतील? जेवले की जाणारच होते!"

"मग दारात काय प्रकार घडला?"

"मी दार उघडलं, हवालदार पळून जायचा प्रयत्न करीत होते आणि त्याच वेळी पैलवानानं हातातल्या कुऱ्हाडीनं त्यांचं मुंडकं उडवलं!"

ॲड. प्रधानानी सहर्ष नजरेनं सरकारी वकिलांच्याकडं पहात म्हटलं,

"आय सिंपथाईज वुईथ यू मिस्टर प्रॉसिक्यूटर! बट इज इज ए

टूय! शालनकडे पहात प्रधानानी विचारलं.

"जयसिंगचं मुंडकं उंबऱ्याच्या आत आणि धड उंबऱ्याच्या बाहेर पडलं!"

"होय!"

"त्यावेळी श्रीरंग काय म्हणाला?"

"ते म्हणाले 'तुझीही वाट लावली असती पण बाईवर हात उगारणं मर्दाचं काम नाही!' रक्तानं भरलेली कुऱ्हाड घेऊन पैलवान पोलीस ठाण्याकडं गेले! मग कालवा झाला. फौजदारसाहेब आले. त्यांनी गर्दी हटवली आणि पंचनामा केला!"

"तुझ्या दारातच पंचनामा केला ना?"

"होय!"

यावेळी ॲड. प्रधान न्यायमूर्तींना उद्देशून म्हणाले, "यूवर ऑनर शालनने जी हकीगत सांगितली आहे तेच सत्य आहे! फौजदार मुरारराव घोरपडेनी पोलीस स्टेशनपासून बत्तीस फुटावर खुनाचा प्रकार घडला हे दर्शविण्यासाठी केलेला पंचनामा खोटा आहे! श्रीरंगवर खुनाचाच गुन्हा शाबीत व्हावा या दुष्ट हेतूनं त्यानी गुन्ह्याची जागा बदलली आहे!'

न्यायमूर्ती बर्वे काहीसे गंभीर झाले. त्यानी सरकारी वकिलाना विचारलं.

"व्हॉट इज धिस प्रॉसिक्यूटर? धिस इज ए व्हेरी सिरियस थिंग! आय वुईल हॅव टू टेक ए सिव्हियर ॲक्शन अगेन्स्ट यूवर इन्व्हेस्टिगेटिंग ऑफीसर!"

सरकारी वकील स्वतःची काहीही चूक नसता अपराधी मुद्रा धारण करून उभे होते.

विस्कळीत केली होती. ती शालनच्या उलट तपासानंतर जवळ जवळ संपूर्णच कोसळली.

त्यानंतर गुन्ह्याच्या ठिकाणचे पंच तपासले गेले. त्यातला एक होता. निलाप्पा चांभार. हा निलाप्पा शिरगाव एस.टी. स्टँडसमोर एका लहान छपरात रहायचा. पुढच्या भागात त्याचे दुकान होते. दुकान कसले जुन्या चपलाना मोटारीच्या टायरीचे सोल चढवायचा आणि चपलांचे तुटलेले आंगठे शिवायचा. या निलाप्पाची बायको 'गजगी' अतिशय देखणी होती. गजग्यासारखी गोल गरगरीत आणि गोरीपान होती. लहानपणीच कपाळावर तुळस भिवया जवळ विळे आणि हनुवटीवर ठिपका, गोंदलेली ही गोरी गोमटी बायको कोणाचा तरी हात धरून पळून जाईल म्हणून लग्न झाल्यानंतर निलाप्पाने तिच्या उजव्या हातावर आपले नाव गोंदून घेतले होते.

या गजगीची हवालदार जमदाडेनं एकदा छेड काढली होती. निलाप्पाला ते ठाऊक होतं पण फौजदार घोरपडेयांच्या मर्जीतल्या या जयसिंगच्याविरूद्ध तक्रार करण्याचं धाडस त्यावेळी त्याला झालं नाही. उलट गुन्ह्याच्या जागेचा पंचनामा करण्यासाठी निलाप्पाला जेव्हा निळकंठ परब बोलवायला आला तेव्हा मनातल्या मनात मेलेल्या जमदाडेला शिव्या घालतंच निलाप्पा पंचनामा करण्यासाठी गेला होता. मुराररावानी श्रीरंगच्या दारासमोर पंचनामा करण्याचे नाटक केले. गुन्ह्याची जागा बदलून दुसरा पंचनामा त्यानी ठाण्यातच केला होता. पण या दुसऱ्या पंचनाम्यात गुन्ह्याची जागा पोलीस स्टेशनच्या पश्चिमेला बत्तीस फुटावर असल्याचा उल्लेख होता.

सरकारी वकिलानी खटला चालू होण्यापूर्वी निलाप्पाला पंचनामा वाचून दाखवला होता. मुराररावानीही निलाप्पाला दम भरला होता. 'या पंचनाम्याला सोडून जर साक्ष देशील तर तुझं छप्पर जाग्यावर रहाणार नाही.' एरव्ही सदैव विनम्र वाटणारा निलाप्पा कोर्टात साक्षीला येताना ठरवूनच आला होता, 'खरं तेच सांगणार'!

सर तपासातंच निलाप्पानं सांगून टाकलं, पंचनाम्यातला मजकूर आम्हा पंचाना न वाचून दाखवताच आमच्या सह्या त्यावर घेतल्या. सरकारी वकिलानी हताश होऊन त्याचा उलट तपास करण्याची परवानगी घेतली पण त्याचा फारसा काही उपयोग होण्यासारखा नव्हता.

दुसरा पंच होता इब्राहिम बागवान. याचं स्टँडवर फळाचं आणि पानपट्टीचं दुकान होतं. शिरगांव पोलीस ठाण्याचा एकही कॉन्स्टेबल त्याला पानपट्टी आणि सिगारेटचे पैसे देत नसे. त्याचा मोबदला म्हणून इब्राहिमला पोलिसानी मंटका घेण्याची परवानगी देऊन टाकलेली होती.

इब्राहिमनं 'खुदा की कसम' घेऊन साक्षीला सुरुवात केली आणि खोट्या पंचनाम्याप्रमाणे हकीगत घडल्याचे सांगितले. ॲड. प्रधानानी त्याला विचारले.

"इब्राहिम तुझ्यावर मटका घेतल्याचा खटला कधी झाला होता का?" इब्राहिमला पुण्याचा हा वकील असला काही प्रश्न विचारील याची कल्पना नसल्यामुळे तो भांबावून गेला.

"नही साब, मै मटका लेता नही!"

"हे बघ, आत्ता तुझ्या दुकानाची झडती घेऊन त्यातून आकड्याच्या पाच पन्नास चिठ्ठ्या काढून दाखवू?"

निळकंठ परब, शालन या दोन प्रमुख साक्षीदारांना नामोहरम करणाऱ्या प्रधानांचा सर्वच साक्षीदारांनी धसका घेतलेला होता. हा माणूस चार भिंतीच्या आत काय घडलं ते साक्षीदाराकडून वदवून घेऊ शकतो, तर आपण उघड्यावर लोकाकडून मटका घेतो हे शाबीत नक्कीच करू शकेल या कल्पनेनं हात जोडून इब्राहिम म्हणाला.

"माफ करना साब, घोरपडे ..."

ॲड. प्रधानानी डॉक्टरांच्या उलट तपासात एकच प्रश्न विचारला.

"जयसिंग जमदाडेचा व्हिसेरा घेतला होता, त्यात अल्कोहोल मिळाले?"

"हो, सी.ए. रिपोर्टवरून तसं आढळून आलं!"

त्यानंतर सरकार पक्षाचे शेवटचे साक्षीदार म्हणून मुरारराव घोरपडे साक्षीदाराच्या पिंजऱ्यात आले. त्यानी सर्व पुरावे ढासळून सुद्धा न डगमगता साक्ष दिली. ते म्हणाले,

"अंगावर रक्ताचे शिंतोडे उडालेला, हातात फरशी कुऱ्हाडं घेऊनं पोलीस स्टेशनमध्ये हजर झालेल्या श्रीरंगला मी ठाण्यात येऊन लागलीच अटक केली. त्यानं जयसिंगचा खून केल्याची हकीगत सांगितली. मी गुन्ह्याचा ठिकाणचा पंचनामा केला. त्यावर पंचांनी माझ्यासमोर सह्या केल्या आहेत. गुन्ह्याचे ठिकाण पोलीस ठाण्याच्या पश्चिमेला बत्तीस फुटावर, पोलीस लाईनच्या पूर्व भिंतीलगत आहे! गुन्ह्याच्या ठिकाणची रक्तमिश्रित माती जप्त करून केमिकल ॲनलायझरला पाठवली. आरोपी श्रीरंगच्या कपड्यावर सापडलेले रक्ताचे डाग, मयताच्या कपड्यावरचे रक्ताचे डाग आणि गुन्हेठिकाणची रक्तमिश्रित माती एकाच 'ब्लड ग्रुपची' आहेत.

श्रीरंगने पंढरपूरला कुस्ती पहायला जातो असे खोटे सांगून पाळत ठेऊन जयसिंग जमदाडेचा पूर्व नियोजनाने खून केलेला आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर मी आरोपी श्रीरंगविरूद्ध दोषारोप पत्रक पाठवले आहे!'

ॲड. प्रधानांना विश्वासनं आणि श्रीरंगनं मुराररावांची बरीच माहिती पुरवली होती. घराण्याचा आणि आपल्या खानदानीचा अनाठायी अभिमान बाळगणाऱ्या मुराररावाना ॲड. प्रधानांच्या उलट तपासाला तोंड द्यावे लागणार होते.

ॲड. प्रधान अंगावरचा गाऊन सावरत म्हणाले, "मिस्टर घोरपडे, फौजदार म्हणून किती वर्षे नोकरी झाली?"

"अठ्ठावीस वर्षे!"

"वाऽऽ बराच अनुभव आपल्या गाठीशी आहे! पण काय हो. तुमची कन्या चंपा हिने आपल्यापेक्षा गौण जातीच्या शिवरामशी पळून जाऊन लग्न केलं म्हणून तुम्ही शिवरामविरूद्ध जी फिर्याद दिली होती त्या फिर्यादीचं पुढं काय झालं?"

"ती कॉम्प्रमाईज झाली"

"ती का कॉम्प्रमाईज केली?"

"ते कारण मी सांगू शकत नाही!"

किंचित् ताठरपणे मुरारराव म्हणाले, "मी सांगतो ना तुम्हाला त्याचं कारण, तुम्ही चंपाला ताब्यात घेऊन तिचा जबरदस्तीने गर्भपात करविला, म्हणून चंपा तुमच्याविरूद्ध फिर्याद दाखल करणार होती म्हणून तुम्ही शिवरामविरूद्धची केस आपसात करून घेतलीत!"

"त्या केसचा या खटल्याशी काडीचा संबंध नाही!" मुरारराव मग्रुरीनं म्हणाले.

"नसेल, पण तुमच्या स्वभावाचे पैलू दाखवण्यासाठी मला हे प्रश्न विचारणं भाग आहे फौजदारसाहेब!"

"बरं बरं!"

"आता मला सांगा, श्रीरंगनं जयसिंग जमदाडेला कुऱ्हाडीनं मारलं, ते श्रीरंगच्या दारात! तो व्यभिचार करण्यासाठी शालनकडे गेला होता म्हणून! पण तुम्ही श्रीरंगने हा बचाव घेऊ नये म्हणून जाणून बुजून गुन्ह्याची जागा बदललीत, हे खरं आहे.की नाही?"

"नाही! गुन्हा पोलीस स्टेशनपासून बत्तीस फुटावरच घडलेला आहे!"

"तो श्रीरंगच्या लाईनमधल्या खोलीच्या उंबरठ्यावर घडलेला आहे असं तुमची प्रमुख साक्षीदार शालन देखील म्हणते!"

"तुम्ही तिला फसवून घेतलेली ती उत्तरे आहेत."

"मी? फसवून घेतली?" ॲड. प्रधान किंचित् आवाज चढवून

न्यायमूर्तींना म्हणाले, "यूवर ऑनर धिस विटनेस इज मेकिंग सिरियस अलेगेशन्स अगेन्स्ट मी! शालननं शपथ प्रतिज्ञेवर न्यायासनासमोर दिलेली उत्तर खोटी आहेत असं म्हणण्याचा हा फौजदारांचा हा उर्मटपणा आक्षेपार्ह आहे!"

एवढं होऊनही मुरारराव शांतपणे साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभे होते. त्यांची बाजू घेण्याच्या प्रयत्न ५.रीत सरकारी वकील उठून म्हणाले,

"यूवर ऑनर. श्रीरंगनं जयसिंग जमदाडेचा खून केला ही गोष्ट आरोपीचे वकील मान्य करतात, मग हा खून श्रीरंगच्या दारात झाला की तो पोलीस स्टेशनपासून बत्तीस फुटावर झाला ही बाब गौण ठरते!"

त्यावर न्यायमूर्ती बर्वे सरकारी वकिलाना म्हणाले, "मिस्टर प्रॉसेक्यूटर, अशी बेजबाबदारपणाची विधानं तुमच्याकडून अपेक्षित नाहीत. गुन्ह्याच्या ठिकाणावरच या केसचं भवितव्य अवलंबून आहे. जयसिंग जमदाडेला पोलीस स्टेशनपासून बत्तीस फुटावर मारले असे मानले तर तो खून (मर्डर) ठरेल, श्रीरंगच्या दारात मारले तर तो, "ग्रेव्ह अँड सडन् प्रोव्होकेशनचे कृत्य ठरले. तेव्हा प्रस्तुतच्या खटल्यात गुन्ह्याच्या जागेचा प्रश्न गौण समजता येत नाही! बरं मिस्टर प्रधान पुढं विचारा."

"अॅड. प्रधानानी मुराररावाना विचारलं. "फौजदारसाहेब मीनल ही आपली पुतणी?"

"होऽऽ अमृतराव घोरपड्यांची कन्या!"

"ती अद्याप अविवाहित आहे!"

"होय, ती शिकते आहे गावातल्या कॉलेजात!"

"त्याच कॉलेजात आरोपी श्रीरंग शिकत होता?"

"हो, पण त्याची घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती म्हणून तो पोलिसात भरती झाला!"

"त्याला तुम्ही भरती होण्यासाठी सहाय्य केलंत?"

"असं काही नाही, तो ॲथलेट असल्यामुळं डी.एस.पी. साहेबानी त्याचं सिलेक्शन केलं."

त्यावर न्यायमूर्ती बर्वेनी ॲड. प्रधानाना विचारलं, "वॉट इज द रेलेव्हन्सी?"

त्यावर ॲडव्होकेट प्रधानं म्हणाले, "मीनल आणि श्रीरंग एका वर्गात होते. त्या दोघात थोडासा जिव्हाळा निर्माण झाल्याचे पाहून या फौजदार घोरपडेनी त्याला चिंचलीतून बाहेर काढण्याचे हेतूने त्याला पोलिसात भरती करून टाकले!

"आय सीऽऽऽ!" न्यायमूर्तीनी आपल्या समोरच्या कागदावर कसलीशी नोंद करून घेतली.

त्यावेळी ॲड. प्रधान म्हणाले, "श्रीरंगबद्दल फौजदारांना फारसं प्रेम होतं म्हणून त्यानी त्याला नोकरी नाही मिळवून दिली, तर आपल्या पुतणीने त्याच्या प्रेमात पडू नये या दूरदृष्टीने त्यानी हा वरवर उपकार वाटणारे कारस्थान केले होते!".

मुरारराव शांतपणे सारं ऐकून घेत होते. आजपर्यंत असे साक्षीदारांच्या पिंजऱ्यात त्याना कोणी बदनाम केलेले नव्हते. ॲड. प्रधानानी मुराररावाना केवळ घराण्याचा दुराभिमान असणारा गृहस्थ म्हणून 'एक्सपोज' केले नव्हते, तर हा गृहस्थ किती धूर्त आणि कारस्थानी आहे हेही चव्हाट्यावर आणले होते. चंपा शिवराम प्रकरण मीनल श्रीरंगचं प्रेम प्रकरण यांचा या खटल्याशी तसा प्रत्यक्ष संबंध नसतानाही त्या गोष्टींचा ॲड. प्रधानानी मुद्दाम उल्लेख केला होता.

मुराररावाना उलटतपासात ॲड. प्रधानांनी शेवटचा प्रश्न विचारला

"श्रीरंगवर खुनाचा खटला शाबीत व्हावा

वकील भलताच बदमाष दिसतो!"

त्यावर सरकारी वकील म्हणाले, "अहो फौजदारसाहेब, तसं काही बोलू नका, पुण्यातले प्रख्यात कायदेपंडीत आहेत ते! हायकोर्ट जज्ज होण्यासाठी आलेली निमंत्रणं त्यानी दोनवेळा स्वीकारलेली नाहीत!"

"नसतील, पण असे घरंदाज माणसाना बदनाम करणारे प्रश्न तुमचे कोर्ट तरी कसे काय विचारू देते?"

"त्याना ते विचारू देणंच भाग असतं!"

"खटल्याचं काय होणार? जयसिंगला मारून कुन्हाडीसह ठाण्यात हजर होणारा श्रीरंग सहीसलामत तर सुटणार नाही ना?"

"त्याचं काय आहे फौजदारसाहेब, श्रीरंगनं जयसिंगला मारल्याचा 'बोल्ड स्टँड' घेतलेला आहे. आता न्यायमूर्तींवर सारं काही अवलंबून आहे! माझ्या मते तो संपूर्णत: निर्दोष सुटणार नाही!"

"मग ठीक झालं. पाच सहा वर्ष जरी खडी फोडायला गेला तरी बस्स!"

"बघू उद्याच आरोपीचा जबाब होईल, त्यानंतर लगेच आर्ग्युमेंटसही होतील! नंतर एक दोन दिवसात बर्वेसाहेब निकाल जाहीर करतील! लेट अस् होप फॉर आवर सक्सेस!"

संपत आलेली सिगारेट मुराररावानी अॅशट्रेमध्ये विझवली. सरकारी वकिलाना सॅल्यूट ठोकून ते बाहेर पडले.

२९.

... कोर्टात चालणाऱ्या खटल्याचा वृत्तांत रोजच्या

करतोय, आज कोर्टात मीनलच्या नावाचाही उल्लेख झाला म्हणे!"

'अहो मला समजलं ते, पण आपण त्यात काय करू शकणार आहे? मुरारभावोजीना चंपाबद्दलही त्या वकिलानी प्रश्न विचारले. कोर्टात एकदा साक्षीदार म्हणून कोणी आले तर आरोपींचे वकील त्याना नाना तऱ्हेचे प्रश्न विचारू शकतात. आपण ते मनाला कशाला लावून घ्यायचं?"

"अहो पण आपल्या मीनलच्या नावाचा उल्लेख जाहीररीत्या कोर्टात झाल्यावर तिला चांगलं स्थळ मिळू शकेल का? खटल्याचा वृत्तांत चघळून चघळून चर्चा केली जाते गावोगावी! एवढ्यासाठीच कार्टीला कॉलेजात घालायला नको म्हणत होतो! पण तुम्हाला शिक्षणाचा भलताच पुळका! वडिलोपार्जित वाडा त्या हरामखोर विश्वासला देऊन टाकलात, आता तोच बदमाष त्या प्रधान वकिलाला आपली सगळी माहिती पुरवतोय! मुरारदादानी मागेच त्याचा काटा काढायला पाहिजे होता!"

"म्हणजे काय? त्याला मारून टाकायला हवा होता?"

"नाहीतर काय? असली सापाची पिल्लं ठेचूनच काढायला हवी होती!"

त्यावर पद्मावाई शांतपणे म्हणाल्या, "उगाच त्या विश्वासला कशासाठी दोष देता? कोणी ना कोणी त्या वकिलाना आपली सगळी माहिती पुरवली असतीच की? शिवाय मुरारभावोजीनी या खटल्यात निष्कारण खोटा पुरावा करायला नको होता!"

"खोटा पुरावा? ते कशाला करतील? जे घडलंय तेच त्यानी कोर्टासमोर ठेवलंय?"

— पद्माबाई म्हणाल्या, "मी जे बोलते ते नीट ऐकून घ्या,

आहे! तरी मी त्याना त्यावेळी म्हणाले देखील, 'भावोजी तुम्ही हे खोटं करता आहात ते कधी ना कधी अंगाशी येईल! पण त्यावेळी त्यानी माझं काहीच ऐकलं नाही!"

"अहो पण ते कार्ट खटल्यातून सुटू नये याच हेतूनं त्यानी ते धाडस केलं असेल ना?"

"होय, पण खोटंनाटं करण्यापेक्षा जे सत्य होतं तेच न्यायालयासमोर मांडायला हवं होतं! एक खोटं करण्यासाठी अनेक खोटे पुरावे त्यानी तयार केले. तो निलाप्पा चांभार, इब्राहिम बागवान, निळकंठ परब पोलीस हवालदार सगळे 'होस्टाईल' झालेच ना शेवटी? ते होऊ द्यात, पण शालननं सुद्धा आरोपीला उपयोगी पडतील अशी उत्तर द्यावीत याचं आश्चर्य वाटतं!"

"तुम्ही ही केस सुरू होण्यापूर्वी सांगावला गेला होता तेव्हा तिला कोर्टात जबाब व्यवस्थित दे असं नव्हतं सांगितलं?"

पद्माबाई म्हणाल्या, "दौलू हवालदार आजारी आहे असं समजलं म्हणून त्याला बघायला गेले होते. मी तिथं खटल्याची चर्चा कशाला करू?"

पद्मबाईना जेव्हा मुराररावानी त्या खटल्यातून श्रीरंग सुटता कामा नये यासाठी वाट्टेल ते करण्याचा मानस बोलून दाखवला. तेव्हा त्यानाही ते थोडंसं खटकलं होतं. श्रीरंग आणि मीनल यानी पुन्हा एकत्र येऊ नये असं जरी पद्माबाईना वाटत असलं, तरी खोटापुरावा तयार करून श्रीरंगला शिक्षा व्हावी असं मात्र त्यांच्या सुसंस्कृत मनाला वाटलं नव्हतं! त्यात बायजाचा तो अचानक झालेला मृत्यू, वैनीसरकार पोराला तुमच्या वट्यात घाटलाय, त्येला सांबाळा' असं वारंवार काकुळतीला येऊन विनवणारी बायजा एकसारखी त्यांच्या स्वप्नात येत होती. जयसिंग जमदाडेची ख्याती हा खटला झाल्यावर पद्माबाईच्या कानावर आलेली होती. आपल्या सहकाऱ्यांच्या तरुण बायकांवर लोभी नजर ठेवणाऱ्या जयसिंगबद्दल त्याना कसलीच सहानुभूती नव्हती. उलट

श्रीरंगनं त्याला जे शासन घडवलं ते योग्यच होतं असं त्याना हळूहळू वाटू लागलं होतं.

खटला सुरू झाल्यापासून त्या अस्वस्थ होत्या. मुरारराव श्रीरंगच्या बाबतीत घोर अन्याय करतात असं त्याना एकसारखं वाटत होतं. खटल्यातले एकापाठोपाठ एक साक्षीदार ढासळल्याचं ऐकताना त्याना थोडं समाधानच वाटलं होतं. उघडपणे त्याबाबत त्यानी त्याची चर्चा कोणाशी केली नाही.

खटला चालू झाल्यापासून मीनलही अस्वस्थ होती. दुर्गापूरला जाऊन कोर्टात काय काय घडलं याची अमृतरावाना माहिती देण्यासाठी कोणी आलं की मीनल हळूच दाराआडून ती चर्चा ऐकायची. प्रॉसिक्यूशनचे महत्वाचे साक्षीदार फितूर होत आहेत हे ऐकल्यावर मीनलला आनंद वाटला होता. तिने आणि विक्रमने ॲड. प्रधानाना श्रीरंगचा बचाव करण्यासाठी आग्रह धरला होता ही गोष्ट घोरपडेंच्या वाड्यात समजली असती तर हाहाःकारच उडाला असता.

अचानक त्या रात्री मुरारराव गाडी घेऊन चिंचलीला आले. ते आल्यानंतर बंगल्यात चर्चा सुरू झाली.

मुरारराव म्हणाले, "वैनी, मघाशी मला एक बातमी समजलीय, ती खरी की खोटी याची शहानिशा करून घेण्यासाठी मी एवढ्या तातडीनं आलोय!"

"कसली बातमी समजलीय भावोजी?"

"विक्रम पुण्यात ज्या वकिलाकडं कायदा शिकायला जातो, तोच हा ॲडव्होकेट प्रधान!"

"काय सांगता?"

"होऽ होऽऽऽ मी सांगतो ते शंभर टक्के सत्य आहे, पुण्याहून शिवलकर फौजदार आज मला भेटायला आले होते. ते म्हणाले तुमचा पुतण्या याच प्रधानांचे मार्गदर्शन घेत असतो. त्या वकिलासोबत अधून मधून कोर्टातही जात असतो म्हणे!"

"विक्रम एका कायदेपंडिताकडं जाऊन बसतो हे मला समजलं होतं, पण तेच हे प्रधान असतील याची मला कल्पना नव्हती.

"नसेल पण आता विक्रमला तार करून बोलावून घ्यायला हवंय!"

"कशासाठी?"

"उद्या कोर्टात वकीलांच्या 'आर्ग्युमेंटस्' व्हायच्या आहेत. त्यावेळी त्या वकिलानं माझ्याविरूद्ध काही तक्रार करू नये यासाठी प्रयत्न करायला हवा! तो बर्वे जज्ज भलताच विक्षिप्त आहे! या खटल्याचं काहीतरी होऊ दे मला आता त्याची चिंता नाही. पण बर्वेनी माझ्यामागं काही झंजट लावू नये यासाठी तातडीचे प्रयत्न करणं जरूरीचं आहे!"

"भावोजी तुम्हाला आठवतं? शिरगावला मी आले होते तेव्हा मी तुम्हाला म्हणाले होते, एका लफड्यातून सहीसलामत सुटला आहात, आता पुन्हा या खटल्यात काही खोटंनाटं करून अडकून पडाल!"

"वैनी खरं सांगू तुम्हाला, मला माझ्या खात्यानंच दगा दिला! तो हरामखोर निळकंठ परब, सरकारपक्षाचा फिर्यादी, त्यानंसुद्धा आरोपीच्या बाजूनं उत्तर द्यावीत? तो चांभार, तो बागवान ही माणसं फालतूच आहेत. ते होस्टाईल झाले याचं मला आश्चर्य वाटत नाही. पण शालननंसुद्धा तो प्रकार आपल्या दारात घडला असं सांगावं? मला समजत नाही या आरोपीचा बचाव करण्यामागे कोणकोण गुंतलेले आहेत? बरं ते काही असो विक्रम जर रात्री निघाला तर उद्या सकाळी दुर्गापूरात पोहचेल. आल्या आल्या त्याला प्रधानाकडं पाठवायला हवा!"

अमृतराव म्हणाले, "तुम्ही तेथूनच त्याला तार द्यायची नाही?"

"म्हटलं अगोदर वैनींच्या आणि तुमच्या कानावर घालावं! कर्नलसाहेबांच्या घरी ट्रंककॉल केला तरी चालेल!"

अमृतरावानी लागलीच फोन उचलला. एकशे ऐंशी नंबर फिरवून त्यानी पुण्याचा कर्नल साहेबांचा नंबर सांगितला आणि ऑपरेटरला म्हणाले, "लायटनिंग कॉल द्या!"

विक्रमला परस्पर दुर्गापूरला येण्याची सूचना अमृतरावानी दिली.

मीनल या हालचाली पाहून मनातल्या मनात म्हणत होती, 'विकी तुम्हा लोकाना बिलकूल मदत करणार नाही! त्याच्यामुळं तरी प्रधान खटला चालवायला दुर्गापूरला आलेत.'

फोनवरून निरोप मिळाल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी विक्रम पुण्याहून आला. मुरारराव दुर्गापूरात त्यांची वाटच पहात होते.

"विकी एक घोटाळा झालाय!"

"कसला?"

"तू ज्यांच्याकडं असिस्टंट म्हणून जातोस तेच ॲड. प्रधान श्रीरंगचा खटला चालवण्यासाठी इथं आले आहेत. आज त्या कामाच्या 'आर्ग्युमेंटस्' होणार आहेत. ॲड. प्रधान माझ्याविरूद्ध कोर्टाला काहीतरी 'ॲक्शन' घ्यावी अशी विनंती करणार आहेत!"

"ती कशाबद्दल?"

त्या प्रकरणाबद्दल आपल्याला काहीच माहिती नसल्याचा बहाणा करीत विक्रम म्हणाला, "प्रधान सर एक सेन्सेशनल खटला चालवण्यासाठी मला दुर्गापूरला जावं लागणार आहे असं गेल्या आठवड्यात मला म्हणाले होते खरं! पण ते हा श्रीरंगचाच खटला चालवायला जाणार आहेत याची मला कल्पनाच नव्हती!"

"नसेलही. पण आत्ता तू 'अजिंक्य हॉटेलवर जा, आणि त्याना सांग, मुरारराव घोरपडे माझे काका आहेत आणि त्याना त्रास होईल असे काही करू नका!"

विक्रम म्हणाला, "पण आपलं नातं त्याना ठाऊक आहे!"

"अरे ठाऊक असलं तरी तो वकील मला संपवायला बसलेला आहे. आता केवळ तूच मला या संकटातून वाचवू शकशील!"

विक्रम शांतपणे म्हणाला, "खरं सांगू काका, ॲड. प्रधान आपला सख्खा भाऊ जरी एखाद्या खटल्यात विरूद्ध पक्षातर्फे साक्षीदार म्हणून आला तरी ते त्याची गय करणार नाहीत. माझी विनंती ते ऐकतील आणि मला म्हणतील 'या पुढं माझ्याकडे येत जाऊ नकोस!

फंदफितुरीच्या विरूद्ध आहेत ते!"

हताश होऊन मुरारराव म्हणाले,

"मग आता काय करायचं. ते तूच सांग?"

"विश्वासदादा कुठंय?"

"तो असेल कुठंतरी मसणात, तो मला बिलकूल मदत करणार नाही. त्याच्यामुळंच हा प्रधान हा खटला चालवायला आलाय. आपल्या घराण्याचे वाभाडे काढायचे तेवढे शिल्लक राहिलेत. तूच यातून काहीतरी मार्ग काढू शकशील!"

"पण तुम्हाला एवढी भीती वाटण्यासारखं झालंय तरी काय?"

"अरे गुन्ह्याची जागा बदलल्याचं माझ्या अंगाशी आलंय ना?"

"पण तुम्ही हे असलं धाडस केलंतच कशासाठी?"

"आता ते तुला सांगत बसायला वेळ नाही. साडेनऊ झालेत. साडेदहाला ते प्रधान कोर्टात येतात. साडे अकराला केस चालू होईल त्या अगोदरच तू त्याना भेटायला हवंय!"

"तुम्ही म्हणताच आहात. तर मी त्याना भेटतो. सांगतो, पण ते माझं ऐकतीलच असं काही समजू नका!"

"विकी तुला हात जोडतो, असं करू नको! माझी अब्रू आणि तुझी अब्रू काही भिन्न नाही!"

"विक्रम उठला आणि म्हणाला, "काका, माझ्या लग्नाला मानी विरोध केला नव्हता, तो तुम्ही केलात. घराणं बाटवलंस म्हणून माझी बदनामी केलीत. आजपर्यंत तुम्ही माझ्याशी बोलला देखिल नाही. हे सारं विसरून मी तुम्हाला अशा परिस्थितीत मदत करावी अशी का अपेक्षा करता? मीनल श्रीरंगवर प्रेम करीत होती हे मला माहीत होतं, तुम्ही कारस्थान करून त्याला चिंचलीतून बाहेर काढलंत, त्या दोघांची कायमची ताटातूट व्हावी म्हणून श्रीरंगच्या लग्नाचं कारस्थान रचलंत! आता त्यानं आपल्या बदफैली पत्नीच्या याराचा 'मर्डर' केला म्हणून त्याच्याविरूद्ध खोटेनाटे पुरावे तयार केलेत. आजपर्यंत घराण्याची खोटी

[illegible] मुरारराव हताश होऊन त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडं पहात राह्यले.

मुरारराव उठले आणि सरळ विश्वासकडं त्याच्या चौकातल्या ऑफीसात आले. त्याना पहाताच विश्वासला त्यांच्या पुन्हा तिथं येण्याचं प्रयोजन समजलं.

"विश्वास, आज आर्ग्युमेंटस् आहेत. प्रधानाना तू एक विनंती करशील?"

"तुमच्या विरूद्ध खोटा पुरावा तयार केल्याबद्दल कारवाईची मागणी करू नका म्हणून?" विश्वासनं खोटं खोटं हसत विचारलं. मुरारराव मानेनेच 'हो' म्हणाले.

"फौजदारसाहेब, श्रीरंग पोलीस कस्टडीत असताना मी त्याला भेटायला आलो होतो. त्यावेळी तुम्ही माझ्याशी कसे वागलात ते जरा आठवा!"

"ते कशाला काढतोस आता विश्वास?"

"हे पहा फौजदारसाहेब, चंपानं तुमच्याविरूद्ध केस दाखल करू नये म्हणून तुम्ही माझे पाय धरलेत. मी मन मोठं करून तुम्हाला त्या संकटातून वाचवलं! पण हात मोकळे झाले की त्याच हातानं वाचवणाऱ्याचा गळा पकडायला तुम्ही मागेपुढे पहात नसता! यावेळी मी तुम्हाला कसलीही मदत करू इच्छित नाही! मी आणि श्रीरंग हलक्या कुळात जन्मलेलो कुणबट आहोत म्हणून सदैव आमची अवहेलना केलीत. मग आमचे पाय पुन्हा कशाला धरता? तुमच्या खानदानीचा अवमान आहे तो!"

"खानदान गेली खड्ड्यात बर्वे मलाच तुरुंगाची वाट दाखवतील! विश्वास मी आयुष्यभर तुझे उपकार विसरणार नाही!"

विश्वास शांतपणे म्हणाला "तुम्हाला मदत करण्याचा मूर्खपणा मी पुन्हा दुसऱ्यांदा करणार नाही!"

हताश होऊन मुरारराव परत गेले.

कोर्ट हॉल चिक्कार भरले होते. आरोपी श्रीरंगला क्रिमिनल प्रोसिजर कोड कलम तीनशे तेराअन्वये खुलासा विचारण्यासाठी पुढं बोलावण्यात आले.

"श्रीरंग, तू तेरा ऑगस्टला रात्री सव्वा दहाच्या सुमारास पोलीस हवालदार जयसिंग जमदाडे याचा कुऱ्हाडीने खून केलास असा तुझ्याविरूद्ध फौजदार मुरारराव घोरपडे यानी जबाब दिलेला आहे, त्याबाबत तुला काय सांगावयाचे आहे?"

"तेरा ऑगस्टला मी पंढरपूरला कुस्त्या बघण्यासाठी जाणार होतो. तशी मला पोलीस ठाण्यातून परवानगीही मिळालेली होती. पंढरपूरला मला दोनतीन दिवस रहावं लागणार असल्यामुळं मी सोबत कपडे घेण्यासाठी घरी आलो. तेव्हा शालन भाजी आणायला स्टँडवर गेली होती. मी आडदाणीवरचे कपडे घेत असताना मला चंदनाच्या अत्तराचा वास आला. वास कशाला येतो म्हणून मी अडदाणीवरच्या कपड्यांचा वास घेऊ लागलो. तिथं शालनचा निळसर रंगाचा ब्लाऊज होता. त्या ब्लाऊजलाच चंदनाच्या अत्तराचा वास येत होता.

चंदनाचं अत्तर हवालदार जमदाडे याच्याशिवाय लाईनमध्ये कोणीच वापरत नव्हते.

मी शिरगावांत नसताना जमदाडे लायनीत माझ्या खोलीत जाऊन शालनशी बोलत असतो असं दोन-तीन वेळा माझ्या कानावर आलेलं होतं, पण मी त्याकडं फारसं लक्ष दिलेलं नव्हतं. आता तिच्या ब्लाऊजलाच चंदनाचा वास येतो म्हटल्यावर माझी खात्रीच झाली की शालन जयसिंगच्या नादी लागली आहे. भाजी घेऊन शालन आल्यावर मी तिला त्याबाबत काहीच विचारलं नाही. उलट मी तिला 'तीन चार दिवस पंढरपूरला जाणार आहे' असं म्हणालो.

अलीकडे मी बाहेरगावी जाणार म्हटल्यावर ती फारच खुषीत येई. तेरा ऑगष्टला मी पंढरपूरला जाणार म्हटल्यावर तिने उत्साहाने माझी

बॅग भरली. मी तिच्या हालचालींचं बारकाईनं निरीक्षण करत होतो. मी तिला म्हटलं.

'चार दिवस मी येणार नाही, तेव्हा तू सांगावला जाणार असशील तर जा!" त्यावर ती म्हणाली 'कशाला उगीच जा जा ये ये, परवा तर आबा येऊन भेटून गेलेत. मी नाही जाणार सांगावला!"

मी पंढरपूरला जायचे रद्दीत केले. माझ्या अपरोक्ष खरोखरच जमदाडे शालनकडे येत असतो का याची खात्री करून घ्यायचं ठरवलं. सकाळी नऊला पंढरपूरला जाणारी एस.टी. येते. त्या एस.टी.त चढलो. हवालदार जमदाडे इब्राहिम बागवानच्या पानपट्टीच्या दुकानासमोर सिगारेट ओढत उभा होता. त्यानं मला पंढरपूरच्या एस.टी.त चढताना पाहिले. एस.टी. सुटण्याच्या वेळी तो माझ्या खिडकीजवळ येऊन म्हणाला,

"पैलवान, कधी परत येणार?"

मी म्हणालो, "चार दिवसाची परवानगी दिलीय साहेबानी!"

"तुम्ही काय, सरकारचे जावई! चैन आहे बुवा! स्पोर्टस्‌मन म्हणून तुम्हाला हवं तिकडं जायला मिळतं! आमची मात्र पंधरा दिवसाची कॅज्युएल बारा महिने बुडते!'

एस.टी. सुटल्यावर मी हसत हसत त्याचा निरोप घेतला. दुसरा स्टॉप आहे नरसिंगपूरचा. या नरसिंगपूरात भिमा वडार हा पैलवान माझ्या ओळखीचा होता. त्याच्या घरी संध्याकाळपर्यंत थांबलो. रात्री आठला शिरगांवला जाणारी एस.टी. पकडून परत आलो.

अंधार पडला होता. पोलीस लाईन समोर दाट शेंडाचं झुडूप आहे. तिथं लपून बसलो. तेथून दीडशे पावलावरची माझी लाईनमधली खोली स्पष्ट दिसत होती.

हजेरी नऊ साडेनऊला संपल्यावर जमदाडे इकडं तिकडं पहात माझ्या खोलीसमोर आला. त्यानं दारावर थाप मारताच शालनने दार उघडलं. तो आत जाताच दार बंद झालं.

मी बाहेर गावी जाताना नेहमी एक सोटा जवळ ठेवतो. पैलवानकीच्या क्षेत्रात भयंकर जीवघेणी स्पर्धा असते. नावारूपाला येणाऱ्या पैलवानाना कधी कधी विषप्रयोग झाल्याच्या हकीगती घडलेल्या आहेत, तर कधी एकटा गाठून त्याचे हात पाय तोडले जातात असंही घडलं आहे. मीही खेडोपाडी कुस्त्या पहायला जायचा. संरक्षणासाठी म्हणून मी महिन्यापूर्वी त्या सोट्याला बसेल असं फरशी कुऱ्हाडीचं पातं बागणी गावातून बनवून घेतलं होतं.

जयसिंग माझ्या घरात शिरल्याचं पहाताच नकळत मी ते पातं सोट्यात अडकवलं. झुडूपातून बाहेर पडलो. दाराजवळ आलो तर आतून शालनच्या हसण्या खिदळण्याचा आवाज कानावर आला. आत काय चाललं असावं याची खात्री झाल्यावर मी दारावर थाप मारली. 'शालननं कोण ते ?' म्हणून विचारलं.

"दार उघड म्हणजे कोण आहेत ते दिसेल" असं मी म्हणताच 'जमदाडे म्हणाला 'बापरे पैलवान पंढरपूरला गेला नाही तर!' नंतर दोघांची हळू आवाजात थोडी कुजबूज झाली. लाईनमधल्या खोल्याना मागे दार नाही. बाहेर पडायचं तर पुढच्याच दाराने बाहेर पडावं लागतं. जमदाडे दार उघडताच मुसंडी मारून पळून जाणार याचा अंदाज करून माझी फरशी कुऱ्हाड उंगारून तयारीतच होतो. माझा अंदाज अचूक ठरला. दार उघडलं गेलं. जयसिंग मला बाजूला ढकलून पळून जाण्याचा प्रयत्न करण्यापूर्वीच माझ्या कुऱ्हाडीनं त्याचं मुंडकं घडावेगळं केलं होतं. मुंडकं घरात पडलं आणि धड उंबऱ्यावर! एक दोन क्षण धडपडून धड शांत झालं. त्याच वेळी शालनलाही संपवावं असं वाटलं, पण म्हटलं बाईवर हात उगारणं मर्दाचं काम नाही. तिच्या मरणानं ती मरेल. मी रक्तानं भरलेल्या कुऱ्हाडीसहीत पोलीस ठाण्यात हजर झालो. हवालदार निळकंठ परबला जे घडलं होतं ते सांगितलं. त्यानं तात्काळ फौजदार साहेबाना बोलावून आणलं. त्यानी मला अटक केलं!"

त्यानंतर त्याला न्यायमूर्तींनी विचारलं,

"तू जमादार जयसिंग जमदाडेला पोलीस स्टेशनपासून बत्तीस फुटावर मारलेस असे फौजदार घोरपडेयांचे म्हणणे आहे. त्याबाबत तुला काय म्हणायचे आहे?"

"त्यांचं म्हणणं साफ खोटं आहे, मी जमदाडेला माझ्या खोलीतून पळून जाताना दारातच मारले. फौजदारानी खोटा पंचनामा करून गुन्ह्याची जागा बदललेली आहे. माझ्या खोलीच्या उंबऱ्यावर आणि घरात पडलेलं रक्त त्यानी पुसून टाकले आहे."

"तुला आणखीन काही सांगायचे आहे का?"

"जमादार जयसिंग जमदाडे माझ्या पत्नीशी व्यभिचार करण्याच्या हेतूने माझ्या घरात आलेला होता. माझ्या मनावरचा ताबा सुटला आणि रागाच्या भरात मी त्याला उडवले आहे. पूर्व नियोजनानं मी हे कृत्य मुळीच केलेले नाही."

"तुला शिक्षेबद्दल काही सांगायचं आहे का?"

"मला वाटतं मी कसलाच गुन्हा केलेला नाही!"

न्यायमूर्ती बर्वे किंचित स्मित करून म्हणाले, 'मिस्टर प्रधान युवर ॲक्यूज्ड इज क्वाईट बोल्ड."

ॲड. प्रधान उठून म्हणाले,

"युवर ऑनर, जे काही घडलेलं होतं ते माझ्या क्लायंटनं अगदी प्रामाणिकपणे आपल्याला निवेदन केलेलं आहे!"

त्यावर न्यायमूर्ती सरकारी वकिलाना उद्देशून म्हणाले,

"येस प्रॉसिक्यूटर एेनी आर्ग्युमेंटस!"

सरकारी वकील उठून उभे राहिले आणि त्यानी बोलायला सुरुवात केली.

"मे इट प्लिज यूवर ऑनर"

३०.

'मे इट् प्लिज यूवर ऑनर' या खटल्यातला आरोपी श्रीरंग, याचेवर जमादार जयसिंग जमदाडे याचा खून केल्याचा आरोप ठेवण्यात आलेला आहे. आरोपी श्रीरंग याला आपली पत्नी शालन इचा मयत जयसिंग जमदाडेशी अनैतिक संबंध असावा अशी शंका होती. गेल्या तेरा ऑगष्ट रोजी रात्री अकराच्या सुमारास शिरगांव पोलीस स्टेशनच्या पश्चिमेला जी पोलीस लाईन आहे, तिच्या पूर्व भिंतीलगत आरोपी श्रीरंगने जयसिंगवर कुऱ्हाडीचा जबरदस्त वार करून त्याचे शीर धडावेगळे केले आणि स्वत: रक्तानं माखलेल्या कुऱ्हाडीसह पोलीस ठाण्यात हजर झाला.

या केसमधील महत्वाचे साक्षीदार हवालदार निळकंठ परब, शालन आणि गुन्ह्याठिकाणचे पंच यानी मात्र गुन्ह्याच्या ठिकाणाबाबत विसंगत जबाब दिले आहेत. तेव्हा प्रश्न असा निर्माण होतो की, जयसिंगला आरोपी श्रीरंगने नेमके मारले कुठे? वादाकरतां आपण गृहीत धरू की श्रीरंगने जयसिंगला पोलीस लाईनमधल्या खोलीच्या उंबरठ्यावरच मारले. यामुळे श्रीरंगने केलेल्या गुन्ह्याची तीव्रता थोडी कमी होणार आहे. हा प्रकार खून 'मर्डर' या सदरात बसणार नसून सदोष मनुष्य वध, म्हणजे 'कल्पेबल होमीसाईड नॉट अमाऊंटिंग टू मर्डर" या सदरात बसणार आहे! हा गुन्हाच घडला नव्हता असे काही होणार नाही.

आता आपण श्रीरंगने 'तीनशे तेरा' कलमाप्रमाणे जो जबाब दिलेला आहे तो क्षणभर सत्य जरी मानला तर काय निष्पन्न होईल? जमादार जयसिंग जमदाडे शालनशी व्यभिचार करण्यासाठी त्या रात्री तिच्याकडे गेला होता. व्यभिचार, म्हणजे 'ॲडल्ट्री', या गुन्ह्याबाबत जर एखादा आरोपी दोषी आढळला तर त्याला जास्तीत जास्त पाच वर्षे इतकी शिक्षा होऊ शकते. आरोपी श्रीरंग याने त्यासाठी त्याचे प्राण

ठाण्यात येऊन जर जयसिंगविरूद्ध व्यभिचाराची फिर्याद दिली असती तर हा भीषण प्रकार घडलाच नसता. ज्याला इंग्रजीत 'रेड हॅंडेड' पकडणे म्हणतात तसा अगदी 'रंगेहात' जयसिंग पकडला गेला असता. पण या मायेफिरू श्रीरंगने त्याला जीवानिशी मारून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा केलेला आहे. जयसिंगला कोणत्या ठिकाणी मारले हा प्रश्न माझ्या दृष्टीनं फारसा महत्वाचा नाही. शिवाय आरोपी श्रीरंगने कुन्हाड बाळगल्याचे जे कारण दिले आहे ते बुद्धीला न पटण्यासारखे आहे. तो म्हणतो 'मी गावोगावी जात असतो आणि अशावेळी संरक्षणासाठी कुन्हाड बाळगतो.' कुठल्या पहिलवानाने आजपर्यंत परगावी जाताना कुन्हाड बाळगल्याचे माझ्यातरी आढळात नाही. उलट श्रीरंगने तेरा ऑगस्टच्या रात्री जमादार जयसिंग जमदाडे याचा हेतूपुरःस्पर खून करण्यासाठीच त्याने ती फरशी कुन्हाड पैदा केली होती असे दिसून येते. पूर्वनियोजनानेच हा गुन्हा करण्याचा त्याचा हेतू होता असेच दिसते. तेव्हा आरोपी श्रीरंग याने हा गुन्हा जरी त्याच्या पोलीस लाईनमधल्या खोलीसमोर केला असे जरी मानले तरीही तो संपूर्ण दोषमुक्त होऊ शकत नाही.

आरोपी पोलीस कॉन्स्टेबल आहे. पोलिसांनी जनतेच्या जीविताचे आणि वित्ताचे संरक्षण करायचे असते, पण इथे पोलिसानेच पोलीस जमादाराचा वध केला आहे. यामुळे पोलीस खात्याची प्रतिमा काही अंशी डागाळलेली आहे.. ती डागाळणाऱ्या श्रीरंगसारख्या मायेफिरूला कडक शासन घडणे अत्यावश्यक आहे. आरोपी विरूद्ध 'मर्डर' शाबीत होऊ शकणार नाही असे आपले मत झाल्यास त्याला निदान सदोष मनुष्यवधाखाली दोषी धरून जन्मठेपेची सजा सुनावल्यास न्यायासनाचा हेतू पूर्ण होईल. आरोपीचे वय आणि त्याचा पूर्वेतिहास लक्षात घेता अगदी जन्मठेपेची नसली तरी दहावर्षे सश्रम कारावासाची शिक्षा त्याला व्हावी अशी सरकारतर्फे माझी आपणाला नम्र विनंती आहे.'

सरकारी वकिलानी ढासळलेल्या खटल्याची बरीच डागडुजी करण्याचा प्रयत्न केला होता. शेजारी बसलेले अॅड. प्रधान त्यांच्या भाषणातल्या काही मुद्यांना उत्तर देण्याचा पावित्र्यात होते. सरकारी वकिलांच्या भाषणानंतर अॅड. प्रधान आपली बाजू मांडण्यासाठी उभे राहिले.

कोर्ट हॉलमधे पाय ठेवायला जागा नव्हती. वकील लोकांच्या दुसऱ्या ओळीत दोन दोन ज्युनिअर वकील दाटीवाटीनं एकाच खुर्चीवर बसले होते. समाजातल्या सर्व स्तरातले श्रोते या गाजलेल्या खटल्याचे अंतिम टप्प्यातले कामकाज ऐकण्यासाठी आतुरलेले होते. एवढी गर्दी असून कोर्ट हॉल शांत होते. छताचे पंखे हळूवार फिरत होते. तेवढीच काय ती हालचाल दिसून येत होती.

"मे ईट प्लीज युवर ऑनर" अॅड. प्रधानानी आपल्या भाषणाला सुरुवात केली. उंच, गोरे, सरळ नाकाचे, कुरळ्या केसांच्या अॅडव्होकेट प्रधानांचे डोळे आत्मविश्वास प्रकट करीत होते. खणखणीत आवाजाची त्याना जन्मजात देणगीच होती. त्यानी बोलायला सुरुवात केली.

'मे इट प्लीज युवर ऑनर, या खटल्यात आत्ताच आमचे विद्वान मित्र सरकारी वकील यानी जे भाषण केले ते ऐकून सद्‌सद्‌विवेकबुध्दी आणि व्यवहारचातुर्य असणाऱ्याचे बिलकूल समाधान होणार नाही. सरकारी वकील म्हणतात हा गुन्हा कोणत्या ठिकाणी घडला हा मुद्दा गौण आहे. माझ्या मते गुन्हा कोणत्या ठिकाणी घडला हाच प्रमुख मुद्दा या खटल्यात आहे! आता कळत न कळत सरकारी वकिलानीही हा प्रकार श्रीरंगच्या खोलीसमोर उंबरठ्यावर घडला होता हे मान्य केल्यासारखेच आहे.

आपण तेरा तारखेला काय घडलं हे पाहू. श्रीरंगला कुस्त्या पहायला पंढरपूरला जायचे होते. त्यासाठी कपडे घेण्यासाठी तो घरी आला. शालन त्यावेळी भाजी आणायला गेली होती. आडदाणीवरचे कपडे घेताना त्याना चंदनाच्या अत्तराचा वास आला. इथे तो वास कसा हे

पहाताना त्याला शालनचे ब्लाऊज दिसले. ते त्याने नाकाला लावले. त्या ब्लाऊजलाच चंदन अत्तराचा वास होता. जमादार जयसिंग शिवाय तसले अत्तर शिरगावच्या पोलीस स्टाफमधे कोणीही वापरत नव्हते. त्या अगोदर आपण कामानिमित्त परगावी गेलो, किंवा कुस्त्या पहायला बाहेरगावी गेलो की जयसिंग आपल्या घरी येतो याची त्याला कुणकूण लागली होती. म्हणून त्यादिवशी त्यानं त्या बाबतीत शहानिशा करण्याचे ठरवले. पंढरपूरला न जाता तो नरसिंगपूरला गाडीतून उतरला. रात्री आठ साडेआठला तो शिरगावला परत आला. पोलीसलाईन समोर शंभरं पावलावर विहिरीजवळ शेंडाचे दाड झुडूप आहे त्या झुडूपात तो बसून राहिला. साडेदहाच्या सुमारास जयसिंग शालनकडे गेला. दारावर थाप पडताच तिनं दार उघडले याचा अर्थ ती त्याची वाटच पहात होती. जयसिंग आत जाताच आतून दार बंद झाले.

आता हा प्रकार कोणता विवाहित तरुण गृहस्थ शांत चित्ताने बघत बसेल? हां, आता तो पुरुषत्वहीन असेल तर गप्प बसेल! विद्वान सरकारी वकील म्हणतात त्याने बाहेरून कडी लावून पोलीस ठाण्यात जाऊन जयसिंगाविरूद्ध पत्नीशी व्यभिचार करण्यासाठी तो तिथं आला होता म्हणून फिर्याद देणे जरुरीचे होते!

जयसिंग हा फौजदार मुरारराव घोरपड्यांचा उजवा हात! त्याच्याविरूद्ध फौजदारानी व्यभिचाराबद्दल कारवाई केली असती का? अशक्य आहे! ठाणे अम्मलदारानं श्रीरंगची तक्रारदेखील नोंद करून घेतली नसती!

श्रीरंगचा स्वतःच्या मनावरचा ताबा उडाला. त्यानं दाराजवळ येऊन आत काय चाललं आहे याचा कदनोसा घेतला. आत शालन खुदूखुदू हसत होती. या साऱ्या घटना मर्द पुरुषाचा क्रोध अनावर होणाऱ्या नाहीत का?

पंढरपूरला न जाता श्रीरंग परत आलेला आहे हे समजताच जयसिंगने कपडे चढवले. शालननेच ही कबुली दिली आहे. पँट काढून

जयसिंगनं कमरेला लुंगी लावलेली होती. प्रत्यक्षात तो आणि ती कोणत्या अवस्थेत असावीत याचा मी अंदाजच करू शकत नाही! पण वादाकरता त्याने कमरेला लुंगी गुंडाळली असावी असे गृहीत धरू. श्रीरंग परत आला आहे याची जाणीव होताच जयसिंगाने लुंगी सोडून पँट चढवली. शालनने दार उघडताच मुसंडी मारून बाहेर पळून जाण्याचा प्रयत्न जयसिंगाने केला. पण उंबरठ्यावरच श्रीरंगने त्याचे शीर धडावेगळे केले. व्यभिचारी शालनलाही त्याने देहांत प्रायश्चित घडवले असते, पण हा मर्यादा पुरुष आहे. स्त्रीवर हल्ला करणं त्याला मंजूर नव्हतं. तो तेथून तडक पोलीस ठाण्यात आला, रक्तानं माखलेल्या कुऱ्हाडीनिशी!

फौजदाराना वर्दी जाताच ते ठाण्यात आले. आल्याआल्या त्यानी आपल्या कारस्थानाला सुरुवात केली. गुन्ह्याची जागा बदलली. श्रीरंगच्या खोलीच्या दाराशी पडलेलं जयसिंगचं धड आणि आत पडलेलं शीर याचा खोटा पंचनामा केला. कोर्टासमोर दाखल करण्यात आलेल्या पंचनाम्यात .हा प्रकार पोलीस स्टेशनपासून बत्तीस फुटावर पश्चिमेस घडल्याचा उल्लेख आहे. फौजदार घोरपड्यानी हा खोटा पंचनामा करण्यामागे त्यांचा एकच उद्देश होता. श्रीरंगने पूर्वनियोजनाने जयसिंगचा खून केला. हे दाखवण्याचा! जयसिंग हा मुराररावांच्या खास मर्जीतला हे एक हा बनावट पुरावा करण्यामागचे कारण तर होतेच पण याही बरोबर अद्याप अविवाहित असलेली आपली पुतणी मीनल, हिला श्रीरंगपासून कायम अलग ठेवण्याचा फौजदारांचा दुष्ट हेतुही होता. पण तो त्यांचा हेतू साध्य होणार आहे की नाही हे भविष्यकाळच ठरवेल!

फौजदार मुरारराव घोरपडे यानी श्रीरंगच्या खोलीतले रक्ताचे डाग साफ करून भयंकर स्वरुपाचा गुन्हा केलेला आहे. निरपराध माणसावर खुनाचा आरोप करणारा हा गुन्हा आहे. पुरावा नष्ट करणे आणि खोटा पुरावा तयार करणे हे दोन्ही भयंकर स्वरूपाचे गुन्हे फौजदार मुरारराव घोरपड्यानी केलेले आहेत.

आता आपण श्रीरंगवर कोणता आरोप शाबीत होतो हे पाहू! माझे म्हणणे आहे की श्रीरंगवर जास्तीत जास्त 'ग्रेव्ह अँड सडन प्रोव्होकेशनने' मनुष्यवध केल्याचा दोष ठेवता येऊ शकेल. पण या खटल्यात तेही अन्यायकारक ठरेल असं माझं प्रतिपादन आहे. एखाद्याच्या घरी त्याच्या अपरोक्ष, कपडे उतरून त्याच्या पत्नीला बाहुपाशात घेऊन एखादा पुरुष तिला खुदूखुदू हसवत असेल तर त्या स्त्रीच्या नवऱ्याने पत्नीच्या प्रियकाराच्या कंठात फुलमाळा घालावी की त्याला कंठस्नान घालावे?

इथं श्रीरंगने त्याला कंठस्नान घातले आहे. काय अधिकार होता जयसिंगला रात्री अपरात्री तिथं जाण्याचा? तो शालनशी व्यभिचार करण्यासाठीच तिथं गेला होता. श्रीरंगने त्याचं मुंडकं उडवलं हीच त्या नराधमाला योग्य शिक्षा होती. आता आपण म्हणाल. जीवे मारण्यापेक्षा त्याचे हातपाय तोडले असते तर चालू शकलं असतं? पण क्रोधाने पेटलेल्या श्रीरंगकडून तशी अपेक्षा करणेही रास्त नाही. आपल्या पत्नीशी होणारा व्यभिचार रोखण्यासाठीच श्रीरंगनं तो प्रकार केलेला आहे असे जर आपण मानले, तर श्रीरंगला निर्दोष म्हणून सोडता येईल! 'ग्रेव्ह अँड सडन प्रोव्होकेशन' तरी निर्विवाद दिसून येतेच आहे. त्याला सदोष मनुष्यवधाबद्दल जरी दोषी धरले तरी त्याचं पूर्वचारित्र्य, त्याची, स्त्रीकडं पहाण्याची क्षमाशील वृत्ती विचारात घेता त्याला 'अॅडमॉनिशन'वर म्हणजे केवळ ताकीद देऊनही आपल्याला सोडता येईल. या बाबतीत मी आपणाला दोन महत्वाच्या अथॉरिटीज सादर करणार आहे. ही पहिली केस आहे. क्रिमिनल लॉ जर्नल १९७३ मधील, यात असं म्हटलं आहे की 'Case of culpable homicide not amounting to murder, accused below 21 years of age on the date when judgement was pronouneed by trial court, accused could claim benefit of probation. क्रिमिनल लॉ जर्नलमधील या केसला सुप्रिम कोर्टानेही मान्यता दिलेली आहे. ती केस

१९७२ ए.आय.आर.पेज २५५ वर आपणाला आढळते. मी या दोन्ही ऑथॉरिटीज आपणासमोर सादर करीत आहे.

आता कदाचित विद्वान सरकारी वकील म्हणतील की त्या केसमधला आरोपी हा २१ वर्षांचा होता, इथं श्रीरंग साडेचोवीस वर्षांचा आहे. त्याला त्या रुलिंगचा फायदा मिळणार नाही, पण आरोपीचे वय हे प्रोबेशनचा विचार करताना गौण ठरते. आरोपीचे पूर्वचारित्र्य, गुन्हा घडण्यास कारणीभूत झालेली परिस्थिती या घटकांचा विचारच महत्वाचा असतो. तेव्हा या सेन्सेशनल खटल्याचा समग्र विचार करताना आपल्याला दोन गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. एक अशी की श्रीरंगने जाणूनबुजून पूर्वनियोजनानं जयसिंगचा खून केलेला आहे की तो अतीव क्रोधामुळे मनावरचा ताबा सुटल्याने घडलेला आहे? आणि दुसरी महत्वाची गोष्ट विचारात घ्यावी लागते ती अशी की या प्रकरणात खोटा पंचनामा करणे, साक्षीदारांचे खोटे जबाब घेणे आणि जो पुरावा श्रीरंगच्या बाजूने विचारात घेता आला असता तो नष्ट करणे या न्यायदानाविरूद्ध केलेल्या गुन्ह्याबाबत फौजदार मुराररावविरूद्ध कोणती 'ॲक्शन' घ्यायची?

इंडियन पिनल कोड कलमातल्या एकशेहे एक्याणऊ कलमापासून ते एकशेहे शहाण्णव कलमापर्यंतचे सर्व गुन्हे मुराररावांनी केलेले आहेत. हा माणूस पोलीस खात्यात क्षणभरही राहता कामा नये अशी कारवाई केली जावी. पण केवळ पोलीस खात्यातून त्यांना काढून टाकल्याने भागणार नाही तर न्यायदानाविरूद्ध केलेल्या गुन्ह्याबाबत त्यांना कडक शासनही होणं जरुरीचं आहे. असे अधम पोलीस अधिकारी जर खात्यात उजळ माथ्याने वावरू लागले तर जनतेचा शासनसंस्थेवर विश्वास रहाणार नाही.

शेवटी श्रीरंगच्या हातून मनुष्यवध घडलेला आहे हे मी मान्य करूनही ज्या परिस्थितीत त्याच्या हातून हे कृत्य घडलेलं आहे ती परिस्थिती विचारात घेऊन त्याला नाममात्र शिक्षा दिली जावी. ती

शिक्षा त्याने न भोगता त्याला फक्त ताकीत, 'ॲडमॉनिशन' देऊन सोडून देण्यात यावं अशी माझी आपणाला नम्र विनंती आहे."

ॲड. प्रधान आपलं प्रदीर्घ भाषण संपवून खुर्चीवर बसले तेव्हा ते भाषण ऐकण्यासाठी जमलेली वकील मंडळी आपसात कुजबुजू लागली, याला म्हणतात ॲडव्होकसी! नाहीतर आपल्याकडचेही फौजदारी वकील आहेतच! उगाच प्रत्येकवेळी 'टोटल डिनायलचा' बचाव करायचा आणि सगळं ओझं अंगावर घेऊन कोलमडून पडायचं!' दुसरे एक वकील म्हणाले 'श्रीरंगचं एक ठीक होईल पण आता फौजदारांचं भवितव्य मात्र धोक्यात आलं आहे!'

न्यायमूर्ती बर्वे खुर्चीवरून उठता उठता म्हणाले 'परवा दिवशी निकाल जाहीर केला जाईल!'

सरकारी वकिलांच्या ऑफसमध्ये येऊन बसलेल्या मुराररावाना ॲड. प्रधानानी केलेल्या भाषणाचा वृत्तांत समजला. ते अस्वस्थ होऊन सरकारी वकिलाना बाहेर आल्यावर म्हणाले,

"आता काय करायचं?"

सरकारी वकील म्हणाले, "निकाल बाहेर पडल्यावरच काय करायचं ते ठरवायचं! पण मलाही वाटतं तुम्ही या गुन्ह्याच्या तपासात तुम्ही नको त्या गोष्टी केल्या आहेत!"

"मला वाटलं नव्हतं, श्रीरंगचा बचाव करायला एवढा मोठा वकील येईल!"

"मोठा आणि लहान! त्याचा काय संबंध आहे? विश्वास श्रीरंगच्या बाजूने उभा रहाणार म्हटल्यावर तुम्ही दहावेळा विचार करायला हवा होता!"

"झालं ते झालं! आता मला सांगा जर कोर्टानं माझ्याविरूद्ध ताशेरे झोडले तर त्यातून काय मार्ग?"

"ते मी कसं सांगू? तुम्ही खोटे पुरावे केलेत हे तुमच्या साक्षीदारानीसुद्धा कबूल केलंय ना?"

"सगळे एक जात हरामखोर निघाले!"

सरकारी वकिलाना त्या चर्चेत फारसा रस नव्हता. त्यानी काळा कोट उतरला. दुसरा कोट चढवला आणि क्लार्कला म्हणाले, "उद्या चालणाऱ्या क्रिमिनल अपीलाची फाईल तेवढी द्या, रात्री मला घरी वाचायला हवी!"

सरकारी वकील निघून गेल्यानंतर मुरारराव ऑफीसातून बाहेर पडले. श्रीरंगला हातकड्या घालून ड्युटीचे पोलीस त्याला जेलकडे घेऊन निघाले होते. त्याला बघायला लोकानी गर्दी केलेली होती. बहुसंख्य लोकांची त्याला सहानुभूती होती. ती गर्दी ओलांडून बाहेर निघालेल्या मुराररावांच्याकडे मात्र कोणाचंच लक्ष नव्हतं!

श्रीरंगवर तो खटला झाल्यापासून चिंचलीतले वातावरण काहीसे बिघडले होते. श्रीरंगला साऱ्या गावाची सहानुभूती होती. मुरारराव घोरपड्यानी त्या खटल्यात जरुरीपेक्षा अधिक लक्ष घातल्याने चिंचलीतला सामान्य माणूस घोरपड्यांच्याकडे कलुषीत नजरेनं पाहू लागला होता.

पद्मावाईचीही त्यातून सुटका नव्हती. सरकारबाईनी खरं तर श्रीरंगच्या सुटकेसाठी प्रयत्न करायला हवे होते असं चिंचलीतल्या ग्रामस्थांना वाटत होतं. श्रीरंगचा बाप बलभीम हा घोरपड्यंची सेवा चाकरी करीत असतानाच मृत्यूमुखी पडला होता. बायजाने लहान श्रीरंगला पद्मावाईच्या पायासमोर आणून ठेवलं होतं आणि म्हणाली होती "वैनीसरकार आता ह्या लेकराचा संबाळ कसा करू सांगा?" पद्मावाईनी बायजाला लागेल तेवढं धान्य आणि थोडीफार मदतही केली होती. पण जेव्हा श्रीरंग आणि मीनल यांच्या प्रेमाची त्याना चाहूल लागली तेव्हा मात्र त्यांची पावलं निराळ्या दिशेनं पडली होती. मुराररावाना हाताशी धरून त्यानी त्याचं शिक्षण खंडित करून त्याला पोलिसात भरती करून टाकला होता. मीनलची आणि त्याची ताटातूट करण्याचाच त्यांचा हेतू होता. श्रीरंगनेही आपले प्रेम सफल होऊ

वाटल्यानं तुम्ही त्याच्यावर अन्याय केलात. सर्वसामान्य ...
ती गोष्ट खटकली. लोक तुमच्याकडे कामाला येईनासे झाले. याला जबाबदार तुम्हीच!"

विश्वास कोणाची भीड बाळगत नव्हता. तो सडेतोडपणे बोलू शकत होता.

पद्माबाई काहीशा सचिंत होऊन म्हणाल्या, "मी श्रीरंगच्या सुटकेसाठी काही प्रयत्न केला नाही हे खरं, पण त्याचवेळी त्याला शिक्षा व्हावी असं मला कधी वाटलं नव्हतं!"

"वैनीसरकार माफ करा थोडं स्पष्ट बोलतो या प्रकरणात तुमचं वर्तन थोडं दुटप्पी घडलंय! मुरारराव श्रीरंगविरूद्ध खोटेनाटे पुरावे करून त्याला खटल्यात अडकवणार आहे याची जाणीव होऊनही तुम्ही गप्प बसलात! आज काल लोक फार चाणाक्ष झाले आहेत. तुम्ही चार भिंतीच्या आड काय बोलता याचा त्याना अचूक अंदाज करता येतो. तुम्ही एक गोष्ट विसरलात, ही तुमची सरकार शेरीची चाळीस एकर जमीन अमृतराव सरकार आणि तुम्ही दोघे गावकऱ्यांच्या मदतीविना कधीही कसू शकणार नाही!"

"जे झालं ते झालं, आता पुढचा मार्ग सांग?"

"मी काय सांगू? या खटल्याचा निकाल काय लागतो यावर आमीर- उल-मुल्कांचं भवितव्य अवलंबून आहे. श्रीरंगला फाशी तर नक्कीच होत नाही. यदाकदाचित जन्मठेप झालीच तर तुमची जमीन ओस पडणार आहे. गावातला एकही पुरुष किंवा स्त्री तुमच्या शेतावर कामासाठी येणार नाही! दुसऱ्या गावचे मजूर आणू म्हणाल तर तेही शक्य होणार नाही. बाहेरचा मजूर गावच्या पांढरीत पाय ठेवू म्हणेल तर त्याला आपले पाय गमवावे लागतील!"

"पण विश्वास, हा आमच्यावर अन्याय नाही का?"

"अन्याय? वैनीसरकार अन्याय तुम्ही केलात श्रीरंगवर! इतक्यात

शकणार नाही म्हणून मीनलला 'मला विसरून जा' असे पत्र धाडले होते.

श्रीरंगने जयसिंगला मारल्यानंतर त्याच्यावर हा खटला झाला या खटल्यात आपण काही झाले तरी श्रीरंगला अडकवणार असे मुराररावानी पद्माबाईना उघड उघड सांगूनही पद्मबाई गप्प राहिल्या होत्या. श्रीरंग खटल्यातून निर्दोष सुटला तर पुन्हा मीनल त्याच्या प्रेमात पडल्याशिवाय रहाणार नाही ही भीती त्यांच्या मनात मुराररावानीच निर्माण केलेली होती.

घोरपड्यांच्या शेतावर कामासाठी लोक जाईनासे झाले. पद्माबाईनी विश्वासला बोलावून घेतले. त्या त्याला म्हणाल्या,

"अरे जरा गावकऱ्याना समजावून सांगा ना? श्रीरंगने तो खून केला त्यात आमचा काय दोष आहे? लोक कामाला यायचे बंद झालेत! शेतीचं नुकसान व्हायला लागलंय!"

त्यावर विश्वास म्हणाला, "वैनीसरकार लोकाना वाटलं श्रीरंगच्या सुटकेसाठी तुम्ही तुमच्या बॅरिस्टर भावाना बोलावून घ्याल. खटल्यातून त्याला सोडवून घ्याल! पण तुम्ही काहीच हालचाल केली नाही! लोक नाराज आहेत!"

"विश्वास तुला वेड तर लागलं नाही ना? अरे मुरारभावोजीनी ज्या गुन्ह्याचा तपास केला त्यात मी माझ्या भावाला श्रीरंगच्या सुटकेसाठी कशी काय बोलावणार?"

"का काय अडचण होती त्यात? श्रीरंगचा बाप तुमची सेवा चाकरी करताना मेला. बायजाला तुम्ही श्रीरंगचा सांभाळ करण्याचं वचन दिलंत, यावेळी त्याच्या सुटकेसाठी तुम्ही काय केलंत? मीनल श्रीरंगच्या प्रेमात पडते आहे हे बघितल्यावर मात्र तुम्ही तुमचा मदतीचा हात आखडलात, इतकंच नव्हे तर त्या दोघांची कायमची ताटातूट व्हावी म्हणून मुराररावांच्या मदतीने त्याला पोलिसात भरती करून टाकलात. खेळात आणि अभ्यासात तो हुशार होता, त्याची पुढं शिकण्याची इच्छा

होती, पण तुम्हाला तुमच्या घराण्याची प्रतिष्ठा धोक्यात येते आहे असं वाटल्यानं तुम्ही त्याच्यावर अन्याय केलात. सर्वसामान्य चिंचलीकराना ती गोष्ट खटकली. लोक तुमच्याकडे कामाला येईनासे झाले. याला जबाबदार तुम्हीच !"

विश्वास कोणाची भीड बाळगत नव्हता. तो सडेतोडपणे बोलू शकत होता.

पद्माबाई काहीशा सचिंत होऊन म्हणाल्या, "मी श्रीरंगच्या सुटकेसाठी काही प्रयत्न केला नाही हे खरं, पण त्याचवेळी त्याला शिक्षा व्हावी असं मला कधी वाटलं नव्हतं !"

"वैनीसरकार माफ करा थोडं स्पष्ट बोलतो या प्रकरणात तुमचं वर्तन थोडं दुटप्पी घडलंय ! मुराररराव श्रीरंगविरूद्ध खोटेनाटे पुरावे करून त्याला खटल्यात अडकवणार आहे याची जाणीव होऊनही तुम्ही गप्प बसलात ! आज काल लोक फार चाणाक्ष झाले आहेत. तुम्ही चार भिंतीच्या आड काय बोलता याचा त्याना अचूक अंदाज करता येतो. तुम्ही एक गोष्ट विसरलात, ही तुमची सरकार शेरीची चाळीस एकर जमीन अमृतराव सरकार आणि तुम्ही दोघे गावकऱ्यांच्या मदतीविना कधीही कसू शकणार नाही !"

"जे झालं ते झालं, आता पुढचा मार्ग सांग ?"

"मी काय सांगू? या खटल्याचा निकाल काय लागतो यावर आमीर- उल-मुल्कांचं भवितव्य अवलंबून आहे. श्रीरंगला फाशी तर नक्कीच होत नाही. यदाकदाचित जन्मठेप झालीच तर तुमची जमीन ओस पडणार आहे. गावातला एकही पुरुष किंवा स्त्री तुमच्या शेतावर कामासाठी येणार नाही ! दुसऱ्या गावचे मजूर आणू म्हणाल तर तेही शक्य होणार नाही. बाहेरचा मजूर गावच्या पांढरीत पाय ठेवू म्हणेल तर त्याला आपले पाय गमवावे लागतील !"

"पण विश्वास, हा आमच्यावर अन्याय नाही का ?"

"अन्याय ? वैनीसरकार अन्याय तुम्ही केलात श्रीरंगवर ! इतक्यात

त्याची लग्न करण्याची इच्छा नव्हती. बायजाला पुढे करून तुम्ही त्याचं जबरदस्तीनं लग्न लावून दिलंत. शालनला श्रीरंगासाठी फक्त सहा महिने त्याग करता आला नाही? निंबोतची कुस्ती झाल्यावर तो गृहस्थी धर्माचा स्वीकार करणार होता. आता माझ्या कानावर येतंय, शालन पहिल्यापासूनच थिल्लर स्वभावाची होती. श्रीरंगने जमदाडेला ठार केले यात काही चूक नाही केली. बऱ्याच पोलिसांच्या तरुण बायका त्यानं बाटवल्या होत्यात. खात्यातले लोक अन्याय सहन करीत होते ते मुराररावांच्या दबावामुळे! पण शेवटी जय होणार सत्याचाच! ज्या जयसिंग जमदाडेला मुराररावानी सतत पाठीशी घातला तो तर गेलाच, पण आता मुराररावांची प्रतिष्ठाही धोक्यात आली! बघू निकाल काय होतो. न्यायदेवता आंधळी असत म्हणतात! कदाचित श्रीरंगला दीर्घकालीन कारावासाची शिक्षाही होईल, आणि मुराररावांचे तातडीने गुन्ह्याचा तपास केल्याबद्दल कौतुकही होईल, कुणी सांगावं?"

पद्मावाई विमनस्क अशा अवस्थेत बसून होत्या. त्या रात्री त्याना झोपही लागली नाही. विश्वासने त्याना धोक्याची जाणीव दिली होती.

दुसऱ्या दिवशी साडेबाराच्या सुमारास गावात फटाकड्या वाजू लागल्या. चार दोन औट गोळेही उडाले. गावात गेलेला संतराम धावत आला आणि व्हरांड्यात वेताच्या खुर्चीत बसलेल्या पद्माबाईना म्हणाला,

"वैनीसरकार श्रीरंग सुटला, गावकरी जल्लोष करायला लागल्यात!"

आतून सिगारेटचे झुरके घेत अमृतराव आले, त्यानी विचारलं, "कायरे संत्या गावात कसली गडबड आहे?"

"सरकार, श्रीरंग सुटला!"

"श्रीरंग सुटला? तो कसा सुटेल? स्वत: रक्तानं माखलेली कुऱ्हाड घेऊन पोलीस ठाण्यात हजर झाला होता. कायदा गाढव नाही!"

"आता काय सांगावं सरकार, चावडी म्होरं बोर्ड लावलाय सरपंचानं! घटकाभरात शिरीरंग येनार हाय. तेची मिरवनूक काडनार

म्हंत्यात गावकरी''

अस्वस्थ होऊन सिगारेटचे झुरके घेणारे अमृतराव पद्मावाईच्याकडे पहात म्हणाले, ''फोनतरी लावा दुर्गापूरला! खरं काय ते समजेल!''

अमृतरावानी फोनची भाषा करताच फोनची बेल वाजली. पद्मावाईनी उठून रिसिव्हर कानाला लावला.

''हॅल्लोऽऽऽ मी सरकारी वकील बोलतोय, एक घोटाळा झालाय बाईसाहेब!''

''कसला? श्रीरंग सुटला हाच ना?''

''तो तर सुटलाच, पण खोटे पंचनामे केले, खोटे जाबजबाब घेतले म्हणून न्यायमूर्ती बर्वेयांनी मुराररावांच्या विरूद्ध तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याचा आदेश दिल्यानं, डी.एस.पी. नी त्याना सस्पेंड केले आहे!''

''काय सांगता काय?''

''हो, खरे तेच सांगतो आहे! मुराररावानी अमृतरावाना तात्काळ इकडं पाठवा असा निरोप दिला आहे.''

त्यानंतर सरकारी वकिलानी पद्मावाईना निकालाचा तपशील सांगितला.

''माय गॉड! अहो, तुम्हाला तात्काळ जायला हवं! मुरारभावोजीना सस्पेंड केलंय!''

''सस्पेंड? त्या न्यायमूर्तीचं डोकं बिघडलंय का काय?''

''आता आपलं डोकं बिघडायची वेळी आलीय, न्यायमूर्तीनी श्रीरंगला जमदाडेच्या मृत्यूबद्दल जबाबदार धरलं. त्याला दोन वर्षाची शिक्षाही दिली. म्हणे ज्या परिस्थितीत त्याच्याकडून हा अपराध घडला ती परिस्थिती विचारात घेऊन त्यानी त्याला सजा भोगायला न पाठवता केवळ ताकीद देऊन सोडून दिलाय.''

''पण मुरारदादाना सस्पेंड कशासाठी केलंय?''

''न्यायमूर्तीनी म्हणे निकाल देण्यापूर्वी डी.एस.पी.ना कोर्टात

बोलावून घेतले होते. खोटा पुरावा करण्याचा गुन्हा दखलपात्र म्हणजे कॉग्निझेबल नसतो, म्हणून न्यायमूर्तींनी स्वत: डी.एस.पी. ना बोलावून तात्काळ जरूर ती कारवाई करण्याचे आदेश दिले. भावोजीविरूद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेशही जज्ञानी दिले आहेत!''

''या राज्यात काही अर्थ राहिला नाही, मी जातो, काय करता येईल ते पाहू.

अमृतराव आणि पद्माबाई निघण्याची तयार करीत असतानाच, मीनल धिंमी धिमी पांवलं टाकीत खाली आली आणि पद्माबाईना म्हणाली, ''मा, तुम्ही जाता आहात तर आणखीन एक काम करा!''

''कोणतं?''

''बदफैली पत्नीला पती घटस्फोट देऊ शकतो की नाही याचीही चौकशी करून या!''

अमृतराव आणि पद्माबाई दोघेही पुतळ्यासारखे निर्जीव झाले. थिजलेल्या डोळ्यानी ते एकमेकाकडे पहात राह्यले. मीनल आली तशीच धिमीधिमी पावलं टाकीत माडीवर गेली. ती माडीवर जाताच वर धाडकन् बंदुकीचा बार उडाला. अमृतराव आणि पद्माबाई माडीवर आले. मीनलने बारा बोअरच्या बंदुकीने हवेत बार काढला होता. तिच्या हातातून बंदूक हिसकावून घेण्याचा प्रयत्न करीत अमृतराव म्हणाले,

''हे काय करतेस?''

''आनंदाचा क्षण साजरा करते आहे, समजलं, आता फक्त एकच बार उडाला आहे, मला आणखी चार बार उडवायचे आहेत. आपल्या घराण्याची ही प्रथा आहे ना? आता तोफा नाहीत, नाहीतर पाच तोफा उडवण्याचे आदेश मी दिले असते,''

विक्रमला मुलगा झाल्यावेळी अमृतराव हेच वाक्य बोलले होते.

पद्माबाई आणि अमृतराव हतबल होऊन एकमेकाकडे पहात असताना मीनल अमृतरावाना म्हणाली 'जा, बंधुराजांच्या सुटकेसाठी प्रयत्न करायला जा, उगाच उशीर होतोय! पण एक करा, तुमची

वंशावळ तेवढी सोबत घेऊन जाऊ नका, तिचा तिथं काही उपयोग होणार नाही! हंSSS म्हणे आम्ही अमीर-उल-मुल्क? इतिहास जमा झालेली पदवी आहे ती!" मीनल भ्रम झाल्यासारखी बोलत होती. गेल्या वर्षभरात झालेल्या मानसिक दडपणाचा विस्फोट होत होता.

पद्माबाईना भविष्याची चाहूल लागली होती. ती दोघे विमनस्क अशा स्थितीत दुर्गापूरला जायला निघाले. त्यांची मोटार गावच्या वेशीजवळ आली तेव्हा समोरून श्रीरंगची मिरवणूक वाजत गाजत येत होती. गुलालानं माखलेल्या श्रीरंगच्या गळयात गावकरी हार घालत होते. पद्माबाई मोटारीतून उतरल्या. त्या गर्दीत श्रीरंगला हार घालण्यासाठी उभ्या असलेल्या पोलीस पाटलाच्या हातातील हार घेऊन पद्माबाईनी तो श्रीरंगच्या 'गळयात घातला. ते पाहून अमृतरावानी कपाळावर हात मारून घेतला. त्यांचा स्वतःच्या डोळ्यावर विश्वासच बसेना. गावकऱ्यानी मात्र ती घटना पाहून जल्लोष केला. वैनीसरकार झिंदाबाद! वैनी सरकार झिंदाबाद."

झिंदाबादच्या त्या घोषणेने चिंचलीचा आसमंत दुमदूमत होता.

S.Kumar

— समाप्त —


सिंदबाद
बाबा कदम